हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा

प्रा. शं. दा. चितळे
विशारद अेम ए बी टी

★

हिंदी के द्वारा सारा भारतवर्ष अेकसूत्रमें पिरोया जा सकता है।

—महर्षि दयानन्द

★

प्रकाशक :—मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला, १९६।८५ टिळक रोड, पुणें २.
मुद्रक :— वि. गं. केतकर, महाराष्ट्र मुद्रण शाळा छापखाना,
६२४ सदाशिव, पुणें २.

प्रस्तावना

आपल्या देशाच्या राष्ट्रभाषेसंबंधानें कोणासही शंका वाटण्याचें वास्तविक कांहीं एक कारण नाहीं, कारण ती एक स्वभावसिद्ध गोष्ट आहे. अिंग्लंडची राष्ट्रभाषा कोणती, फरान्सची राष्ट्रभाषा कोणती असा प्रश्न जर कोणी केला, तर त्या देशाचें लोक प्रश्न विचारणारास मूर्खांत काढतील, कारण त्यांच्या राष्ट्रभाषेबद्दल त्या देशांतीलच नव्हे तर इतर देशांतील लोकांसही शंका वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर तशी शंका वाटण्याचें कांहींसुद्धां कारण नाहीं. अशीच स्थिति आमच्या या देशांतही राष्ट्रभाषेसंबंधीं असली पाहिजे. ती तशी आहेही. पण आमच्या देशांत राष्ट्रभाषेसंबंधानेंही सध्यां पक्षोपपक्ष निर्माण होऊन येथें त्यावर रणें माजविण्यापर्यंत विद्वानांविद्वानांत पाळी आलेली आहे! ही निःसंशय आश्चर्य करण्याजोगीच स्थिति आहे.

हिंदुस्थानांतील विद्वानांमध्येंच आपल्या राष्ट्रभाषेविषयीं असा संशय कां उत्पन्न व्हावा व या निसर्गसिध्द विषयावर येथें रणें कां बरें माजावी? स्वभावसिद्ध तत्त्वास मान्यता न देणारे येथेंच कां उत्पन्न व्हावे? हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

कोणत्याहि देशांत जाऊन पहा, जी भाषा बहुसंख्य लोक जाणूं शकतात, तीच तेथील लोकांची राष्ट्रभाषा असते. अल्पसंख्यांकाना संतुष्ट करण्यासाठीं राष्ट्रभाषेमध्यें संकर करावा असें म्हणण्यास कोणत्याही देशांतील ज्ञाते लोक उद्युक्त होत नाहींत. पण आपल्या देशांतील राष्ट्रीय म्हणवल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांचा निराळाच प्रकार दिसून येत आहे. बहुसंख्यांकाना समजणारी भाषा, राष्ट्रभाषा म्हणून मानण्यास ते तयार नाहींत व जी भाषा सर्व लोक तिरस्कारीत आहेत, असली नवी रचना करून व नवी बनवलेली संकरभाषा या भारताची

राष्ट्रभाषा करावी असा खटाटोप ते सध्यां करीत आहेत ! ! म्हणूनच या सहज सुटूं शकणाऱ्या प्रश्नावरही येथें रणें माजलीं आहेत !

आपल्या देशाची लोकसंख्या ४० कोटी आहे. यापैकीं जवळ जवळ ३० कोटी लोकांस ‘ हिंदी ’ भाषा न्यूनाधिक्यपणें समजते. २० कोटी लोक ही भाषा कमीअधिक प्रमाणांत बोलूं शकतात व त्याखेरीज सोळा कोटी लोकांस ती उत्तम बोलतां येते. तसेंच हिंदीभाषा संस्कृत-निष्ठ असल्यानें व तिच्याप्रमाणें सर्व प्रांतीय भाषा संस्कृतनिष्ठच असल्यानें हिंदी भाषा ही भारतीय लोकांस लवकर समजते.

उर्दू भाषा हिंदुस्थानांत २ कोटी लोकांसही समजत नाहीं, मुसल-मानांपैकीं तीनचतुर्थांश लोकांसही उर्दू समजत नाहीं व इंग्रजी तर त्याहूनही कमी लोक समजूं शकतात. तेव्हां उर्दू व इंग्रजी या भाषा राष्ट्रभाषा होण्यास या देशांत योग्य नाहींत, हें सर्वांसच मान्य आहे. केवळ शिकलेले थोडेसे मुसलमान, उर्दू हीच राष्ट्रभाषा करावी असा हट्ट धरतात. पण तो हट्ट टिकण्यासारखा नाहीं हें त्यांसही अन्तर्यामीं पटत असतें.

इतर कोणतीहि भारतीय भाषा यापेक्षां अधिक लोकांस समजत नाहीं, तेव्हां इतर भाषांचा विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं. उर्दूची बाजू मुसलमानांनीं धरली आहे. इंग्रजीची बाजू इंग्रजांनीं, मिशनऱ्यांनीं, युरेजियनांनीं व आपल्यापैकींच कांहीं अंधानुकरणशील लोकांनीं धरली होती. पण आतां इंग्रज येथून गेले असल्यानें इंग्रजीचा पक्ष अगदींच निर्बल झाला आहे. राहतां राहिला उर्दूवाल्यांचा. पण तोही पक्ष अगदींच अल्पसंख्य असल्यामुळें त्या पक्षास स्वतःचें असें बल नाहीं. तथापि त्यांच्याजवळ अत्याचाराचें बल असल्यामुळें अत्याचारांना घाबरणारे अनुनयशील लोकही हा पक्ष केव्हां केव्हां उचलून धरूं लागतात ! इतकें सर्व होऊनही उर्दूचा पक्ष टिकणार नाहीं इतकें आतांपर्यंतच्या चर्वितचर्वणानंतर ठरल्यासारखे झालें आहे.

ऊर्दूचा पक्ष मुसलमानांचा. पण तो तर अगदींच अल्पसंख्य. यामुळें तो टिकत नाहीं. तो उचलून न धरला तर मुसलमान रागाव-तील, यासाठीं अनुनयशील लोकांनीं हिंदुस्तानीचा नवा पक्ष निर्माण

केला व या पक्षाच्या हातीं या देशाची राजसत्ता आल्यामुळें या पक्षाला सध्यां अधिक बल प्राप्त झालें आहे.

सरासरी दीडशें वर्षांपूर्वी इंग्रजांनीं प्रथम हिंदुस्तानीची कल्पना काढली व कोश छापले, क्रमिक पुस्तकें छापलीं, सरकारी मान्यता दिली. इतकें करूनही ही हिंदुस्तानी, इंग्रजांचें सैस, खानसामे, चपरासी व इतर परिचारक आया आदिकांच्या बाहेर कोणीही आपलीशी केली नाहीं. कारण ही मुसलमानास अप्रिय होती व हिंदूंस ती आवडत नव्हती. याचें कारण या दोनही जातींचा आत्मा जागृत व्हावा असें कांहींच वाङमय या हिंदुस्तानींत नव्हतें व होणें शक्य नव्हतें.

अशी ही या दोनही प्रमुख जातींकडून परित्यक्त, तिरस्कृत व अपमानित झालेली हिंदुस्तानी प. पूजनीय महात्मा गांधींजींनी हातीं घेतली व काँग्रेसचा तिला आधार देऊन ही राष्ट्रभाषा करावी असा अट्टाहास चालविला आहे. शेंकडा ५० हिंदी शब्द घ्यावे व ५० उर्दू (फारसी-अरबी) शब्द घ्यावे व त्यांच्या सहकारानें हिंदुस्तानी बनवावी; म्हणजे ती मुसलमानांना व हिंदूंना, शेंकडा त्यांचे ५० + ५० शब्द घेतल्यामुळें प्रिय होईल अशी यांची अपेक्षा होती. पण या प्रयत्नाला यावें तसें अपेक्षित फल आलेलें नाहीं व येईल असेंही वाटत नाहीं. कारण असें केल्यानें हिंदुमुसलमान एक होतील असें यांनीं मानलें होतें; तें घडलें नाहीं. इतकेंच नव्हे तर पूर्वीं कधीं नव्हती इतकी दुफळी या दोन जातींत सध्यां झाली आहे. त्यांनीं निराळें पाकिस्तान हिसकून घेतलें व तेथें उर्दू भाषा प्रारंभिली, तेव्हां ते यापुढें हिंदुस्तानी स्वीकारतील ही आतां आशा करण्याचें कारण नाहीं. राहतां राहिले हिंदु लोक. यांना ही संकर भाषा प्रिय होणें शक्यच नव्हतें. तेव्हां ही हिंदुस्तानी परिस्थितीनेंच मरणाच्या पंथास लागली आहे. तथापि ज्या बाजूला पू. महात्मा गांधी असतात तो पक्ष कितीही निर्बल असला तरी तो महात्माजींच्या आशीर्वादानें कांहीं काळ तरी टिकणें शक्य आहे, या कारणानें या आपल्या देशांत कांहीं काळ हा राष्ट्रभाषेचा वाद टिकेल असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं.

घटना समितीच्या काँग्रेस सदस्यांनीं गेल्या दोन महिन्यांत प्रबळ बहुमतानें निर्णय घेतला असून 'आपली राष्ट्रभाषा हिंदी व राष्ट्रलिपि देवनागरी आहे' असें ठरवलें. महात्माजींचा पक्ष या योगें निर्बल आहे हेंही दाखवलें. पण एवढ्यानें हें स्थायीपणानें ठरलें असें मात्र म्हणतां येत नाहीं. कारण आतां या पुढें स्वतः महात्माजी आपला भार घटना समितीवर घालून दोन वेळ घेतलेला निर्णय बदलून घेण्याच्या इरेस पडले आहेत, असें अशुभ वृत्त नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. परमेश्वरानेंच या वेळीं भारतीय राष्ट्राच्या राष्ट्रभाषेचें हिंदीचें– या संस्कृतनिष्ठ–राष्ट्रभाषेचें संरक्षण करावें.

राष्ट्रभाषेचा प्रश्न अशा रीतीनें महासंकटांत सध्यां असतांना जनमताला योग्य वळण लावण्यासाठीं, समतोलपणानें, सरळ सत्य व योग्य माहिती सुबोध रीतीनें देणारीं लहान मोठीं पुस्तकें राष्ट्रांतील प्रत्येक प्रातांतील प्रत्येक प्रांतिक भाषेंत प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. '**हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा**' या नांवाचें अशा प्रकारचें पुस्तक प्रा. शं. दा. चितळे, एम्. ए., बी. टी., रा. विशारद, पुणें यांनीं यावेळीं लिहून मराठी वाचकावर फारच मोठे उपकार केले आहेत. या पुस्तकाला वरील कारणासाठीं सामयिक महत्त्व तर आहेच, पण हिंदी–उर्दू हिंदुस्तानी या भाषांच्या संघर्षाचा इतिहास ज्यांना जेव्हां पहाण्याची बुद्धि होईल, त्यावेळीं निर्विकार मनानें लिहिलेलें हें पुस्तक त्यांना सर्व आवश्यक माहिती देऊं शकेल. या दृष्टीनें या पुस्तकाला स्थायी महत्त्वही आहेच. प्रा. चितळे यांनीं या राष्ट्रभाषेच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करणारें पुस्तक योग्य वेळी प्रसिद्ध केलें यामुळें महाराष्ट्रीय जनतेवर फारच उपकार झालेले आहेत व निःपक्ष वाचक या विषयीं कृतज्ञताच व्यक्त करतील.

या पुस्तकांत कोठेंही विपक्षासंबंधीं कटु शब्द प्रयोग नाहीं, पण प्रमाणें मात्र अशी पद्धतशीर दिलीं आहेत कीं, समंजस विपक्षी माणूस हें पुस्तक वाचून या हिंदीच्या पक्षास मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

या पुस्तकांत राष्ट्रभाषेची व्यापकता, राष्ट्रभाषेचे दहा गुण, स्वतः-सिद्ध राष्ट्रभाषा, उर्दू व हिंदी, हिंदुस्तानी–हिंदीचें स्वरूप, राष्ट्रलिपि.

व तिचे गुण, रोमन व फारसी लिपीची अपूर्णता, नागरी लिपीच सर्व गुणसंपन्न, कांहीं प्रश्न व त्याचीं उत्तरें इतके विषय मुख्यतः आहेत. या प्रत्येकांत अनेक उपविषय आले आहेत. आपल्या राष्ट्रभाषेसंबंधीं आपलें मत स्वतः बनवावें अशी स्थिति सध्यां निर्माण झाली असल्यानें हें पुस्तक साद्यन्त वाचावें अशी विनंती करतों. आपल्या राष्ट्रावर सध्यां आणीबाणीचा प्रसंग आलेला आहे. या हिंदुस्थान देशास 'हिंदुस्थान' सुद्धां म्हणू नये, कारण यामुळें हिंद्वेतरांना वैषम्य वाटेल असें भय वाटून आमच्या पुढाऱ्यांची छाती धडधडूं लागली आहे ! ज्या मुसलमानांस वैषम्य वाटेल असें यांस वाटते तेच यास परवांपर्यंत 'हिंदुस्थान' म्हणत होते हे **'हिंदोस्ताँ हमारा'** या अिकबाल या मुसलमान कवीच्या पद्यावरून वाचकांस समजूं शकेल. मुसलमान कवीच 'आमचा हिंदुस्ताँ' असे म्हणत होते, अर्थात त्यांस यावेळी हिंदुस्थान या नांवाचें वैषम्य वाटत नव्हतें हें उघडच आहे. पण आज याच पुढाऱ्यांस हिंदुस्थानास हिंदुस्थान कसें म्हणावें अशी धडकी भरली आहे ! आपल्या देशास काय म्हणावे हें यांस सुचेनासें झालें आहे. भारत, भारतवर्ष, आर्यावर्त हे तर 'हिंदुस्थान' या नांवापेक्षांही कडू शब्द आहेत ! 'इंडिया' म्हणावें तर तो इंग्रजी शब्द आहे, अशा पेचांत हें सध्यां सांपडले आहेत! ! अशा वेळी या देशाची **राष्ट्रभाषा** हिंदीच आहे असे सप्रमाण सिद्ध करणाऱ्या व प्रतिपक्षास निरुत्तर करणाऱ्या या ग्रंथाचें विशेषच महत्व आहे. राष्ट्रभाषेसंबंधीं कोणताही महत्वाचा प्रश्न आपण घ्या. त्याचें योग्य उत्तर आपणांस या पुस्तकांत निर्विकारपणानें दिलेलें सांपडेल.

हिंदीच राष्ट्रभाषा आहे हे दाखविणारीं अनेक पुस्तकें हिंदीमध्यें प्रसिध्द झालेलीं आहेत. त्या ग्रंथांचें आधार या पुस्तकांत दिलें असून आपल्या वाङमयीन प्रतिभेनें व अनुभवानें आणखी बरीच भर लेखकानें त्यांत घातलेली आहे. या दृष्टीनें हें पुस्तक या विषयावरील सर्व प्रश्नांच्या उत्तरांचें संग्राहक आहे असे म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाही. या पुस्तकांतील विषय प्रतिपादनाची जुळणी व क्रमवार मांडणी तर प्रतिपक्षालाही निरुत्तर करणारी आहे.

हिंदुस्तानी (हिंदुस्थानी नव्हें बरें!) चा प्रसार करूं इच्छिणारे उत्तर भारतांत आपला प्रचार करीत नसून दक्षिण भारतांतच विशेष प्रचार करीत आहेत. याचें कारण हें कीं दक्षिण भारतांत खरी हिंदी कोणती व बनावटी हिंदुस्तानी कोणती हें समजणारे कोणी नाहींत. या जनतेच्या अज्ञानाचा लाभ हे हिंदुस्तानीचे प्रचारक सध्यां घेत आहेत. यासाठीं मराठीमध्यें हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे, तसेंच याचे अनुवाद गुजराथी, कानडी, तेलगु, मल्याळ आदि दक्षिण भाषांत व्हावयास पाहिजेत. कोणीं तरी हें कार्य यावेळीं करावें अितके हें अत्यंत महत्वाचें काम आहे.

लिपीचाही प्रश्न लेखकांनीं चांगलाच हाताळला आहे. देवनागरी बरोबरच ऊर्दू लिपीही शिकावी असा हिंदुस्तानीच्या प्रचारकाचा आग्रह असतो. यानें जो अत्याचार होणार होता तो पुष्कळांच्या ध्यानीं आला नव्हता. जर उर्दू या रीतीनें आवश्यक म्हणून शिकविली गेली असती, तर तीच लिपि पाकीस्तानची लिपि ठरल्यामुळें अखण्ड हिंदुस्थानची लिपी उर्दू झाली असती व उरलेल्या हिंदुस्थानचीच तेवढी नागरी लिपी झाली असती! पण महाराष्ट्रांतील कॉंग्रेसनिष्ठानींच महाराष्ट्रापुरता सक्तीनें उर्दू न शिकण्याचा अपवाद करून घेऊन या उर्दूच्या आपत्तींतून महाराष्ट्रास सोडविला. पण हिंदुस्तानीच्या पकडींत मात्र ते सांपडलेच आहेत!

आतां या पुस्तकानें हिंदुस्तानीचा व उर्दूचा असे दोनही कांटे काढून टाकले आहेत. आम्हाला असा विश्वास वाटतो कीं या पुस्तकानें उर्दू–हिंदुस्तानीचें बंड मोडलें जाईल व आपल्या खऱ्या हिंदीला राष्ट्रभाषा मानलें जाईल.

राष्ट्रभाषा व राष्ट्रलिपि या संबंधीं हें पुस्तक महाराष्ट्रीयांनीं घरोघर अभ्यासण्यासारखें आहे. योग्य वेळीं लिहिलें म्हणून लेखकांचें आभार मानून या पुस्तकाचा परिचय करून देण्यासाठीं लिहिलेले हे चार शब्द येथेंच समाप्त करतों.

स्वाध्याय मंडळ
औंध, जि. सातारा.
ता. २२।१२।४७

निवेदक
श्री. दा. सातवळेकर.
संपादक 'पुरुषार्थ'

लेखकाचें निवेदन

जो सिद्धांत किंवा प्रश्न स्वयंसिद्ध नि सर्वमान्य असावा,तोच आधार देअून सिद्ध करण्याचा प्रसंग यावा हें खेदकारक आहे. पण अशी वेळ आल्यावर स्वस्थ बसणें हें कार्यकर्त्यांना शक्य नसते. हिंदी ही राष्ट्रभाषा असतांना तिच्याविरुद्ध अितके आक्षेप घेण्याचा अट्टाहास चालावा याचें वाअीट वाटतें; पण लोकतंत्र युगांत केवळ देवावर भरंवसा ठेवून स्वस्थ बसणें राष्ट्रास हानिकारक असते. ही हानि होअू नये म्हणून जनतेस जागृत करणें हाच खरा मार्ग होय. त्याच हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे.

राष्ट्रभाषेच्या प्रश्नावर मराठींत वेळोवेळीं कांहीं लेख किंवा १–२ छोटीं पुस्तकें प्रकाशित झाली आहेत. परंतु तेवढ्यानें सर्व विषय लक्षांत येत नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत या प्रश्नांचा अनेक अंगांनीं विचार केला आहे. या वादांतील मुद्दे नागरिकांस समजावे नि हिंदी प्रचारकांस नागरिकांनीं विचारलेल्या प्रश्नास अुत्तरें देण्याअितकी माहिती मिळावी या हेतूनें प्रकरणांची रचना केली आहे. प्रत्येक प्रकरण सामान्यतः स्वयंपूर्ण आहे.

कांहीं प्रकरणें लेखरूपानें '**वाङ्मय शोभेंत**' नि '**तरुण हिंदुस्थानां**'त प्रकाशित झाली असल्यानें त्यांची रचना स्वपंत्रपणें करणें आवश्यकच झाले. साहजिकच कांहीं मुद्द्यांची पुनरुक्ति केली आहे. यामुळें विद्वान् वाचकांची गैरसोय झाली असली तरी अितरांचा फायदा होअील असा मला विश्वास वाटतो.

राष्ट्रभाषेचा प्रश्न हा हिंदु-मुसलमानांचा धर्मविषयक प्रश्न नाहीं. भिन्नभिन्न प्रांतांतील सर्व धर्मांचे नागरिकांनीं अेकमेकाशीं अेका भाषेंत कसें बोलावें नि अेकाच लिपींत ही भाषा कशी लिहावी असा प्रश्न राष्ट्रापुढें आहे. तसेंच हा प्रश्न सोडविण्याचा मक्ता अेकाच राजकीय पक्षास दिलेला नाहीं, तर सर्व राजकीय पक्ष आणि समाजकारण, धर्म-कारण, शिक्षणकारण अित्यादी क्षेत्रांत काम करणाऱ्या सर्वांच्या समान अधिकाराचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न तात्कालिक स्वरूपाचा म्हणून कसातरी हातावेगळा करून टाकण्यासारखा नाहीं. स्वतंत्र भारताचे चिरंतन अैक्य टिकविण्याचा नि राष्ट्राचें आत्मीयत्व वर्धन करण्याच्या माध्यमाचा हा प्रश्न आहे. मानवी जीवनांत श्वासाचें जें महत्त्व तेंच राष्ट्राच्या जीवनांत भाषेचें आहे. श्वासोच्छ्वास कोंडल्यास डॉक्टरा-कडून औषध घ्यावें लागेल. तें घेतांना तो कोणत्या पक्षाचा आहे हें आपण पहात नाहीं किंवा डॉक्टरही रोग्याचा राजकीय पक्ष लक्षांत घेअून औषध देत नाहीं. राजकीय पक्षापेक्षां श्रेष्ठ जें जीवन त्याचा विचार सर्व करतात, तसेंच राष्ट्रभाषेसंबंधानें नेत्यांनीं करावयास हवे.

राष्ट्रभाषेच्या प्रश्नासंबंधीं लिहितांना म. गांधी किंवा हिंदुस्तानीवादी यांच्या विचारांची चर्चा मला करावी लागली आहे. त्यांच्या राष्ट्रैक्य हितबुद्धीविषयीं मला आदर आहे, परंतु त्यांचें भाषा-धोरण अनुचित आहे हें स्पष्टपणें मीं दर्शविलें आहे. असें करतांना केलेली टीका मर्यादेंतच रहावी असा मी प्रयत्न केला आहे. त्यांतून कांहीं अधिकअुणा शब्द गेला असल्यास त्यांनीं क्षमा करावी.

चर्चा करितांना अनेक लेखांचें, भाषणांचे नि पुस्तकांचे आधार मी दिले आहेत. हेतु अेवढाच कीं हा विचार भाषाभिज्ञांचा आहे, केवळ

माझ्यासारख्या सामान्य हिंदी प्रचारकाचा नाहीं हें वाचकांच्या ध्यानांत यावें. अनेक ठिकाणीं मूळचे हिंदी अुतारे मी त्याच भाषेंत दिले आहेत, मराठी वाचकांना त्याचा भावार्थ समजेल व सहजगत्या हिंदी भाषेचें स्वरूपही त्यास वाचण्यास मिळेल. ही अुदाहरणें गोळा करण्यासाठीं मला अनेक मासिकें नि इतिवृत्तें यांचे संदर्भ संग्रहीत करावे लागले. गेलीं १० वर्षें हिंदीचें अध्ययन–अध्यापन करीत असतां जें जें साहित्य मिळालें तें मीं जवळ ठेवलें, वेळोवेळीं व्याख्यानप्रसंगीं त्यांचा अुपयोग केला नि त्याची पद्धतशीर मांडणी या पुस्तकांत केली. माझे मित्र श्री. बा. ग. साळस्कर, राष्ट्रभाषाकोविद यांनीं राष्ट्रभाषाप्रेमामुळें वेळ काढून, माझ्या लहरीप्रमाणें, मी सांगेन त्या वेळेस मजकूर उतरून घेण्याचे, प्रसंगोपात् नवीन आक्षेप मांडून चर्चा करण्याचें नि अनेक व्यापांत असलेल्या मला, हा विषय लिहिण्याची टोंचणी चालू ठेवून कर्तव्य जागृत ठेवण्याचे कार्य केलें यासाठीं मी त्यांचा आभारी आहे संदर्भासाठीं लागणारी पुस्तकें हिंदी प्रचारसंघ, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, पुणें हिंदी विद्यालय या संस्थांनीं दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. वस्तुतः अशा पुस्तकांतून आर्थिक प्राप्ति होण्याची आशा नसतांना, हें पुस्तक प्रकाशित करण्याचें कार्य मनोहर ग्रंथ मालेचे चालक नि वाङ्मय शोभेचे सुविद्य संपादक श्री. मनोहर महादेव केळकर यांनीं अंगावर घेतलें. यामुळें हें पुस्तक प्रकाशित होत आहे यासाठीं त्यासही मी धन्यवाद देतो.

लोकसंग्रहांतील जुळणीसांना मजकुरांतील टीपा खालींवर करतांना फार त्रास होअी, पण त्यांनीं तो त्रास राष्ट्रप्रेमामुळें सहन केला यासाठीं त्यांना धन्यवाद देणें अुचित आहे. या विषयावर लिहावें असें फार दिवस मनांत होते, तो संकल्प पूर्ण झाला म्हणून मानवी स्वभावानुसार मला आज समाधान वाटत आहे.

पुस्तकास प्रस्तावना द्यावी अशी विनंति औंधच्या स्वाध्याय मंडळाचे वयोवृद्ध संचालक व 'वैदिक धर्म' (हिंदी) नि 'पुरुषार्थ' या मासिकाचे संपादक पं. श्री. दा. सातवळेकर यांना मी केली. गेलीं ४०

वर्षें ते राष्ट्रभाषा हिंदींतून लिहीत आहेत. या वर्षीं मुंबअीस भरलेल्या राष्ट्रभाषा परिषदेच्या अध्यक्षपदींही त्यांची निवड झाली होती. त्यासाठीं तें भाषण लिहीत असतांना त्यांना मी प्रस्तावनेसाठीं विचारलें. तथापि त्यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहून दिली यासाठीं त्यांचा मी आभारी आहे.

पुस्तकांतील गुण आणि वैगुण्यें वाचकांनीं अवश्य कळवावींत, त्यामुळें मला राग न येतां हिंदीची सेवा करण्यास अधिक अुत्साह मिळेल अेवढें अभिवचन मी त्यांना देतो.

२८–१२–४७
३८९ अ २ सदाशिव, पुणें २.

शं. दा. चितळे

अनुक्रमणिका

१ : : नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

कार्यकर्त्यांचा व्यामोह

आपल्या देशाच्या अुन्नतीसाठीं जे अनेक प्रयत्न चालू आहेत त्यांमध्यें, अहिंदी प्रांतांतून हिंदी या राष्ट्रभाषेचा प्रचार करावा या हेतूनें चाललेलें कार्य महत्त्वाचें आहे. आपलें जीवन त्यागपूर्वक याच कार्यास अर्पण करणारे कित्येक कार्यकर्ते या क्षेत्रांत आज वावरत आहेत. नागरिक स्त्री-पुरुषांची प्रवृत्तिही हिन्दी शिकण्याकडे अधिकाधिक होत आहे. याच बरोबर आपल्यास असें आढळून येतें कीं आपल्या अुद्दिष्टाबद्दल कार्यकर्त्यांमध्यें व्यामोह अुत्पन्न झालेला आहे. राष्ट्रभाषेचें नांव नि तिचें स्वरूप याविषयींच्या वादविवादामुळें कार्यकर्त्यांचीं मनें प्रसंगोपात् गोंधळूनही जातात अितका हा वाद तीव्र झाला आहे.

नागरिकांच्या मनांतील शंका

सर्व साधारण नागरिकांमध्यें कांहीं जण या प्रश्नाकडे अुपहासानें पाहातात तर कांहींना सहानुभूति वाटते व तिचें महत्त्वही पटतें. तथापि राष्ट्रभाषेच्या चळवळीविषयीं अशा रीतीनें सहानुभूति दाखविणाऱ्या या सुबुद्ध नागरिकांच्या मनांतही अनेक शंका येत असतात. हिन्दी हीच राष्ट्रभाषा कां ? मराठी किंवा बंगाली भाषेला हा मान कां मिळूं नये ? अेका गटाकडून असा आग्रह कां धरला जातो कीं, 'अुर्दू' हीच राष्ट्रभाषा असावी ? ' हिन्दी यानें हिन्दुस्तानी ' म्हणजे काय ? पाकिस्तान होण्या-

पूर्वी नि झाल्यावरही 'हिन्दुस्तानी' ला राष्ट्रभाषा माना असा प्रचार गांधीजी कां करतात?

राष्ट्रभाषा अेक असावी असा अट्टाहास करीत असतां, ही भाषा दोन लिप्यांत लिहावी आणि छापावी असें सांगण्यास हेच लोक धजतात तरी कसे? वस्तुतः नागरी हीच राष्ट्रलिपि असतांना तिच्या जोडीला फारसी लिपि (अुर्दू लिपि) बसविणें अयोग्य नाहीं काय? 'रोमन लिपीला (इंग्रजी लिपीला) राष्ट्रलिपीचें स्थान द्या' असें म्हणणाऱ्यांचें कोठें चुकतें? आपली मातृभाषा जी मराठी तिच्यावर हिंदी प्रसारानें आक्रमण होत नाहीं काय? इंग्रजी भाषेच्या प्रसारानें जशी आपल्या मातृभाषेची गळचेपी झाली तशी या नव्या आंदोलनानें होअील कीं काय? अिंग्रजी भाषा हीच राष्ट्रभाषा झाली तर काय बिघडतें, असा प्रश्न विचारणारे विद्वान् आपल्या देशांत आहेत. 'आज जें अिंग्रजी भाषेला समाजांत स्थान आहे तें हिन्दीस मिळालें पाहिजे' असें म्हणणें म्हणजे अुच्च शिक्षणाचें माध्यमही हिन्दी व्हावें असा अर्थ होत नाहीं कां? यामुळें हा मान मातृभाषेचा असतांना तो हिन्दीला दिला जात नाहीं काय? प्रांतिक सरकारचा कारभार हिन्दींतून चालणार काय? या अनेक प्रश्नांची साधकबाधक चर्चा या लेखांतून केलेली आहे.

व्यावहारिक दृष्टीनें

तात्त्विक विवेचनाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी व्यावहारिक दृष्टया अेकभाषेच्या प्रचाराला महत्त्व आहे. पुण्यासारख्या महाराष्ट्राच्या केंद्रांत बाजारहाट करावयास गेल्यास आपल्याला हिन्दी आलें असते तर बरें झालें असतें असें अेकादे वेळीं तरी नागरिकाला वाटूं लागतें. पुणें–मुंबअीच्या आगगाडींत प्रवास करतांना देखील आपल्या डब्यांत सभोंवार नजर टाकली तर असें दिसतें कीं आपल्या भोंवती अनेक प्रांतांतील लोक बसलेले आहेत. अशा माणसांशीं बोलावयाचें तर तें कार्य मराठीनें होत नाहीं. अेकाच कचेरींत, बँकेंत किंवा कारखान्यांत काम करणाऱ्यांतही कितीतरी अमहाराष्ट्रीय आहेत! यांपैकीं ज्यास अिंग्रजी येत नाहीं ते लोक आपआपसांत मोडक्या तोडक्या हिन्दी भाषेंत बोलून

आपला व्यवहार चालवितात. अशी परिस्थिति असल्यानें राष्ट्रभाषेचा प्रश्न हा सामान्य नागरिकांच्या जीवनाशीं निगडित झालेला आहे.

परभाषीय पण ' परके ' नसलेले शेजारी

आणखी अेक वैशिष्टच या प्रश्नास आहे. मुंबअीसारख्या ठिकाणीं चाळींत आपल्या शेजारीं रहाणारा बिऱ्हाडकरूच पुष्कळ वेळां परप्रांतीय भेटतो. दोन्ही घरांतील मुलाबाळांचा नित्याचा संबंध येतो, पण समान भाषा नसल्यानें व्यवहारास अडचण होते. आणि हे परप्रांतीय लोक वस्तुतः ' परके ' नसतात. आपल्या धर्माचे, आपल्याप्रमाणें नवरात्र, दसरा, दिवाळी हे अुत्सव साजरे करणारे, त्याच श्रीरामश्रीकृष्णांना पूज्य मानणारे, त्याच गंगा-यमुना नदीचीं स्तोत्रें संस्कृतांत म्हणणारे असे असतात. केवळ भाषा आणि पोषाख यांमध्यें भेद आढळून येतो. साहजिकच या भिन्नभिन्न प्रांतीयांना अेकमेकांत मिळून मिसळून रहावेंसें वाटतें, परंतु परस्परांची भाषा न कळल्यानें या शेजाऱ्यांना हें स्नेहसौख्य पूर्णपणें मिळत नाहीं. सुशिक्षित शेजारीपाजारी धेड-गुजरी अिंग्रजींत कसावसा व्यवहार करतात; परंतु आबालवृद्धांना ही भाषा अवगत नसल्यानें त्यांची अडचण होते.

संपन्न नि समर्थ भाषा पाहिजे

बारीकसारीक विषयांवर बोलण्याची जर अेवढी अडचण तर मग राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि आर्थिक अशा विषयावर भिन्नप्रांतीय नागरिक अेकत्र चर्चा कशी करणार? राष्ट्रीय सभा, हिंदुमहासभा, नाताळांत भरणाऱ्या अनेक विषयांच्या विद्वत् परिषदा, भारतीय महिला परिषद, भारतीय मजूर संघ, भारतीय कारखानदारसंघ अित्यादि क्षेत्रांत मुख्यतः अिंग्रजींत नि कांहीं अंशीं हिंदींत चर्चा चालते. या संस्थांतून इंग्रजी न जाणणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. सध्यांचें हें अिंग्रजीचें महत्त्व स्वराज्यांत लुप्त होत जाणार. तेव्हां सर्वांना सभेंतील चर्चा कळावी असें वाटत असेल तर अेकच मार्ग आहे :—शेजाऱ्यापाजाऱ्याशीं अथवा बाजारांत बोलण्यासाठीं, भारतीय परिषदांतून म्हणजे विज्ञान,

साहित्य नि राजकारण या विषयांची चर्चा करतां येण्यासाठीं, समर्थ, समृद्ध नि संपन्न अशा अेकभाषेचें ज्ञान सामान्य नागरिकांस करून देणें. हें ध्येय साध्य करावयाचें असा भारतीयांचा–भिन्नभिन्न प्रांतीय भाषा बोलणारांचा–अट्टाहास आज आहे, पूर्वीं होता‡ नि पुढेंही राहील. आंतर्-प्रांतीय व्यवहार दिवसेंदिवस वाढत जाणार असल्यानें आंतर्प्रांतीय भाषेचा किंवा राष्ट्रभाषेचा प्रश्न हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आतां झालेला आहे. वस्तुतः हिंदुस्थानची राष्ट्रभाषा स्वयंसिद्ध आहे. तथापि दुर्दैवानें तीच गोष्ट सिद्ध करावयास लागावी अशी परिस्थिति आज आली आहे. या दृष्टीनें या विषयाचे अनेक पैलू पुढील प्रकरणांतून चर्चिले आहेत. असें करतांना कांहीं मुद्द्यांची पुनरावृत्ति करावी लागली त्याला लेखकाचा निरुपाय आहे.

---

२ : : राष्ट्रभाषेची व्यापकता

भाषा म्हणजे काय ?

‘दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ ’ अितकें भाषेचें श्रेष्ठत्व आहे. भाषणाशिवाय–बोलल्याशिवाय मनुष्याच्या गरजा कशा भागणार ? जसें अन्न-पाणी, वस्त्र–आच्छादन माणसास हवें तसेंच बोलणेंही आवश्यकच आहे. मानवी जीवनाचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचें बोलणें. ‘ भाषा म्हणजे मनांतील भावना प्रकट करणाऱ्या

‡त्रावणकोर विश्वविद्यालयाच्या ग्रन्थालयांत, मलायालम् भाषेमध्यें लिहिलेली हस्तलिखित ‘ हिन्दीमातृका स्वयंशिक्षक ’ या नांवाचीं दोन पुस्तकें आहेत. वरील पुस्तकें ताडपत्रावर लिहिलेली असून तिरुवट्टार नि कोटचम् या त्रावणकोरमधील भागांत सांपडली आहेत. तीं पुस्तकें दोनतीनशें वर्षांपूर्वींचीं असावींत. ‘ त्रावणकोरमें हिंदी ग्रन्थ ’ या शीर्षकाचा लेख, —‘हिन्दी ’ जुलै १९४२.

शब्दांचा आणि वाक्यांचा समूह'. †या शब्दसमूहानें जीवनाचे व्यवहार चालतात. भारतवर्षांत बहुसंख्यांक लोकांची व्यवहाराची भाषा गेलीं आठनअू शतकें तरी हिन्दी आहे. या हिन्दीला 'भाषा'* किंवा 'भाखा' असें अेक नांव आहे. तें याच दृष्टीनें पडलें असावें. भाषा शब्दाचा दुसरा अर्थ असा कीं 'समाजामध्यें प्रचलित असलेली बोलण्याची पद्धति†' या दोन्ही व्याख्यांच्या साहाय्यानें 'राष्ट्रभाषा' या शब्दाचा अर्थ लावला जाणें अिष्ट आहे.

भारतीयत्व व्यक्त झालें पाहिजे

भारताची राष्ट्रभाषा म्हणजे भारत राष्ट्राची भाषा. भारतीयांच्या 'मनांतील भावना व्यक्त करणाऱ्या शब्दांचा नि वाक्यांचा समूह' म्हणजे आमची राष्ट्रभाषा. अभारतीय किंवा अराष्ट्रीय विचार व्यक्तविणारी भाषा, राष्ट्रभाषा होअूंच शकणार नाहीं. याचसाठीं हिन्दीचा प्रचार म्हणजे स्वराज्याच्या भावनेचा किंवा राष्ट्रीय विचाराचा प्रचार अशी भावना हिन्दी प्रचारकांनीं सतत ठेवली आहे.† भाषा शब्दाच्या दुसऱ्या अर्थानेंही, अितर भाषांपेक्षां 'राष्ट्रभर अधिकतेनें प्रचलित असलेली बोलण्याची पद्धति' राष्ट्रभाषा होय. मराठी भाषेच्या अुत्कृष्ट ग्रंथांतून ज्याप्रमाणें महाराष्ट्रीयत्व प्रकट होतें, तद्वतच राष्ट्रभाषेंत राष्ट्रीयत्व–भारतीयत्व–प्रतीत झालें पाहिजे.

सहा भाषांचें अस्तित्व

जगांतील अन्य देश नि हिंदुस्थान यांची स्थिति राष्ट्रभाषेच्या बाबतींत सारखी नाहीं. 'आपली राष्ट्रभाषा कोणती'? असा प्रश्न अिंग्रज किंवा जर्मन लोक स्वतःस विचारीत नाहींत, कारण स्वभावतःच त्यांची जन्मभाषा जी अिंग्रजी किंवा जर्मन हीच त्यांची राष्ट्रभाषा

---

†भाषा शब्दकोष (श्री. रसालकृत)—*हा हिंदी भाषेचा कोष असून त्याचें नांव 'भाषा' शब्दकोष असें आहे.

† "मैंने तो वर्षोंसे यह विचार कर माना है, कि हिन्दीका प्रचार स्वराज्य की भावनाका प्रचार है।–श्री. पुरुषोत्तमदास टंडन, कर्णधार हिं. सा. सम्मेलन.

असते. मातृभाषा आणि राष्ट्रभाषा असा फरक त्यांना करावा लागत नाहीं हें त्यांचें सुदैव होय. आपल्या देशांत भिन्न भाषा बोलणारे मोठमोठे प्रांत असल्यानें जन्मभाषा आणि राष्ट्रभाषा यांच्यांत अंतर आहे. हें अंतर जितकें कमी करतां येअील, तितकें कमी केल्यानें राष्ट्रभाषेचा प्रश्न सुटणार आहे. आज या देशांत सहा‡ प्रकारच्या भाषांचें अस्तित्व आहे.

१. **प्राचीन भाषा**––वैदिक–प्राकृत, पाली–प्राकृत अि.

२. **संस्कृती भाषा**––संस्कृत. (या भाषेच्या साहाय्यानें प्राचीन संस्कृति, धर्म, समाजरचना यांचा बोध होतो.)

३. **मातृभाषा**––हिन्दी, मराठी, बंगाली, गुजराथी, तेलगू अि.

४. **राष्ट्रभाषा**––२२ कोटी लोक बव्हंशीं जी भाषा बोलूं शकतात नि त्यापेक्षां अधिक लोक जी भाषा समजूं शकतात–ती भाषा म्हणजें **हिन्दी.**

५. **राजभाषा**––अिंग्रजी.

६. **विदेशी भाषा**––फरेंच, जर्मन, पोर्तुगीज, अरबी अि.

अशी स्थिति असल्यानें या देशांत मातृभाषा, राष्ट्रभाषा नि राजभाषा या तिन्ही भिन्न भिन्न आहेत. संयुक्त अमेरिकेसारख्या विस्तृत देशांत या तीनही भाषांचें स्थान अेकट्या अिंग्रजीसच मिळालेलें आहे. अर्थात् अधिक दोन भाषा शिकण्याचे श्रम तेथील लोकांस करावे लागत नाहींत, तसेंच राष्ट्रभाषा कोणती, तिचें स्वरूप काय याची चर्चा करण्यांतही तत्रस्थांचा वेळ जात नाहीं! कॅनडामध्यें फरेंच नि अिंग्रजी अशा दोन्ही भाषांत व्यवहार चालतो. स्वित्झर्लंडमध्यें अिटालियन, जर्मन आणि फरेंच या तीनही भाषांस राजभाषेचें पद अेकसमयावच्छेदेंकरून प्राप्त झालेलें आहे.* यांपैकीं दोन भाषा जाण-

---

‡ राष्ट्रभाषा का प्रश्न––ले. वंशीधर मिश्र, अेम्. अेल्. ए.–'हिंदी-जून ४२. तसेंच, भाषा की शिक्षा–प्रकरण १ (ले. प्रा. चतुर्वेदी तथा पं. मिश्र).

*पण या तीन भाषांचें मिश्रण करून एक नवीन खिचडी भाषा तयार करण्याचा उद्योग तेथें कोणी करीत नाहीं!

णारे पुष्कळ नागरिक तेथें असतात. ज्याप्रमाणें आपल्याकडे गुजराथी मराठी अथवा कानडी–मराठी बोलणारे दुभाषी लोक मिळूं शकतात तसेंच स्विस लोकांचे आहे. परंतु हिंदुस्थान देश अितका विस्तृत आहे आणि अितक्या भिन्न प्रांतीयाशीं आपला व्यवहार येतो कीं, तो नीट चालवावयाचा तर निदान तेरा भाषा शिकाव्या लागतील ! ही गोष्ट अशक्य आहे. राष्ट्रभाषा अेक असली तरच ही आपत्ति टळेल.

चार भाषा तरी याव्या

भारतीय सुबुद्ध नागरिकाला संस्कृति-भाषा म्हणजे संस्कृत, मातृभाषा अथवा प्रांतीय भाषा, राष्ट्रभाषा हिन्दी आणि राजभाषा अिंग्रजी- अशा चार भाषा समजणें आवश्यक आहे. स्वराज्यामध्यें अिंग्रजीचें दरबारांतील प्रभुत्व कमी होअील, पण ज्ञानविज्ञानाला अुपयुक्त नि संपन्न भाषा म्हणून पुष्कळ नागरिक अिंग्रजी शिकतीलच. ज्यांची मातृभाषा हिंदी आहे त्यांना मात्र अेक भाषा कमी शिकावी लागेल. आतां स्वराज्यांत मातृभाषा नि राष्ट्रभाषा (राजभाषाही) अशा दोन भाषांचें अध्ययन करणें नागरिकाचें कर्तव्यच ठरेल.

समान राष्ट्रियत्वाची खूण

पारतंत्र्यांतसुद्धां राष्ट्रभाषेची आवश्यकता असते, कारण ज्या राष्ट्राला स्वतःची भाषा नाहीं त्या देशांतील समाज अेकजीव होणें दुरापास्त आहे. "समभाषित्व ही समराष्ट्रीयत्वाची सर्वांत मोठी खूण आहे, अितकेंच नव्हे तर तें अेकराष्ट्रयित्वाचें शक्तिशाली बंधन आहे"* अलीकडच्या काळांत हें तत्त्व आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांनी प्रथम ओळखलें. आर्यसमाजाचा प्रचार करण्यासाठीं त्यांनीं 'हिंदी' भाषा अुपयोगिली; त्यांची स्वतःची मातृभाषा गुजराथी असूनही त्यांनीं समाजाचा 'सत्यार्थप्रकाश' हा धर्मग्रंथ आर्यभाषा किंवा हिन्दी भाषेंत लिहिला. त्यांनींच हा सिद्धान्त स्पष्ट करून दाखविला कीं "भारतवर्षाला अेकसूत्रांत गोंवावयाचें असेल तर तें कार्य अेक

---

*. डॉ. सुनीतिकुमार चतर्जी–'हिन्दी' नवम्बर १९४१.

भाषेच्या द्वारें म्हणजे हिंदीच्या द्वारेंच करतां येअील." †७५ वर्षांपूर्वींचे हे उद्गार होत! यामुळें आज आर्यसमाजांतील कोठल्याही प्रांतीय भाषिकाला हिन्दी भाषा येत असते. कोठल्याही रीतीनें गाजावाजा न करतां आर्यसमाजानें हिन्दीचा प्रचार अव्याहतपणें चालविला आहे. या समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद हे राष्ट्रभाषा हिन्दीचे आधुनिक काळांतील आद्य प्रचारक होत, हें आजच्या हिंदी प्रेमियांनीं ल ांत घ्यावयास हवें.

आर्थिक व्यवहारासाठीं

सार्वदेशीय धार्मिक सभा-चर्चेसाठींच अेकभाषेची आवश्यकता आहे असें नसून आर्थिक नि व्यापारी व्यवहारसुद्धां अेकभाषा झाल्यास सुलभ होणार आहेत. भिन्न प्रांतांतील व्यापाऱ्यांना वस्तूंही देवघेव करण्यासाठीं समक्ष बोलणें किंवा पत्रव्यवहार करणें या गोष्टी कराव्या लागतात. कांहीं अंशीं अिंग्रजीनें आज हें काम चालतें, परंतु अिंग्रजी न जाणण्याऱ्या असंख्य व्यापाऱ्यांचें यामुळें फार हाल होतात! परावलंबनामुळें हा आर्थिक व्यवहार 'कसातरी' चालतो. अिंग्रजी भाषा शिकणें ही गोष्ट कष्टसाध्य असल्यानें तसा यत्न व्यापारी करीत नाहींत, क्वचित् धेडगुजरी हिंदींत ते बोलतात नि काम भागवतात. हीच भाषा त्यांना ४।६ महिन्यांत शिकतां येते हें पटवून दिलें तर ते अेवढें शिक्षण सहज घेतील. त्यामुळें त्यांचा, व्यापाराचा नि ग्राहकांचाही फायदा होअील. अशा रीतीनें 'देशव्यापी व्यवहार सुलभ करण्यासाठींच *राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार करावा' असा प्रमुख हेतु हिं. सा. सम्मेलनानें त्या संस्थेच्या स्थापनेपासून स्वीकृत केला आहे.

† "अिस हिन्दी के द्वारा सारा भारतवर्ष अेकसूत्र में पिरोया जा सकता है। हिन्दू तो अिस झंडे के नीचे आहि जायँगे, मुसलमानों के लिये भी अिसका अपनाना आसान होगा; क्योंकि अुर्दूका सारा ढाँचा हिन्दी का रूपही लिये हुअे है।" स्वामी दयानंद–'हिंदी प्रचार समाचारांत' छापलेले स्वामी सत्यदेवांचें भाषण. जानेवारी १९४०.

*हिं. सा. सम्मेलन, नियमावली–उद्देश (ख) 'देशव्यापी व्यवहारीं और कार्योंको सुलभ करने के लिअे राष्ट्रे लिपि देवनागरी और राष्ट्र-भाषा हिंदी का प्रचार बढानेका प्रयत्न करना.' पृ. १.

गुप्ततेसाठीं

अिंग्रजी येणाऱ्या भिन्न प्रांतीय भारतीय तरुणांनींही याच राष्ट्र-भाषेचा अुपयोग अिंग्लंडमध्यें केला. 'अभिनव भारत' संस्थेच्या वीर सावरकर, मदनलाल धिंग्रा आदि क्रांतिकारकांना आपले विचार सभोंवतालच्या अिंग्रजांपासून गुप्त ठेवावे लागत. हिन्दी भाषेंत हा विचारविनिमय केल्यानें तो सामान्य अिंग्रजांना कळणें शक्यच नव्हतें. तेव्हांपासून किंबहुना इ. स. १९०१–२ पासून हिंदी हीच आपली राष्ट्रभाषा ‡असा प्रचार करणारे पुढारी वीर सावरकर होत. कधीं गुप्ततेसाठीं तर कधीं प्रकट व्यवहारासाठीं पण देशव्यापी कार्यासाठीं अेकभाषा पाहिजे हेंच या योगें स्पष्ट होत नाहीं काय ?

आंतर्भाषीय साहित्य परिचयासाठीं

वरच्याप्रमाणें अिंग्रजी चांगल्या जाणणाऱ्या परंतु भिन्नभाषी भारतवासीयांना परस्पराशीं कांहीं गोष्टींत विचारविनिमय अिंग्रजी-द्वारा करणें अशक्य नसलें तरी असंभवनीय झालें आहे. मराठी बंगाली सारख्या प्रगत प्रांतीय भाषा–पंडितांना साहित्यिक विचाराची देवाण घेवाण करण्यास इंग्रजी भाषा हें माध्यम अपुरें पडतें. समाजरचना, संस्कृति नि विचारसरणी यांत समानता असतांही या भिन्नभाषी साहित्यिकांना आपल्या मातृभाषेच्या साहित्याचा अेकत्र विचार-विनिमय करतां येत नाहीं. थोड्याशा श्रमानें या लेखकवर्गाला बोलण्यापुरतें आणि पत्रव्यवहार किंवा सभांमधून चर्चा करण्याअितकें हिंदी सहज येअील. सर्व प्रांतीय भाषांमध्यें शास्त्रीय परिभाषा आज अेक नाहीं याचें कारण राष्ट्रभाषेसारखें विचारविनिमयाचें साधन वाप-

---

‡" मराठीचा आम्हांस अभिमान आहे यांत शंका नाहीं....परंतु अुभ्या हिंदुस्थानांत अेकच राष्ट्रभाषा व्हावी म्हणून मराठीचें नांव न सुचवितां हिंदीचाच तो अधिकार आहे असें आम्ही वीसपंचवीस वर्षां-पासून प्रतिपादीत आलों असून हिंदीच्या प्रचारार्थ अेकसारखे झटत आहोंत."—वीर सावरकर कृत 'मराठी भाषेचें शुद्धीकरण' पुस्तक पृष्ठ ३५ (प्रकाशन अि. स. १९२६).

रण्यांत आलें नाहीं. संस्कृत भाषेपासूनच जर सर्वांनीं शब्दांची अुधारी करावयाची तर ती समान शब्दांची कां नको ?* नागरी लिपीची सुधारणा, साहित्याच्या प्रचारांतील अडचणी यासारखे अेकाच रीतीचे प्रश्न भारतवर्षीय साहित्य परिषदेंत सोडवितां येतील. हिंदी भाषेचा प्रसार होअील त्या मानानें हिंदी साहित्य सम्मेलनाला हें स्थान अधिक प्रमाणांत मिळेल. त्या सम्मेलनाचें स्वरूप प्रांतिक नाहीं हे आपल्याकडे कित्येकांस माहीत नसते ! प्रयागचे हिंदी सम्मेलन किंवा काशी येथील नागरी प्रचारिणी सभांच्या घटनेंतच नियामक मंडळांत हिंदुस्थानभरच्या हिंदी प्रेमियांना स्थान दिलेलें आहे, आणि या संस्थांचे कित्येक कार्यक्रमही प्रांतिक सीमा ओलांडून अमलांत आणण्यासाठीं असतात.† साहित्यिकांचें लिखाणही सध्यांच्यापेक्षां अधिक समृद्ध झालें असतें. कविवर्य टागोरांना जर तुकारामाच्या अभंगाचा थोडासा परिचय असतां तर गीतांजलींत अधिक ' प्रसाद ' निर्माण झाला असता ! तुकारामाचे सारांशरूपानें हिंदीकरण आम्ही केले नाहीं नि बंगाली लोक हिंदीही शिकले नाहींत नि मराठी तर नाहींच नाहीं ! कै. शिवरामपंत परांजपे हिंदींत लिहिते तर अरविंद घोषाअितकी स्वातंत्र्यस्फूर्ति देण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे हें भारतास कळलें असतें ! तुलसीदासाचा किंवा कबीराचा परिचय सर्व देशांत आहे याचें कारण त्यांनीं हिंदींत लिहिले हें होय. आमच्या भक्त कवींचीं कांहीं काव्यें तरी हिंदींत

***समाचारपत्र शब्दकोष** (प्रकाशक.हिं.सा.सम्मेलन) पहा.यांत अेक अिंग्रजी शब्द देऊन त्यास हिंदी, बंगाली, गुजराथी, मराठी असें प्रति शब्द दिले असून, त्यापैकीं जो अेकच शब्द या भाषा वापरूं शकतील तो मोठ्या टाअिपांत छापला आहे. पारिभाषिक आणि नव्या वस्तूंचे देशी शब्द सर्व प्रांतीय भाषांत एक होण्यास अशा यत्नांचा उपयोग होईल.

† राष्ट्रभाषेच्या प्रचाराखेरीज, बंगाली, मराठी, गुजराथी, हिंदी या चार भाषांत प्रयुक्त होणाऱ्या कोषांची रचना (अुपर्युक्त समाचारपत्र शब्दकोष, शब्दशास्त्र (phylology) कोष इ.,). नागरी लिपीच्या सुधारणा, याबाबत इतर भाषियांचें साहाय्य या संस्थांनीं घेतलेलें आहे.

व्हावयास पाहिजेत. प्रत्येक प्रांतीय भाषेला हें करणें शक्य आहे, कारण हिंदी ही या भाषेशीं समरूप भाषा आहे; अिंग्रजीसारखी क्लिष्ट व अपरिचित वळणाची नाहीं. याखेरीज परकीय भाषेच्या साहाय्यानें स्वदेशी विचारांचा प्रचार किंवा पोषण समाजाच्या सर्व थरांत करणें शक्य नाहीं नि अिष्टही नाहीं. 'कोणताही देश आपल्या राष्ट्रीय भावना विदेशी भाषेच्या द्वारें विकसित करूं शकत नाहीं आणि अुत्तम रीतीनें व्यक्त करूं शकत नाहीं."* भाषा हें सर्व अुन्नतीचें मूळ होय. ही भाषा राष्ट्रभर अेक नसल्यानें राष्ट्राची प्रगति नि अुन्नति त्या मानानें खुंटते.

कांहीं आक्षेप

"राष्ट्रभाषेवांचून आज आमचें काय अडलें आहे? आमच्यावर अेक नवीन भाषा शिकण्याचें ओझें कां?' 'जर स्वित्झर्लंडमध्यें तीन भाषा राजभाषा म्हणून चालतात किंवा कॅनडामध्यें अिंग्रजी नि फ्रेंच या दोहोंसही समान अधिकार आहेत तर हिंदुस्थानांत ८।१० भाषा असल्यानें काय बिघडलें? अेक भाषा नसतांना आजही आपणांत अेकत्वाची भावना वसत आहेच कीं?" असे आक्षेप शहाणे समजले जाणारे लोक करीत असतात. पण या म्हणण्यांत तथ्य नाहीं हें विचारांतीं कळून येअील.

"अडलें आहे, पण कळलें नाहीं."

कोठलीही नवीन गोष्ट करावयाची झाली कीं 'तिच्यावांचून आपलें अडलें नाहीं' असें सांगणारा पुराणमतवादी वर्ग कोठल्याही समाजांत असतो. वस्तुस्थिति अशी आहे कीं 'अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं किंवा आपलें जीवन अधिक सुखी करण्यासाठीं नवीन गोष्टी सुरू केल्या जातात. तीच गोष्ट हिंदी प्रचारासही लागू आहे. शहरांतील माणसाचें जीवन अवलोकिलें असतां असें आढळून येअील कीं सकाळीं अुठल्यापासून रात्रीं झोपेपर्यंत अन्य भाषियांशी बोलण्याचे

---

* डॉ. राजेंद्रप्रसाद–"यह सर्वसम्मत है कि कोअी भी देश अपनी राष्ट्रीय भावना को विदेशी भाषाद्वारा न तो अुन्नत कर सकता है, और न ठीक ठीक व्यक्तही कर सकता है।"—हिन्दी, जुलाअी १९४१

प्रसंग त्यांस कितीतरी येतात ! मुंबअीसारख्या ठिकाणीं सकाळीं दूध घालणारा भय्या हिंदीमध्यें आपल्या गिऱ्हाअीकास जागृत करतो' मंडअींतील कांहीं फळविके, रस्त्यावरील 'कोअी भी चीज अेक आना' म्हणत हिंडणारे हातगाडीवाले किंवा पायवाटेवर (फुटपाथवर) छोटी दुकानें मांडणारे, ट्राम किंवा बसमधील नोकरवर्ग, वहातुकीवर नियंत्रण ठेवणारे पोलिस, भेळवाले, दारावरून औषधें नि कापड विकीत जाणारे फेरीवाले—यांच्याशीं होणारे व्यवहार केवळ मराठींतून होणें दुरापास्त आहे. अधूनमधून आपल्या गांवांत किंवा नभोवाणीवर होणारीं राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं भाषणें आजकाल हिंदींतच होअूं लागली आहेत—निदान मराठींत तरी नाहींत. चित्रपट पहावयाचे झाल्यास 'मराठीनें' आतां भागत नाहीं—हिंदी थोडेबहुत तरी—यावें लागते. कथाकीर्तनांत तर प्राचीन काळापासून कबीर, तुलसीदास, सूरदास, मिरबाअी अित्यादि संतांचे दोहे आणि पदे यांचा सर्रास अुपयोग केला जातो. त्याचा अर्थ श्रोत्यांना कळावयाचा असेल तर तोडके-मोडकें हिंदी सुजाण बायाबापड्यांनासुद्धां यावयास पाहिजे. अगदीं पूर्ण महाराष्ट्रीय अशा बालगंधर्व किंवा पटवर्धनबुवा यांच्या गाण्याच्या बैठकींतील निम्या चिजा हिंदीच असतात. अुत्तर भारतांतील गवय्यें अर्थात् अमराठी पदेंच जास्त म्हणतात. वस्तुतः संगीतज्ञांनीं हिंदीचें राष्ट्रभाषापद वादविवाद न करतां केव्हांच स्वीकृत केलेलें आहे. हें संगीत कळावयाचे असेल तर केवळ मराठी ज्ञानानें कसें कार्य होअील ? आगगाडीच्या डब्यांतील परिस्थिति पहिल्या प्रकरणांतच वर्णिली आहे. आगगाडीच्या स्टेशनावरील 'पान, बिडी, माचीस' वाला नि 'पुरीभाजी' वाला अमराठीच असतात ! या सर्व व्यवहारांत तन्मयतेनें भाग घ्यावयाचा म्हणजे राष्ट्रभाषा हिंदी यावयास नको काय ? खेडेगांवांतील जीवनांत अितके अडणार नाहीं, परंतु खेडूतांसही शहरांत अधूनमधून यावेंच लागते कीं; अर्थात् एकाद्यानें अमराठी भाषा न बोलण्याचा निश्चयच केला तर गोष्ट वेगळी ! पण त्यांस सुद्धां दुसऱ्यांचे चाललेले हिन्दी बोलणें अैकावेंच लागेल.

टिचभर स्वित्झर्लंडशी तुलना अव्यवहार्य

दुसरा आक्षेपही असाच भ्रममूलक आहे. स्वित्झर्लंड किंवा कॅनडा या देशांत २–३ भाषांचाच प्रश्न असल्यानें असे द्विभाषक मिळूं शकतात. त्यांतही त्या भाषांची लिपि अेकच असल्यानें द्विभाषी वाचक अधिक आढळतात. स्वित्सर्लंड तर टिचभर देश आहे. भारतवर्षाची स्थिति असाधारण आहे. प्रचंड खंडाअेवढा देश , जगांतील अेक पंचमांश लोकसंख्या तेथें पसरलेली असून भिन्नभिन्न लिप्यांत लिहिल्या जाणाऱ्या प्रमुख अशा तेरा भाषा येथें बोलल्या जातात. या भाषांच्या अुपभाषांची किंवा बोलींची संख्याच न मोजणें अिष्ट ! या १३ भाषांचे नि त्यांच्या ५।६ लिप्यांचें ज्ञान समाजांतील पुढारी मंडळींसही घेणें अवघड आहे मग सामान्य नागरिकांचा तेथें काय पाड ? यासाठीं मातृभाषेखेरीज अेक राष्ट्रभाषा आणि ज्ञानवर्धनासाठीं स्वराज्यांतही कांहीं वर्षे अिंग्रजी सुबुद्ध नागरिकाला शिकलीच पाहिजे. या शिवाय प्रारंभीं सुचविलेल्या 'संस्कृती' भाषा वगैरे निराळ्याच. स्विस नागरिक तीन भाषा जाणतो असें गृहीत धरलें तर राष्ट्रभाषा अेक असली तरीही मराठी नागरिकाला तीन भाषा याव्या लागतीलच. तीन भाषा येणें निराळे नि १३ भाषा शिका म्हणणें निराळे. म्हणजे राष्ट्रभाषा अेक झाली तरी प्रांतीय नागरिकांस स्विस माणसाप्रमाणें त्रिभाषी व्हावेच लागेल !

वाटतात तितके श्रम यांत नाहींत

आणखी तिसरा आक्षेप असा कीं शहरांतील पुष्कळसे व्यवहार अिंग्रजींतून भागत असतां आणखी अेक भाषा शिकण्याचे श्रम कां करावेत ? आक्षेपांच्या प्रारंभी दर्शविल्यापैकीं कांहीं व्यवहार–फार तर निम्मे–अिंग्रजींतून चालवितां येतील. पण सर्वच्या सर्व प्रसंगास ती भाषा निरुपयोगी आहे, कारण भय्यापासून ट्रॅम कंडक्टर पर्यंतच्या लोकांना अिंग्रजी शिकविणें अगदीं अशक्य आहे. शिवाय शहरांतील पुष्कळसे लोक अिंग्रजी जाणतात हें खरें आहे काय ? लोकवस्तीपैकीं निम्या स्त्रिया आहेत असें मानले तर त्यांच्यापैकीं अिंग्रजी किती जाणतात आणि पुरुषापैकीं अिंग्रजी भाषातज्ञता शेंकडा दहांची तरी असेल काय ?

न शिकतांही यापेक्षां अधिक लोकांना हिंदी बोलतां येते नि समजतें. अिंग्रजी शिकलेल्यांना अन्य भाषा शिकणें अगदीं सुलभ आहे, ज्यांना अिंग्रजी येत नाहीं त्यांनाही फार श्रम न घेतां राष्ट्रभाषा शिकतां येअील. अिंग्रजी शिकण्याच्या अेकदशांश परिश्रमही राष्ट्रभाषा शिकण्यास लागत नाहींत. स्वाभिमानरक्षणार्थ अेवढे श्रम नागरिकाला घ्यावयासच पाहिजेत.

राष्ट्राचा श्वास म्हणजे भाषा

मानवी जीवनांत श्वासाचें जें महत्त्व तेंच राष्ट्राच्या जीवनांत भाषेचें, कारण "कोणत्याही देशाची राष्ट्रभाषा म्हणजे त्याचें सारे अुच्च साहित्य जींत व्यक्तविलें जाते ती. भारताची राष्ट्रीय भाषा म्हणजे भारताचे अत्युच्च विचार, तत्त्वज्ञान, काव्य, रसायन, वैद्यक, पदार्थविज्ञान, यंत्र, शिल्प, भूगर्भ प्रभृति अनेकविध विज्ञानांचे आणि राजकीय , सामाजिक, धार्मिक जीवनाचें व्यक्तीकरण जींत होअू शकेल अशी संपन्न, प्रौढ, नि प्रगत भाषा असली पाहिजे.†" केवळ बाजारू व्यवहारासाठीं राष्ट्रभाषा नको असून, समग्र जीवनाच्या व्यवहारासाठीं ती पाहिजे. अशी सर्वगामी भाषा 'बाजारू' व्यवहार सहजच पूर्ण करील, अितकेंच नव्हे तर स्वतंत्र भारतसरकारला आपल्या सर्वांगीण योजना प्रसृत करण्यास याच भाषेचा अुपयोग होअील. परक्यांची राजकीय बेडी तुटत आल्यानें अिंग्रजीचें राज्यही संपुष्टांत येत आहे. अशा वेळीं तितक्या तोलाची भाषा आपणांस नको कां? हिन्दीचा सार्वत्रिक प्रचार झाल्यास भारताच्या भावी वैभवांचें कोंदण तयार झाले असेंच मानावें लागेल.

---

† वीर सावरकर–सावरकर अंक 'सह्याद्री' जून १९३७.

३ : : राष्ट्रभाषा शिक्षणाचें अुद्दिष्ट

राष्ट्रभाषेच्या प्रश्नाचें महत्त्व नि अशा भाषेची आवश्यकता याचें वर्णन केल्यानंतर शैक्षणिक नि भाषिक दृष्टचा या यत्नाचे उद्देश काय याची चर्चा करणें आवश्यक आहे. याचें कारण हेंच कीं अुद्देश स्पष्ट झाल्यानें ते साध्य करण्यासाठीं आपल्या प्रयत्नास योग्य दिशा देतां येते.

अुद्देश व अुपयुक्तता *

या विवेचनांत अुद्देश व प्रत्यक्ष आपल्या हातास लागणारे फल, फायदा, अुपयुक्तता किंवा परिणाम यांत फरक केलाच पाहिजे. 'न कळतां पद अग्निवरी पडे, करि न दाह असें न कधीं घडे' हा सिद्धांत सत्य आहे, म्हणून पायाला चटका देणें हा अग्नीचा मूळ अुद्देश आहे असें म्हणतां येअील काय? तसेंच मारुतीला प्रदक्षिणा घातल्यानें व्यायाम होतो हें खरें असलें तरी प्रदक्षिणा घालणाराचा अुद्देश 'व्यायाम करणें' हा होअू शकत नाहीं! अशा वरपांगी लाभालाच कित्येक वेळां अुद्देशाचें स्वरूप प्राप्त होतें. पण खरा अुद्देश कोणता व खोटा अुद्देश कोणता हें ओळखण्याचें अेक सुंदर गमक आहे. अुद्देश हे प्रारंभापासूनच निश्चित केलेले असतात, ते कदाचित् पूर्णत्वानें साध्यही होणार नाहींत, परंतु फल काय मिळालें यावरून प्रत्यक्ष परिणाम किंवा अुपयुक्तता ठरवितां येते. अेकादी गोष्ट करीत असतां अथवा केल्यावर जें पदरांत पडतें ती त्याची अुपयक्तता होय. असें प्रत्यक्ष परिणाम किंवा अुपयुक्तता व अद्देश भिन्नही असूं शकतील. अद्देश किंवा हेतु हे कार्याला दिशा दाखवितात, तर फलप्राप्ति किंवा अुपयुक्तता किंवा परिणाम हातांत काय आलें हें स्पष्ट करतात. प्रत्यक्ष अध्ययन करीत असतांना आनुषंगिक अशा कांहीं गोष्टी हाताला लागूं शकतात, हा लाभ होय; परंतु आपल्याला अशा लाभांचा विचार कर्तव्य नाहीं.

---

* प्रस्तुत लेखकाच्या 'अितिहास कसा शिकवावा' या पुस्तकांतील पाठ १ मधील अुद्देश व अुपयक्ततेचें विवेचन' करणारा परिच्छेद जसाच्या तसाच येथें घेतलेला आहे.

तथाकथित अुद्देश

मूळ अुद्देश स्पष्ट करण्यापूर्वींही, हिंदी भाषा शिक्षणाचें अुद्देश म्हणून जें काहीं सांगितलें जातें तें ध्यानांत आणलें पाहिजे. असें सामान्यत: सांगितले जाणारे हेतु पुढीलप्रमाणें आहेत.†

" **आपण हिंदी कां शिकतां?**' याचीं अुत्तरें सर्व सारखी नसतात खालीलप्रमाणें निरनिराळीं अुत्तरें येतील :--

१. हिंदी आमची राष्ट्रभाषा आहे म्हणून.

२. राष्ट्रासाठीं आम्हीं कांहींतरी केलें पाहिजे.

३. अुत्तर-भारतांत प्रवास करावयाचा, तेव्हां अडूं नये.

४. तुलसीदास, सूरदास, कबीरदास, यांच्यासारख्या संतांच्या वाङ्मयाचा परिचय होण्याची सोय.

५. महाराष्ट्रांतील अुत्तम ग्रंथांचीं भाषांतरें हिंदींत करण्यासाठीं.

६. हिंदी प्रदेशांत नोकरी मिळणें सोपें व्हावें.

७. बोलपट अुत्तम समजावे.

८. आमच्या देशांतील मोठमोठ्या पुढाऱ्यांचीं व्याख्यानें अथवा लेख चांगले कळावे.

९. वेळ जात नाहीं, अैकले कीं तुम्ही हिंदी शिकवितां.

१०. आमचे विचार व्याख्यानरूपानें सांगतां यावे.

११. 'हिंदी' शिक्षकाची नोकरी मिळवावी.

१२. हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळाल्यावांचून महाराष्ट्र पुढें येणार नाहीं हें पटलें.

१३. संस्कृतनिष्ठ हिंदी व हिंदुस्तानी यांतील फरक कळावा म्हणून."

१४. डॉक्टर, वकील नि व्यापारी यांना धंद्यास पोषक.

१५. सैनिक महाविद्यालयें, सैनिक शिबिरें, नि सेना विभागांत काम करतां यावें.

---

† १ ते १३ हे अुद्देश हिंदी-मराठी अनुवादमाला भा. १ (प्रकाशक हिं. प्र. संघ पुणें) यांत प्रथमारंभी दिलेले आहेत.

या १५ अुत्तरांत अुद्देश नि अुपयुक्तता यांची गल्लत झालेली आहे. या सर्व तथाकथित अुद्देशांचा सारांश अेवढाच कीं आपल्या दैनंदिन व्यवहारांत समानसंस्कृतीच्या पण परभाषिकांचा संबंध दिवसेंदिवस वाढत आहे आणि या परिस्थितीमुळें अेकभाषा असावी अशी तीव्र जाणीव समाजांत अुत्पन्न झालेली आहे. या अेकभाषेच्या अभावीं आपल्या जीवनाचा कोंडमारा होतो असा लोकांस अनुभव येअूं लागलेला आहे.

खरा अुद्देश अेकच

भाषा शिकण्याचा अुद्देश अेकच कीं "दुसऱ्यानें जें सांगितलें आणि लिहिलें तें आपणांस चांगल्या रीतीनें वाचतां यावें आणि समजावें, तसेंच शुद्ध, प्रभावोत्पादक, मधुर आणि रमणीय पद्धतीनें बोलतां आणि लिहितां यावें."* हा अुद्देश मातृभाषा शिक्षणाचा होय. पण राष्ट्रभाषेचें स्थान जवळजवळ तितक्याच तोलाचें आहे. घरांतील जीवनांत मातृभाषा जितकी आवश्यक तितकीच बाहेरच्या जीवनांत राष्ट्रभाषा आवश्यक आणि म्हणूनच मातृभाषेला निकट असेंच स्वरूप राष्ट्रभाषेचें पाहिजे. असें असलें तरच आपला अुद्देश साध्य होओील. आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं स्वतःची मातृभाषा शिकावयाचें श्रम नागरिकास आहेत, आणि त्यानंतर त्यास राष्ट्रभाषा शिकावयाची आहे. ही भाषा अिंग्रजी किंवा अुर्दूसारखी परकी असेल तर नागरिकास तें शिकणें अव्यवहार्य होओील. असें नसतें तर आज १५० वर्षांच्या इंग्रजांच्या राज्यानंतर हिंदुस्थानांत अिंग्रजीचा प्रसार शें. १।२ लोकापुरताच मर्यादित राहिला असतां काय? गेलीं २५ वर्षें विशेष खटपट करूनही हैद्राबादचें अुस्मानिया विद्यापीठ नि सरकार त्या प्रदेशांत अुर्दूचा किती प्रचार करूं शकले? आणि जें राजसत्तेनें झालें नाहीं तें हिंदी शिक्षणाचें कार्य लोकांच्या हौसेनें नि जोमानें चाललें आहे, याचें कारण राष्ट्रभाषेचें नि मातृभाषेचें साधर्म्य आणि राष्ट्राभिमान होय.

*भाषा की शिक्षा पृ. ४–५ (पं. चतुर्वेदी आणि पं. मिश्र).

चार पोट–अुद्देश

राष्ट्रभाषा ही 'मातृभाषासम'च पाहिजे, तरच सुलभतेनें ती भाषा नागरिक अुपयोगांत आणतील. अशा राष्ट्रभाषा शिक्षणाचे अुद्देश पुढीलप्रमाणें सांगता येतील.

१. दुसऱ्यानें बोललेलें **समजणें** (**संभाषण**, नाटक, चित्रपटांतील संवाद, **व्याख्यान**).

२. स्वतःचे विचार दुसऱ्यास सांगणें-**बोलणें** (**संभाषण**, व्याख्यान).

३. वाचतां येणें, (**पत्रव्यवहार**, **वृत्तपत्रें**, मासिकें, पुस्तकें),

४. लिहितां येणें (**पत्रव्यवहार**, लेख, पुस्तकें अि.)

या चार पायऱ्या चढून गेल्यावर राष्ट्रभाषा मंदिरांत आपला प्रवेश होईल. यापैकीं पहिले दोन अुद्देश पूर्ण होतील अितके तरी हिंदी प्रत्येक नागरिकांस यावें. संभाषण म्हणजे 'दुसऱ्यानें बोललेलें अैकणें आणि त्यांना अुत्तर देणें' या गोष्टी शुद्ध, प्रभावोत्पादक आणि मधुर पद्धतीनें करतां येणें आवश्यकच आहे. समाजापुढें अुभे राहून व्याख्यान देतां न आलें तरी चालेल, कारण हें कार्य फार थोड्यांना करावयाचें आहे. वक्तृत्व हा गुण भाषाज्ञानापासून भिन्न आहे. यामुळेंच मातृभाषेंतही थोडे लोक वक्तृत्व किंवा लेखन करूं शकतात !

लिपिज्ञानाशिवाय भाषा येअील काय ?

हे अुद्देश साध्य करीत असतांना लिपीचा प्रश्न आड येत नाहीं असें कांहीं जणास वाटतें. या तऱ्हेचें शिक्षण घेणारे नि देणारे लोक लिहिलेली पुस्तकें नि वृत्तपत्रें न वाचतांच हें शिक्षण करणार काय ? अभ्यासाच्या दृष्टीनें पाहतां स्वतःशीं बोलणें म्हणजेच लेखन करणें होय. असें कांहीं लेखन केल्याशिवाय शुद्ध बोलतां तरी कसें येणार ? सभोंवतीं सर्वच हिंदी भाषी लोक असतील तर असें बोलणें–लिहिल्याशिवाय–येअू शकेल. कारण त्यावेळीं मातृभाषेची जी लिपि असेल त्यांतूनच लेखन करून असें ज्ञान मिळविण्याचा अभ्यास करतां येअील. परंतु हिंदी प्रांतांतील वृत्तपत्रें त्याला वाचतां येणार नाहींत नि जिवन्त हिंदीपासून त्यांस दूर रहावें लागेल, सकृद्दर्शनीं जरी पहिल्या दोन अुद्देशासाठीं लिपिज्ञानाची

आवश्यकता नाहीं असें वाटलें तरी तें व्यवहारांत खरें नाहीं. कोणाही नागरिकाला परप्रांतीयाशीं प्रसंगोपात् पत्रव्यवहार करावा लागणार असल्यानें ३ आणि ४ हे अुद्देश डोळ्यापुढें ठेवून त्यांस राष्ट्रभाषा शिकावी लागणार. यापेक्षां असें म्हणणें अिष्ट होअील कीं सामान्य नागरिकाला या चार अुद्देशांतील प्राथमिक भाग–म्हणजे अुद्देशापुढील मोठ्या टाअिपांत छापलेला भाग–साध्य व्हावा. अुरलेला दुसरा भाग हा थोडा अुच्च दर्जाच्या किंवा सवड असणाऱ्या नागरिकांनीं शिकावा. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे असें म्हणतां येअील कीं मराठी सातवीच्या दर्जाचे हिंदी भाषाज्ञान सामान्य नागरिकांस व्हावें, त्यापुढचें ज्ञान प्रत्येकाच्या गरजेप्रमाणें नि योग्यतेप्रमाणें व्हावें. मात्र ध्येय असें असावें कीं हें अुच्चज्ञानही अनेक नागरिकांस प्राप्त व्हावें.

मातृभाषेप्रमाणेंच पण कांहीं थोड्या कमी प्रमाणांत हें चार अुद्देश साध्य करणें हेंच राष्ट्रभाषा प्रचारकांचें कार्य आहे.

आपल्या देशांत ‘ राजभाषा ’ नि आंतरप्रांतीय व्यवहाराची ‘भाषा म्हणून अिंग्रजी या परकीय भाषेस स्थान प्राप्तच झाल्यासारखें कित्येकांस वाटूं लागलें आहे, पण हें सत्य नाहीं. लवकरच प्रत्येक प्रांतांत तेथील प्रांतीय भाषा ‘ राजभाषा ’ होअील नि आंतरप्रांतीय नि सांस्कृतिक व्यवहार राष्ट्रभाषेंतून चालतील. शास्त्रीय, सांस्कृतिक, अैतिहासिक दृष्टि कायम राहिली तर स्वतंत्र भारत सरकारची राजभाषा हीच राष्ट्रभाषा हिंदी होअील. अशी महत्त्वाची भाषा अवगत करणें हें राष्ट्रभाषा शिक्षणाचें ध्येय होय.



आपल्या देशाच्या दृष्टीनें

राष्ट्रभाषा कां पाहिजे आणि त्या भाषेचें ज्ञान कितपत असावें याची चर्चा केल्यानंतर 'अशी भाषा तरी कोणती' या प्रश्नाचा अुहापोह करणें अुचित होअील. आपल्या देशाच्या दृष्टीनें या भाषेंत कोणते गुण असले पाहिजेत, त्यांचा निर्देश केल्यास राष्ट्रभाषेसाठीं सध्याच्या अनेक भाषांतून निवड करावी कीं नवीनच भाषा तयार करावी या प्रश्नांचा अुलगडा होअील.

अनेक भाषांचें अस्तित्व

आपला देश विशाल, अितका विस्तृत कीं, रशिया वगळल्यास सर्व युरोपखंडही लहान वाटावें. जगांतील $\frac{1}{5}$ लोकसंख्या या देशांत आहे. साहजिकच भिन्न भिन्न प्रांतांत प्रचलित भाषाही अनेक असून त्यांपैकीं कांहींचें साहित्यिक श्रेष्ठत्वही सर्वमान्य आहे. हिन्दी, बंगाली, मराठी, गुजराथी, अुर्दू, नेपाळी, कानडी, तामील, तेलगू, मल्यालम् अित्यादि अशा भाषा होत. यांपैकीं अेका भाषेस राष्ट्रभाषापद वस्तुत: आपल्या पूर्वजांनीं १०–११ व्या शतकांतच दिलेलें आहे. पण आज त्याबद्दल कित्येकांना संभ्रम अुत्पन्न झाल्यानें त्या प्रश्नाचा विचार करावा लागत आहे. राष्ट्रभाषापद प्राप्त करणाऱ्या भाषेंत पुढील गुण* असले पाहिजेत.

दहा गुण

१. राष्ट्रांतील सर्व अथवा तेथील बहुसंख्यांक लोकांची बोलण्याची ती भाषा असावी, निदान ती समजणारे पुष्कळ असावे.

२. या भाषेंत अुच्च दर्जाचें साहित्य नि शास्त्रीय ग्रंथ असावे अथवा ते निर्माण करण्याचें शब्दरूपी सामर्थ्य त्या भाषेंत पाहिजे. 'बाजारू बोली'† म्हणजे राष्ट्रभाषा नव्हे. राष्ट्रभाषेचें अेक अंग म्हणून बाजारू बोली चालू राहील, पण तें तिचें सर्व रूप नव्हे.

---

* आमच्या राष्ट्रभाषेचा प्रश्न –ले. पं. श्री. दा. सातवळेकर, पृ. १२–१३ वर असे चार महत्त्वाचे गुण सुचविले आहेत.

† 'बाजारू बोली' म्हणजेच राष्ट्रभाषा होय अशी कांहींची कल्पना आहे. ही कल्पना गृहित धरल्यानें तिचें स्वरूप ठरवितांना त्यांचा गोंधळ अुडतो.

३. अन्य प्रांतीय भाषांमधील शब्दावली, व्याकरणाचे नियम, अुच्चार, वाक्यरचना, लिपि, वर्णमाला अित्यादि गोष्टींत पुष्कळ साम्य असावें. यामुळें राष्ट्रभाषा बोलतां न आली तरी परप्रांतीयांना ती समजेल आणि शिकावयाची झाल्यास लवकर शिकतां येअील.

४. शास्त्रीय पारिभाषिक शब्द त्या भाषेंत असावे अथवा प्रांतीय भाषांना अुपयुक्त होतील किंवा त्यांच्याशीं साम्य राहील असे शब्द निर्माण करण्याची शक्ति या भाषेंत असावी.

५. ही भाषा भारतीय पाहिजे (विदेशी भाषेचा स्वीकार आमच्या स्वाभिमानास बाधक आहे.)

६. ती जीवित पाहिजे, म्हणजे आज भारतांत चालू असलेली पाहिजे.

७. व्याकरणाचे नियम शक्य तों थोडे असावे.

८. भारतीय भावना, भारतीय विचार, संस्कृति यांचें प्रतिबिंब त्या भाषेंत असावें. म्हणजे तिच्यांत भारतीयत्व§ पाहिजे.

९. राष्ट्रभाषेची लिपि सुगम नि वैज्ञानिक असावी. तिच्यांत अन्य भारतीय भाषांतील अुच्चारलेखन करण्याची पात्रता पाहिजे. कारण प्रांतीय भाषा या लिपींत लिहितां आल्यास सर्वत्र अेक लिपि तरी सुरू करतां येअील.

१०. ही लिपि मुद्रणसुलभ असावी. अक्षरांची जुळणी (कंपोजिंग) थोड्या वेळांत करतां यावी. अेकटंक (मोनोटाअीप), पंक्तिटंक (लायनो टाअीप) नि टंकलेखनयंत्र यांचें साहाय्य त्या लिपीस घेतां यावें.

---

§१. सत्य आणि ज्ञानजिज्ञासा, २. परमतसहिष्णुता, ३. अहिंसा, मैत्री, जीवदया, ४. त्याग, विषयवैराग्य, निःस्पृहता–हा गुणसमुच्चय म्हणजे भारतीयत्व होय, असें 'हिंदी' नोव्हें. १९४१ च्या अंकांत डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनीं लिहिलें आहे आणि ही वृत्ति राष्ट्रभाषेंत हवी असें सांगितलें आहे.

सुसंपन्न भाषा

अशी दशगुणमंडित भाषा आमची राष्ट्रभाषा होअूं शकेल. अितक्या गुणांनीं परिपूर्ण अशी भाषा न मिळाल्यास हे गुण आज ना अुद्यां तिच्या अंगीं येतील अशी तरी ती असावी. या भाषेचा अुपयोग टांगेवाल्यापासून थेट राजकीय नि अन्य विषयक परिषदांमधून केला जावयाचा आहे. बाजारू बोली ही स्टेशनवरचें किंवा टांगेवाल्याशीं बोलण्याचें काम भागवील पण तींत अत्युच्च विचाराचें वाङमय नि विज्ञान प्रकट होअूं शकणार नाहीं. अशी 'बाजारभाषा' आपोआप येते, तिचा प्रचार करण्यासाठीं सम्मेलनें, प्रचारसभा नि समित्या, अट्टाहास नि धडपड करण्याचें कारण नाहीं. राष्ट्रभाषेचें हें एक लौकिकरूप राहील पण तेवढेंच रूप म्हणजे आमची संपूर्ण राष्ट्रभाषा नव्हे.

बंगाली–मराठी कां नाहीं ?

पण केवळ साहित्यिक अुंची किंवा क्षमता अेवढ्याच गुणानें प्रांतीय भाषा राष्ट्रभाषा होणार नाहीं. बंगालीचें साहित्य रवींद्र, शरच्चंद्र, अित्यादींनीं समृद्ध केलें आहे, मराठीही कांहीं फार मागें नाहीं–पण म्हणून त्या कांहीं राष्ट्रभाषा मानल्या जात नाहींत. त्यांचें अधिक विवेचन या प्रकरणाच्या शेवटीं केलें आहे.

चार नांवें

राष्ट्रभाषा म्हणून आज ज्यांचीं नांवें पुढें येतात त्या भाषा म्हणजे अिंग्रजी, अुर्दू, हिंदुस्थानी (हिंदुस्तानी) आणि हिंदी या होत. क्वचित् संस्कृतचें* नांवही सुचविलें जातें. वरील 'दशगुण' या भाषांपैकीं प्रत्येकींत किती प्रमाणांत आहेत याची चर्चा केल्यानें या प्रश्नाचा अुलगडा होणार आहे.

अिंग्रजीचे दोष

राष्ट्रभाषा ही व्यापक नि सामान्य नागरिकालाही कळली पाहिजे. पण अिंग्रजीचें‡ या दृष्टीनें काय स्थान आहे ? गेलीं दीडशें वर्षें सरकार-

* पुरुषार्थ, जून १९४६.

‡ या भाषेंतही पारिभाषिक शब्द बनविणें अवघड होअूं लागले आहे. (रघुनाथ पंडितांचा आधुनिक अवतार–डॉ. रघुवीर) –ले. डॉ. लिमये पृ. १८)

द्वारां अलोट पैसा खर्च करून अिंग्रजीचा प्रचार चालू असतांही शें. अेकच भारतीय या भाषेंत कांहीं अंशीं बोलूं अथवा लिहूं शकतो.सध्यांच्या शंभरपट वर्षांनंतरही यश येअील कीं नाहीं याची शंका आहे. याचें कारण ही भाषा विदेशी असून तिची वाक्यरचना, स्पेलिंगपद्धति, अुच्चाराची रीति यांचा अेकाही प्रांतीय भाषेशीं मेळ बसत नाहीं. यामुळें ती कितीही साहित्यसंपन्न असली, तिची लिपि सुगम आणि यंत्रसिद्ध असली तरीही तथाकथित सुशिक्षितापलीकडे तिचा प्रसार होणार नाहीं. वर दिलेल्या दहा गुणांपैकीं १ (बहुसंख्यांकांची भाषा), ३ (प्रांतीय भाषांशीं साम्य),५ (स्वदेशीपण), ७ (व्याकरण सुलभता), ८ (भारतीयत्व असलेली), ९ (लिपि वैज्ञानिक) हे सहा गुण या भाषेंत नाहींत. ही भाषा आंतरराष्ट्रीय व्यवहाराची झाली असली तरी तिच्यांत 'भारतीयत्व' कधींच आढळून येणार नाहीं. भारतीय लेखकांनीं अिंग्रजींत लिहिलें तरी त्या भाषेचा मुख्य प्रवाह हा पाश्चात्य वळणाचा नि त्याच संस्कृतीचा राहणार! भारतीय नांवें नि शब्द लिहिण्यास अिंग्रजीची रोमन लिपि असमर्थ आहे. प्रांतीय भाषांशीं तर तिचें साम्य कशांतच नाहीं–विरोधाचेच मुद्दे अधिक. या भाषांत अभ्यास करणें, काम करणें–अि. करणें, या प्रयोगाची पद्धति, तर अिंग्रजींत study do, work do असें म्हणणेंही मूर्खपणाचें ! अिंग्रजींत क्रिया–पदानंतर कर्म, तर प्रांतिक भाषांत कर्मानंतरच क्रियापद आलें पाहिजे. प्रांतिक भाषापद्धतीनें कोणी अिंग्रजी बोलूं लागला कीं ते 'Indian English' किंवा भ्रष्ट अिंग्रजी मानलें जातें ! ही भाषा शिकण्यासही कितीतरी अवघड आहे. सात वर्षें प्रत्यहीं दोन तास शाळेंत नि दोन तास घरीं तिचें अध्ययन करून मॅट्रिक होणाऱ्यांना धड साधें पत्रही अिंग्रजींत लिहितां येत नाहीं ! हा त्या मुलांचा दोष नाहीं. अिंग्रजी सर्वथैव परकीय आहे हेंच त्याचें कारण होय.

विशाल समाजाचें काय ?

अिंग्रजी हीच राष्ट्रभाषा करावी असें जे प्रतिपादन करतात त्यांच्या-पुढें शहरांतील सुशिक्षित समाज असतो. पण अेवढा समाज म्हणजें

कांहीं राष्ट्र नव्हे. त्यापेक्षां शतपट विशाल असें हें भारतीय राष्ट्र आहे. हें खरें कीं आज ज्या शास्त्रीय, व्यापाराच्या, कारखानदारांच्या, अैतिहासिक, शैक्षणिक अशा अखिल भारतीय परिषदा भरतात त्यांचें काम अिंग्रजींतून चालतें. पण यामुळेंच या महत्त्वाच्या विषयासंबंधीं बहुजनसमाज अज्ञानांत आहे हें विसरून कसें चालेल ? या सभापरिषदांच्या चालकांना ही जाणीव अलीकडे होअूं लागली आहे, हें सुचिन्ह होय.

जेत्यांची भाषा

आपल्या देशांत असलेला हा अिंग्रजीचा वरचष्मा अस्वाभाविक आणि केवळ अिंग्रजी राज्याच्या अनुषंगानें आलेला आहे. स्वराज्याचे अधिकार आतां प्राप्त झाल्यानें या भाषेचें महत्त्व नि व्यापकता कमी कमी होअूं लागेल. प्रांतिक सरकारांचे मंत्री, विधिमंडळांत प्रांतीय भाषांतून भाषणें देअूं लागले आहेत, त्या भाषेंत लिहिलेल्या पत्रांचीं अुत्तरें प्रांतीय भाषेंत देअून त्या पत्राखालील स्वाक्षरीही नागरी लिपींत करूं लागले आहेत. याचें महत्त्वाचें कारण असें कीं, अिंग्रजी भाषा ही परकीयांची नि त्यांतही जेत्यांची भाषा असल्यानें तिला राष्ट्रभाषापदीं बसविणें आमच्या स्वाभिमानासही वोंचणारें आहे ! केवळ या अवगणामुळेंच सर्व गुणसंपन्न भाषाही राष्ट्रभाषा होअूं शकणार नाहीं* आणि अिंग्रजींत तर अितर अुणीवा किती तरी आहेत ! याचा अर्थ अिंग्रजी भाषा कोणीं शिकूं नये असा नाहीं, ज्ञान मिळविण्यासाठीं ती किंवा रशियन, जर्मन या भाषाही शिकाव्या; परंतु राष्ट्रभाषापद तिला मिळणार नाहीं हें स्पष्ट आहे.

अुर्दू

या भाषेची अुत्पत्ति कशी झाली, तिचा विकास जाणूनबुजून विदेशी वळणावर कसा करण्यांत आला नि आज ती भाषा हिंदीपासून अगदीं स्वतंत्र कशी झाली आहे याची चर्चा पुढील प्रकरणांत आहे. अुर्दू भाषेचे **आधारभूत शब्द म्हणजे विभक्तिप्रत्यय, कांहीं अव्ययें आणि क्रियापदें हीं हिंदींतून घेतलेलीं असल्यानें** पुष्कळांना हिंदी नि अुर्दू अेकच आहे

*श्री. माखनलाल चतुर्वेदी—अध्यक्षीय भाषण (हिं. सा. सम्मेलन, हरिद्वारचें अधिवेशन).

असें वाटतें. केवळ फारशी लिपींत लिहिलेली हिंदी म्हणजे अुर्दू अशी स्थिति आज नाहीं. धर्मभेदाप्रमाणें भाषाभेद असावा लागतो असें नाहीं. तरीसुद्धां 'मुस्लीमलीग'सारख्या संस्थांनीं 'अुर्दू' ही मुसलमानांची भाषा आहे असें ठरवून तसा प्रचारही गेलीं अनेक वर्षें चालविला आहे. हैदराबाद संस्थानांत मुसलमानी राज्य असल्यानें तेथील राज्यकारभार आणि शिक्षण अुर्दूमधूनच दिलें जात आहे! अुर्दू भाषा ही पंधरा कोटी लोक बोलतात नि आणखी सात कोटी लोक ती समजूं शकतात असें बोलणें फसवेगिरीचें आहे. अुर्दूच्या प्रारंभिक कालांत हिंदी-अुर्दूमध्यें फारसा फरक नव्हता. त्या कालांतील भाषेला अुद्देशून हें बोलणें असतें. तेव्हांच्या कालांतील या भाषेचें स्वरूप आतां पार बदललेलें आहे!

पांच गुण कमी

या अुर्दू भाषेंत राष्ट्रभाषेला आवश्यक अशा दहा गुणांपैकीं पांच गुण नाहींत. पहिलाच 'बहुसंख्यांकांची भाषा' हा गुण तिच्यांत नाहीं. अन्य प्रांतीय भाषांच्या शब्दावलीशीं किंवा लिपीशीं कांहींच साम्य नाहीं. भारतीय भावना नि विचार त्यांतील ग्रंथांत व्यक्त झालेले नाहींत. तिची प्रवृत्ति भारताबाहेर पाहण्याची आहे. *याखेरीज अुर्दूची लिपी जी फारशी ती अवैज्ञानिक, भारतीय अुच्चार लिहिण्यास असमर्थ नि यंत्रसिद्धतेस सोअिस्कर नाहीं. या पांच गुणांच्या अभावीं तिला राष्ट्रभाषापद कसें मिळावें? ती जन्मानें भारतीय भाषा असली तरी आज ती सर्वथैव विचारानें, शब्दावलीनें, लिपिप्रयोगानें, आणि व्याकरणाच्या कांहीं नियमांनीं परकीय झालेली आहे.

मुसलमान तत्प्रांतीय भाषा बोलतात

अुर्दूस राष्ट्रभाषा करणारांना असें विचारलें पाहिजे कीं, तुमच्या अुर्दूचा अुत्कृष्ट नमुना अुस्मानिया विद्यापीठांत पहावयास मिळतो ना? ती भाषा प्रांतीय भाषांपासून अितकी भिन्न आहे कीं, तेथील प्रजेला †

*'हिंदी, हिंदुस्तानी, अुर्दू'—(ले. पद्मसिंह शर्मा)! †अिंडो आर्यन अँड हिंदी-डॉ. चतर्जी) पृ. १४७.

ही ती भाषा आपलीशी वाटत नाहीं आणि अन्य प्रांतीय मुसलमानांना समजत नाहीं! आरबी–फारशी शब्दावलीला हिंदीच्या ‘खडी बोली’चे प्रत्यय लावलेली ती अरबी भाषा आहे! असली भाषा नि असली अशास्त्रीय लिपि सर्व समाजाच्या माथीं राष्ट्रभाषा नि लिपि म्हणून मारणें हें अन्यायाचें नि अप्रयोजकपणाचें नव्हे काय? मुसलमानांचा अनुनय करणारांनीही हें ध्यानांत ठेवावें कीं, बंगालमधील मुसलमान बंगाली बोलतात,† महाराष्ट्रांत मुसलमान मराठी बोलतात, वायव्य सीमाप्रांतांत पुश्तु भाषा चालते नि अन्य प्रांतांत तत्रस्थ स्थानिक‡ भाषा मुसलमानी बोलतात आणि अितर देशांतील मुसलमान तेथील भाषा बोलतात. मुसलमानांची स्वतंत्र अशी भाषा नाहीं. लखनौ–लाहोरच्या किंवा हैद्राबादच्या श्रीमंत मुसलमानी घरांत बोलली जाणारी भाषा म्हणजे कांहीं सर्व मुसलमानांची भाषा नव्हे! मुस्लीम लीगनें सर्व मुसलमानांना ‘अुर्दूदां’ करण्याचें अेकमेव कार्य पत्करलें तरी तिला अर्ध शतकांत यश येणें असंभवनीय आहे. अितकी ती भाषा कृत्रिम नि तिची लिपि अशास्त्रीय आहे!

हिंदीपासून सर्वथैव भिन्न

आजची अुर्दू भाषा ही हिंदीपासून किती भिन्न आहे याविषयीं अलाहाबाद विद्यापीठाचे अुपकुलगुरु पं. अमरनाथ झा यांचे हे विचार वाचा:

---

‡ कॉंग्रेस व राष्ट्रभाषा (ले. श्रीपाद जोशी) पृ. २१.–तसेंच काका कालेलकर–हरिजन सेवक–३ नोव्हें. १९४६.–हिंदुस्थानांत आलेल्या अिस्लामधर्मीय तुर्की शिष्टमंडळाचे प्रमुख श्री. फसीह रिफकी अते यांनीं लिहिलें आहे: “हिंदी, तामील, बंगाली, मराठी, अि. भाषा या देशांत आहेत. या भाषा धर्मानुसार वाटलेल्या नसून–प्रादेशिक तत्त्वावर आधारलेल्या आहेत. गुजरातच्या हिंदूला मद्रासी हिंदूची भाषा समजत नाहीं आणि सं. प्रांतांतील मुसलमानाला बंगाली मुसलमानाची भाषा कळत नाहीं. कॉंग्रेसचे पुढारी श्री. नेहरू यांची मातृभाषा अुर्दू आहे. असेही मुसलमान आहेत कीं ज्यानीं हिंदी साहित्यांत चांगलें कार्य केलें आहे.” (हिन्दी स्वराज्य दि. ८–४–४३).

" महात्माजी विचारतात कीं, ' बंगाली, मराठी या भाषा हिंदी-पासून जितक्या भिन्न आहेत तितकीच अुर्दू हिंदीपासून भिन्न आहे काय ?' याचें अुत्तर असें आहे कीं " तितकी नाहीं, त्यापेक्षांही अधिक. " हीं अुर्दूचीं वाक्यें पहा.†

(१) " अिसमें कोअी कलाम नहीं कि अिक़बाल बहुत बलन्दपाया शायर अजीमुल्मर्तबात मुफाक्किर थे। बाज हज़रात को शायद अिस बात के तस्लीम करनेमें पसोपेश हो कि वह अुलूमे–रूहानी के मुअल्लम और असरारे बातिनी के हकिम भी थे। और अुन्हें रूहानियत की गहराअियाँ मालूम और रमूजे मखफ़ी से ख़ूबी आगाही थी। "

या वाक्यांतून आमच्या देशांतील केवळ पुढील शब्द आहेत! ' अिस, में, कोअी, नहीं, कि, बहुत, थे, और, अुन्हे, की, और, से, थी ' बाकी सगळे अरबी किंवा फारसीचे !

(२) मेरा सीना है मशरिक आफ़तावे दागे हिज्रां का,
तुलूये सुबहे महशर चाक है मेरे गरेबाँ का।

(३) बररूये शशजहत दर आअिना बाज़ है।
यॉं अिम्तियाजे नाक़िसे। कामिल नहीं रहा ॥

(४) वजूद अफराद का मजाजी है हस्तिये कौम है हकीकी, फ़िदा हो मिल्लतप ' यानी, आतिश जने तिलिस्मे मजाज़ हो जा। "

या भाषेचा हिंदीशीं काय संबंध आहे ? कोणतें साम्य आहे ? मी हे मान्य करतो कीं यांत माधुर्य आहे, रस आहे, काव्यचमत्कार आहे; पण ही भाषा हिंदी आहे, हें मला कधींच मान्य करतां येणार नाहीं."

अुर्दू-हिंदीमधील फरक काय याचा सविस्तर विचार पुढें केलेला आहेच.

हिंदुस्तानी नांवाची भाषा कोणती ?

हिंदुस्तानी (स्तान फारसी शब्द आहे) ला कांहीं ठिकाणीं हिंदुस्थानी असें बहुजनसमाजाकडून बोललें जातें. अुर्दूचा पर्यायवाची शब्द

† ' हिंदी ' अप्रैल १९४२ :" महात्माजी फिर पूछते है " क्या अुर्दू हिंदीसे अुतनी ही भिन्न है जितनी बंगाली, मराठी ?" अुत्तर है " अुतनी ही नहीं अुससे कहीं अधिक।" पुढील अुतारा त्याच अंकांतील आहे.

म्हणून या नांवाचा प्रचार पुष्कळ वर्षांपासून आहे. हा अर्थ गृहित धरला तर वरील अुर्दूबद्दल घेतलेले आक्षेप या भाषेस लागू होत असल्यानें ती राष्ट्रभाषा होअू शकत नाहीं.

नव्या भाषेसाठीं अस्वाभाविक अुद्योग

हिंदुस्तानी म्हणजे हिंदी नि अुर्दू यांचें मिश्रण असलेली भाषा असा अर्थ कांहीं वेळां केला जातो. अशी भाषा आज अस्तित्वांत नाहीं* बाजारांत बोलल्या जाणाऱ्या हिंदीच्या विकृत रूपास 'हिंदुस्तानी' मानण्याची वृत्ति दिसून येते. पण ही भाषा शास्त्रीय किंवा साहित्यिक ग्रंथनिर्मितीस अुपयोगीं पडणार नाहीं. असल्या शब्दसंपत्तिहीन भाषेस राष्ट्रभाषापद कसें झेपेल? हिंदी-अुर्दूच्या मिश्रणानें नवी भाषा करण्याचा अुद्योग सुरू आहे; अेस्पिरँटोचा प्रयोग यशस्वी होअू शकला नाहीं मग हा तर सेमेटिक (अरबी) नि आर्यभाषा या दोन विरुद्ध कुलांच्या भाषा अेकत्र आणण्याचा प्रयोग मुळांतच चुकीचा असल्यानें यशस्वी होणें असंभवनीय. त्यांतूनही प्रचलित भाषांपैकीं योग्य भाषा न मिळाल्यास नवी भाषा तयार करण्याच्या अुद्योगाचा विचार करतां येअील. पण तशी स्थिति सुदैवानें आपल्याला आलेली नाहीं

---

*मुंबई विद्यापीठाच्या सेनेटच्या सभेंत व्हा.चॅन्सेलर श्री. मसानींचा निर्णय, फेब्रुवारी १९४०.

५. : : : स्वयंसिद्ध राष्ट्रभाषा

स्वीकृत भाषा

राष्ट्रभाषेच्या पदासाठीं ज्या भाषांचीं नांवें पुढें यतात त्यांतील त्याज्य नांवांचा विचार मागें झाला. आपल्या स्वीकृत भाषचें नांव हिंदी असून तिच्यामध्यें राष्ट्रभाषेला आवश्यक असलेल्या १० गुणां-पैकीं ९॥ गुण आज विद्यमान आहेत नि बाकीचा अर्धा गुण प्राप्त करणें प्रयत्नसाध्य आहे, हें पुढें स्पष्ट केलें आहे.

मध्यदेशाची भाषा

भारतीय भाषांची जननी जी संस्कृत भाषा तिचें मूलस्थान पंजाब नि संयुक्तप्रांताचा पश्चिम भाग किंवा 'मध्यदेश' होय. या मध्य-देशाची संस्कृति नि भाषा यांना पुरातन कालापासून या देशांत महत्त्व नि मान्यता मिळत आलेली आहे.* या प्रांतांतील संस्कृत भाषेपासूनच पुढें क्रमाक्रमानें अर्धमागधी, पाली, शौरसेनी, प्राकृत, महाराष्ट्री, अपभ्रंश नि हिन्दी या भाषांचा अुदय झाला. अर्धमागधी ते अपभ्रंश यांमधील भाषा कालप्रवाहांत वाहून गेल्या, पण त्या सर्वांची माता संस्कृत आज अस्तित्वांत आहे. तिच्या आधारानें अुत्पन्न झालेले सहस्रों शब्द, बंगाली, मराठी, गुजराथी, हिन्दी या भाषांतून प्रयोगांत येत आहेत. म्हणून अन्य प्रांतीय भाषाप्रमाणें हिंदीला संस्कृतोत्पन्न भाषा समजणें हेंच युक्त होय. या प्रांतिक भाषा पालीपासून अगर महा-राष्ट्रीपासून अुत्पन्न झाल्या असें म्हटलें तरी बिघडत नाहीं. आज हा मधील कालाचा प्रवास अदृश्य झाला असून, मूळ संस्कृतचा सांठा अुपलब्ध आहे नि त्याचाच आधार या भाषांच्या विकासास होत आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

इ. स. ७०० पासून—

'हिन्दी'च्या विषयीं आणखी अेक गोष्ट विशेष आहे कीं, ज्या मध्य-देशांतील भाषांचें महत्त्व अनेक शतकें आपल्या देशांत होतें

*श्री. कन्हैयालाल मुन्शी–राष्ट्रभाषा परिषद–अध्यक्षीय भाषण,–जयपूर.

त्याच 'मध्यदेशांत' हिंदीचा अुदय नि विकास झालेला आहे. अैतिहासिक परंपरेनेंच संस्कृत–अर्धमागधी–पाली–या क्रमानुसार हिंदीला राष्ट्रभाषापद मिळणें स्वाभाविकच आहे.

"प्राकृत भाषा संपल्या कोठें नि हिंदीचा प्रारंभ झाला कोठें हें नक्की सांगणें कठिण आहे. कारण हा फरक फार हळुहळू घडत गेला.... हिन्दी साहित्याचा प्रारंभ अि. स. ७००च्या मागें नेतां येणार नाहीं. शिवसिंह सरोज यांनीं 'पुष्प' कवीला हिंदीचा आदिकवि मानलें आहे. 'नागकुमारचरित' लिहिणारा पं. पुष्पदन्त असावा यांत आश्चर्य नाहीं."†

आजपर्यंतची प्रगति

पुष्कळ विद्वानांनीं चंदकवीच्या 'पृथ्वीराज रासो' पासून हिंदी साहित्याचा आरंभ धरलेला आहे. हा ग्रंथ १३ व्या शतकांत लिहिला गेला. त्यांत हिन्दीचें मूळ रूप सांपडतें. त्यानंतर अमीर खुश्रो यानें (अि. स. १२५३ ते १३२५) हिन्दी किंवा हिन्दवी या भाषेंत चांगली कविता केली. पंधराव्या शतकांत कबीरानें याच भाषेंत रचना केली. कांहीं पंजाबी कवींनीं, त्यानंतर सूरदास, मलिक महंमद जायसी (पद्मावत् काव्य) यांनीं काव्यरचना करून भाषेस प्रौढत्व आणलें. त्या काळीं गद्यलेखनाचा प्रघात नसल्यानें काव्यरचनेस अनुकूल अशा व्रजभाषेस (हिन्दीच्या अुपभाषांपैकीं अेक) साहित्यिक पद प्राप्त झालें. अिंग्रजी भाषेच्या संसर्गानें अितर प्रांतीय भाषांप्रमाणें १७व्या शतकाच्या अखेरीपासून हिन्दी गद्याचाही* विकास झाला. गद्याला अनुकूल म्हणून व्रजभाषेपेक्षां 'खड़ी बोली' या अुपभाषेचा अुपयोग लेखक करूं लागले. गेल्या शतकांत या खड़ी बोलींत काव्यरचना करण्याचा यत्न झाला नि तो यशस्वी आहे असें पाहून आजकाल या खड़ी बोलींत–हिन्दींत–गद्य नि पद्यरचना होअूं लागली आहे.

†पं. अंबिका प्रसाद बाजपेयी–अध्यक्ष हि. सा. सम्मेलन–भाषण. २८ वें अधिवेशन काशी (अि. स. १९३९)

* हें मत चुकीचे असून त्यापूर्वीही खडी बोली हिंदीत गद्यरचना होत होती असें श्री. चंद्रवली पांडे यांनी हिंदुस्तानी कीं हिमायत क्यों ? या पुस्तकांत सिद्ध केले आहे. (१९४७)

व्रजभाषेंत काव्यरचना करण्याचा प्रघात अद्यापही चालू आहे.‡

बहुसंख्याकांची भाषा

आतां दहा गुणांच्या दृष्टीनें हिन्दीचें परीक्षण करूं या. बहुसंख्याकांची † भाषा हा पहिला गुण या भाषेंत आहे. १५ कोटि लोकांची ही मातृभाषा असून दहा कोटि लोकांना ती समजते.

दुसरा गुण—साहित्यसंपन्नतेचा

धार्मिक साहित्य—विशेषत: भक्तिकाव्यें नि तुलसी रामायणासारखे ग्रंथ—या भाषेंत आहेत. साहित्यशास्त्र-वाङमयाच्या आलोचनाचे ग्रंथ अलीकडे प्रकाशित होऊं लागले आहेत. कै. श्यामसुंदर दास यांचा साहित्यालोचन ग्रंथ अशा कोटींतील होय. विज्ञानादि शास्त्रीय ग्रंथास लागणारी शब्द-संपत्ति संस्कृतच्या आधारें होऊं शकते हें महाराष्ट्रीयांना तरी सांगावयास नको. विद्यालयें, महाविद्यालयें नि राजसभा यांतून हिंदी भाषेस जसजसा वाव मिळेल त्या प्रमाणांत अितर शास्त्रांतील ग्रंथ निर्माण होतील. बनारस हिंदु—विद्यापीठानें हा यत्न हातीं घेतला आहे नि पंचवार्षिक योजनाही केली आहे. भारतीय हिंदी साहित्य सम्मेलन (प्रयाग) नि नागरी प्रचारिणी सभा (काशी) या संस्थाचीं प्रकाशनें हा प्रगतीचा मार्ग सहज चालतां येअील असें दर्शवितात.

तिसरा गुण—प्रांतीय भाषांच्या शब्दावलीशीं साम्य :

हा या भाषेंत आहे. शास्त्रीय पारिभाषिक शब्द तर सर्व भारतीय भाषांत (अुर्दूखेरीज) तेच प्रयुक्त होऊं शकतात. समाचारपत्र, शब्दकोष, शब्दशास्त्रीयशब्दांचा कोष अि. पुस्तकें हिं. सा. सम्मेलनानें प्रकाशित केलीं तीं याच हेतूनें होत. कै. सयाजीरावांनीं प्रसिद्धिलेला ‘ सयाजी शासन कल्पतरू’ हा कोष या दृष्टीनें उपयुक्त आहे. याखेरीज नित्याचे सुध्दां जे तत्सम शब्द आहेत तेही सर्वत्र वापरतां येतात. पुस्तक, ग्रंथ, साहित्य, कविता, काव्य, गणित, भूगोल, अितिहास, लेखन अि. शब्द गुजराथी, मराठी, बंगाली, हिंदी, आणि द्रविड भाषांतसुद्धां प्रयुक्त होतात.

‡ हिन्दीच्या अुत्पत्तीचा विशेष विचार ‘ अिन्डो आर्यन् अँड हिन्दी ’ या पुस्तकांत पृ. १७० ते १७५ वर पहावा.

† श्री. अंबिका प्रसाद बाजपेयी—‘गृहस्थ’ आक्टोबर १९३९.

अनेक क्रियापदें सुद्धां ' विचार करना, अभ्यास करना, प्रकाशित करना, जवळ जवळ तींच. वाक्यरचना–' कर्ता, कर्म, क्रियापद '–हीं तशीच. हें साम्य कांहीं वेळेस अितकें असतें कीं, हिंदी भाषा वाचतांना, केवळ विभक्तिप्रत्यय आणि कांहीं अव्ययें निराळीं लिहिलेलीं ही मराठीच होय असें वाटावें. 'दैनिक'आज हें काशी येथें निघणारें प्रतिष्ठित दैनिक वर्तमानपत्र आहे. तें आणि त्याच्या जोडीला आपलें अेकादें मराठी दैनिक घेअून वाचलें असतां हें साम्य स्पष्टपणें प्रतीत होअील. अुर्दू, हिंदुस्तानी किंवा अिंग्रजी या भाषांत हें साम्य जन्मांतरींही आढळणार नाहीं. प्रांतीय भाषांशीं असणारें हें शब्दांचें साम्य हिन्दी भाषा समजण्यास नि शिकण्यास अत्यंत अुपकारक ठरलें आहे. हायस्कुलामध्यें सात वर्षें रोज दोन तासिका (Periods) शिकून नि तितकाच वेळ घरीं अभ्यास करून जितकें अिंग्रजी विद्यार्थ्यांस येतें त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक हिंदीचें ज्ञान अवघ्या दीड-दोन वर्षांत रोज एक तासिका अभ्यास केल्यास प्राप्त होतें. आबालवृद्धांत सहज रीतीनें होणाऱ्या हिंदी प्रचारानें ही गोष्ट सिद्ध झाली आहे. अुर्दूवाल्यांनाही† हिंदी भाषा शिकतांना आपल्याअितकें शब्दांचें साम्य न आढळलें तरी व्याकरणसाम्य मिळतें, त्यामुळें त्यांनाही ही भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारणें सोयीचें आहे.

पारिभाषिक शब्द तेच

४. मराठीमध्यें अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र यांवर चांगलीं पुस्तकें निर्माण होत आहेत. यांमध्यें पारिभाषिक शब्द संस्कृतमधूनच घेतले आहेत. तेच शब्द हिन्दींतही वापरतां येतील. ही शब्दसंपन्नता संस्कृतच्या आधारें जशी आपल्या मराठीस लाभली आहे तशीच हिंदीसही लाभली आहे.

' हिन्द ' की हिन्दी

५. हिन्दी ही भारतीय आहे हें सांगावयास नको. विशेष हें कीं तिचें नांवही प्रांतदर्शक नाहीं. महाराष्ट्राची मराठी, बंगालची बंगाली,

† दयानंद : क्योंकि अुर्दूका सारा ढांचा हिंदीका रूपही लिये हुअे है '। पृष्ठ आठवरील टीप पहा.



[इतिहासप्रवेशांत (ले. पं. जयचंद्र विद्यालंकार) दिलेल्या नकाशाच्या आधारें हा नकाशा तयार केला आहे.]

गुजराथची गुजराथी, तामीलनाडची तामिल अशीं नांवें सामान्यत: आहेत. पण संयुक्तप्रांत, बुंदेलखंड यावरून या भाषेस नांव प्राप्त झालेलें नाहीं. आपल्या देशास जशीं भारतवर्ष, हिंदुस्थान अशीं नांवें आहेत तसेंच 'हिन्द' असेंही नांव आहे. अुत्तर हिंद नि दख्खन किंवा 'दक्षिण हिन्द' असे दोन भाग समजले जातात. या 'हिन्द' देशाची भाषा 'हिन्दी' होय. हें असें सार्वदेशीय नांव या भाषेस आहे. तिची मर्यादा प्रांतापुरती नसून सर्व देशांत तिचा प्रसार आहे असें नांवावरूनही व्यक्त होतें. गांधीजींची 'हिन्दुस्तानी'* पसंत नसणारांनाही, हिंदुस्थानची भाषा 'हिंदुस्थानी' अशा अर्थानें त्या नांवास विरोध करावा असें वाटत नाहीं, मात्र स्वरूप 'हिन्दी'चें रहावें अशी त्यांची अिच्छा असते. याचें कारण हिन्दी हें नांव 'हिन्द' वरून आलें आहे हें त्यांच्या लक्षांत येत नसावें असें दिसतें.

सहावा गुण–जीवित भाषा असणें :

संस्कृतसारखी केवळ विद्वानांतच नव्हे तर सर्व समाजांत हिंदी मात्र जिवंत आहे, तिच्यांत वृत्तपत्रें चालू आहेत नि ग्रंथसंपत्ति वाढत आहे.

सातव्या गुणाबद्दल

मराठी आणि बंगालीच्या मानानें हिन्दी व्याकरण सोपें आहे. लिंगभेद नि 'ने'ची रचना हा भाग थोडा अवघड आहे. ही अडचण दूर करण्याचा यत्न हिं. सा.सम्मेलनानें चालविला आहे. ही अडचण 'बाजारू' हिंदीला नाहीं. तिच्या व्याकरणाचे नियम अेका पोस्टकार्डावर लिहून होतील† पण साहित्यिक स्वरूपांत अर्थातच व्याकरणबद्धता पाळली पाहिजे.

'भारतीयत्व' प्रतीत होतें

आठवा गुण हा महत्त्वाचा आहे. अितर प्रांतीय भाषांप्रमाणेंच भारतीय संस्कृति, ज्ञानजिज्ञासा, अि. गुणांनीं युक्त–'भारतीयत्व' या भाषेंतील ग्रंथांतून आहे. हें विचारसाम्य अितकें आहे कीं, परप्रांतीय गृहस्थास हिंदी वाचत असतांना आपल्याच वृत्तीच्या कोणातरी बांधवानें हें सर्व लिहिलें असावें असें वाटतें. शब्दावलि साम्याप्रमाणेंच

*आतां आपल्या देशाचें नांव **'अिंडिया'** ठरविल्यानें हेंही समाधान कोणास लाभणार नाहीं!

†अि. आर्यन अॅण्ड हिंदी, पृ. २३३.

हें साम्य विशेष अुल्लेखनीय आहे. आपल्या मायभाषेंत असलेले अनेक शब्द, तीच राष्ट्रीय विचारसरणी, त्याच गंगायमुनांबद्दलचा आदर, काश्मीरपासून थेट कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या लोकांच्या चालीरीतींबद्दल आत्मीयता—दसरा, दिवाळी, दुर्गापूजनाचा तोच हव्यास, महाभारत-रामायणाचे दाखले हिंदींत मिळतात. भाषाभेदाखेरीज अन्य भेद आढळत नाहींत.

वर्णमाला आणि लिपींची समता

नववा गुण पूर्णत्वानें देवनागरी लिपींत आहे. ती सुगम नि वैज्ञानिक* असून भारतांतील सर्व प्रांतीय भाषांतील अुच्चारलेखन त्यांत करतां येतें. मराठीची लिपि तीच आहे. गुजराथी-बंगाली लिप्या नागरीचेंच परिवर्तित रूप होत. त्या त्या प्रांतांत रहाणारे सर्व धर्मांचे लोक आपल्या भाषा याच लिपींत लिहितात. द्रविड भाषांची (कानडी, तेलगू, मल्याळम्) लिपि भिन्न असली तरी वर्णमाला (अ, आ, अि, अी पासून ह, ळ, क्ष, ज्ञपर्यंतचे सर्व वर्ण) तेच आहेत. त्या अक्षरांचीं चिन्हें निराळीं असलीं तरी त्यांतील स्वर नि बाराखडीची पद्धति अेकच आहे.[1] शब्दांच्या साम्याप्रमाणें या लिपिसाम्यामुळें अितर प्रांतीयांना हिन्दी भाषा शिकणें सोपें जातें.[2] अुर्दू लिपि ही राष्ट्रलिपि मानल्यास हा लाभ कधींही होणार नाहीं.

मुद्रणसुलभता

दहावा गुण पूर्णत्वानें अद्याप आलेला नाहीं. तथापि अितर भारतीय लिप्यांपेक्षां मुद्रणसुलभता देवनागरी लिपीस अधिक साध्य झालेली आहे.* कांहीं अपुरेपणा लक्षांत घेऊनच हा गुण अर्धा धरला आहे. या दृष्टीनें हिंदीमध्यें ९॥ गुण आहेत असें प्रारंभीं म्हटलें आहे.

---

*याचें सशास्त्र विस्तृत विवेचन पुढील प्रकरणांतून येणार आहे.

१. ऱ्हस्व 'अेकार' नि ऱ्हस्व 'ओ' कार हे दोन ध्वनि बाराखडींत जास्त आहेत.

२. या भाषेंतील संस्कृत शब्दावली काढून त्या जागीं फारसी-आरबी शब्द घातले, आणि ती उर्दूलिपींत लिहिली तर (म्हणजे हिंदुस्थानींत होते तसें) तिसरा आणि नववा गुण— म्हणजे साम्याचे गुण नष्टच झाले.—डॉ. रघुवीर (लॅंग्वेज प्रॉब्लेम ऑफ इंडिया, पॅम्प्लेट नं १)

सब भाषाओंकी शक्तिका अंश

हिंदी प्रचाराचें आणि हिं. सा. सम्मेलनाचे अनेक वर्षांचे सूत्रधार श्री. पुरुषोत्तमदासजी टंडन (संयुक्तप्रांत विधिसमितीचे भूतपूर्व अध्यक्ष) यांनीं पुणें येथें हिंदीच्या याच गुणांचा म्हणजे प्रांतीय भाषांशीं साम्य असलेल्या ३, ५, ८, ९ या गुणांचा अुल्लेख करून, यामुळेंच हिंदी ही राष्ट्रभाषा मी मानतों असें सांगितलें होतें. ते म्हणाले‡ :—" मेरा जन्म हिन्दी भाषाभाषी प्रान्तमें हुआ है अतअेव हिन्दी का अभिमान होना मेरे लिअे स्वाभाविक है। पर अिस अभिमानसे मैं हिन्दी का आग्रह नहीं करता। हिन्दीमें **राष्ट्रीयत्व** और **सर्व प्रांतिक भाषा के अंशात्मक शक्तिशाली रूप की अपस्थिति देखी**, अिससे मैंने अुसका प्रचार राष्ट्रभाषा के रूपमें करना शुरू किया। हिन्दी 'अेक-कुल-अुत्पन्ना†' **सब भाषाओंकी बडी बहन** है। अिसलिअे **प्रत्येक प्रांतिक भाषाको हिन्दी सरीखी दिखती** है। अपने देशमें अंग्रेजीने माध्यमिक भाषा का स्थान ग्रहण कर लिया है। अेक तरफ तो स्वाधीनताका प्रबल युद्ध और दूसरी ओर दूसरों की भाषा की गुलामी ये मुझे कैसे दिखते है? राष्ट्रीय भावना की अिस दृष्टिसे मैं हिन्दीको देखता हूँ। **संस्कृतमें जो आंतरिक शक्ति है यही आधुनिक स्वरूप हिन्दीका है** अैसा मेरा विश्वास है। हिंदीका प्रश्न स्वराज्य का प्रश्न है।

हमारे सब कार्यों में धर्मका अधिष्ठान है। पर हम धर्मके सत्य स्वरूप को भूल गये। नवरात्रि अुत्सव के समय हम दुर्गा सप्तशती पाठ करते हैं, परंतु अुसके महत्त्व की बातको नहीं समझते। बल-शाली असुरों के संहार करने के लिअे सब देव अेकत्रित हुअे और प्रत्येकने अपनी शक्तीका तेजस्वी अंश निकाला जिससे दुर्गाका निर्माण हुआ और अुसने देवताओंका रक्षा की। अिसका अर्थ यहि है की जो बात असाध्य थी वह अिस संघटित प्रयत्नसे सफल हो सकी। राष्ट्रभाषा हिंदी यह अिसी प्रकारकी शक्तिशाली दुर्गा है, अुसमें सब भाषाओंकी शक्ति का अंश अेकत्रित हैं। अिस शक्तिशाली भाषाके द्वारा राष्ट्रीयत्वका

‡ 'शक्ति', जबलपूर दि. १३ मे, १९४५. पुणें येथील भाषणाचें वृत्त

† अेका कुलांत अुत्पन्न झालेल्या.

प्रचार कर हम अपने देशको स्वतंत्र कर सकते हैं अैसा मेरा दृढ विश्वास है। "

बंगाली भाषा राष्ट्रभाषा कां नाहीं ?

क्वचित् बंगाली* किंवा मराठीला राष्ट्रभाषापद मिळावें असें प्रतिपादलें जातें. बंगाली भाषा ही साहित्यिक दृष्टचा प्रगत असल्यानें आणि सुमारें ६ कोटींची ती मातृभाषा असल्यानें हा आग्रह व्यक्त केला जातो. वंगीय साहित्यसम्मेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. सुनीति-कुमार चतर्जी यांनीं विवेचन करून बंगाली ही राष्ट्रभाषा होअू शकणार नाहीं असें सांगितलें. " हिन्दीशीं तुलना करतांना असें दिसून येअील कीं बंगाली भाषा कठिण आहे. या भाषेचें व्याकरण सोपें असलें तरी तिची वाक्यरचना, साहित्यिक नि बोलचालीचीं अशीं दोन रूपें, अुच्चार करण्याची विशेष पद्धति यांमुळें अबंगालीयांना बंगाली भाषा ही हिन्दीपेक्षां कठिण वाटते. बंगाली भाषेच्या प्रचारासाठीं आपण कांहीं यत्न करीत नाहीं.बंगाली लिपि ही अितर प्रांतीय भाषांना हिन्दी च्या नागरी लिपीअितकी जवळची नाहीं." अशा प्रकारें बंगाली साहित्यिकांनींच आपल्या मर्यादा ओळखल्या असल्यानें हा वाद वाढ-लेला नाहीं. बंगाली ही बहुसंख्याकांची भाषा नाहीं आणि तिचा प्रसार तुरळक रीतीनेंही अन्य प्रांतांत (सं. प्रांत नि बिहार वगळून) नाहीं.

मराठीचीही तीच स्थिति

मराठीचा तुरळक प्रसार हिंदुस्थानभर आहे. कारण अेके काळीं ती राजभाषा होती. परंतु ती राष्ट्रभाषा होअू शकत नाहीं. कारण

*अि. स. १८६५ मध्येंच कॅ. केशवचंद्रसेन यांनीं हिंदी हीच राष्ट्रभाषा आहे, असें सांगितले आहे. "यदि भाषा अेकना हइले भारतवर्षे अेकता न हय तब. ताहार अुपाय कि? समस्त भारतवर्षे अेक भाषा व्यवहार करा–अि–अुपाय. अेखन जतोगुलि भाषा भारते प्रचलित आछे, ताहार मध्ये हिन्दी भाषा प्राय सर्वत्र प्रचलित. अेअि हिन्दी भाषाके यदि भारतवर्षेर अेकमात्र भाषा करा जाय, तबे अनायसे शीघ्र सम्पन्न हअिते पारे."

ती बहुसंख्याकांची भाषा नाहीं. २–२॥ कोटि लोकांची भाषा बाकीच्या ३८ कोटींना–आतां २८ कोटींना शिका–असें आपण सांगणें अन्यायाचें आहे. विशेष आग्रहानें 'मराठी हीच राष्ट्रभाषा झाली पाहिजे' असें कधीं कधीं प्रतिपादलें जातें, परंतु सामान्यत: हिन्दी हीच राष्ट्रभाषा आहे या गोष्टीस महाराष्ट्राची मान्यता आहे.

हिंदीस महाराष्ट्राची मान्यता

या संबंधाचा थोडा अैतिहासिक धागा दाखविणें अवश्य वाटतें. देवगिरीच्या यादवांच्या राज्यांत म्हणजे महाराष्ट्रांतील तत्कालीन संपन्न अशा मराठी राज्यांत, अलाअुद्दीनाची स्वारी होण्यापूर्वी साधु-संतांमध्यें हिन्दी वाणीचा प्रचार झालेला होता. कारण नामदेव-ज्ञानदेव अित्यादि साधुसंतांनीं अुत्तर हिंदुस्थानांत यात्रा केली त्या वेळीं नामदेवांनीं कांहीं हिंदी पदें रचिलीं असें दिसतें. एकनाथमहाराजांनीं कांहीं कवनें हिंदींत केल्याचें सुप्रसिद्ध आहे. शिवकालामध्यें 'भूषणा' सारख्या कवींना शिवाजीमहाराजांनीं राजकवीचा मान दिला होता. कानडी किंवा गुजराथी कवीला हा मान मिळाला नाहीं कारण त्यांची भाषा राष्ट्रभाषा नव्हती. संभाजीमहाराजांनीं दोन हिंदी काव्यें लिहिलीं आहेत. अितकें चांगलें हिंदी संभाजीला येत नसलें आणि कदाचित् दुसऱ्या कोणी तीं काव्यें त्याच्या नांवावर लिहिलीं असें मानलें तरी हिंदी भाषेस मोठेपण देण्यास संभाजी सिद्ध होता हें यामुळें अुघड दिसून येतें. शाहूकालांत अुत्तरेकडे मराठ्यांच्या स्वाऱ्या वाढूं लागल्यामुळें हिंदी भाषेशीं त्यांचा परिचय वाढला. महादजी शिंद्यांनीं हिंदी पद्यें रचून गिरिधर प्रभूची आळवणी केली आहे. पेशव्यांच्या घराण्यांतील साधुपुरुष भास्कर रघुनाथ यांनीं तुलसीरामायणाचा व्यासंग करून हिंदींत कांहीं काव्यरचना केली.* पेशवाअीच्या अखेरच्या काळांत महाराष्ट्रांतील स्त्रियांनाही हिंदी येत होते असें तत्कालीन अिंग्रज अधिकाऱ्यांनीं लिहून ठेवले आहे. ‡

---

*राष्ट्रभाषा दिग्दर्शन (ले. हर्डीकर, पृ. ९).

‡ प्रा. श्री. म. माटे, यांचें पुण्यास हिंदी दिनानिमित्त (दि. १ ऑगस्ट १९४७) भाषण.

मराठ्यांचें राज्य असतांनाही

मराठ्यांचें स्वतंत्र राज्य होतें तेव्हांही त्यांनीं मराठी भाषा दुसऱ्यावर न लादतां 'मध्यदेशांतील' हिंदीचें राष्ट्रभाषा या नात्यानें थोरपण ओळखलें होतें असें यावरून दिसून येअील. अिंग्रजी राज्यांत कांहीं काळ या प्रश्नाकडे पुढाऱ्यांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. चिपळूणकर-आगरकर-टिळक यांनीं मराठी भाषेबद्दलचा अभिमान जागृत केला. तरीही अि. स. १८८८, च्या केसरीच्या अंकांतून राष्ट्रभाषेचा मान मराठीस न देतां हिंदीसच दिलेला आहे. अि.स. १८९३–९४ सालीं श्री. केशवराव पेठे यांनीं 'राष्ट्रभाषा' नांवाचें पुस्तक लिहिलें यावरून या विषयाकडे महाराष्ट्राचें लक्ष असावें असें दिसतें.

क्रांतिकारकांचा मंत्र

अि.स. १९००च्या सुमारास जागृत झालेल्या महाराष्ट्रीय क्रांति-[1]कारकांनीं आपल्या चळवळींत हिंदीस राष्ट्रभाषापद दिलें होतें-नुकत्याच स्थापन झालेल्या नागरी प्रचारिणी सभा काशी, या संस्थेचे त्या वेळचे मंत्री कै. श्री. श्यामसुंदरदास यांनीं १९०५ मध्यें लो. टिळकांची भेट घेतली असतां अेक लिपि आणि अेक भाषेसंबंधीं लो. टिळकांनीं त्यांना सहानुभूति दाखविली. कांहीं वर्षांनंतर 'हिंदी केसरी' काढण्यास कै. माधवराव सप्रे यांस लोकमान्यांनीं अुत्तेजन दिलें. प्रथम हें पत्र नागपुराहून दर शुक्रवारीं प्रसिद्ध होअी आणि त्यांत दर मंगळवारच्या केसरींतील अग्रलेखांचें भाषांतर दिलें जात असे. अि. स. १९०६ सालीं काशी येथें भरलेल्या पहिल्या अेक-लिपी-विस्तार परिषदेच्या बैठकींत लो. टिळक अुपस्थित होते.

कै. सयाजीराव गायकवाडांचा पाठिंबा

या वेळीं बडोदें संस्थानचे दिवाण श्री. रमेशचंद्र दत्त यांनीं सयाजीराव गायकवाड यांच्या आदेशानुसार, सरकारी आज्ञा छापतांना भाषा गुजराथी असली तरी ती भाषा देवनागरींत छापली

१ त्याचप्रमाणें वंगभंग आंदोलनांतील बंगाली नेते कै. कालीप्रसन्न काव्यविशारद आदि मंडळींनींही हिंदी ही स्वभावतःच भारताची राष्ट्रभाषा आहे असें मान्य केले होते.

जाते असें सांगितलें. ही राष्ट्रीय लिपि वापरण्याची प्रथा अद्यापही बडोदें संस्थानांत चालू आहे. सरकारी अधिकाऱ्यांनीं हिंदी भाषा शिकावी असाही नियम या संस्थानांत आहे. या महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या दीर्घकालीन हिंदी सेवेचा गौरव करण्यासाठीं हिंदी साहित्य सम्मेलनाचें अध्यक्षपदही त्यांस देण्यांत आलें होतें. (अि. स. १९३४)

आतांचे विचार

याच सुमारास 'हिंदी हमारी राष्ट्रभाषा,देवनागरी हमारी राष्ट्रलिपि' अशा अुद्देशानें महाराष्ट्रांत हिंदी भाषा शिकण्याचा प्रचार सुरू झाला. या आंदोलनाचें प्रवर्तक पं. ग. र. वैशंपायन यांनीं पुणें येथें अि. स. १९४० मध्यें भरलेल्या भारतीय हिंदी साहित्यसम्मेलनाच्या स्वागताध्यक्षपदावरून पुढील अुद्‌गार काढले : "अैतिहासिक सत्य लक्षांत घेअून मराठी भाषेनें स्वेच्छेनें आपले गुण आणि शक्ति यांना भारतीय अैक्याकरितां राष्ट्रभाषेच्या वेदीवर बलिदान केलें आहे. या महान् अुद्देशासाठीं आत्मबलिदान करण्यांत ती भूषण मानते." यावरून महाराष्ट्राची अभिनंदनीय वृत्ति प्रकट होत नाहीं काय ?

'हिंदी-हिंदुस्तानी-हिंदुस्थानी' असा वाद महाराष्ट्रांत आजही चालू आहे. तथापि मराठीसच राष्ट्रभाषा करावें या विचारसरणीस कोठेंच पाठिंबा मिळालेला नाहीं.

६ : अुर्दू आणि हिन्दी या भाषा अेक नव्हेत

अज्ञान असतें खरें !

अुर्दू आणि हिन्दी या भाषांतील विभक्तिप्रत्यय आणि क्रियापदें पुष्कळशीं अेकच असल्यानें या दोन भाषांत काय फरक आहे हें चट्दिशीं कित्येकांस—आपल्याकडील कित्येक विद्वानांसही–कळत नाहीं. महाराष्ट्रासारख्या अहिंदी प्रांतांत, अुर्दू जाणणारे जे विद्वान् आहेत त्यांनाच हिंदींतील तज्ज्ञ समजण्याची वहिवाट आहे. फारसी भाषेचे किंवा अुर्दूचे प्राध्यापक आणि अुर्दूचे शिक्षणाधिकारी हें हिंदीचे ज्ञाते मानले जातात. याचें कारण या दोन भाषांतील फरकाचें अज्ञान होय; तें दूर करावें, निदान तशी दृष्टि यावी हाच हें प्रकरण लिहिण्याचा हेतु आहे.

'अुर्दू' भाषा केव्हां अुत्पन्न झाली याचा अितिहास पुढें दिला आहे. पण आज ज्या भाषेला 'अुर्दू' म्हणतात नि आज ज्या भाषेला 'हिंदी' म्हणतात त्या दोन भाषा कशा भिन्न आहेत त्याचें विवेचन येथें केलें आहे.

नामांचीं बहुवचनें

अुर्दू आणि हिंदीचें व्याकरण पूर्णपणें सारखें आहे असें म्हणणें आतां तरी चुकीचें आहे. अुर्दूचें व्याकरण फारसी व आरबी भाषेच्या वळणावर नेण्याचा हट्टाग्रह चालूं आहे. 'कवायदे-अुर्दू' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत 'अंजुमन-तरक्की-अे-अुर्दू'चे सेक्रेटरी मौलाना अब्दुल हक् म्हणतात : "आजपर्यंत व्याकरणाचीं जीं पुस्तकें प्रचलित आहेत, त्यांमध्यें अरबी भाषेच्या व्याकरणाचेंच अनुकरण केलेलें आहे" अुर्दू भाषेंत तीन प्रकारांनीं म्हणजे हिंदी, फारसी आणि अरबी-व्याकरणानुसारनामांचीं बहुवचनें होतात. अुदाहरणार्थ—

शब्द	हिंदी अ. व.	फारसी अ. व.
कागज	कागज	कागजात्
हकीम	हकीम	हकिमों

लिपिभिन्नता हाच विरोधाचा पाया

अुर्दू भाषेची लिपि फारसी आहे. कित्येकजण याच लिपीस अुर्दू लिपि म्हणतात तें चुकीचें होय. हिन्दी भाषेची लिपि देवनागरी किंवा नागरी आहे. संस्कृतची लिपि नागरी आहे तथापि तेलगू किंवा रोमन लिपींतही कांहीं संस्कृत पुस्तकें प्रकाशित झालीं आहेत. पण यामुळें संस्कृत भाषेची लिपि तेलगू किंवा रोमन आहे असें म्हटलें जात नाहीं. तसेंच कांहीं हिंदी काव्यें फारसी लिपींत किंवा कांहीं अुर्दू पुस्तकें नागरी लिपींत लिहिलेलीं आढळतात. पण हे अपवाद होत. नियम असा कीं अुर्दू भाषा म्हटली कीं फारसी लिपीचें साहचर्य आलेंच. हिंदी–अुर्दू फरकाचा आणि विरोधाचा **पायाच मुळी हा लिपिभेद** आहे. फारसी लिपि लिहिण्याची पद्धति, अुजवीकडून डावीकडे अशी अभारतीय आहे. फारसी भाषा राजभाषा झाल्यापासून म्हणजे मुसलमानी शासनकालापासून या लिपिचा प्रचार आपल्या देशांत झाला. विदेशी अिंग्रजी भाषा नि विदेशी रोमन लिपि यांचा आज आपल्या देशांत राजसत्तेमुळेंच प्रचार आहे. तेंच कारण फारसी लिपि आणि फारसी भाषा यांच्या प्रचारास त्या काळीं होतें. कालांतरानें फारसीच्या जागीं सरकारी कचेरींत अुर्दू भाषा आली. त्यासही फारसी लिपीशीं तिचें जें नातें आहे तें अेक कारण होतेच. वस्तुतः या लिपीचा आणि हिंदुस्थानचा कांहीं संबंध नाहीं. हिंदुस्थानांतील मुसलमानबंधूंचा धार्मिक दृष्टीनें या लिपीशीं थोडा संबंध येतो, पण तेवढ्यामुळें अुर्दूलाही ‘धर्मभाषेचें’ जें स्थान देण्याचा यत्न चालू आहे तो न्याय्य म्हणतां येणार नाहीं.

लिपीचा आणि धर्माचा संबंध जोडल्यानें ‘अेक लिपीच्या’ प्रचाराचा प्रश्न निष्कारण अवघड झाला आहे. त्यांतही फारसी लिपि अशास्त्रीय नि भारतीय भाषांतील अुच्चार लेखनास अपूर्ण असल्यानें विशेषच अडचण असून हिंदी-अुर्दूतील भेद वाढण्यास हाच लिपिभेद कारण आहे.

‘फारसी’ची अपूर्णता : संस्कृत नांवाची त्रेधा

फारसी लिपीच्या लेखनपद्धतींत अी, अु, अे हें स्वर, जेर, जबर, पेश आदि चिन्हांनीं दाखवितात; परंतु हीं चिन्हें लावणें हें लेखकांच्या

अिच्छेवर अवलंबून असल्यानें ती चिन्हें प्रत्यक्ष लिहिलीं जात नाहींत. यामुळें अेकच शब्द अनेक प्रकारांनीं वाचला जातो आणि त्यामुळें अर्थामध्येंही फरक पडतो. यामुळें मूळचा शब्द आणि व्याकरण माहीत असल्याशिवाय फारसी लिपींतील लेखन नीट वाचतां येत नाहीं. नागरी लिपींतील लेखन कोणीही अचूक वाचूं शकतो. फारसी लिपींत 'कतब' हा शब्द 'कुतब' किंवा 'कुतुब' अशा १०–१२ रीतीनें वाचला जातो. या लिपींत संस्कृत किंवा हिंदी शब्द लिहिले असतां जी दुर्दशा होते ती तर कींव करण्यासारखी आहे. 'कुल्लियाते वली' चें विद्वान् संपादक नि अुर्दू साहित्यिक आहसन साहब यांनीं 'दाल' आणि 'वाव' या फारसी वर्णांच्या घोंटाळ्यामुळें 'दाडिम' (डाळिंब) हा शब्द 'वाडम' असा वाचला! फारसी आणि हिंदीचे विद्वान् प्रा. श्यामसुंदरदास यांनीं अेका पद्यांतील 'कलधूत' हा फारसी लिपींत लिहिलेला शब्द 'कुलधूत' असा वाचला! यामुळें त्या पद्याचा अर्थ त्यांना लागेना! आणखी कांहीं अुदाहरणें पहा :—

संस्कृत	फारसी लिपींतील लेखनानें अुच्चार
सांख्य	संखिया
गौडप्राकृत	गौदा पिराकिरत
सारस्वत	सवारसोता
अमरुशतक	अमरसक्ता
भक्तमाल	भगतमल अि.

अशी स्थिति होत असल्यानें **फारसी लिपींतील लेखनांत संस्कृत शब्दांचा प्रयोग कमी करण्याची प्रवृत्ति** होत जाते.† या दृष्टीनें म्हणजे लिपीच्या सोयीसाठीं भाषेंतून संस्कृत शब्द काढून टाकले तर हिन्दीमध्यें काय शिल्लक राहील?

---

† किंबहुना फारसी लिपींत लिहितां येत नाहींत ते शब्द उर्दू भाषेंत घेणें योग्यच नव्हे असें आग्रहानें प्रतिपादन केलें जाते. (दरियाये लताफत–अंजुमने तरक्कीये अुर्दू, देहली)

शब्दावलींतील फरक

पारिभाषिकशब्द हे अरबी व फारसींतून अुर्दूत घेतले जातात आणि हिंदींत मराठीप्रमाणें ते संस्कृत मधूनच घेतले जातात. पण पुष्कळसे अन्य तत्सम शब्दही कारण नसतां अुर्दूमध्यें बदललें आढळतात.[1]

हिंदी	उर्दू
यहाँ	याँ
वहाँ	वाँ
पूजापाठ	पूजापाट
पाठशाला	पाटशाला
देश	देस
प्रसाद	प शाद
स्नान	अशनान
वह (अेकवचन)	वह (अेक वचन)
वे (अनेकवचन[1])	वह (अनेक वचन)

छन्दभेद

अुर्दू आणि हिन्दींत व्याकरणभेद नि लिपिभेद आहेत पण छन्द भेदही आहेत. हिन्दी भाषेंतील 'दोहा' 'सोरठा' 'चौपाअी' किंवा संस्कृत वृत्तें यांचा अुपयोग अुर्दू लेखक करीत नाहींत. फारसी आणि आरबींतील छन्दपद्धति म्हणजे गज्जल अि. त अुर्दू काव्यें लिहिलीं जातात !

फारसी लिपींत लिहिलेल्या संस्कृत शब्दांची त्रेधा वर वर्णन केली. परंतु अुर्दू लेखक जाणूनबुजून संस्कृत शब्दच लिहिण्याचें टाळतात. कठिण अरबी आणि फारसी शब्द अुर्दूत घालण्याची प्रथा लखनौवाल्या लेखकांनीं सुरू केली आणि ती वाढतच आहे. औस्ट अिंडिया कंपनीच्या काळांत डॉ. जॉन गिलख्राअिस्टच्या प्रयत्नांनीं जी हिंदी आणि अुर्दू पुस्तकें प्रकाशित झालीं त्यांतही हा शैलीभेद दिसून येतो. लिपी-साम्यानें नि लेखक स्वतः फारसी-अरबी जाणणारे असल्यानें, त्यांनीं फारशी शब्दावलि अुर्दूत आणली. पण यामुळें अुर्दू आणि हिंदी या भाषांतील फरक वाढत चालला.

---

१ असें करतांना शास्त्रशुद्ध नियम बहुशः पाहिले नाहींत कोणीकडून तरी निराळेपण दिसले म्हणजे झाले. (हिं. हि. क्यों, ३२)

वातावरणही अभारतीय

अुर्दू साहित्यिकांत अरबी नि फारसी विद्वानांची संख्या विशेष असल्यामुळें त्यांनीं लिहितांना अरबी-फारसी शब्दांचाच भरणा केला* असें नव्हे तर फारसी व्याकरण नि छन्द यांनाही आत्मसात् करून अुर्दूला विदेशी स्वरूप दिलें. याही पुढें जाअून अुर्दूतील वातावरणही अभारतीय करून टाकलें. निसर्ग नि हवामानाचे ऋतु यांचें वर्णन करतांना अुपमा नि अुदाहरणें फारस देशांतीलच ते देअूं लागले. शौर्यासाठीं 'रुस्तुम', गाणारा पक्षी म्हणून 'बुलबुल', अुत्तम फूल म्हणजे 'नरगिस', नद्या म्हणजे 'दजला' नि 'फ़रात'; डोंगर पर्वतांचे आदर्श 'तूर', अतुलनीय प्रेमासाठीं 'शिरी' नि 'फरहाद' यांचे दाखले देण्यांत येतात. सौंदर्याचा आदर्श म्हणून 'यूसफ,' पुत्रवत्सल पिता 'हजरत याकूब', अुदार-दानशूर 'हातीमताअी', न्यायाधीश 'नौशेरखाँ आदिल' यांचे अुल्लेख अुर्दूत येअूं लागले.आपल्या देशांतील भीम, अर्जुन, कोकिळ, मोर, गंगा-यमुना, हिमालय-विंध्याचल, कर्ण-विक्रमादित्य यांचे दृष्टांत चुकूनसुद्धां अुर्दूत सांपडावयाचे नाहींत. हिंदू कवीसुद्धां या भाषेंत काव्याच्या भरांत मूर्तिपूजेला शिव्या देण्यास सिद्ध हअूं शकतात ! सुजाण मुसलमान लेखकांनींही ही गोष्ट मान्य केली आहे.† "अुर्दू भाषेंतील गद्य आणि पद्य जर आम्ही पाहिलें तर त्यांत हिंदुस्थानची संस्कृति, हिंदुस्थानची विशेषता, हिंदुस्थानचा गौरव या गोष्टी कितीही शोध केला तरी यत्किंचितही सांपडणार नाहींत. अशा स्थितींत अुर्दू ही हिंदुस्थानची भाषा आहे असें आम्हीं कोणत्या तोंडानें म्हणावें ?*

'अुर्दू' मुसलमानालाच येते ?

हिंदी आणि अुर्दूमध्यें व्याकरण, लिपि, शब्द, छन्द, विदेशी आदर्श

---

*मागें '४' अंकांत दिलेले पं. अमरनाथ झा यांचें विवेचन पहा.

†'मुल्क की जबान और फाजिल मुसलमान,' या पुस्तकांत मौ. सय्यद वाहचोद्दिन सलीम, प्रा. अुस्मानिया कॉलेज हैदराबाद.

*क्वचित् आधुनिक काळांतील चार-दोन कविता अपवाद म्हणून आढळतात, पण हें चिरंतन सत्य नव्हे.

यामुळें फरक पडला आहेच, पण कांहीं मुसलमानांनीं 'अुर्दू' ला मुसलमानांचीच भाषा असें संबोधून त्या भाषेची व्याप्ति कमी केली आहे. 'पंजाबमें अुर्दू' या पुस्तकाच्या लेखकांनीं आणि सय्यद अिन्शांनीं 'दरिया-फे-लताफत' मध्यें ही भूमिका घेतली आहे. हिंदूंना चांगले अुर्दू येअूंच शकणार नाहीं असाही सिद्धान्त या आग्रही लोकांनीं मांडला आहे. 'फरहंगे असाफिया' या ग्रंथाचे परीक्षणांत मौ. अलताफ हुसेन साहब हाली लिहितात कीं "**अुर्दूचा कोश रचणारा** हा दिल्लीचा रहाणारा आणि शरीफ मुसलमान पाहिजे. कारण खुद्द दिल्लींतसुद्धां चांगली अुर्दू ही केवळ मुसलमानांचीच भाषा समजली जाते. हिंदूंच्या सामाजिक दुस्थितीमुळें 'अुर्दू-अे-मुअल्ला' ही त्यांची मातृभाषा होअू शकत नाहीं.‡"

आजची अुर्दू ही भिन्न भाषा

अबोहर येथें भरलेल्या हिंदी साहित्य सम्मेलनाच्या अधिवेशनांत (अि. स. १९४१) याबद्दल केलेल्या प्रस्तावानें हेंच घोषित केलें कीं हिंदी भाषा नि अुर्दू भाषा या भिन्न आहेत. "वास्तविक रीतीनें 'अुर्दू म्हणजे हिन्दीपासून अुत्पन्न झालेले अरबी फारसी मिश्रित रूप होय ! अैतिहासिक दृष्टीनें पाहतां 'हिन्दी' शब्दामध्यें अुर्दूचा समावेश आहे. परन्तु अुर्दूची साहित्यिक शैली, (जी थोड्याशा लोकांतच प्रचलित आहे) **हिंदीपासून आज अितकी विभिन्न झाली आहे** कीं तिचें निराळे-पण स्वीकृत करून हिन्दीच्या शैलीपासून तिचें भिन्नत्व हें सम्मेलन मान्य करीत आहे."

यह कैसे राष्ट्रभाषा बनेगी

अुर्दू आणि हिन्दी या भाषा अेकच आहेत, नांवें निराळीं असलीं तरी त्यांचें स्वरूप अेकच आहे असा जो समज पसरविला जात आहे तो किती चुकीचा आहे हें अेवढ्या ठरावावरूनही लक्षांत येअील. अशा अुर्दू भाषेस राष्ट्रभाषापद देणें अन्यायाचें, गैरमुत्सद्दीपणाचें नि अैतिहासिक अज्ञानाचेंच द्योतक ठरत नाहीं काय ? श्री. संपूर्णानंद (सध्याचें सं. प्रांतांतील कॉंग्रेस पक्षीय शिक्षणमंत्री), श्री. पराडकर, 'आज' या कॉंग्रेसी दैनिकाचे संपादक, यांसारख्या तज्ज्ञांनीं असें म्हटलें आहे कीं "जिसके साहित्यकी आत्मा और दृष्टि ही अपनी न हो वह कैसे राष्ट्रभाषा बन सकेगी ?"

---

‡ येथपर्यंतचें या प्रकरणांतील विवेचन पं. पद्मसिंह शर्मा यांच्या 'हिन्दी-अुर्दू-हिंदुस्तानी' या पुस्तकांतील पृ. ४० ते ९२ पर्यंतचा सारांश आहे.

लोकभाषेपासून निराळी भाषा

हिन्दी भाषेपासून अुर्दू भाषा भिन्न केव्हां झाली किंवा अुत्पन्न केव्हां झाली ? हा काळ अि. स. १७४४–४५ आहे असें श्री. चन्द्रबली पांडे यांनीं संशोधनपूर्वक सिद्ध केलें आहे*. अुर्दूचे पहिले व्याकरणकार सय्यद अिन्शा अल्लाहखाँ म्हणतात कीं " दिल्लीच्या शहाजहानाबाद-मधील सुखवस्तु लोकांनीं अितर भाषांतील दिलचस्प शब्द निवडले, कांहीं शब्दांत आणि वाक्यांत फेरफार केला आणि अन्य भाषांपासून भिन्न अशी अेक नवीन भाषा निर्माण केली, व तिचें नांव अुर्दू ठेविलें." 'अुर्दू 'चे आद्यपंडित शाह हातिम यांनीं ' दिवाण जादा ' या पुस्तकांतील प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं " गेल्या ११–१२ वर्षांत पुष्कळ देशी शब्दांचा वहिष्कार करून. . .मोगल राजकुमार आणि शिष्ठ सूफी कवि जे शब्द पुष्कळ अुपयोगांत आणतात अशा अरबी नि फारसी शब्दांचाच स्वीकार या पुस्तकांत केला आहे. " याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, सभोंवतालीं चालू असलेल्या ' हिंदवी 'ला किंवा ' भाषे 'ला अर्थात् लोकभाषेला बहिष्कृत करून अरबी-फारसी जाणणारे राजे-रजवाडे आणि कवि यांनीं अुर्दू भाषा निर्माण केली.

आमफहम नव्हे खास पसन्द

आज कित्येक पुढारी 'अुर्दू'ला 'आमफहम' किंवा बोलचालीची

---

*'अुर्दूका जन्म-दिन' हा 'राष्ट्रभाषा' मासिकांतील मार्च १९४४चा लेख पहा, किंवा 'अुर्दू की जबान' ही पुस्तिका (ले.चंद्रबली पांडे ना. प्र. सभा काशी) पहा. †" शहांजहानाबादमें खुशबयान लोगोंने अेकमत होकर अनेक भाषाओंसे दिलचस्प शब्दोंको जुदा किया और कुछ शब्दों तथा वाक्योंमें हेर-फेर करके दूसरी भाषाओंसे भिन्न अेक अलग नयी भाषा अीजाद की और अुसका नाम अुर्दू रख दिया।" त्याच लेखांतील दिलेल्या मूळ उताऱ्याचा अनुवाद. यासाठीं पं. रामचंद्र शुक्लकृत 'हिंदुस्तानी का अुद्गम' या पुस्तकांतील पृ. ७–८ वरील विवेचन पहा. सं. १९९६ (डॉ. ताराचंदांचें विवेचन या मंडळींना अमान्य आहे.)

भाषा म्हणतात. त्यांनीं हें लक्षांत घ्यावें कीं अुर्दूच्या प्रारंभिक काळांतच शाह हातिमनें या भाषेस 'खास-पसन्द' असें म्हटलें आहे! अितकेंच नव्हें तर ही भाषा 'देहलवी' म्हणजे दिल्लीच्या आसपासची लोकभाषा नसून दिल्लीच्या शिष्ट नि निवडक लोकांचीच आहे असें स्पष्ट केलें आहे! अि. स. १७९६ मध्यें 'फोर्ट वुअिल्यम कॉलेज' मधील फारसीचे तज्ज्ञ शिक्षक डॉ. गिलक्राअिस्ट यांनींहि 'अुर्दू'चा अुल्लेख (the polished language of the court) 'राजदरबारांतील शिष्टभाषा' असा केला आहे! शाह हातिमची भाषा ही गर्भावस्थेंतील अुर्दू होय, त्यांत पुष्कळच हिन्दी शब्द शिल्लक राहिले होते–पण आतां तेहि शब्द नाहींसे झाले आहेत!

'अुर्दू' म्हणजे लष्करची भाषा नव्हे

'अुर्दू' शब्दाचा अर्थ लष्कर असा घेऊन, त्या लष्करांत असलेल्या मुसलमान-हिंदूंच्या अेकत्रित बोलण्यानें ही भाषा निर्माण झाली असें मानण्याची वहिवाट आहे. पण ही कल्पना चुकीची आहे[१] 'अुर्दूचा अर्थ लष्कर असा त्या वेळीं घेतला गेला नाहीं. बाजारांतील अगर लष्करांतील हिंदु मुसलमानांच्या मिश्रित व्यवहारानें 'अुर्दू' भाषा निर्माण झाली नाहीं.[२] हिंदु–मुसलमानांच्या संयुक्त परिश्रमाचें फळ म्हणजे अुर्दू असें सांगितलें जातें तेंहि बरोबर नाहीं. मुसलमानांची फारसी आणि हिंदूंची हिंदी यांच्या मिश्रित भाषेस अुर्दू हें नांव दिलें गेलें नाहीं.अुर्दू ही* 'मेल–जोल'ची भाषा नाहीं. अुर्दू–अे–मोअल्लांतील अमीरांची ही भाषा असून तिचे अधिकारीही अुर्दू म्हणजे शाही लोकच आहेत. सय्यद अहमद देहलवी फरहंगे असाफियांत† म्हणतात.

"सगळें कांहीं ठीक, पण माझें मन हें कबूल करण्यास कधींही तयार नाहीं कीं, या टोकापासून त्या टोकापर्यंत 'टकसाल बाहेरची' भाषा असावी आणि तिची तारीफ करण्यांत या बंद्यानें (सेवकानें) मग्न

१. 'मुगलों की हिन्दी'च्या निवेदनांत श्री. चन्द्रबली पांडे, अेम्.अे. काशी–ना. प्र. सभा.

२. डॉ. सुनीतिकुमार चतर्जी–अध्यक्षीय भाषण राष्ट्रभाषा परिषद, कराची १९४६.

*भाषाका प्रश्न–ले. चंद्रबली पांडे पृ.११९–२० पहा.

†अुर्दू की जबान (चंद्रबली पांडे, काशी ना.प्र.सभा) पृ.११–१२–१३

व्हावें. कांहीं शब्द व्याकरणानुसार चालू नयेत आणि आम्ही त्यांची स्तुती करावी. आम्ही आमच्या भाषेला 'मरहटीवाले' 'लावनीवाले' यांची भाषा, अडाण्यांचें बोलणें किंवा शेंडी अगर बुडखा नसलेल्या शब्दांचा समूह बनवूं इच्छित नाहीं. तसेंच हिंदुस्थानांतील ख्रिस्ती, नवमुस्लीमभाई, नुकतेच विलायतेंतून आलेले साहेब लोक, बबर्ची, नोकर, पूर्वेकडील माणसें, कंपबॉय किंवा लष्करांतील सातगांवांचें लोक बोलतात त्या भाषेस आम्ही उर्दू मानीत नाहीं. आमच्या विनोदी मित्रांनीं थट्टेनें या असल्या भाषेचें नांव पुडदू ठेवलें आहे.' (फरहंगे असाफिया, तकरीज्, जिल्द अव्वल पृ. २३, सबब तालीफ्)

"जे लोक उर्दूच्या भाषेला हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची खूण समजतात त्यांनीं ' नविन मुस्लीमभाई ' आणि जे लोक उर्दूला लष्करांची भाषा समजतात त्यांनीं ' छावणींतील सतवेझडे 'वांशिदा' या शब्दांकडे विशेष लक्ष द्यावें, आणि नेहमींसाठीं त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं अुर्दू ही ' अुर्दू की जबान ' किंवा अुर्दूची भाषा आहे, ती कांहीं ' पूडदू ' अर्थात लष्कर आणि बाजारची ' सतबेझडी ' बोली नव्हे. राजकीय धोरणासाठीं आज कांहीं सांगितलें जात असलें तरी अुर्दूचा अतित काल ओरडून सांगत आहे कीं,

" अुर्दूचे स्वामी त्या लोकांचे संतान होते कीं जे खरोखर फारसी भाषा बोलत होते. यामुळें त्यांनीं संपूर्ण फारशी छंद, फारसींतील मनोरंजक आणि रंगदार भाव, आणि रचनापद्धतींचा ' फोटोग्राफ' अुर्दूत चितारला. (नज्मे आझाद–नवल किशोर गैस प्रि. वर्क्स लाहौर १९१० अि. पृ. १४)

" अुर्दूचे निर्माणकर्ते फारसी अरबी किंवा तुर्की भाषेंतील होते हें विसरून चालणार नाहीं. मौ. अहमद देहलवी विचारतात कीं हें लोक हिंदीच्या पद्धतीप्रमाणें रचना कसे करूं शकले असते ?

" अुर्दूचा जन्मदिनच जो १७४५ तो काय दर्शवितो ? मुसलमानी साम्राज्य नष्ट झाल्यावर त्याच्या पडत्या काळांत या भाषेचा जन्म झाला! तेव्हां मोगलांचें लष्कर संपुष्टांत आलें होतें ! मराठे, शीख आणि अिंग्रज यांचीं लष्करें या वेळीं सिद्ध झालेलीं होतीं ! " (अुर्दू की जबान)

अुर्दू–की–जबान म्हणजे राजदरबारची भाषा

मग 'अुर्दू' हें नांव भाषेला आलें कसें ? याचा संबंध 'अुर्दू-अे-मुअल्ला' किंवा 'जबान-अे-उर्दू-मुअल्ला' या शब्दप्रयोगाशीं आहे. 'अुर्दू'[१] म्हणजे वरिष्ठाच्या तळाची जागा किंवा दरबार. या दरबारची जी भाषा ती अुर्दू. 'जबान-अे-अुर्दू-अे-मोअल्ला' याचा अर्थ '**श्रेष्ठ दरबारची भाषा**' म्हणजे–'राजभाषा'. " the language of the exalted Camp or Court "—a sort of Badashahi or King's speech.[२] असा होतो. 'अुर्दू-अे-मोअल्ला' या शब्दप्रयोगाप्रमाणें 'जबान-अे-अुर्दू किंवा 'अुर्दू-की-जबान' म्हणजे अुर्दू (दरबार)ची भाषा असेहि शब्द अुपयोजिले जात. अुर्दू म्हणजे बादशाही शिबिर किंवा राजदरबार अर्थात् शहाजहानबाद किंवा लाल किल्ला. या ठिकाणीं बोलली जाणारी जी भाषा ती अुर्दूची किंवा दरबारची भाषा. ही साहजिकच प्रौढ असे. परंतु १८ व्या शतकाच्या अुत्तरार्धांत मोगलशाही म्हणजे 'अुर्दू-अे-मोअल्ला' चें महत्त्व नष्ट होअूं लागलें. तेव्हांपासून 'अुर्दू-अे-मोअल्ला' या लांब नांवाच्या अैवजीं या भाषेस केवळ अुर्दू हें छोटें नांव रूढ झालें.* अशा रीतीनें 'मजलिसी जबान'–दरबारी भाषा या अर्थी केवळ 'अुर्दू' शब्द अुपयोगांत आला. अिंग्रजांचें राज्य सुरू झाल्यावर कोर्ट-कचेरींतून फारसीच्या जागीं फारसी लिपींत लिहिली जाणारी ही अुर्दू भाषा त्यांनीं राजभाषा ठरविली. अुर्दूला

---

१ मूळ अर्थ : tent, camp, encampment, dw llings, dw lling or encampment of a chief. तुर्की आणि मोंगल राजांचे camps किंवा तळ हेच दरबार असत. Page 178. S. Cha arji 'Indo Aryan and Hindi

२ was always the fash onable & elegant language among those who had anything to do with the court, the army or the administration in the different subha's of the Moghal empire from the 18 th century. –Page 192 Indo Aryan and Hindi.

* नुक्. शो. सुलैमानी, दारूल मुसन्निफीन, आजमगढ़ सन १९३८ अि. पृ. १०२ (अर्दूकी जबान पृ.९).

आमफ़हम म्हणजे लोकभाषा म्हणणें कसें चुकीचें आहे हें या विवेचनावरून स्पष्ट होईल.

दक्षिणेंतील रेखता

अुर्दूच्या अुत्पत्तीसंबंधानें डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनीं अुद्बोधक विवेचन केलें आहे, तेंहि या विचारास पुष्टी देणारें आहेः

बहमनी राज्यस्थापनेपासून (अि. स. १३०० पासून) अुत्तर हिंदुस्थानांतील मुसलमान दक्षिणेंत येअूं लागले. यांपैकीं पुष्कळसे लोक वांगरू (दिल्लीच्या आसपासचा प्रदेश) नि पंजाब या प्रदेशांतील होते. या प्रदेशांतील भाषा 'खडी बोली' ही होय. साहजिकच ती लोकभाषा ते दक्षिणेंतहि बोलूं लागले. फारसी भाषेच्या प्रदेशापासून ते आतां फारच दूर आले होते. त्यांना फारसी आणि देशभाषा या दोन्ही भाषांचें शिक्षण घेणें अडचणीचें वाटूं लागलें. अुत्तरेकडील दिल्ली प्रदेशांतील त्यांच्या नातलगांशीं त्यांना दळणवळण करावयाचे होते आणि मराठी-कानडी आदि भाषियांपासून निराळेपणहि ठेवावयाचें होतें. या दृष्टीनें खडी बोलीचा आणि फारसी लिपीचा त्यांनीं अुपयोग सुरू केला. हिन्दी शब्द नि हिन्दी कल्पनांचा आणि हिन्दी बोलीचा त्यांनीं स्वीकार केला, लिपि फक्त परकीय घेतली. या भाषेंत १७–१८ व्या शतकांत 'कुतब-मुश्तरी' सारखे चांगले ग्रंथहि निर्माण झाले. मात्र सतराव्या शतकाच्या शेवटीं अुत्तरेंतील मुसलमानांनीं फारसी वळणावर असलेली अुर्दू-अे-मोअल्ला ही भाषा फारसी लिपींतून लिहिण्यास आरंभ केलेला होता. दक्षिणेंत राहिलेला आणि नंतर अुत्तरेंत गेलेला प्रसिद्ध कवि 'वली' हा या भाषेंतील पहिला कवि होय. याच्या कवितेंत फारसी शब्दांचें प्रमाण (आजच्या मानानें) बेताचें होतें, म्हणून तिला **रेख़ता**—कवितांच्या ओळींतून पसरलेली शब्दावली—असा शब्द रूढ झाला.

अुत्तर हिंदुस्थानांतील मुसलमानांना 'वली'ची भाषा ही फारशी लिपींत लिहिली जात असल्यानें आणि फारसी शब्द अितःस्ततः पसरलेले असल्यानें जवळची वाटूं लागली. याच लिपीसमानतेनें फारसी-अरबी

शब्द सहजगत्या तींत आणतां येअूं लागले नि कुराणाच्या पवित्र भाषेशींहि या लिपीसाम्यानें तिचा संबंध जोडला गेला. हें स्वरूपसाम्य अितकें वाढूं लागलें कीं हिन्दीच्या या रूपास 'जामनी', 'यामनी' अथवा 'यावनी' (अहिंदूंची भाषा) असें नामाभिधान देण्यांत येअूं लागलें.

हिंदींत गद्याचा अवतार

"या भाषेकडे हिंदूंनी प्रथम लक्ष दिलें नाहीं, कारण त्यांची साहित्यिक भाषा व्रजभाषा किंवा अवधि ही होती. अठराव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांनीं अुपयोजिलेल्या खडीबोलीकडे हिंदूंचें लक्ष गेलें. *अितर अुपभाषांचें महत्त्व कमी झाल्यामुळें त्या 'पडी बोलीं' झाल्या आणि दिल्लीच्या आसमंतांतील बोलीस 'खडी बोली' हें नांव मिळालें. अेकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत पत्रव्यवहाराखेरीज कोणतेंही गद्य[1] लिहिलें गेलें नव्हतें. मुन्शी 'सदासुख' यांनीं भागवत पुराणाचा 'सुखसागर' या नांवानें खडी बोलींत अठराव्या शतकाच्या शेवटच्या कालांत अनुवाद केला. व्रज नि अवधी या अुपभाषा ज्या लिपींत लिहिल्या जात त्याच लिपींत त्यांनीं हा ग्रंथ लिहिला, व्रज नि अवधींत येतात त्याप्रमाणें महत्त्वाचे संस्कृत शब्दहि तसेच ठेवले. त्यानंतर कलकत्त्याच्या फोर्ट वुअिल्यम कॉलेजमध्यें जेम्स गिल-क्राअिस्ट यांच्या अुत्तेजनानें लल्लूजीलाल यांचा प्रेमसागर नि

---

*नया साहित्य भा. २ (दिसंबर १९४५). श्री. सज्जादजहीर यांनी या विषयावर लिहितांना असें दर्शविले आहे कीं, अुर्दू भाषेंतून मुद्दाम अरेबी–फारसी शद्ब वहिष्कृत करून त्या जागीं संस्कृत शद्ब घालून आधुनिक हिंदीचा विकास झालेला नाहीं. व्रज, अवधी, मैथिली या उपभाषांची संस्कृताश्रित राहण्याची जी परंपरा संतकालांत आणि रीतीकालांत होती तीच परंपरा नव्या लेखकांनीं खडी बोलींत चालू ठेवली अेवढेच ! भारताचे 'नवजागरण' व्यक्त-विण्यास खडी बोलीचा उपयोग करतांना या हिंदू लेखकांच्या मनांत मुसलमानविरोधी किंवा अुर्दूविरोधी भावना नव्हती.

१. हें वरोबर नसून पूर्वीं गद्य लिहिलें जात होतें असें श्री. चंद्रबली पांडे यांनीं 'हिं. हिमायत क्यो ?' या नव्या अि. स. १९४७ च्या पुस्तकांत सिद्ध केलें आहे.

सदल मिश्र यांचा 'नासिकेतोपारव्यान' हे गद्यग्रंथ या भाषेंत झाले. (अि. स. १८०३) याच वेळीं मीर आमन[१]चें 'बाग-ओ बहार' (१८०४) आणि हफीजुद्दीन अहमदचे 'खिराद अफरोज' हीं अुर्दू पुस्तकें प्रकाशित झाली.

अशा रीतीनें नागरी हिन्दी आणि फारसी हिन्दी किंवा अुर्दू या भाषांत गद्याचा अवतार झाला नि अेकाच भाषेचीं दोन भिन्न रूपें प्रकट झालीं. अेकोणिसाव्या नि विसाव्या शतकांत गद्यवाङ्मयाचा विस्तार झाला. अिंग्रजांनीं आपला विशेष वरद हस्त फारसी हिंदी (अुर्दू)वर ठेविला. यामुळें दरबारांत, कोर्टांत, सैन्यांत फारसी-हिन्दीला (अुर्दूला) विशेष महत्त्व प्राप्त झालें. विद्यापीठांत मात्र दोन्हीं रूपांना स्थान मिळालें."

हिंदी-अुर्दू वादाचें मूळ

हिन्दी भाषा ही फारसी लिपींत लिहिण्याची बुद्धिपुरःसर किंवा सहजगत्या जी प्रथा मुसलमानांनीं सुरू केली त्यांत हिंदी-अुर्दू वादाचें मूळ आहे[२] हें या अितिहासावरून लक्षांत येअील. (लिपिसाम्यानें शब्दसाम्य, शब्दसाम्यानें कल्पनासाम्य असें या भाषेचें नातें अेकीकडे फारसीशीं जोडलें गेलें; आणि दुसरीकडे, कुराणाची लिपि हीच या भाषेची लिपि असल्यानें मुसलमानांनी तिचे नातं धर्माशीं जोडले.) या अुर्दूत भारतीय संस्कृति नि भारतीय आदर्श यांचा ठावठिकाणाहि नाहीं. ही गोष्ट राष्ट्रीय संस्कृतीच्या उपासकांना आवडली नाहीं; संस्कृतमयी हिंदीच्या विकासांत त्यांनीं आपला आदर्श प्रतिबिंबित केला. यांतच सध्यांच्या हिंदु-मुसलमान वादाची भर पडून या प्रश्नास राजकीय स्वरूप प्राप्त झालें. राजकीय प्रश्न सुटेपर्यंत अेकभाषेचा प्रश्नहि सुटणार नाहीं."

---

१ यानेंच अुर्दू ही मेलजोलची किंवा अैक्याची भाषा आहे, हा मतप्रवाह दडपून मांडला. (श्री. पांडे-हिं. हिमायतक्यों?)

२ अिन्डो आर्यन अॅन्ड हिन्दी. तसेंच हा सिद्धांत पं. पद्मासिंह शर्मा यांनीं 'हिंदी-हिंदुस्थानी-अुर्दू' या पुस्तकांत आणि 'मातृ-भाषा की महत्ता' या पुस्तकांत सैय्यद अमीरअली 'मीर' यांनींही मान्य केला आहे. (पृ. ५१).

हा भाषेचा प्रश्न कसा सुटेल याविषयी पं. रविशंकर शुक्ल* म्हणतात, "राजनीतिक एकता की भांति भाषाकी अेकता भी खरीदी नहीं जा सकती। एकता अुस दिन होगी, जिस दिन मुसलमान भारतीय कहालानेमें गर्वका अनुभव करेंगे, और जिस दिन वे भारतीय वस्तुओंसे प्रेम करना सीखेंगे।... जब वह दिन आअेगा, तब जिस प्रकार आधुनिक तुर्कीमें, तुर्की भाषामेंसे अरबी-फारसीके और आधुनिक फारसमें, फारसीमेंसे अरबीके शब्द निकाले जा रहे हैं, अुसी प्रकार मुसलमान अुर्दू को विदेशी साज-सज्जासे सजाना छोडेंगे, और तभी अुर्दू वास्तवमें हिंदीके निकट आअेगी। अुस दिन मुसलमान स्वयं यह माँग करेंगे कि हमारी राष्ट्रभाषा हिंदी हो। जबतक वह दिन नहीं आता तबतक भाषाको सांप्रदायिकता का आखाडा बनाना या हिंदी की बलि देना वृथा ही नहीं, अनुचित और महा अनर्थकारी है।"

ढांचा (सांगडा) म्हणजे भाषा नव्हे

'अुर्दू ही मूलतः खडी बोली असल्यानें कांहीं आक्षेपक असें म्हणतात कीं, हिन्दी शैलीच्या म्हणजे नागरी हिंदीच्या पूर्वी अुर्दू शैली निर्माण झाली.† पण "असें म्हणण्यानें हिंदी-अुर्दूची समस्या सुटण्यास कांहीं साहाय्य होत नाहीं. हिन्दी भाषियांचा अुर्दूवाल्यांना सवाल आहे की, "आपल्याशीं तडजोड करण्यासाठीं तुम्ही ज्या बोलींत बोलतां तिला—खडी बोलीला—आमच्या परिष्कृत व्रज आणि अवधी या भाषांचा त्याग करून— आम्ही साहित्यिक रूप देण्याची अिच्छा धरली. अर्थात् भारतीय शब्दावलीचा अुपयोग करून; परंतु आपण अडाणीपणानें हट्ट धरतां कीं, आम्ही तुमची अुर्दू भाषा सर्वथैव स्वीकारावी कीं जिचे अस्थिपंजर भारतीय,पण मांस, कातडें आणि रक्त सुद्धां विदेशी आहे! असें म्हणणें कीं—अुर्दू राष्ट्र-भाषा होती आणि अुगाच हिंदीवाल्यांनीं तंटा सुरू केला आहे—

---

* 'राष्ट्रभाषा की समस्या और हिंदुस्तानी आंदोलन' (पृ.१०४-१०५)

† डॉ. ताराचंद—नॅ. लॅं. फॉर अि.—पृ. १४०. पण तेही लिपि-भिन्नतेबद्दल कांहींच बोलत नाहींत.

हें वस्तुस्थितीची थट्टा करण्यासारखें आहे. राज्यकर्त्यांच्या दावानें कोर्ट-कचेऱ्यांतील लोक अुर्दूचा व्यवहारांत अुपयोग करीत किंवा आज करीत आहेत, या गोष्टी कांहीं अुर्दूची राष्ट्रीयता सिद्ध करीत नाहींत! याच तऱ्हेनें जर अुद्यां अँग्लो-अिंडियन असें म्हणूं लागले कीं आतांपर्यंत आपण अिंग्रजीला राष्ट्रभाषा मानीत होतां, ती शिकत होतां, आतां कां तिचें स्थान बदलतां? तीहि आर्यभाषाच आहे ना! तर आमच्या जवळ काय अुत्तर आहे? केवळ असें सांगण्यानें कीं 'अुर्दूका ढांचा भारतीय है।' काम भागणार नाहीं! जिप्सी किंवा सिंहलीचाहि ढांचा भारतीय आहे–पण केवळ ढांचा म्हणजे भाषा नव्हे!"[१] अलाहाबाद विद्यापीठांतील प्रसिद्ध शब्दशास्त्रज्ञ डॉ. बाबूराम सक्सेना यांच्या या मतावर अुर्दूच्या किंवा हिंदुस्तानीच्या समर्थकांचें काय अुत्तर आहे?

हिंदी–अुर्दूत मूलभूत भेद

हिंदी-अुर्दू यामधील भेद थोडक्यांत असा स्पष्ट करतां येअील. "हिन्दी-अुर्दूच्या रचनेंत समानता असल्यानें त्यांच्यात वरकरणी साम्य दिसतें, आणि भाषाशास्त्रदृष्ट्या (अुच्चारपद्धति नि व्याकरण) त्या दोन्ही अेक आहेत असें सांगितलें जाते. नाहीं तर अितर दृष्टीनें विचार केल्यावर हें स्पष्ट दिसून येतें कीं हिंदी आणि अुर्दूमध्यें मूलभूत भेद आहे. प्रवृत्ति, कवितेचीं वृत्तें, पदयोजना, शब्दकोष§ आदि सगळ्या गोष्टींत अेकता तर नाहींच पण प्रतिकूलता किंवा विरोधच आहे! कोठपर्यंत हे भेद वर्णावे? या भाषांच्या अंगांवरील पोषाख म्हणजे लिपीसुद्धां अेक नाहीं! लिपीच्या निराळेपणामुळें (मुळांत त्या भाषा) अेक असल्या तरी-आज त्या अेक राहिल्या नाहींत. असें असतांहि या लिपीच्या प्रश्नाची हेळसांड केली जात आहे. यांतील रहस्य काय आहे कोण जाणें?"*

---

१. डॉ.बाबूराम सक्सेना, हिंदी सारथी साप्ताहिक १३जुलै१९४२

§प्रकरण चारमधील पं.अमरनाथ झा यांनीं दिलेलीं उदाहरणें पहा.

*श्री. चंद्रबली पांडे-भाषा का प्रश्न-प्रकरण 'अुर्दूकी अुत्पत्ति' पृ. १२७.

८ : : हिंदुस्तानी, हिंदुस्थानीचे अनेक अर्थ

सरकारी अट्टाहास

'हिंदुस्तानी' या नांवाचीच भाषा राष्ट्रभाषा आहे असा अट्टाहास सरकारी रीतीनें मद्रास नि मुंबईच्या काँग्रेसपक्षीय सरकारनें चालविला आहे नि त्यानुसार ती भाषा शाळांतून शिकविण्याची सक्ति अि.स.१९३९ पासून सुरू करण्यांत आली आहे. या काँग्रेसपक्षांतहि हिंदुस्तानीच्या अर्थाबद्दल ओढाताण चालू आहे. काँग्रेसनें अधिकृत रीतीनें या शब्दाची व्याख्या केलेली नाहीं. या महान् संस्थेंतील गांधी-गटानें 'हिंदुस्तानी'-चा पुरस्कार करून तिच्या प्रचारार्थ अहिंदी प्रांतांतून 'हिंदुस्तानी प्रचार सभा' काढल्या असून, 'हिंदी-अर्दू-हिंदुस्तानी' च्या परीक्षा या संस्थांकडून घेतल्या जात आहेत. हिंदी साहित्य सम्मेलनानें नेमलेल्या राष्ट्रभाषा प्रचार समिति (वर्धा) कडून पूर्ववत् हिंदीचा प्रचार प्रांतोप्रांतीं चालू आहे. याच समितीच्या गळीं 'हिंदुस्तानी' भाषा मारण्याचा यत्न आचार्य कालेलकर (या समितीचे तत्कालीन प्रमुख) यांनीं केला पण हिंदी साहित्य सम्मेलनांतील हिंदी पक्षानें (ज्यांत शें.९९काँग्रेसवाले आहेत) तो अुलटवून लावला.तेव्हां म. गांधी, कालेलकर यांनीं वर्ध्यासच स्वतंत्रपणें हिंदुस्तानी प्रचार सभा स्थापन केली नि तिच्या द्वारा आपल्या कल्पनेंतील भाषेच्या प्रचाराचें कार्य आरंभिलें आहे (इ. स. १९४१).

व्यक्ति तितके अर्थ

ही 'हिंदुस्तानी' भाषा आहे तरी काय ? तिच्या स्वरूपाविषयींच्या कल्पना कशा भिन्न भिन्न आहेत नि 'हिंदी' भाषेपासून या भाषेचें वेगळेंपण काय आहे तें समजणें अवश्य आहे. यामुळें 'हिंदुस्तानी'ला राष्ट्रभाषा करण्यास राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांचा विरोध कां आहे तेंहि स्पष्ट होअील. त्या दृष्टीनें या शब्दाच्या अर्थाविषयींचीं अनेकांचीं मतें पुढें संकलित केलीं आहेत.

दोन भाषा

डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनीं 'अिन्डो आर्यन् ॲन्ड् हिंदी' या पुस्तकांत पृष्ठ १३१–३२.वर पुढील स्पष्टीकरण दिलें आहे."हिंदी आणि

हिंदुस्थानी हे शब्द भारतीय आर्यभाषेला म्हणजे "का, में, पर, से; अिस, अुस्, जिस, किस; ना, ता, आ, गा" या भाषेच्या अर्थी मीं योजिले आहेत. साहित्यिक आणि सुसंस्कृत अशा दोन भाषांची आधारभूत ही भाषा होय. या दोन भाषा म्हणजे *हिन्दू (ची) नागरी हिंदी (High H ndi) आणि मुसलमानी अुर्दू.

हिंदुस्तानींत संस्कृत शब्दांचा बहिष्कार

"अुत्तर हिंदुस्थानांतील बोलाचालीच्या भाषेला हिन्दी हें सर्वांत जुनें नि सर्वांत सोपें असें नांव आहे. बाराव्या नि तेराव्या शतकापासून हा शब्द रूढ आहे. सर्वसामान्य लोकांत 'हिंदी' हा शब्द आजहि वापरतात. मी सुद्धां त्याच अर्थानें तो अुपयोगिला आहे. हिंदुस्तानी हें त्यानंतरचे फार वर्षांचें आणि अवजड (cumbrous) रूप होय हिंदुस्तानी हा शुद्ध फारसी शब्द. हिंदी भाषेच्या मुसलमानी रूपाचा-अर्दूचा पर्यायवाची शब्द-म्हणून बव्हंशीं व्यवहृत होत आलेला आहे. या भाषेंत फारसी नि अरेबी शब्दांचें वैपुल्य असून हिंदी नि संस्कृत शब्दांचा बहिष्कार केलेला असतो.

हिंदुस्तानी म्हणजे अुर्दू

"भाषाशास्त्राचे कांहीं भारतीय अभ्यासक, राष्ट्रीय सभेचे सामाजिक नि राजकीय कार्यकर्ते यांनीं 'हिंदुस्तानी' हा फारसी शब्द अधिक व्यापक अर्थानें अुपयोगिण्याचा यत्न केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं 'नागरी हिंदी आणि अुर्दू या भाषांची आधारभूत भाषा म्हणजें हिंदुस्तानी'. त्यांचे हे प्रयत्न चालू असले तरी व्यवहारांत, (फारसी लिपींत लिहिल्या जाणाऱ्या, फारसी--अरबी--शब्दांचा अधिक प्रयोग असणाऱ्या 'हिंदी' च्या अेका शैलीसच) हिंदुस्तानी आणि अुर्दू हे दोन्ही शब्द समान अर्थानें अद्यापिहि पुष्कळसे अिंग्रज, अितर परकीय आणि कित्येक मुसलमान योजतात.

हिंदुस्थानी

"या फारसी शब्दाचें भारतीय रूप हिंदुस्थानी (संस्कृतमधील 'स्थान' या शब्दापासून झालेला शब्द, 'स्तान' या फारशी शब्दापासून

नव्हे) हें आज भुत्तर हिंदुस्थानांतील लोकभाषा, बोलचालीची भाषा आणि नागरी ' हिंदी व अुर्दू 'ची आधारभूत भाषा दर्शविते. मराठी, गुजराथी, बंगाली आणि दक्षिणेकडील भाषांत 'हिंदूस्थानी' 'हिंदुस्थानी' हा शब्द रूढ आहे. बिहारमधील अशिक्षित मुसलमान आणि संयुक्त-प्रांत, मध्यप्रांत, राजपुताना यांतील हिंदु, पंजाबी हिंदु आणि शीख यांना मी ' थ '* वर्णाचा शब्द अुच्चारतांना अैकलेलें आहे."

अुर्दूस जवळची

गुलाम अुस-सय्यद्दीन† म्हणतात :—" हिंदुस्तानी म्हणजे काय ? ' कांहीं लोक असें म्हणतात कीं, अशी भाषा अस्तित्वांत नाहीं. केवळ प्रचाराचें साधन म्हणून आपल्या मनांतील भाषा अज्ञानी लोकांच्या गळीं अुतरविण्यासाठीं या शब्दाची योजना करण्यांत आली आहे' अुर्दूवाल्यांना असें वाटते कीं, या नांवामुळें आपल्यावर हिंदी लादली जाअील; हिंदीवाल्यांना वाटते कीं या नांवाखालीं अुर्दू हीच राष्ट्रभाषा केली जाअील !... मला असें वाटते कीं या दोन वहुसंख्य जमातींच्या सांस्कृतिक अैक्यांतून निर्माण झालेली भाषा हीच राष्ट्रभाषा होअू शकेल. ' हिंदुस्तानी 'नें हें साध्य होअील. फारसी-अरबीच्या बहिष्कार करणाऱ्या[1] आधुनिक हिंदीस हिंदुस्तानी म्हणतां येणार नाहीं. **हिंदुस्तानी ही अुर्दूस[2] पुष्कळ जवळची** आहे. कारण ही भाषा हिंदु-मुसल-

---

*पू. गांधीजींनीं वर्ध्यास स्थापन केलेल्या सभेचें नांव 'हिंदुस्तानी प्रचार सभा' आहे, हिंदुस्थानी नव्हे ! किंबहुना हिंदुस्तानी लिहिण्याचा त्यांनीं अगदीं नियमच केलेला आहे, 'थ' लिहिला तर मुसलमान बिथरतील!

†हे गृहस्थ सध्यां मुंबई सरकारचे शिक्षणसल्लागार आहेत. यांचा लेख : नॅ. लॅ. फॉ. अि. पृ. २१०, सं. झेड्. अे. अहमद

१. आपल्यासारखी भाषाशुद्धीची चळवळ अुत्तरेंत नाहीं. मुद्दाम कोठल्याहि शब्दाचा बहिष्कार आधुनिक हिंदींत केला जात नाहीं.

२. अुर्दू म्हणजे अरबी-फारसीशब्दमय भाषा. त्या भाषेस हिंदुस्तानी जवळची म्हणजे तिचा कल हे शब्द अुपयोगिण्याकडे अधिक रहाणार. बिहार, काश्मीर सरकारची नि आझादांची हिंदुस्तानी ही अुर्दूकडे पूर्णतया झुकलेली आहे. अुर्दूत कांहीं हिंदी शब्द घातले म्हणजे झाली हिंदुस्तानी !

मान अैक्यांतून निर्माण झाली आहे.[३] परंतु साहित्यिक अुर्दू ही पुष्कळदां अप्रचलित फारसी, अरबी शब्दांनीं भरलेली भाषा असल्यानें अुर्दू ही हिंदुस्तानी नव्हे. . . पूर्व कालीन हिंदी आणि सोपी अुर्दू यांना हिंदुस्तानी जवळची आहे. **हिंदुस्तानी राष्ट्रभाषा झाली तरी साहित्यिक अुर्दू किंवा साहित्यिक हिंदी याची जागा ती भाषा घेअू शकणार नाहीं.**[४]

'हिंदुस्तानी म्हणजे अुर्दूच'

' हिंदुस्तानी ' हा शब्दप्रयोग केव्हां व कोणत्या अर्थानें रूढ झाला याची हकीकत अधिकृत व्यक्तींच्या म्हणजे अिंग्रज अधिकाऱ्यांच्या शब्दांत पुढें दिलेली आहे*.

"डॉ. गिलख्रिस्तच्या आश्रयानें फोर्ट वुइल्यम कॉलेज सुरू झालें तेव्हां हा प्रश्न विशेष रीतीनें पुढें आला. याबद्दल डॉक्टरसाहेबांचें म्हणणें पुढीलप्रमाणें आहे. "इतर भाषांप्रमाणें हिंदुस्तानीमध्यें भिन्न भिन्न शैली आहेत, परंतु त्यांपैकीं तीन महत्त्वाच्या आहेत.

---

३. हें खरें नाहीं.—डॉ. चतर्जींचें रा. भा. परिषद अध्यक्षीय भाषण—कराची.

४. म्हणजे ही नवीनच भाषा होणार ! तिला साहित्यिक स्वरूप नसलें तर आमच्या राष्ट्राचे अुच्च विचार तींत व्यक्त कसे करतां येणार?

* महाराष्ट्र विद्यापीठासाठीं नेमलेल्या कमिटीचे साक्षीपुराव्याचें काम चालू असतां हिंदी व हिंदुस्तानी भाषा म्हणजे काय याबद्दल चर्चा झाली. त्यांत हिंदुस्तानी म्हणजे फारसी लिपींत लिहिलेली अुर्दू, व हिंदी म्हणजे नागरी लिपींत लिहिलेली हिंदुस्तानी अशी व्याख्या सांगण्यांत आली होती. कमिटीच्या सभासदांनीं याबद्दल जास्त माहिती विचारली नाहीं, पण हा प्रश्न पुढें घातक होअील म्हणून पुण्याच्या हिंदी प्रचार संघाचे त्या वेळचे मंत्री श्री. चितळे (प्रस्तुत पुस्तकाचा लेखक) यांनीं या कमिटीशीं पत्रव्यवहार केला. त्यांत अधिकृत विद्वानांनीं या प्रश्नावर पत्र लिहून पाठविल्यास कमिटी त्याचा विचार करील असें सेक्रटरीचें पत्र आलें. त्यानुसार काशीच्या नागरी प्रचारिणी सभेच्या कार्यकारी मंडळांतील एक सदस्य व 'हिंदी' मासिकाचे विद्वान् संपादक श्री. चंद्रबली पांडे यांस हिं. प्रसंघानें विनंति केली. दि. ११ मार्चला श्री. चंद्रबली पांडे यांनीं आपले विचार महाराष्ट्र विद्यापीठ समितीस कळविले. त्यांतील मुख्यभाग येथें दिला आहे.

(१) फारशी वळणाची, (२) मध्यम प्रतीची किंवा देशज हिंदुस्तानी, (३) सामान्य लोकांची म्हणजे हिंदवी.

सौद, वली, मीरदर्द, अि. कवींच्या कवितांत व राजकारणांत पहिली शैली वापरली जाते. तिचा ओढा अरेबी व फारसीकडे सहजच असतो. मुन्शी (कारकन) मध्यम प्रतीची भाषाशैली वापरतात. तिसरी शैली सरकारी कायद्यांचें जें भाषांतर मि. फॉस्टर यांनीं केलें त्यांत वापरलेली आहे. **ही शैली नागरी लिपींत लिहिलेली व सामान्य हिंदु नोकरांत व शेतकऱ्यांमध्यें प्रचलित आहे.**[1] मी मात्र मध्यम शैलीचा अुपयोग करण्याचा यत्न केला आहे, कारण फारसी वळण किंवा हिंदवी वळणाचा तो सांधा आहे. (Gilchrist's Dictionary)"

"येथें ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे कीं, फोर्ट वुअिल्यमच्या सरकारनें खरोखरीच्या म्हणजे सामान्य लोकांची **मातृभाषा असलेल्या** व नागरी लिपींत लिहिल्या जाणाऱ्या **हिंदी भाषेमध्यें कायद्यांचीं भाषांतरें केलीं होतीं.** परंतु त्यानंतर मुन्शीच्या शैलीला म्हणजे 'मध्यम प्रतीच्या हिंदुस्तानी'ला सरकारनें पाठिंबा दिला. त्या वेळचे तेथील सरकारी अधिकारी व कांहीं वर्षांनीं जे मद्रासचे गव्हर्नर झाले ते सर सी. पी. ट्रिव्हेलिन म्हणतात (इ. स. १८३४ मध्यें):—

ही लोकभाषा नव्हे.

" "अरबी वळणाची हिंदुस्तानी, जी कलकत्त्याच्या सरकारी आश्रयानें वाढीला लागली आहे व जी फोर्ट वुइल्यम कॉलेजमधील मुन्शी व मौलवी उपयोगांत आणतात **ती हिंदुस्थानांत अितरत्र कोठेंही प्रचलित नाहीं.**२" (History of the Application of the Roman Alphabet by M. williams).

ही संस्कृतोत्पन्न नव्हे

सर रिचर्ड टेंपल (मुंबईचे गव्हर्नर, अि. स. १८७७–१८८०) लिहितात :—

---

१. ही लोकभाषा होय. २. यांस लोकभाषा कसें म्हणणार ?

"हिंदुस्थानांतील मुसलमानांची भाषा फारसी वळणाची होती. या शतकाच्या मध्यकाळांत **तीस हिंदुस्तानी म्हणूं लागले व तिलाच पूर्वी अुर्दू म्हणत.** अद्यापहि लाहोर, आग्रा, लखनौ येथील जिल्हा-कोर्टांतून हीच भाषा उपयोगांत आणली जाते. इतरत्र मात्र त्या त्या प्रांताची भाषा कोर्टांत वापरतात. अुदाहरणार्थ, बंगाल्यांत बंगाली, बिहारमध्यें हिंदी, मुंबई अिलाख्यांत मराठी, गुजराथी, कानडी, दक्षिणेंत तामिळ अित्यादि. या प्रमुख भाषांपैकीं हिंदुस्तानी[3] व तामीळ या भाषा वगळल्यास बाकी सर्व भाषा संस्कृतोत्पन्न आहेत."

यावरून हिंदुस्तानी म्हणजेच अुर्दू होय अशी सामान्यतः अिंग्रज अधिकाऱ्यांची कल्पना असते हें दिसून येअील. सर सी. पी. ट्रिव्हेलिन यांनीं असंदिग्धपणें सांगितलें आहे कीं, मुन्शी मौलवींची अरबी वळणाची भाषा अितर प्रांतांत मुळींच प्रचलित नाहीं!

हिंदीपासून अुर्दू निघाली

तीन वर्षांपूर्वी तुर्कस्थानांतून म्हणजे अिस्लाम धर्मीय देशांतून अेक पत्रकारमंडळ हिंदुस्थानांत आलें होतें. ते लोक अनेक ठिकाणीं हिंडले. त्या मंडळाचे प्रमुख श्री. फसीद-रिफकी-अते यांनीं 'हिंदुस्तानी' संबंधीं पुढील विचार प्रकट केले.[4]

"संस्कृत भाषेपासून निघालेल्या प्राकृत आणि पाली या दोन शाखांपासून सुमारे **दहाव्या शतकांत हिंदीचा जन्म झाला.** या भाषेंमध्यें संस्कृत शब्दांच्या अैवजीं **अरबी-फारसी शब्द घालून** ज्या भाषेस आपण अुर्दू म्हणतों ती बनली†. हिंदी डाव्या बाजूनें अुजवीकडे या पद्धतीनें नागरी लिपींत लिहिली जाते, आणि अुर्दू ही अुजवीकडून डावीकडे अरबी लिपींत लिहिली जाते. दोहोंच्या बोलचालीची भाषा हिंदुस्तानी होय...."

---

३. ही संस्कृतोत्पन्न भाषा नव्हे. मग प्रांतीय भाषांशीं तिचें साम्य कसें काय असणार? ४. हिंदी स्वराज्य, खांडवा, ८-६-४३.

† 'संस्कृत शब्दांचा बहिष्कार नि अरबी-फारसींचा स्वीकार' हा 'अुर्दू'चा पाया होय, हें या परकीय पुढाऱ्यानें मान्य केलें म्हणावयाचें.

दगडविटा एकच पण--

हा मुसलमान तुर्की पंडितहि म्हणतो कीं, हिंदीपासून अुर्दू बनली, आणि येथील अेक मुसलमान विद्वान् सांगतात कीं, अुर्दूपासून हिंदी निघाली० ! हा तुर्की पत्रपंडित, बोलाचालीच्या भाषेला 'हिंदुस्तानी' म्हणतो, म्हणजे या भाषेंत साहित्यनिष्पत्ति करूं लागले कीं ती हिंदी तरी होणार किंवा अुर्दू तरी होणार, हें त्याच्या ध्यानांत आलेलें आहे. हें पुढचें रूप लक्षांत घेऊन म्हणजे तें रूप व्यक्तविणारें नांव राष्ट्रभाषेला दिलें पाहिजे. 'आधार'-भूत भाषेवर रचनेचा बंगला कसा होणार यावरूनच तें देअूळ आहे कीं मशीद आहे, कीं चर्च आहे कीं टाअुनहॉल आहे हें ठरावयाचें आहे. सर्वच अिमारतींना दगड, विटा, चुना, सिमेंट हे आधारभूत असतात ! पण दगड-विटा म्हणजे कांहीं अिमारत नव्हे. केवळ दगड-विटांचे ढीग रचून तेथें जसा आश्रय घेतां येत नाहीं तसा 'बाजारू हिंदीनें' समग्र जीवनाचा व्यवहार कसा पुरा होणार ?

पू. गांधीजींची विचारसरणी

ब्रिटिश शासनकालांत हिंदीचें राष्ट्रीय व्यापकत्व ओळखून तिला सार्वदेशीय भाषचें आग्रहानें स्थान देणारे पहिले पुढारी स्वामी दयानंद होत. त्यांनीं आर्यसमाजाच्या प्रचारांत संस्कृत अितकेंच हिंदीला स्थान दिलें. अलीकडच्या २५ वर्षांत म. गांधींनीं हिंदी प्रचाराला सार्वत्रिक महत्त्व आणून दिलें. त्यांच्याच प्रेरणनें अहिंदी प्रांतांत, विशेषतः दक्षिणेंत हिंदीचा प्रचार सुरू झाला. आज त्यांनींच "हिंदी–अुर्दू –हिंदुस्तानी" अशा नांवानें या प्रचाराला निराळें वळण देण्याचे यत्न चालविले आहेत. हें कार्य हिं. सा. सम्मेलनास संमत नाहीं असें पाहून त्यांनीं स्वतंत्रपणें प्रचार सुरू केला आहे.* राजकारणांतील हिंदु-

---

०याच प्रकरणांतील 'रेडिओवरील हिंदुस्तानी' या विभागांत डॉ. मौलवी अब्दुल हक् यांचें भाषण पहा.

*गांधीजींनी हिं. सा. सम्मेलन सोडलें असलें तरी सम्मेलनाचें कार्य चालू आहे, परंतु त्यांनीं हिंदुस्तानी प्रचार सभा सोडली तर ती चळवळच

(टीप पुढील पानावर)

मुसलमान अेकतेशीं त्यांनीं राष्ट्रभाषेचीं सांगड घातली नि त्यामुळें या कार्यांतहि पंथभेद अुत्पन्न झाले ! राष्ट्रभाषेविषयीं त्यांनीं पुष्कळच लिहिलें आहे, त्यांतील १।२ उतारे येथें देतो, म्हणजे त्यांची ' हिंदुस्तानी' काय आहे तें कळून येअील.

दि. १९–१०–३८ च्या हरिजनमध्यें गांधीजी लिहितात––"खरी स्पर्धा हिंदी नि अुर्दू यांत नसून हिंदुस्तानी नि अिंग्रजी मध्यें आहे.[१] हें युद्ध मोठें निकराचें आहे. मी अतिशय काळजीपूर्वक या युद्धाकडें पहात आहें. काँग्रेसच्या कल्पनेंतील[२] हिंदुस्तानीला अजून निश्चित आकार आलेला नाहीं. जोंपर्यंत काँग्रेसचा सर्व व्यवहार हिंदुस्तानींत होत नाहीं तोंपर्यंत ही भाषा साकार होणार नाहीं. हें करण्यासाठीं हिंदी आणि अुर्दूची मदत घ्यावी लागेल. भावी हिंदुस्थानांत. . ही हिंदु नि मुसलमानांची सामान्य भाषा होअील.[३] तथापि त्या वेळींहि अरबी-फारसी शब्दांचा भरणा असलेल्या अुर्दूची भरभराट होअील नि संस्कृत

(मागील पानावरून)

थंडावेल ! कारण या सभेचें कार्य केवळ त्यांच्या व्यक्तिमत्वावरच चालणार आहे.–(राष्ट्रभाषा–आगस्त १९४७, ले. आनंद कौसलयायन)

१. वस्तुस्थिति अशी अनुभवास येत आहे कीं राजकारणांत जसें केवळ अिंग्रजांशीं युद्ध नव्हतें, तर तें अिंग्रज नि कांहीं हटवादी मुसलमान यांच्याशीं होतें, आणि आजहि आहे; तसेंच भाषेच्या बाबतींत अिंग्रजी नि अुर्दूशीं हिंदीचें युद्ध आहे. जशी आज अुर्दू थोड्या लोकांची मातृभाषा आहे, तशी अिंग्रजीहि कित्येक ख्रिस्ती नि स्थायिक युरोपियनांची मातृभाषा आहे. मग ती संपन्न भाषा जर राष्ट्रभाषा होअू शकत नाहीं तर दरिद्री अुर्दू तरी कां व्हावी ?

२. म्हणजे आज ही भाषा अस्तित्वांत नाहीं. अस्तित्वांत नसलेली भाषा राष्ट्रभाषा करण्याचा अट्टाहास कां ?

३. वरती तुर्की पत्रकार म्हणतो कीं, आज ही सामान्य भाषा आहेच. प्रकरणाच्या प्रारंभीं डॉ. चतर्जींनींहि हेंच म्हटलें आहे.

शब्द असलेल्या हिंदीचाहि अुत्कर्ष होत राहील.[४] परंतु या दोनहि भाषांतील अुत्तम गुण हिंदुस्तानींत अेकरूप होतील.[५]

हिंदी = अुर्दू = हिंदुस्तानी

'हिंदुस्तानी' या लेखांत गांधीजी लिहितात, "हिंदुस्तानी हें नांव कोणत्या भाषेस द्यावे? अुर्दू अथवा हिंदी यांपासून भिन्न अशी, या नांवाची स्वतंत्र भाषा नाहीं. कधीं कधीं लोक हिंदुस्तानीलाच अुर्दू म्हणतात. कॉंग्रेसनेंहि आपल्या नियमावलींत अुर्दूला हिंदुस्तानी असें म्हटलें आहे काय? सगळ्यांत जास्त लोकांकडून बोलल्या जाणाऱ्या हिंदीला त्या (नियमावलीं)त स्थान नाहीं असें म्हणणें म्हणजे अर्थाचा अनर्थ होअील... हिंदी आणि अुर्दूच्या मिश्रणानें अशी भाषा तयार करावयाची कीं जिनें आपलें सर्व काम सुरळीत चालेल. **परंतु अशा तऱ्हेची लिहिली जाणारी[६] भाषा प्रचलित नाहीं.** मात्र अुत्तर हिंदुस्थानांत कोट्यवधि अशिक्षित हिंदु नि मुसलमानांची हीच अेक बोली आहे"[७]

---

४. या दोन भाषा चालू रहाणार आणि ही नवी हिंदुस्तानीहि! हीच तर अडचण आहे! या नव्या भाषेची शैली संस्कृत किंवा अरबी वळणाची न झाली तर तिच्यांत साहित्य कसें लिहिलें जाणार? असें वळण लागलें कीं ती हिंदी किंवा अुर्दू होणारच. का प्रत्येक संस्कृत शब्दापुढें कंसांत आरबी-फारसी शब्द देत रहाणार? बोलचालीच्या म्हणजे टांगा नि स्टेशनवर अुपयोगिल्या जाणाऱ्या भाषेसाठीं सम्मेलनें नि प्रचारसभांची आवश्यकता नाहीं!

५. कदाचित् दोन्ही भाषांचे दुर्गुणच या नव्या भाषेंत येतील! पुढील गोष्ट प्रसिद्ध आहे. बर्नाड शॉना अेका सुंदर नटीनें विवाह करण्याची गळ घातली. ती म्हणाली: "माझें रूप नि तुमची बुद्धि संततीला मिळेल." शॉ अुद्गारला "अहं. तुझी बुद्धि नि माझें रूप त्या संततीस मिळेल म्हणून ही भानगड नको!"

६ ज्या भाषेंत साहित्य नाहीं ती भाषा शाळांतून शिकविण्याचा नि प्रचाराचा अट्टाहास कां?

७. रविशंकर शुक्ल: हिंदी भाषा की समस्या और हिंदुस्तानी आंदोलन. पृ. १०५: हें विधान सिद्ध करण्याचें आव्हान लेखकानें गांधीजींना दिलें आहे.

ही बोली लिहिण्यांत येत नाहीं म्हणून ती अपूर्ण आहे. जी भाषा लिहिली जाते तिच्या दोन स्वतंत्र शैली आहेत. त्या दिवसेंदिवस भिन्न होत होत अेकमेकींपासून दूर जात आहेत.[८] **म्हणून हिंदुस्तानीचा अर्थ "हिंदी आणि अुर्दू"** असा झाला आहे...या दोन्ही शैलींना जवळ आणण्याचा प्रयत्न करणारी संस्था आज नाहीं."०

यापूर्वी 'हिंदी-हिंदुस्तानी' अथवा 'हिंदी यानें हिंदुस्तानी' असें नांव गांधीजींनी प्रसृत केलें होतें, आतां मात्र 'हिंदुस्तानी' हेंच नांव त्यांनीं पसंत केलेलें दिसतें! याच्याहि पुढें आतां त्यांनीं असें समीकरणच मांडलें आहे कीं हिन्दी = अुर्दू = हिंदुस्तानी ! †

बाजारू हिंदी म्हणजे हिंदुस्तानी

राष्ट्रभाषा या विषयाबद्दल गु. प्रा. द. वा. पोतदार यांनीं आपले पंचवीस मुद्दे 'सबकी बोली' या मासिकाच्या' सप्टें. १९४० च्या अंकांत मांडले आहेत. त्यांतील 'हिंदुस्तानी' संबंधीं त्यांचे विचार पुढें दिले आहेत–" बाजारू हिंदीचेंच नांव अुर्दू आहे. हिंदुस्तानी हें नांव सुद्धां त्याच बाजारू भाषेचें दुसरें जुनें नांव[१] आहे. हीच बाजारू भाषा आमची राष्ट्रभाषा आहे.[२] (मुद्दा १४ वा) साहित्यिक

---

८. रविशंकर शुक्ल : व्रज हिंदी आणि अवधी हिंदीच्यापेक्षां अुर्दूला आजची हिंदी जवळची नाहीं काय ? तुलसीची हिंदी नि गालिबच्या अुर्दूत जेवढें अंतर आहे त्यापेक्षां 'प्रसाद'ची हिंदी नि इकबालच्या अर्दूत अधिक अंतर नाहीं. पृ. १०२. (हिं. भा. समस्या)

०. त्या वेळीं नव्हती, आतां स्वतः गांधीजींनीच यासाठीं 'हिंदुस्तानी प्रचार सभा' ही संस्था स्थापन केली आहे.

† राष्ट्रभाषा का प्रश्न (ले. गांधीजी) पृ. ९२ ते ९४ व १०६.

१. डॉ. चतर्जींनीं या नांवाचा अुल्लेख केला नाहीं. जुनें नांव 'हिंदी' होते असेंच त्यांनीं म्हटलें आहे : (या प्रकरणाच्या आरंभीचा अुतारा पहा).

२. ही भूमिका राष्ट्रभाषाप्रचारकांची नाहीं. केवळ बाजारू व्यवहारासाटीं राष्ट्रभाषा नको असून आमचे अत्युच्च विचार, अत्युच्च साहित्य, विज्ञान, शास्त्रें या सर्वांचे ग्रंथ असणारी भाषा राष्ट्रभाषा म्हणून पाहिजे आहे. प्रकरण–२ नि ४ (राष्ट्रभाषेचे गुण पहा).

अुर्दू अेक कृत्रिम भाषा आहे. तिला हिंदुस्थानांत कोठेंहि स्थान नाहीं. (मुद्दा १५). हिंदी, हिंदुस्तानी आणि अुर्दू यांचें स्वरूप लौकिक दृष्टीनें अेक होतें आणि भविष्यकाळांतहि तें अेकच राहील. (मुद्दा २३). साहित्यिक हिन्दी किंवा साहित्यिक अुर्दू शिकणाऱ्यांना हिंदुस्तानी शिकणें[3] किंवा शिकविणें आवश्यक होअील; फरक अेवढाच कीं त्यांना हें शिकणें सोपें जाअील."

भारतीय नभोवाणी आणि हिंदुस्तानी

ऑल इंडिया रेडियोचें धोरण हिंदुस्तानीच्या नांवाखालीं अुर्दूचा-फारसीमय अुर्दूचा–प्रचार करण्याचें आहे. या नभोवाणीविभागांत 'हिन्दी'ला स्वतंत्र प्रांतिक भाषा म्हणूनहि स्थान नाहीं. हिंदुस्तानी म्हणजे अुर्दू अशी सोयिस्कर कल्पना सरकारी अधिकाऱ्यांनीं करून घेतली असून त्यानुसार भारतीय कार्यक्रम नि वृत्त हें अुर्दूत सांगितलें जातें. हे कार्यक्रम बाजारू भाषेंत होत नाहींत, कारण त्यासाठीं लागणारे शब्दच त्या बोलींत नाहींत. या नभोवाणीकरवीं 'हिंदुस्तानी क्या है?' * या विषयावर सहा विद्वानांचीं व्याख्यानें झालीं. रेडिओ-विभागानें व्याख्यात्यांना दोन वाक्यें देअून हिंदुस्तानीच्या दृष्टीनें त्यावर टीका करण्यास सुचविलें होतें. तीं दोन वाक्यें हीं :

१. फेड्रल लेजिस्लेचर के लिये फेहरिस्ते राय-दहिन्दगान तैयार करने के सिलसिलेमें जो अिब्तदाअी कार्रवाअी की जायगी अुसके बारेमें सर अेन्. अेन्. सरकार लॉ.मेम्बरनें आज असेम्ब्लीमें रोशनी डाली।

२. संयुक्त-प्रान्तीय व्यवस्थापिका-परिषदमें अेक प्रश्न का अुत्तर देते हुअे न्यायमन्त्री डॉक्टर काटजूने अुन अुद्योगधंदो की सूची दी, जिनकी अुन्नति के लिये सरकारने सहायता देना स्वीकार किया है।

---

३. त्या लोकांची बाजारू व्यवहाराचीच जर ही भाषा तर ती त्यांना कां शिकावी लागेल? साहित्यिक अुर्दू नि साहित्यिक हिंदी येणारांना 'बाजारू भाषा' येणार नाहीं काय?

*. २० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी १९३९ ला हीं व्याख्यानें झालीं.

या सहा जणांचीं मतें निरनिराळीं आहेत, तीं पुढें दिलीं आहेत.

डॉ. ताराचंद : " हिंदुस्तानी म्हणजे खडी बोली. . .हिंदी-अुर्दूच्या मिश्रणानें अेक खिचड़ी भाषा अुत्पन्न होअील. . .ही साहित्यिकही[१] होअील."

" **अुर्दू म्हणजेच हिंदुस्तानी होय.**" [२]

डॉ. मौलवी अब्दुल हक् :

हिंदी ही अुर्दूपासून अुत्पन्न झालेली भाषा. अुर्दूमधील अरबी-फारसी शब्द काढून त्याजागीं संस्कृत शब्द घालून जी बनविली गेली ती भाषा हिंदी होय.[३] 'सोप्या शब्दांचा अुपयोग करा' अशी आजकाल ओरड चालू आहे. पण असें करण्यानें साहित्यिक ओज लोप पावण्याचाच संभव अधिक. पारिभाषिक शब्दांच्या वेळीं फारच अडचण अुत्पन्न होअील. . .आम्हाला दिलेल्या वाक्यांपैकीं पहिलें वाक्य आम्हांस समजतें पण **दुसरें वाक्य संस्कृत शब्दांनी भरलेलें** असल्यानें आम्हांस समजत नाहीं. . . ही आमची भाषाच नव्हे.[४]

---

१. असा आशावाद व्यक्त करणारे हेच अेक गृहस्थ दिसतात ! (देशज शब्दांचा अुपयोग पारिभाषिक शब्द म्हणून करावा अशी त्यांची विचारसरणी आहे.)

२. गांधीवादी मंडळींनीं अितका प्रचार चालविला असतांही हें मत कायम आहे.

३. मागच्या प्रकरणांतील श्री. बाबूराम सक्सेनांचें अुत्तर वाचा. असें म्हटलें जाते कीं फोर्ट वुइल्यम् कॉलेजमधील मुन्शींनीं अुर्दूचीं पुस्तकें घेऊन त्यांतील अरबी, फारसी शब्द अुचलून त्या जागीं संस्कृत आणि हिंदीचे अपरिचित शब्द घालून जी भाषा बनविली ती झाली हिंदी (अुर्दू, अंजुमन-तरक्की-अुर्दू, अप्रैल सन १९३७). पण ही कल्पनाच चुकीची आहे. "कारण याच्या आधीं म्हणजे १८०३ च्या आधी हिंदी गद्य अस्तित्वांत होतेंच, शिवाय ज्या 'प्रेमसागर' पुस्तकावरून हा निष्कर्ष अुर्दूवाले काढतात तो प्रेमसागर व्रजभाषेंतून खडी बोलींत तयार केला आहे, अुर्दूतील अुर्दू शब्द काढून तेथें हिंदी शब्द ठेवून नव्हे." —'हिंदी की हिमायत क्यों ?' (ले. चंद्रबली पांडे, पृ. ३७, ३८, ३९.)

४. या वृत्तीचा विचार करा !

बाबू राजेंद्रप्रसाद : यांनीं गांधीजींच्या धर्तीवर हिंदुस्तानीची व्याख्या केली आणि पुढील मत दिलें ! "पहिलें वाक्य कांहीं अंशीं मला पसंत आहे, पण दुसरें बिलकुल नापसंत. कारण सवाल, जबाब, फेहरिस्त, मदद् या शब्दांअैवजीं जणू काय जाणूनबुजून प्रश्न, अुत्तर सूची नि सहाय्यता हे शब्द घातले आहेत ![1] लेजिस्लेटिव्ह असेंब्ली या शब्दाअैवजीं व्यवस्थापिका परिषद वापरणें अयोग्य.

"हिंदुस्तानी जाणणाराला हिंदी आणि अुर्दू या दोहोंबद्दल आपलेपणा वाटावयास पाहिजे; तसेंच त्याला जरुरीप्रमाणें म्हणजे सीमाप्रांतांत फारसी-अरबी शब्दांचा अधिक भरणा करून आणि बंगालसारख्या प्रांतांत संस्कृत शब्दांचा भरणा करून बोलतां, लिहितां यावें[2]... कार्यकारिणी समिति आणि मजलिसे–आमिला हे दोन्ही शब्द सर्वांना आले पाहिजेत.[3]"

डॉ. जाकीर हुसेन खां : "मी ज्या भाषेंत बोलत आहें तीच हिंदुस्तानी.... अुर्दूवाला किंवा हिंदीवाला ज्या भाषेस नांवें ठेवूं शकणार नाहीं ती हिंदुस्तानी. विद्वान् मंडळींत व काव्यग्रंथांत दोन्ही शैल्या राहिल्या तरी चालतील, परंतु बोलचाल, व्यवहार, शाळा यांतून तरी अेकच भाषा व्हावी. पहिलें वाक्य हिंदुस्तानी आहे;[4] दुसरें मात्र माझ्या भाषेच्या शैलींत नसल्यामुळें मला समजत नाहीं."

---

१. प्रश्न-अुत्तर-सूचि हे शब्द अधिक परिचयाचे,का सवाल–जबाब, फेहरिस्त ? याचा निःपक्षपातीपणें विचार करा.

२. याप्रमाणें अेक वेळ बोलणें अिष्ट होअील, पण सीमाप्रांतासाठीं निराळ्या भाषेंत लेख आणि बंगालसाठीं (संस्कृतप्रधान) निराळा लेख लिहूं लागल्यावर 'अेकभाषा' कोठें शिल्लक राहिली ?

३. हिंदुस्तानी शिकावयाची म्हणजे फारसी, अरबी, संस्कृत या भाषा बहुत शिकल्या पाहिजेत, त्याशिवाय हे दोन्ही शब्द कसे समजणार ?

४. याच वाक्याला 'अुर्दू' असें पं. व्रजमोहन दत्तात्रय नि बॅ. असफअली यांनीं आपल्या व्याख्यानांत सांगितलें आहे आणि तिलाच हे गृहस्थ हिंदुस्तानी म्हणतात ! वर्धा शिक्षणपद्धतीच्या या 'राष्ट्रीय' आधारस्तंभाला दुसरे वाक्य समजतही नाहीं !

पं. ब्रजमोहन दत्तात्रय : " पहिलें वाक्य अुर्दू आहे. दुसरें वाक्य हिंदीही नाहीं. मी बोलतों ती भाषा हिंदुस्तानी होय. "

बॅ. असफअल्ली : " ज्या भाषेपासून अुर्दू अुत्पन्न झाली नि ज्या भाषेबद्दल अमीर खुसरोला प्रेम होतें ती भाषा आजची अुर्दू किंवा हिंदी नव्हे.. . .या दोन्ही भाषांनाही **हिंदुस्तानी म्हणतां येणार नाहीं.** आम्हाला दिलेलीं वाक्यें अुर्दू आणि हिंदीचे नमुने होत. अुर्दू, **हिंदी नि हिंदुस्तानी या तीनहि भाषा भिन्न आहेत.**[५] अुर्दू-हिंदीच्या संयोगानें जी गंगाजमनी भाषा होणार[६] आहे ती हिंदुस्तानी होय.

भारतीय नभोवाणी आणि भारतीय हिंदी साहित्य सम्मेलन

वरील सहा विद्वानांत हिंदी जाणणारा असा अेकच पुरुष रेडिओ-विभागास मिळाला नि तो म्हणजे डॉ. राजेंद्रप्रसाद ! त्यांचें राजकीय धोरण रेडियोविभागाच्या हिंदुस्तानी धोरणास पोषकच होतें. हिंदी साहित्य संम्मेलनाच्या कार्यकर्त्यांपैकीं किंवा हिंदीभाषी विद्वानांपैकीं कोणासही व्याख्यान देण्यास न बोलाविण्यांत या विभागाचा हेतु काय असावा हें सांगण्याचें कारण नाहीं. अबोहर येथील हिं. सा. सम्मेलनाच्या अध्यक्षांनीं याबद्दल स्वाभाविकपणें आपल्या भाषणांत राग प्रकट केला. त्याच अधिवेशनांत रेडियोच्या हिंदी-विरोधी धोरणाबद्दल निषेधप्रदर्शक ठरावही झाला. ३–४ वर्षें हिंदी लेखक नि वक्त्यांनीं रेडियोविभागावर बहिष्कार टाकला. आतां कांहीं तडजोड झाली असून हा बहिष्कार स्थगित झाला आहे.

अुर्दू आणि हिंदी यांचें स्वतंत्र कार्यक्रम ठेवा

नभोवाणीकडून होणाऱ्या हिंदी भाषेच्या अुपेक्षेबद्दल आपलें गाऱ्हाणें मांडण्यासाठीं काशीच्या नागरी प्रचारिणीसभेचे अध्यक्ष श्री. संपूर्णानन्द यांच्या प्रमुखत्वाखालीं हिं. सा. सम्मेलनाचें शिष्ट-

---

५. अेकाच भाषेचीं हीं तीन नांवें होत असें मानणाऱ्यांनीं राष्ट्रीय मुसलमानांच्या या विचाराकडे अवधान द्यावें.

६. ही भाषा आज अस्तित्वांत नाहीं असाच याचा अर्थ आहे.

मंडळ दि. १–२ फेब्रुवारी १९४५ ला रेडियोविभागास भेटण्यास गेलें होतें. शिष्टमंडळानें आपलें म्हणणें मांडलें : ‡ "रेडियोवरील भाषेस हिंदुस्तानी नांव दिलें तरी ती वस्तुतः अरबी-फारसी शब्दांनीं भरलेली अुर्दूच आहे... हिंदी भाषेची अेक शैली अुर्दू आहे. परंतु संयुक्त प्रांतापासून ...महाराष्ट्रापर्यंत ही भाषा समजली जावी अशी अिच्छा असेल तर, ज्या भाषेला हिंदी म्हणतात तिचाच अुपयोग रेडियोविभागानें केला पाहिजे. नित्य प्रचारांत असलेल्या अरबी-फारसी शब्दांचा बहिष्कार हिंदींत केला जात नाहीं. परंतु ही गोष्ट असंदिग्धपणें लक्षांत ठेवली पाहिजे कीं, **हिंदुस्थानांत संस्कृत-प्राकृत भाषांना जें स्थान आहे तें कधींही अरबी-फारसी किंवा अन्य विदेशी भाषेला नाहीं. नवीन शब्दांच्या रचनेत अरबीला मुळींच स्थान नाहीं.** फारसी ही आर्यभाषा असल्यानें तिचा कांहींसा अुपयोग होअील..या सिद्धांताप्रमाणें जर रेडियोविभागाला काम करावयाचें नसेल तर अुर्दूशैली आणि हिंदीशैली यांचे स्वतंत्रपणे कार्यक्रम नभोवाणीनें करावे.[1]

नभोवाणी नि गांधीजींची हिंदुस्तानी !

रेडियोवरील " हिंदुस्तानी ही अुर्दूच आहे " अशी तक्रार केवळ संमेलनानेंच केली असें नाहीं, तर गांधीजींनीं 'हिंदुस्तानी'च्या प्रचारार्थ स्थापन केलेल्या 'हिंदुस्तानी प्रचारसभे'चे मंत्री श्री. श्रीमन्नारायण अगरवाल यांनीं असेंच प्रकटकेलें आहे कीं,[1] '**रेडियोची हिंदुस्तानी' ही अुर्दुच आहे.**" श्री. काका कालेलकरही म्हणतात कीं, "आमच्यांत भांडणें लावण्यासाठीं सरकार आमच्यावर ही भाषा

---

‡ 'राष्ट्रभाषा' मासिक, वर्धा, फरवरी १९४५, पृ. ५३–५४.

१. हिंदुस्तानी नांव घेअून रेडियो विभागानें अुर्दूचाच प्रचार केला. शेवटीं मराठी, अिंग्रजी आदि भाषांप्रमाणें कां होअीना "आमच्या हिंदींत कार्यक्रम करा" अशी विनंति करण्याची पाळी हिंदीभाषीयांवर आली !

१. 'राष्ट्रभाषा मासिक', अेप्रील १९४६ पृ. १५१–५२.

लादंत आहे[२] ! " याचा स्पष्ट अर्थ असा कीं, वर्ध्याची म्हणजे गांधीजींची हिंदुस्तानी आणि रेडियोवरील हिंदुस्तानी अेक नव्हत ! !

मुंबअीसरकारची हिंदुस्तानी म्हणजे अुर्दू

अि.स.१९३८-३९ मध्यें या प्रांतांत काँग्रसचें प्रधानमंडळ आल्याबरोबर त्यानें प्राथमिक शाळांतील शेवटच्या तीन अियत्तांत नि हायस्कुलांतील पहिल्या तीन अियत्तांत राष्ट्रभाषेच्या नांवाखालीं 'हिंदुस्तानी' या नांवाच्या भाषेची सक्ति केली. या भाषेंतील पाठ्य पुस्तकांची भाषा कशी असावी यासाठीं सरकारनें परिपत्र काढलें. त्यांत म्हटलें आहे: "या भाषेंतील क्रमिक पुस्तकांची भाषा अशी असावी कीं, जी अुत्तरेंतील हिंदु आणि मुसलमान आपसांतील व्यवहारासाठीं योजितात..[३] या दृष्टीनें तींत अुच्च संस्कृत किंवा अरबी-फारसी शब्द नसावेत. ...अेकच विचार व्यक्त करण्यासाठीं **हिंदी** आणि **अुर्दु** असे दोन्ही शब्द अुपयोगांत आणावेत. अुदाहरणार्थ, **सबक, मदरसा, जबान** या शब्दांचा प्रयोग केला गेल्यास त्याच धड्यांत दुसऱ्या ठिकाणीं **पाठ, पाठशाळा** आणि भाषा* या शब्दांचा प्रयोग केला पाहिजे."

अशा रीतीनें मूळ हिंदींत कृत्रिमपणा आणण्याची सूचना सरकारनें द्यावी यावरून **हिंदुस्तानीचें** रूप कसें विचित्र असतें हें दिसून येतें. या सरकारमान्य पुस्तकांतून "सारे जहाँसे अच्छा !" यासारखीं अुर्दू पद्यें हिंदुस्तानी म्हणून छापलीं आहेत ! त्या पद्यांत हिंदी पर्यायवाची शब्द कोठून येणार ? पण हिंदुस्तानींत ते धडे खपून गेले आहेत. ही

---

२. आणि तुम्हीही अशास्त्रीय नि परस्परविरोधी अर्थाचें द्योतक असें हिंदुस्तानी' हें नांव (हिंदुस्थानीसुद्धां नव्हे) राष्ट्रभाषेवर लादीत अहां ! त्यामुळें राष्ट्रभाषाप्रचारकांत भांडणें लागलींच आहेत कीं ! श्री. कालेलकरांच्या अध्यक्षतेखालील मुंबई सरकारच्या 'हिंदुस्तानी बोर्डाची' भाषाही लोकांवर लादलेली भाषा नव्हे काय ?'

३. ही भाषा हिंदीच आहे. ले. —रविशंकर शुक्ल, हिं.भा. समस्या (पृ. १०५)

*या शब्दांपैकीं कोणत्या गटांतील शब्द प्रचलित आणि सोपे आहेत हें सांगावयास नको. मग अुर्दू म्हणजे, आरबी-फारसी शब्द वापरण्याची सक्ति कां ?

पुस्तकें अुर्दू (फारसी) नि हिंदी (नागरी) लिपींतून छापावीं लागतात. फारसी लिपींत लिहितां यावें म्हणून कित्येक संस्कृत शब्दांना अर्धचंद्र द्यावा लागतो, म्हणजे आपोआपच भाषा फारसी वळणावर जाते! या भाषेच्या शिक्षकांनाही दोन्ही लिप्यांचें ज्ञान आवश्यक केलें आहे. (विद्यार्थ्यांना 'लिपि' निवडण्याचें स्वातंत्र्य सुदैवानें अद्याप दिलेलें आहे! †)

सरकारच्या दृष्टीनें हिंदुस्तानी म्हणजे अर्दूच, हिंदी नव्हे, हें आणखी अेका अुदाहरणानें सिद्ध होत आहे. 'अुर्दू' शाळांना हिंदुस्तानी विषय शिकवण्याची सक्ति कां नाहीं याचें समर्थन पुढील रीतीनें करण्यांत आलेलें आहे : " हिंदुस्तानी भाषेंत वाङ्मयाचा आणि क्रमिक पुस्तकांचा अभाव आढळतो १ .... सध्याच्या पाठ्य पुस्तकांतून हिंदी शब्द फार असल्याचें सांगितलें जाते.२ कांहीं धड्यांतील विषय मुस्लीम विद्यार्थ्यांना अयोग्य आहेत.३ **अुर्दू नि हिंदुस्तानीची शब्दसंपत्ति अितकी समान आहे कीं अुर्दू शाळांतून हिंदुस्तानी शिकविण्याचा आग्रह धरणें अनावश्यक आहे** "४

कॉंग्रेपक्षीयांकडूनच कॉं. सरकारचा निषेध

शब्दसंपत्ति समान आहे, क्रियापदें नि विभक्तिप्रत्यय हिंदी-अुर्दू अेकच असल्यानें त्यांची समानता आहे म्हणजे **हिंदुस्तानी ही अुर्दूच** आहे असें सरकारनें मान्य केलें नाहीं काय ? मग स्पष्टपणें अुर्दू शिकवावयाचें आहे असें कां जाहीर केलें जात नाहीं ? हिंदुस्तानी भाषा जर अद्याप प्रगत झालेली नाहीं तर ती शिकवण्याची सक्ति करणें विचित्र आणि शिक्षणशास्त्रदृष्ट्याही चुकीचें आहे. हिंदी आणि अुर्दू या भाषांमधून हिंदुस्तानी निर्माण होणार असें सरकारला वाटत असेल

† हें स्वातंत्र्य रद्द करून अनिवार्यतेनें अुर्दू लिपि शिकविण्याची योजना घाटत आहे.

१. असली भाषा कोठल्याच शाळेंत शिकवूं नका. २. सरकारी बोर्डानें हीं पुस्तकें मंजूर केलेलीं आहेत ना ? ३. म्हणजे अुर्दू शाळा फक्त मुसलमानांच्याच आहेत तर ! मग त्यांना अुर्दू शाळा म्हणण्याअैवजीं मुस्लीमशाळा म्हणा ना ! ४P–५१५/८–१०–४०

तर या दोन भाषांपैकीं कोणतीही अेक भाषा शिकवा असें म्हणणें हें शिक्षणशास्त्र नि भाषाशास्त्रदृष्टचा योग्य होअील. बनावटी भाषा लहान मुलांच्या डोक्यावर लादण्यांत पुरुषार्थ कोणता? जशी अिंग्रजी राज्यांत अिंग्रजांनीं आमच्यावर अिंग्रजी भाषा लादली तशी या काँग्रेसराजवटींत सरकारनें 'हिंदुस्तानी' च्या नांवाखालीं अुर्दू लादली आहे. बहुमतानें सरकार निवडलेलें असलें म्हणजे त्या सरकारचीं मूलतः महत्त्वाचीं पण वरवर बारीकसारीक भासणारीं कृत्येंही लोकांस आवडतात असें थोडेंच आहे! ब्रिटिशांविरुद्ध लढा करण्यासाठीं लोकांनीं, काँग्रेसला पाठिंबा देअून निवडून दिलें होते, आमच्या शिक्षणाचें स्वातंत्र्य हिरावण्यासाठीं नव्हे! आणि याच काँग्रेसपक्षांतील श्री. पुरुषोत्तमदास टंडन, श्री. संपूर्णानन्द, श्री. माखनलाल चतुर्वेदी आदि मंडळी प्रमुख असलेल्या हिंदी साहित्य सम्मेलनानें २९ व्या अधिवेशनांत मुंबई सरकारच्या या अुर्दूप्रेमी धोरणाच्या तीव्र निषेधाचा ठराव अेकमतानें पास केला आहे!

मुंबई विद्यापीठांत हिंदुस्तानी

इ. स. १९४० मध्यें या विद्यापीठाच्या सीनेटमध्यें ठराव आला होता कीं, मॅट्रिकपरीक्षेस हिंदुस्तानी भाषा सक्तीची करावी. त्या वेळचे व्हाअिस चॅन्सेलर श्री. मसानी यांनीं "हिंदुस्तानी" नांवाची स्वतंत्र भाषा नाहीं, अूर्दूस हिंदुस्तानी म्हणतात' असें सांगून तो ठराव नियमबाह्य ठरविला. सहा महिन्यांनंतर अशाच अर्थाचा ठराव श्री. के. टी. शहा यांनीं आणला असतां आपल्या कास्टिंग व्होटनें श्री. मसानींनीं तो अमान्य केला. ज्या हिंदुस्तानींत कांहीं साहित्य नाहीं ती भाषा शाळा-कॉलेजच्या अभ्यासक्रमांत कशी ठेवतां येणार, हा पेंचप्रसंग ओळखून श्री. मसानी यांनीं आपला निर्णय दिला असणें शक्य आहे. या वृत्ताचा उल्लेख मागें दोन वेळां केलेला आहेच. (साप्ताहिक 'अग्रणी' मार्च १९४०).

दोन लिप्यांत हिंदुस्तानी लिहिली पाहिजे

वर्धा राष्ट्रभाषा प्रचार समितीचें आदरणीय मंत्री, भिक्षु आनंद कौसल्यायन हिंदुस्तानीवर टीका करतांना म्हणतात: " हिंदुस्तानी ही

बनावटी (कृत्रिम) भाषा होय. ही हिंदु–मुसलमान अैक्याची दर्शक नसून हिंदु–मुस्लीम 'पॅक्टची' निदर्शक आहे......हिंदुस्तानीचा उद्देश असा आहे कीं अशा भाषेंत लिहिण्याचा यत्न करणें कीं जिच्यांत संस्कृतचे अथवा फारसीचे शद्ब नाहींत, आणि जी दोन्ही लिप्यांत (नागरी आणि फारसी) लिहिली जाऊं शकते!......आर्यसमाजाचें कांहीं साहित्य–संस्कृत संध्यासुद्धां–अुर्दु लिपींत छापलेली आहे–पण हें साहित्य केवळ अुर्दू लिपिबद्ध आहे म्हणून 'हिंदुस्तानी' आहे काय? जर नाहीं, तर अगदीं थेट अुर्दू साहित्य जे अलीकडे नागरी लिपींत छापले जात आहे ते तरी 'हिंदुस्तानी' कसें होऊं शकतें?

'मैं खाता हूँ,' 'मैं जाता हूँ' या विचाराच्या थोडे पुढें गेलें कीं 'न संस्कृत, न अरबी–फारसी' वाली भाषा सोडून द्यावी लागते! मुलासाठीं लिहिलेल्या हिंदुस्तानीचें पुस्तकांतलेच अुदाहरण देतो,— त्यांतील टिपेंतसुद्धां आरबी–फारसी–संस्कृत शद्ब न अुपयोजितां वाक्य लिहितां आलेलें नाहीं:

फारसी लिपींत–मुजक्कर मुअन्नस की वजहसे अफआलमें } जो फर्क
नागरीलिपींत–पुल्लिंग और स्त्रीलिंगकी वजहसे क्रियाओंमें }

पैदा होता है, अुस्ताद अुसे समझाअिये और मश्क कराअे।

अुर्दू लिपींतील शद्बांचे अनेकवचन फारसी व्याकरणानुसार केले आहे (फेल–अफहाल), परंतु नागरी लिपींतील वाक्यांत 'वजह' 'मश्क' हे शब्द तसेच ठेवले आहेत! आणि अितके करूनही दोन लिप्यांत तेच शब्द असलेली भाषा लिहितां आली नाहींच!†

हिंदुस्तानीच्या अर्थाचा गोंधळ

'हिंदुस्तानी' या शब्दाच्या अर्थाविषयीं नि स्वरूपाविषयीं किती विविधता आहे!! हिंदुस्तानी म्हणजे सोपी अुर्दू आणि विदेशी शब्दांचें बाहुल्य असलेली अुर्दू!! हिंदी आणि अुर्दू यांच्या मिश्रणानें बनविलेली भाषा; हिंदी म्हणजेच अुर्दू, अुर्दू म्हणजेच हिंदुस्तानी१, हिंदुस्तानी

---

†हिंदी, काशी, दिसंबर १९४४

१. राष्ट्रभाषा का प्रश्न (ले. गांधीजी) पृ. १०६.

म्हणजे फारसी लिपींत लिहिलेली हिंदी; अेकाच राष्ट्रभाषेस हिंदी, अुर्दू, हिंदुस्तानी अशी नांवें आहेत२; हिंदुस्तानीरूपी सरस्वती कांहींशी प्रकट झाली आहे आणि कांहींशी अप्रकट आहे! ३ हिंदुस्तानी शब्दापेक्षां हिंदुस्थानी हा शब्द योग्य होय; हिंदी आणि अुर्दू या स्वतंत्र भाषा अेकाच शब्दानें व्यक्त करावयाच्या असल्यास हिंदुस्तानी हा शब्द अुपयोगांत आणतात; ४ डॉ. झाकीर हुसेनखां ज्या भाषेंत रेडियोवर बोलले ती भाषा त्यांच्या मतें हिंदुस्तानी होती; रेडियोची हिंदुस्तानी आणि गांधीजींची हिंदुस्तानी या भाषा अेक नव्हेत; हिंदुस्तानी भाषा आज अस्तित्वात नाहीं. हिंदुस्तानी भाषा दोन लिप्यांत (फारसी आणि नागरी) लिहीलींच पाहिजे हा गांधीजींचा आग्रह कायम आहेच.

जेथें थोरामोठ्या लोकांत 'हिंदुस्तानी' या नांवाच्या भाषेच्या* स्वरूपाबद्दल अेवढा मतभेद, तेथें सामान्य लोकांचा गोंधळ किती

---

२. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें (फुटीर म. रा. समितीचें पहिलें पत्रक.)

३. राष्ट्रभाषा का प्रश्न—ले. गांधीजी पृ. १७.

४. हिं. सा. सम्मेलन (अबोहर प्रस्ताव).

* आजकाल चाललेल्या अेकंदर वादविवादावरून व ऐतिहासिक दृष्टीनें हिंदुस्तानी शब्दाचे अर्थ कोणते होतात ते श्री. चंद्रबली पांडे यांनीं संकलित रीतीनें दिले आहेत:

(१) हिंदुस्तानी = हिंदुस्थानी = हिंदु—परंपरागत अर्थ
(२) हिंदुस्तानी = हिंदी = इंडियन—सरकारी अर्थ
(३) ,, = हिंदी = नागरी—फोर्ट विलियम येथील अर्थ
(४) ,, = खरी हिंदुस्तानी = उर्दू—फोर्ट विलियम कॉलेजचा अर्थ.
(५) ,, = हिंदवी = देशभाषा—भाषाशास्त्रदृष्टचा अर्थ.
(६) ,, = हिंदी + उर्दू—भारतीय सरकार आणि हिंदुस्तानी ॲकेडमीचा अर्थ.
(७) ,, = हिंदी + उर्दू—हिंदी—उर्दू = म. गांधींचा अर्थ.

पृ. ५८. हिंदुस्तानीकी हिमायत क्यों, ना. प्र. सभा काशी संवत् २००४.

होओील आणि होत आहे, हें काय सांगावयास पाहिजे ? या हिंदुस्तानींत पारिभाषिक शब्द घ्यावयाचे झाले म्हणजे मतभेद आणखी वाढणार ? राजेंद्रबाबूंसारखे हिंदुस्तानीचे समर्थक म्हणणार कीं असे शब्द संस्कृत-पासूनच घ्यावे लागणार, अब्दुलहक गरजणार कीं असे शब्द आरबी-फारसीच पाहिजेत ![1] गरमतार (पॉझिटिव्ह) आणि ठंडा तार (निगेटिव्ह) अशा धर्तीचे शब्द अुपयोजावे असें म्हणणारा अेक पक्ष आहे, परंतु अशा शब्दांची धांव शास्त्रीय नि गहन विषयांत चालूं शकणार नाहीं असें निःसंदिग्धपणें डॉ. चतर्जी सांगत आहेत.[2] ही अडचण दूर करण्यासाठीं हिंदुस्तानीचे पक्षपाती शेवटीं इंग्रजी 'पारिभाषिक' शब्दांचें समर्थक होतात.† कांहीं विद्वानांना असें वाटतें कीं सामान्य व्यवहारासाठींच हिंदुस्तानी असल्यानें गहन विचाराच्या शब्दांची तींत आवश्यकताच नाहीं ! राष्ट्रभाषचें क्षेत्र जुजबी व्यवहारापुरतेंच मर्यादित करणें हें राष्ट्रभाषेच्या चळवळीच्या मूळ हेतूशींच विसंगत आहे हें त्यांच्या ध्यानीं कसें येत नाहीं कोणास ठाअूक !

हिंदुस्तानी म्हणजे भद्दी अुर्दू

संयुक्त प्रांतीय हिंदी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरून हिंदुस्तानीसंबंधीं पं. अमरनाथ झा* म्हणतात :

"यह कौन भाषा है ? कहाँ की है ? किसकी है ? अिसका साहित्य कहाँ है ? अिस भाषामें कौन लिखता है ? अर्थशास्त्र, राजनीति, विज्ञान, दर्शन आदि विषयोंपर ग्रंथ किस भाषामें लिखे जाते हैं ? हिंदुस्तानी के गढनेका प्रयोजन क्या है ? प्रचलित भाषाओंको विकृत करना कौन-सी बुद्धिमत्ता है ? क्या हिंदुस्तानीमें भावुकता आ सकती है ? क्या अिसमें गूढ विषयोंको व्यक्त करनेकी क्षमता है ? हिंदुस्तानी के जो थोड़ेसे अुदाहरण हम देख सके अुसको तो भद्दी

---

१. नॅशनल लँग्वेज फॉर अिंडिया. पृ. ८७–८८.

२. अिंडो आर्यन अॅन्ड हिन्दी पृ. १९३–९४.

† डॉ. रघुवीर कल्याण–सितंबर १९४७.

* हिंदी–मअी १९४६.हेंच मत पं.रामचंद्र शुक्ल यांनी (पृ. २४) 'हिंदुस्तानी का अुद्गम' मध्यें व्यक्त केलें आहे.

अुर्दू कहनेमें हमको संकोच नहीं है। अुर्दूके वाक्यमें हिन्दीके अेक दो शब्द रख देना भाषाशैली के साथ परिहास करना है। हिंदुस्तानी आंदोलनसे हिन्दी संसार तो असंतुष्ट हैही। अुर्दू जगत् भी प्रसन्न नहीं है। अुचित यही है कि हिन्दी और अुर्दू दोनों की गति अविरुद्ध रहे।"

हिंदी नांवच योग्य

हिंदुस्तानीबद्दल हिंदी जगत आणि अुर्दू जगत नाखूष आहे हें स्वयंस्पष्ट आहे. अशा स्थितींत म्हणजे ज्या नांवामुळें भाषेचें स्वरूप स्पष्ट होत नाहीं, किंबहुना अशी भाषा आहे कीं नाहीं अशी शंका या नांवाचें अभिमानीच वेळीं अवेळीं व्यक्त करतात, असलें नांव राष्ट्र-भाषेस कां द्यावें? हिंद (देश) या शब्दापासून 'हिंदी' हा शब्द अुत्पन्न झालेला आहे, हेंहि नांव परक्यांनींच 'भाषेला' दिलें आहे. प्राचीन कालापासून याच नांवाच्या परंपरेंत हिंदु आणि मुसलमान यांनी साहित्य निर्माण केलेलें आहे [1]. असें असतां रूढ, प्राचीन, सार-गर्भित, निश्चित अर्थाचे आणि सुबोध असें 'हिंदी' हें नांव टाकून दुसऱ्यांना खूश करण्यासाठीं अस्थिर, संदिग्ध आणि अनेकार्थी असें हिंदुस्तानी नांव राष्ट्रभाषेस देणें अयोग्य आहे. गांधीजींनीं म्हटले आहे कीं 'हिंदी ह्या शब्दाचा हिंदूंच्या धार्मिकतेशीं संबंध आहे, त्यामुळें मुसलमानांना हें नांव आवडत नाहीं'.[2] पण अैतिहासिक दृष्टीनें पाहतां हिंदी हें नांवहि भाषेस मुसलमानांनींच दिलें आणि कित्येक मुसलमानांनीं या भाषेंत साहित्यहि लिहिलें. या हिंदींत ख्रिस्ताचें बायबलहि छापून प्रसृत केलेलें आहे. अमकी भाषा अमक्याच धर्माची असें ठरलेलें नाहीं. मुसलमानांविषयींच म्हणावयाचें तर त्यांना 'हिंदुस्तानी' हेंहि नांव

---

१. श्री. पुरुषोत्तमदास टंडन (नॅशनल लँ. फा. अिंडिया पृ. ९३)

२. नॅशनल लँग्वेज फॉर अिंडिया. पृ. ३२ (गांधीजींचा लेख). पण हिंदुस्तानीमध्यें 'हिंदु' हा शब्द धर्मवाचक आहेच कीं? तेंही नांव मुसलमानांना आवडत नाहीं. शिवाय आतां देशाचें नवीन नांव अिंडिया असल्यानें देशवाचकता त्यांत नाहीं. तसाच विचार केला तर India मध्यें Ind किंवा हिंद हा शब्द गर्भित आहे. त्या दृष्टीनें हिंदी नांवच योग्य नाहीं काय?

तितकेंसें आवडत नाहीं,[१] त्यांना अुर्दू हेंच नांव पाहिजे. परंतु कोणाच्या आवडण्यावरती राष्ट्रभाषेचें नांव किंवा स्वरूप अवलंबून न ठेवतां भारतामधील जीवित भाषापैकीं बहुसंख्याक लोकांच्या भाषेस म्हणजे हिंदी भाषेस राष्ट्रभाषापद प्राप्त झालेलेंच आहे[२] हें ओळखून तिचा प्रचार करणें हें आपलें कर्तव्य आहे.

भाषेची चिरफाड करूं नका

वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदी-अुर्दूचा वाद हा केवळ संस्कृत शब्द कमीअधिक वापरण्याचा नाहीं, त्या प्रश्नाचें मूळ राजकीय वादामध्यें आहे. हिंदु-मुसलमान अैक्याच्या नादीं लागणाऱ्या हिंदु-पुढाऱ्यांना हिंदी-अुर्दूचें मिश्रण करून अेक राष्ट्रभाषा तयार करावी असें वाटतें. पण ही राजकीय आणि सांस्कृतिक समन्वयाची इच्छा दुसऱ्या पक्षाकडून कधीं तरी व्यक्त झाली आहे काय ? हें राजकीय अैक्य मनोमन झालें तर भाषेबद्दलचा कांहीं मुसलमानांचा तरी दुराग्रहहि नष्ट होईल. आतां तर ती आशा नाहीं ! म्हणून मुसलमानांच्या अेखाद्या संस्थेच्या लहरीसाठीं भारत देशाचे तुकडे करणें जसें अनिष्ट झालें आहे तसेंच 'भारती'–हिंदी–भाषेची चिरफाड (मूळच्या साग्र हिंदुस्थानांतहि करणें अनिष्टच होतें) शेष हिंदुस्थानांत करणें अधिकच अनिष्ट होईल. मातृभाषेची किंवा राष्ट्रभाषेची हत्या ज्यांत होते तें कसलें स्वराज्य ?

---

१. ब्रेलव्हीचें मद्रास द.भा. हिंदी प्रचार सभेच्या अध्यक्ष पदावरून भाषण. (अि. स. १९४४)

२. श्री. कन्हैयालाल मुन्शी (जयपूर हिं. सा. सम्मेलनांतील राष्ट्रभाषा परिषदेचें अध्यक्षीय भाषण).

मूळ सिद्धांत चुकीचा

हिंदी, अुर्दू आणि हिंदुस्तानी या भाषा कशा. अेक नव्हेत. याचें विवेचन मागील दोन प्रकरणांत केलें आहे. यांपैकीं 'हिंदी' हीच राष्ट्रभाषेच्या पदीं कां विराजमान होअू शकते हेंही वर्णिलें आहे. परंतु राष्ट्रभाषेच्या नांवाचा जसा वाद-विवाद उत्पन्न केला गेला आहे तसाच तो राष्ट्रभाषेच्या स्वरूपाविषयींही निर्माण झालेला आहे. कारण राष्ट्रभाषेची चर्चा करितांना असें गृहित धरलें जातें कीं, हिंदी ही हिंदूंची भाषा आणि अुर्दू ही मुसलमानांची. अर्थातच हिन्दु-मुसलमान या दोघांना ही भाषा आपलीशी वाटावी म्हणून हिंदी-अुर्दू या दोन्ही भाषांच्या मिश्रणानें हिंदुस्तानी भाषा तयार करावी असा विचार मांडला जातो. मूळ गृहित तत्त्वच चुकीचें आहे. सहाजिकच त्याच्या पायावर आधारलेला अुपायही चूक होय, हें काय सांगावयास पाहिजे? कारण ज्या ज्या प्रांतांत मुसलमान राहतात तेथील प्रांतीय भाषाच त्यांची मातृभाषा असते– बंगाली मुसलमान बंगालींत बोलतो आणि महाराष्ट्रीय मुसलमान मराठींत.[२] अलीकडील जातीय भावनेनें कांहीं मुसलमान आपली मातृभाषा

---

१. तुर्की पत्रपडितांचें हेंच मत असल्याचें प्रकरण ७ (पृ. ९१ पहा.)

२. संमेलन पत्रिका पौष २००२ मध्यें प्रभातमिश्र लिहितात. "संस्कृत गर्भित हिन्दीहि राष्ट्रभाषा हो सकेगी । क्योंकि संस्कृतके शब्द सर्वत्र प्रयोज्य हैं । **बंगाल और गुजरात के मुसलमान भी, संस्कृतके शब्द प्रान्तीय भाषाओं मे बहुत प्रयोग करते हैं** । अुर्दू तो अुनके लिये केवल धार्मिक भाषा है । ग्रियर्सन साहब का कहना है कि व्यापार की दृष्टिसे भारत जानेवालों को हिन्दी अवश्य सीखनी चाहिये । अुसी प्रकार थॉमस साहबका कहना है कि संस्कृत ही राष्ट्रभाषा हो सकती है । यदि मैं अुनमें समझौता करता हूँ कि संस्कृतमिश्रित हिन्दी राष्ट्र-भाषा हो जाय तो क्या हानि है ? क्यों कि बाजारवाली भाषा (हिंदुस्तानी), अध्ययन, शिल्प, विज्ञान, सामाजिक, राजनीतिक अेवं आध्यात्मिक विचारविनिमय के लिअे अुपयुक्त नहीं प्रमाणित होती । "

(टीप पुढील पानावर चालू)

उर्दू आहे असें सांगू लागले आहेत तरी त्यांनाहि त्यांचा सर्व व्यवहार प्रांतीय भाषेंतूनच करावा लागल्यानें तिचें ज्ञान त्यांस असतें. भाषा आणि धर्म यांचा अभिन्न संबंध नाहीं. मराठी मातृभाषी ख्रिस्ती लेखक आणि कवि आपल्यास परिचित आहेतच. गुजराथी, पंजाबी, बंगाली अशा भिन्न भाषा बोलणारे लोकही हिंदुधर्मीय आहेत.

भिन्न प्रांतीय भाषा बोलणारांचा प्रश्न

हिंदु-मुसलमानांमध्यें बोलण्यास जशी राष्ट्रभाषा पाहिजे तशीच 'भिन्नप्रांतीय' हिंदूंनाहि आपसांतील आंतरप्रांतीय व्यवहारासाठीं राष्ट्रभाषा पाहिजे, ही गोष्ट या चर्चेंत विसरली जाते. 'हिंदी' ही कांहीं हिन्दु आणि कांहीं मुसलमानांची मातृभाषा आहे, अितर प्रांतीय हिंदूंना ती जवळची वाटते त्याचें कारण धर्मसाम्य नसून या हिंदींत त्यांच्या मातृभाषेंतील (प्रांतीय भाषांतील) शब्दावली आहे म्हणून. या भिन्न प्रांतीय हिंदु (मुसलमानांना) अुर्दू परकीय आहे हें विसरून चालणार नाहीं. राष्ट्रभाषेचा प्रश्न हा हिंदु-मुसलमान अशा दोन धर्मीयांमधील नसून भिन्न प्रांतीय भाषा बोलणाऱ्यांना अेक भाषा देण्याचा आहे.

'अिंदूर'ची व्याख्या

असें असलें तरी हिंदी-अुर्दूच्या संमिश्रणानें राष्ट्रभाषेच्या स्वरूपाबद्दल जी चर्चा गेलीं १०—१२ वर्षे चालू आहे तिची माहिती वाचकांना आवश्यक आहे.अिंदूर येथें अेप्रील अि. स.१९३५मध्यें हिंदी साहित्य सम्मेलनाचें अधिवेशन म. गांधींच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यांत त्यांनीं राष्ट्रभाषा हिंदीची व्याख्या म्हणून अेक ठराव स्वीकृत केला. त्या ठरावांत हिंदी ही भाषा नागरी किंवा अुर्दू या लिपींत

(मागील पानावरून)

तसेंच मुंबअी उपनगर मराठी सा. सम्मेलन १० वें स. १९४६ स्वागताध्यक्ष श्री. वर्दे यांचें भाषण. तसेंच पुढील वृत्त वाचा : पूर्व पाकिस्तान सरकारचे सध्यांच म्हणणें आहे कीं, बंगालीही अुर्दू बरोबर पाकिस्तानची राष्ट्रभाषा करा, कारण तेथील मुसलमानांची तीच मातृभाषा आहे.—दै. काळ १७—११—४७

लिहिली जाते असा स्पष्ट अुल्लेख आहे. कॉंग्रेसमध्यें 'हिंदुस्तानीं'त सर्व व्यवहार करावा असा पुरुषोत्तमदास टंडनजी यांचा ठराव अि.स. १९२६ (कानपूर)† मध्यें झालेला होता. पण त्यांत लिपीचा अुल्लेख नाहीं. हिं. सा. सम्मेलनाच्या कार्यकर्त्यांत पुष्कळसे कार्यकर्ते कॉंग्रेस-भक्त असल्यानें अिदूरच्या ठरावांत 'हिंदुस्तानी' असा शब्दप्रयोग नसतांहि, नव्या व्याख्येच्या जोरावर, कॉंग्रेसची 'हिंदुस्तानी' त्या व्याख्येंत बसूं शकते असें ते मानूं लागले व त्यांनीं तसा प्रचार सुरूं केला. अि. स. १९३७ नंतर अनेक प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळें स्थापन झालीं. त्यांनीं शालेय शिक्षणक्रमांत राष्ट्रभाषेस स्थान देण्याचें ठरविलें. मद्रास प्रांतानें 'हिंदुस्तानी हीच आमची राष्ट्रभाषा' असें ठरवून शाळांतून या भाषेचें शिक्षण अनिवार्य केलें. तेथील सरकारमंजूर 'हिंदुस्तानी रीडर' मधील भाषा पाहून त्या वेळच्या 'आज'चे संपादक आणि कॉंग्रेसभक्त श्री. बाबूराव पराडकर यांना फार दुःख झालें. सिमला येथील हिं. सा. सम्मेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं या पुस्तकाचा कडक निषेध केला. ही 'हिंदुस्तानी आमची राष्ट्रभाषा नव्हे' असें अनेक अुदाहरणांनीं त्यांनीं स्पष्ट केलें. या अनुभवानें विशेष शहाणे न होता मुंबईच्या कॉंग्रेस सरकारनें 'हिंदुस्तानी' ला राष्ट्रभाषा आणि नागरी व अुर्दू या तिच्या दोन लिप्या ठरविल्या. प्राथमिक ट्रेनिंग कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना दोन्ही लिप्यांचें ज्ञान अनिवार्य केलें! 'सबकी बोली' किंवा 'देश की जबान' अशीं पाठचपुस्तकें सरकारनें स्वीकृत केलीं, त्यांत प्रचलित हिंदी शब्दाअैवजीं

† कॉंग्रेसच्या कानपूर अधिवेशनांत हा ठराव हिंदी सा. सम्मेलनाचे प्रमुख श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं मांडला. हिंदी आणि अुर्दू या स्वतंत्र भाषा अेकाच शब्दानें व्यक्त करण्यासाठीं त्यांनीं हिंदुस्तानी हा शब्द योजला. त्याचा अर्थ दोन भाषांचें मिश्रण केलें जाअील असें त्यांस वाटलें नव्हतें.—श्री. टंडन यांचें हिं. सा. सम्मेलनाच्या पुणें अधिवेशनांतील अध्यक्षीय भाषण पहा.

हिंदुस्तानी अॅकेडमी, अलहाबाद या संस्थेच्या नांवांत हाच अर्थ असून तिच्यामार्फत हिंदी आणि अुर्दू भाषांत स्वतंत्रपणें पुस्तकें प्रकाशित केलीं जातात.

अुर्दू शब्द मुद्दाम अुपयोगिण्यांत आले आहेत. धड्यावरील प्रश्नांत जें व्याकरण सांगितलें आहे त्यांतहि फारसी-अरेबी पारिभाषिक शब्द प्रयोजिलें आहेत. सरकारच्या हिंदुस्तानी बोर्डानें हिंदी-अुर्दू शब्दांचें प्रमाण सर्व धड्यांत समान राहिलें पाहिजे असे ठरवून दिलें आहे ! १'

व्याखेंतील चूक सुधारली

राष्ट्रभाषेच्या नांवाखालीं चाललेल्या या प्रचारानें राष्ट्रीय बुद्धीनें हिंदी प्रचार करणारांत अुद्वेग अुत्पन्न झाला. या मंडळींनीं 'अिंदूरचा' ठरावच बदलून घेण्याची खटपट सुरू केली. अिंदूरला हा ठराव करतांना, अुर्दूमातृभाषी लोकांनीं आपल्यांत यावें अशी गांधीजींची अिच्छा असावी. पण झालें काय? अुर्दूवाले तर सम्मेलनांत आलेच नाहींत, हिंदीवाले मात्र अप्रसन्न होअून हिं. सा. सम्मेलनांत दोन पक्ष दिसूं लागले. सिमला अधिवेशनांत वादाची अेक ठिणगी पडून अिंदूरच्या ठरावांतून 'साहित्यिक हिंदीची' सुटका करण्यांत आली. † परंतु राष्ट्रीय हिंदी आणि साहित्यिक हिंदी असें भाषेचे भाग करतां येणें अशक्य असल्यानें राष्ट्रभाषेच्या स्वरूपाबद्दलचा वाद तसाच चालू राहिला.

---

१ आठव्या प्रकरणांत 'मुंबअी सरकारची हिंदुस्तानीं' पृष्ट ७०–७२ पहा.

† "अिस सम्मेलनके विचारमें हिंदीके आधुनिक साहित्य निर्माण के लिअे अैसी भाषा अुपयुक्त है जिसका परम्परागत संबंध संस्कृत, प्राकृत और अपभ्रंश भाषाओंसे है, जिसकी शक्ति कबीर, तुलसी, सूर, मलिक महम्मद जायसी, रहीम, रसखान और हरिश्चंद्र की कृतियोंसे आयी है, जिसका मूलाधार देशी और तद्भव शब्दोंका भण्डार है, और जिसके पारिभाषिक शब्द प्राकृत अथवा संस्कृतके क्रमपर ढाले गये हैं, किंतु जिसमें रूढ, सुलभ और प्रचलित विदेशी शब्दोंको भी स्थान है।" अि. स. १९३८

वस्तुत: राष्ट्रभाषा हिंदीचीच ही व्याख्या आहे, कारण 'साहित्यिक हिंदी आणि राष्ट्रभाषा हिंदी' असा फरकच करतां येत नाहीं". याचें अधिक विवेचनासाठीं श्री. संपूर्णानंद, अध्यक्षीय भाषण हिं. सा.सं. पुणें अधिवेशन पहा.

अि. स. १९४० सालीं हिं. सा. सम्मेलनाचें पुणें येथें २९ वें अधिवेशन भरलें. त्यांत अिदूरचा ठराव बदलण्यांत आला. अुर्दू किंवा फारसी लिपीला नागरीच्या बरोबरीनें स्थान दिल्यानें तींत लिहिली जाणारी अुर्दू भाषा राष्ट्रभाषा ठरूं लागली.वस्तुत: हिंदी ही क्वचितच अुर्दू लिपींत अथवा रोमन लिपींत लिहिली जाते, तिची सामान्य लिपि ती नाहीं. हा मुद्दा लोकांपुढें निश्चित यावा, म्हणजे भोळसटपणें लोक अुर्दू अथवा हिंदुस्तानीला राष्ट्रभाषा समजणार नाहींत म्हणून या अधिवेशनांत हा ठराव दुरुस्त केला गेला.

अिदूरचा ठराव असा होता :--"....अिस लिये यह संमेलन घोषित करता है कि राष्ट्रभाषा की दृष्टिसे हिंदीका वह स्वरूप मान्य समझा जाय जो हिंदु-मुसलमान आदि सब धर्मोंके ग्रामीण और नागरिक व्यवहार करते हैं; जिसमें रूढ, सर्वसुलभ अरबी, फारसी, अंग्रेजी या संस्कृत शब्दों या मुहाविरोंका बहिष्कार न हो और **जो नागरी या अुर्दू लिपिमें लिखी जाती हो।**

पुणें येथें, अिदूरचा ठरावांतील प्रारंभीचा मजकूर तसाच ठेवून शेवटच्या ८ शब्दांबद्दल १४ शब्द घालून खुलासा केला आहे. हे शेवटचे शब्द असे--"जो **साधारण रूपसे राष्ट्रलिपि** नागरी में तथा **कहीं कहीं फारसी** लिपिमें भी लिखा जाता है।"

या परिवर्तनाचा परिणाम

पुण्याच्या ठरावांतील जे शब्द ठळक अक्षरांत छापले आहेत ते महत्त्वाचे आहेत. (१) अिदूरच्या ठरावांत केवळ नागरीलिपि असें म्हटलें आहे, तर पुण्याच्या ठरावांत या लिपीच्या मागें 'राष्ट्रलिपि' असा शब्द आहे. या फरकामुळें नागरी हीच राष्ट्रलिपि होय असें पुन: अेकदां सम्मेलनानें घोषित केलें आहे. (२)त्याचप्रमाणें साधारण रूपसे, म्हणजे नेहमीं, असे शब्द राष्ट्रलिपि नागरीच्या मागें आहेत. '**राष्ट्रभाषा हिंदी** नेहमीं **राष्ट्रलिपि नागरींत लिहिली जाते**' हें सम्मेलनाचें मत आहे, असा याचा अर्थ. (३) अिदूरच्या ठरावांत '**नागरी किंवा अुर्दू**' असे शब्द आहेत; तेथें पुण्याच्या ठरावांत '**तथा कहीं कहीं**

फारसी '० (आणि कोठें कोठें फारसी–अुदाहरणार्थ :—नागरी लिपि न येणारे कांहीं पंजाबी किंवा काश्मिरी लोक या अुर्दू लिपींत क्वचित् लिहिणें शक्य आहे.) असे शब्द आहेत. अिदुरास नागरीच्या बरोबरीनें अुर्दू लिपीला दर्जा दिला आहे तर पुण्यास आपद्धर्म म्हणून, ह्याही लिपींत राष्ट्रभाषा हिंदी कोठें कोठें लिहिली जाते, अेवढाच अुल्लेख आहे. अेकाच भाषेच्या दोन समान दर्जाच्या लिप्या असल्या तर त्या दोन्ही शिकाव्याच लागतात; परंतु तसें नसेल तर त्यांपैकीं नेहमीं वापरण्यांत येणारी लिपि शिकली म्हणजे काम होतें. या भेदामुळें संमेलनाच्या नांवानें तरी राष्ट्रभाषा शिकवीत असतां अुर्दू लिपि शिकणें सक्तीचें करतां येणार नाहीं हें सिद्ध झालें. (४) अिंदूरच्या ठरावांत 'अुर्दू लिपि' असा शब्द आहे तर पुण्याच्या ठरावांत फारसी लिपि हा शब्द घातलेला आहे. यांतही वैशिष्टच आहे. अुर्दू ही जरी या देशांतील भाषा असली तरी तिची लिपि ही परकीय आहे व ती फारसी आहे. परकीय लिपि राष्ट्रलिपि होअू शकत नाहीं. म्हणजे अुर्दू भाषेंत वापरण्यांत येणारी लिपि ही कधींच राष्ट्रलिपि असूं शकणार नाहीं असा संकेत या शब्दांत आहे. शिवाय अुर्दू लिपि व भाषा यांतील फरक लक्षांत न घेतां सामान्य मनुष्य अुर्दूलिपीच्या शब्दामुळें हिंदी भाषा नि अुर्दू भाषा अेकच आहेत अशा भ्रमांत पडे व तितकें अुर्दूसही महत्त्व देअी, तसें तो सम्मेलनाच्या नांवानें करूं शकणार नाहीं. कारण त्या ठरावांत 'अुर्दू' हा शब्द नाहीं आणि हिंदी नि फारसी या दोन निराळ्या भाषा आहेत हें सर्वांसच माहीत आहे. (५) अिंदूरच्या ठरावांत 'अुर्दू लिपिमें' अेवढेच शब्द आहेत; पुण्याच्या ठरावांत '**फारसी लिपिमें भी**' असा फरक आहे. (कोठें

०सेना विभागांत हिंदुस्तानी नांवाखालीं रोमन लिपींत भाषा शिकविली व लिहिली जाते; म्हणून रोमन लिपि कांहीं राष्ट्रलिपि ठरूं शकत नाहीं, आणि तिचें ज्ञान सर्वांस आवश्यक करतां येणार नाहीं. किंबहुना या वृत्तीचा विरोध केला पाहिजे. हिं. सा. सम्मेलनानें अबोहर आणि कराची अधिवेशनांत सैन्यांतील या रोमनलिपि प्रसाराचा विरोध करणारे ठराव स्वीकृत केले आहेतच.

कोठें फारसी लिपींतहि लिहिले जाते.) या 'भी' मुळें अुर्दू लिपीचा दर्जा नागरी लिपीपेक्षां खरोखरच कमी आहे हें विशेष रीतीनें स्पष्ट केलें आहे.

हिंदी म्हणजे हिंदुस्तानी नव्हे

हा ठराव तडजोडीच्या रूपाचा होता. हिंदी पक्षाला ही व्याख्याच नियमावलीतून काढून टाकण्यास हवी होती. (२–३ वर्षांनी अनपेक्षितपणें हें घडून आलें.) तथापि ही तडजोड हिंदुस्तानीवाल्यांनी शिडकारली.त्यांना सम्मेलनाचा राग येअू लागला,त्यांनीं वर्धा राष्ट्रभाषा समिति ही संमेलनापासून स्वतंत्र करण्याचा चंग बांधला, पण तो अयशस्वी झाला. हि. सा. संमेलनाच्या अबोहर (पंजाब) येथें भरलेल्या अधिवेशनांत हिंदी भाषेच्या स्वरूपाबद्दल पुन्हां चर्चा होअून असें घोषित करण्यांत आलें कीं, 'संमेलन साहित्यिक आणि राष्ट्रीय अशा दोन्ही दृष्टींनीं आपल्या नि आपल्या समितीच्या कार्यांत हिंदी शैलीचा आणि हिंदी या शब्दाचा व्यवहार व प्रचार करीत असते.' हा ठराव अगदीं स्पष्ट आहे. या सम्मेलनाच्या हिंदीलाच मी हिंदुस्तानी म्हणतों; तसें म्हणण्यास मला अनुमति द्या अशी विनंति श्री. काका कालेलकरांनीं आपल्या विरोधी भाषणांत केली होती; पण ती कोणासही मान्य झाली नाहीं. हिंदी शब्दाला पर्यायवाची शब्द म्हणून हिंदुस्तानी[१] शद्ब वापरणें चूक आहे हें श्री. टंडनजींनीं आपल्या अुत्तरादाखल केलेल्या भाषणांत सांगितलें.

हिंदी शैली–संस्कृतनिष्ठ हिंदी

हिंदी शैली म्हणजे "देशी शब्द-व्यवहार से प्रभावित" भाषा आणि अुर्दूशैली म्हणजे "अरबी-फारसी शब्द-व्यवहार से प्रभावित" भाषा असा स्पष्ट अुल्लेख वरील ठरावांत आहे. अितकेंच नव्हे तर अुर्दू शैली ही हिंदीपासून अितकी भिन्न आहे कीं तिचें स्वतंत्र अस्तित्व

१. हिंदी शब्दाला पर्यायवाची म्हणून हिंदुस्थानी, हिंदुस्तानी, सबकी बोली या शब्दांचे प्रयोग संमेलनास मान्य नाहींत.

संमेलनास मान्य आहे; असेंही त्यांत म्हटलें आहे.* ही हिंदी शैली म्हणजे वस्तुतः जिच्यांत हिन्दी वृत्तपत्रें, मासिकें,पुस्तकें, ग्रंथ अित्यादि लिहिलीं जातात ती भाषा होय. हिंदुस्तानीच्या भानगडीमुळें आपली हिंदी भाषा कोणती हें स्पष्ट करण्याकरितां हिन्दी भाषीयांना 'हिन्दी शैली' असा शद्ब वापरावा लागला. याच अर्थाचा दुसरा शब्द 'संस्कृत-निष्ठ हिंदी हा होय.[१]'

'संस्कृतनिष्ठ' विशेषण कां लावावें लागलें ?

येथें हिंदी शब्दाच्या आधीं 'संस्कृतनिष्ठ' असें विशेषण आहे. वस्तुतः संस्कृतनिष्ठ मराठी, संस्कृतनिष्ठ बंगाली असें आपण म्हणत नसतांना 'हिन्दी' भाषेलाच हें विशेषण लावण्याचें प्रयोजन काय असें कोणास वाटेल. गेल्या २५ वर्षांत हिंदु-मुसलमानांची अेकी करण्याचे जे प्रयत्न झाले त्यांमध्यें दोन्ही समाजांची राष्ट्रभाषा अेक करण्याचा खटाटोपही करण्यांत आला. अिस्लामधर्मीय मनुष्य ज्या प्रांतांत रहातो त्या प्रांतांतली भाषा हीच त्याची मातृभाषा असते. त्यामुळें सर्वप्रांतिक भाषांची वडील बहिण जी हिन्दी, ती राष्ट्रभाषा म्हणून मुसलमानांसही मान्य व्हावयास पाहिजे. आपल्या महाराष्ट्रांतील मुसलमान, खिरस्ती किंवा ज्यू लोकांची मातृभाषा मराठी आहे आणि आपल्याअितकेंच त्यांचेंही त्या भाषेवर प्रेम आहे; परंतु भ्रान्त कल्पनेनें पछाडले जाअून कांहीं मुसलमान पुढारी अुर्दू भाषेस आपली भाषा मानतात नि ती राष्ट्रभाषा व्हावी असा ते आग्रह धरतात. त्यांना खूष करण्यासाठीं हिन्दी नि अुर्दू यांची भेसळ करून अेक भाषा निर्माण करण्याचे उपाय सुरू झाले. अुर्दूला दुसरें नांव 'हिंदुस्तानी' असें आहे,

*हिन्दी शब्दके भीतर अैतिहासिक दृष्टिसे अुर्दूका समावेश है, किन्तु अुर्दू की साहित्यिक शैली, जो थोडेसे आदमियोंमें सीमित है, हिन्दीसे अिस समय अितनी विभिन्न ही गयी है कि अुसकी पृथक स्थिति संमेलन स्वीकार करता है और हिंदी की शैलीसे भिन्न मानता है ।

१ 'संस्कृतनिष्ठ–हिन्दी' असा शब्दप्रयोग पं. अंबिकाप्रसाद वाजपेयी यांनींही २८ व्या हिं. सा. सं. च्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना वापरला आहे. तसेंच पं. ग. र. वैशंपायन राष्ट्रभाषा परिषद (अबोहर) अध्यक्षीय भाषण पहा.

म्हणून 'हिन्दी याने हिंदुस्तानी' असें नांव या संमिश्र भाषेस देण्यांत येअू लागलें. १९४२ सालीं गांधीजींनीं घोषणा केली कीं 'हिन्दी = हिंदुस्तानी = अुर्दू'. हिंदीच्या स्वरूपाचा हा जो विचका अनेक वर्षे चालू आहे त्यांतून मूळच्या हिन्दी भाषेचें स्वरूप चटकन् ध्यानांत यावें म्हणून हिन्दीच्या आधीं 'संस्कृतनिष्ठ' हा शब्द वीर सावरकरांनीं प्रचारांत आणला. या संस्कृतनिष्ठ स्वरूपांत अरबी, फारसी, अुर्दू या भाषांतील पारिभाषिक शब्दावली, हिन्दुस्थान द्वेष, परकीयांची वाखाणणी करण्याची प्रवृत्ति अित्यादि वृत्तींना स्थान नाहीं. रूढ अशा अरबी-फारसी शब्दांचा बहिष्कार करा असें म्हणण्याचा हेतु नाहीं; परंतु त्यांचा आग्रहानें स्वीकार करणें हेंहीं अभिप्रेत नाहीं. साहित्यिक किंवा शास्त्रीय ग्रंथांस लागणारी शब्दावली संस्कृत भाषे-मधूनच घेतली पाहिजे असा मात्र आग्रह यांत आहे.

संस्कृतनिष्ठेचा अर्थ

संस्कृतनिष्ठ या शब्दाचा अर्थ कित्येकांना कळत नाहीं; किंवा कळून न घेतां त्यावर टीका करण्यांत त्यांना आनन्द वाटतो. संस्कृत-निष्ठ भाषा म्हणजे संस्कृतापासून निर्माण झालेली किंवा प्रगतीसाठीं संस्कृत शब्दांवर अवलंबून असलेली भाषा. हा शब्द प्रथम ज्यांनीं अुपयोगिला त्या वीर सावरकरांनीं त्याचा अर्थ पुढीलप्रमाणें सांगितलेला आहे[१]. "अितर प्रांतिक भाषांप्रमाणेंच हिन्दी ही संस्कृतोत्पन्न भाषा आहे; परन्तु तेलगू, मल्याळम् आणि कानडी या भाषा बोलणारे कांहीं लोक असें म्हणतात कीं आमची भाषा संस्कृतोत्पन्न नाहीं. त्या लोकांना हें मान्य आहे कीं, त्यांच्या भाषांतूनसुद्धां शेंकडा साठ शब्द संस्कृत आहेत. 'तामिळ भाषा' यांतील भाषा हा शब्द संस्कृतच आहे. त्या भाषांतील पारिभाषिक शब्द संस्कृत आहेत आणि ती भाषा बोलणारे जे बहुसंख्याक हिन्दु, त्यांच्या धार्मिक संस्कारांची

---

१ हिन्दी प्रचार संघ, पुणें वार्षिक संमेलनाचे अध्यक्षपदावरून केलेलें भाषण. —'हिन्दी' (काशी) सितंबर १९४२.

भाषा संस्कृत असल्यानें तिचा पगडा त्यांच्या मातृभाषांवर आहे. या दृष्टीनें या भाषा संस्कृतोत्पन्न नसल्या तरी संस्कृतच्या आधारानेंच प्रगत होत आहेत." ०सर्व प्रांतिक भाषा कदाचित् संस्कृतोत्पन्न नसल्या तरी अुर्दू खेरीज सर्व भारतीय भाषा आपले पारिभाषिक शब्द संस्कृतपासूनच घेतात. त्यांच्या काव्यांतील छन्द, त्यांच्यांतील कथा, त्यांच्यांतील अुपमा यांना संस्कृत साहित्याचा आधार घेण्यांत येतो नि त्यांत त्यांना आपलेपणा वाटतो. या भाषांप्रमाणेंच हिन्दीची प्रवृत्ति आहे. ही समानता दर्शविण्यासाठीं संस्कृतनिष्ठ हा शब्द वापरला जातो. या मूळ हिंदींत, अनावश्यक फारसी शब्दांचा भरणा करून तिचें स्वरूप बदलणें म्हणजे हिन्दीप्रमाणें अितर प्रांतिक भाषांवरही अन्याय करण्यासारखें आहे. अशी ही खिचडी भाषा आमची राष्ट्रभाषा नसून मूळची हिन्दी किंवा जी भाषा हिन्दी साहित्यिक लिहितात ती भाषा आम्हांस अभिप्रेत आहे, हें दर्शविण्यासाठीं 'संस्कृतनिष्ठ' असें विशेषण सावरकर लावितात.

पारिभाषिक शब्द संस्कृताच्या आधारें

या स्वरूपाशीं निगडीत असा प्रश्न म्हणजे राष्ट्रभाषेच्या दर्जाचा. 'बाजारू हिन्दी' हीच राष्ट्रभाषा असें कांहींना वाटतें. टांगेवाल्याशीं किंवा रेल्वे स्टेशनावरून बोलली जाणारी हिन्दी हीच यांची राष्ट्रभाषा. या भाषेंत पारिभाषिक शब्द नकोतच. कारण त्या भाषेंत त्यांना साहित्य नकोच आहे. ही राष्ट्रभाषेची कल्पना चुकीची आहे. "कोणत्याही देशाची राष्ट्रभाषा म्हणजे त्याचें सारें अुच्च साहित्य जींत व्यक्तावलें जातें ती." तत्त्वज्ञान, शास्त्र अित्यादि नानाविध विचारांना व्यक्तविण्याचें सामर्थ्य बाजारू बोलींत कधींही येअू शकणार नाहीं. या पारिभाषिक शब्दांसाठीं हिन्दी ही संस्कृत भाषेवरच अवलंबून रहाते. ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे असें हिन्दुस्तानीचे पुरस्कर्ते डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनींही मान्य केलें आहे.० या शब्दावलीनें परिपूर्ण

० पूर्वभारत राष्ट्रप्रचार संमेलन –(जून १९४१) अध्यक्षीय भाषण : साधारण शब्दोंके अतिरिक्त अैसे पारिभाषिक शब्द जो हिन्दीमें प्रचलित नहीं हैं; वे संस्कृतके आधारपर ही लिये जा सकते हैं। क्योंकि अुनका वही रूप अधिक परिचित हो सकेगा, और जल्द हो सकेगा।" डॉ. राजेन्द्रप्रसाद.

असलेल्या भाषेंत साहित्यक्षमता निस्संशय आहे. 'संस्कृतनिष्ठ' हें विशेषण लावण्यांत साहित्यक्षमता अंगीं असलेली अशी हिन्दी आमची राष्ट्रभाषा आहे हें स्पष्ट करण्याचा हेतु असतो.

पंजाब्यानाही संस्कृतनिष्ठ भाषा पाहिजे

हिन्दी ही प्रांतिक भाषांना जवळची असण्याचें कारण ती भाषा संस्कृतोत्पन्न किंवा संस्कृतनिष्ठ आहे हेंच होय. पंजाबमधील साहित्यिक श्री. सन्तराम म्हणतात कीं, "जिच्यांत संस्कृतचे तत्सम शब्द आहेत तीच हिन्दी राष्ट्रभाषा होणें शक्य आहे. बोलाचालीच्या भाषेत वाटल्यास खिचडी करा परंतु ज्या भाषेंत साऱ्या राष्ट्राकरतां साहित्य लिहिलें जाणार तीमध्यें स्थायित्व आणि सर्वव्यापकता हे गुण असणें परम आवश्यक आहे, ... जर हिन्दी **संस्कृतमयी** असेल तरच पंजाबी लोकांना हिन्दीबद्दल आपुलकी वाटेल." † अुर्दूचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पंजाबप्रांतांत अनेक वर्षें राहिलेल्या पिढीजात घराण्यांतील पुढाऱ्याचे हे अुद्‌गार आहेत. याचें खरें कारण असें कीं शिष्ट समाजांत आणि सरकार दरबारीं जरी अुर्दूचें प्रस्थ असलें तरी (जसें आपल्याकडे अिंग्रजी भाषेला महत्त्वाचें स्थान आहे तसें) या शिष्ट समाजाची आणि सामान्य लोकांची मातृभाषा पंजाबी ही संस्कृतोत्पन्न आहे.

बिहारला संस्कृतमयी भाषा जवळची

मैथिली मातृभाषा असलेले अलाहाबाद विद्यापीठाचे कुलगुरु पं. अमरनाथ झा यांचें मत असें आहे कीं "हिन्दी–संस्कृतमयी, सूर तुलसी सेविता, भारतीय संस्कृति मंडिता, राष्ट्रभाषा है और रहेगी।"[१] "यदि हम आशा करते हैं कि हिन्दी अहिंदी प्रांतोंमें समझी जाय और व्यवहृत हो तो वही हिंदी सर्वग्राहच होगी जो संस्कृतमयी होगी और जिसमें अुन प्रांतवालों को कुछ परिचित शब्द और अपनी संस्कृतिकी

---

† अबोहरचें (१९४१) हिं. सा. सं. चे साहित्यपरिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. संतराम यांचें भाषण.

१. हिं. सा. संमेलनाध्यक्ष (१९४१).




★

१९३५ पर्यंत राष्ट्रभाषा हिंदी–
नि राष्ट्रलिपि नागरीचा शीघ्रतेनें
भारतभर प्रचार करणारे
लोकधुरीण

★

पूजनीय म. गांधी




★

हिंदी साहित्य सम्मेलनाचे
–अनेक वर्षांचे कर्णधार–
या भारतव्यापी संस्थेकरवी हिंदीचा
राष्ट्रभाषा, आणि नागरीचा राष्ट्रलिपि
म्हणून भारतभर तन-मन-धनानें
सतत प्रचार करणारे
लोकाग्रणी

★

हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा



महर्षि दयानन्द

★

आधुनिक कालांत, भारतव्यापी धर्म-
कार्यांत हिंदीस राष्ट्रभाषेचें स्थान
देणारे पहिले आचार्य

★

★

विसाव्या शतकाच्या प्रारंभींच्या
क्रांतीच्या–स्वातंत्र्याच्या आंदोलनांत–
' हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा
नि देवनागरी हीच राष्ट्रलिपि '
अशी घोषणा करणारे
स्वातंत्र्य-वीर

★



स्वा. वीर वि. दा. सावरकर

झलक मिलेगी।"* यामध्यें 'संस्कृतमयी' आणि 'संस्कृत की झलक किंवा 'भारतीय संस्कृति मंडिता' ही विशेषणें हिंदी भाषेच्या स्वरूपा-बद्दलचीं दिग्दर्शक आहेत. हिंदींत संस्कृतांतील जे तत्सम किंवा तद्भव शब्द येतात ते अितर प्रांतीयांना परिचित वाटतात. या परिचित शब्दांमुळें हिंदी भाषेबद्दल अितर प्रांतीयांना आपलेपणा वाटतो.

महाराष्ट्राला अशीच भाषा पाहिजे

कै. श्री. न. चिं. केळकर यांनीं असें सांगितलें आहे कीं 'मराठी और हिन्दी के बीच जो नाता पहलेसेही है वह तो संस्कृत भाषा के कारणही है। [१]

याचमुळें कानडीला हिंदी जवळची

स्वतः म. गांधींनी १९३६ सालीं बेंगलोर येथील भाषणांत ही गोष्ट मान्य केली आहे. ते म्हणतात "हिन्दी ही अितकी सोपी भाषा आहे याचें कारण दक्षिणेंतील चार भाषा आणि अितर प्रांतीय भाषा यांमध्यें संस्कृतचे पुष्कळसे शब्द असतात. प्राचीन काळीं दक्षिण आणि अुत्तरेंतील संबंध संस्कृतद्वाराच निगडीत केले जात असत. आजसुद्धां दक्षिणेंतील शास्त्रीमंडळी अुत्तरेकडील शास्त्र्यांच्याबरोबर संस्कृतांतूनच चर्चा करतात.

श्रीमती रामन् यांच्या हिंदी भाषणाचा कानडी अनुवाद तुम्ही आतां अैकिलाच. तुमच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नसेल कीं अनुवादांत श्री.रामन् यांच्या हिंदी भाषणांतील किती तरी शब्द जसेच्या तसेच घेतलेले आहेत--अुदा:-प्रेमी, संघ, सभा, अध्यक्ष, पद, अनंत, भक्ति, स्वागत, अध्यक्षता, सम्मेलन हे सर्व शब्द हिंदी आणि कानडीला समान आहेत.[२]" मद्रास प्रांताला संस्कृतनिष्ठ हिंदी हीच राष्ट्रभाषा

---

* सम्मेलन पत्रिका चैत्र, वैशाख की संख्या (पं. झा यांचे मुझफरपुरचें भाषण)

१ अुद्घाटक या नात्यानें भाषण. हिं. सा. पुणें अधिवेशन.

२ हें खरें असलें तरी वरील सर्व शब्द संस्कृत आहेत. १९४२ च्या नंतर गांधींनीं चालू केलेल्या हिंदुस्तानीच्या चळवळीस हे शब्द झेपण्या-सारखे नाहींत. (हा गांधीजींचा अुतारा पं. अमरनाथ झा, यांच्या अबोहर येथील भाषणांतून घेतला आहे.)

मानवेल हें कै. लो. टिळकांनीही सांगितलेले होते.०

सर्व प्रांतीय भाषा संस्कृतनिष्ठच

बंगाली भाषापंडित प्रा.चतर्जी यांनी १९४१ सालीं याच संस्कृतपृष्ट भूमीचें वर्णन विशेषत्वानें केलें आहे. "भारतके ४।५ आधिवासियों की ओरसे, न केवल हिंदुस्थान या अुत्तर भारतके हिन्दीवालों की ओरसे, बल्कि जिनमें हिन्दीप्रचार करना अुचित समझा जाता है, अुन गुजरात, महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, केरळ, तामिलनाडु, ओरिसा, बंगाल, आसाम और नेपाल की ओरसे–हमें साफ कह देना चाहिये कि संस्कृत को छोडकर हिन्दी राष्ट्रभाषा नहीं हो सकती।"

हिंदीची व्यापकता संस्कृतनिष्ठेमुळेंच

कराची–१९४६–हिं. सा. सम्मेलन–अध्यक्ष– श्री. वियोगीहरी म्हणतात कीं, "अुसकी जिस संस्कृतनिष्ठतापर आज आक्षेप किया जाता है वही तो अुसकी लोकव्यापकताका मूल कारण है।'

यंदाच्या मुंबअीच्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं.राहुल सांकृत्यायन यांनीं प्रगतिशील संघापुढें नुकतेच सांगितले : "नागरी लिपिमें लिखी संस्कृतानुसारिणी हिंदी ही भारत-संघकी अेकमात्र भाषा हो सकती है, और वह होकर रहेगी।"

या सर्व अवतरणांवरून हें लक्षांत येअील कीं हिन्दी ही संस्कृतनिष्ठ असल्यामुळेंच म्हणजे सर्व प्रांतिक भाषांना समान अशी परिचित शब्दावली वापरणारी भाषा असल्यानें अखिल भारतीयांना ती न शिकतां सुद्धां ओळखीची नि आपली वाटते. अशी स्थिति अिंग्रजी किंवा अुर्दू या भाषांतील अपरिचित शब्दांमुळें होत नाहीं. अिंग्रजी

०"हम तो अेक अैसी राष्ट्रभाषा चाहते है जिसे सभी प्रांतवासी समझ सकें और अिसीकी चेष्टा भी होनी चाहिये। यह भाषा यदि कोअी हो सकती है तो हिन्दी ही हो सकता है। पंजाबसे बंगालतक यह कार्य सहजही हो जायगा, पर मद्रासप्रांतमे भी यह कार्य कठिन नहीं है। वहाँ संस्कृतका प्रचार कम नहीं है, और संस्कृतके बहुतसे शब्द अुस प्रांतकी भाषाओंमें मिलते हैं। अिस लिये हिन्दी भविष्यमें भारतकी भाषा बनाअी जा सकती है।" ––स्व. तिलक.
(राष्ट्रभाषा रत्नपरीक्षा, संपूर्ण विवरणपत्रिका के मुखपृष्ठपर)

किंवा अूर्द भाषांना राष्ट्रभाषा न मानण्याचें हेंच प्रमुख कारण होय.

संस्कृत शब्द प्रांतीय भाषांचे प्रतिनिधि

या शब्दसाम्याबरोबरच भाषेंत व्यक्त होणाऱ्या भावनांचा आणि विचारांचा, संस्कृतीचा समानपणा असणें हा गुण (संस्कृतनिष्ठ) हिन्दीमध्यें आहे. "प्रांतीय आणि हिन्दी भाषेच्या अेकतेच्या सांस्कृतिक ग्रन्थी म्हणजेच हे 'संकृत भाषासंबंधी अंश' होत...हिन्दीमधील संस्कृत शब्द हे विटांच्याप्रमाणें नाहींत कीं जे अेकाद्या राजनीतिज्ञ अिजिनिअराला काढून फेंकून देता येतील. हे शब्द सजीव प्रतीक रूपानें सर्व भारतीय भाषांत आहेत.आणि भारतीयांच्या मनांत (मानसके साथमें अपरिहार्य-रूपसे परिणीत होगये हैं) अेकरूप होअून गेले आहेत. हे शब्द म्हणजे स्नायुकेन्द्राप्रमाणें भारतांतील सर्व समाजांत जीवन धारण करण्यास आणि अुत्साहित करण्यास शक्तिप्रदान करणारे सांस्कृतिक विचारांचे प्रतिनिधि आहेत. जर आपल्या भावी सामर्थ्यासाठीं हिन्दी संस्कृत-पासून प्रेरणा प्राप्त करील तरच ती भारताची राष्ट्रभाषा, त्याच्या आत्म्याचें माध्यम, सौंदर्याचें मंदिर व सांस्कृतिक पैतृक संपत्तीची भाषा आपोआप होईल." *

क्लिष्टतेचा बागुलबोवा

अशारीतीनें भाषेची उन्नति करण्यासाठीं नव्या विचाराचे वाहक शद्व प्रांतिक भाषाप्रमाणें हिंदी संस्कृतमधूनच घेते. असें केल्यानें भाषा क्लिष्ट होतें हें म्हणणें फसवें आहे. "भाषेंत प्रगति व्हावयाची तर तिची शद्व संख्या वाढणार, हें शद्व संस्कृतापासून आले तरी परंपरेनें आल्यानें लोक लवकर समजूं शकतात.गंभीर व उच्च विचाराचे वाहक शब्द सगळ्यांस कळणार नाहींत, ही स्थिति सर्वत्रच असते. सामान्य अिंग्रज माणसास ८ हजार शद्वांत व्यवहार करतां येतों, आणि अिंग्रजी-कोषांत कमीतकमी तरी ५ लाख शब्द येतात.अगदीं सुशिक्षित अिंग्रज मनुष्य घेतला तरी त्यांसही (त्यानें विशेष अभ्यास केल्याविना) तत्व-ज्ञान,विज्ञान किंवा अर्थशास्त्राचीं पुस्तकें सर्वथैव समजूं शकत नाहींत."[१]

---

* श्री. कन्हैयालाल मुन्शी (काँग्रेसचे भूतपूर्व गृहमंत्री) जयपूर राष्ट्रभाषा परिषद, अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण.

१. संपूर्णानंद, सा. भारत दि. १६ नोव्हेंबर १९४७

आतां स्वराज्यांत सरकारचें कर्तव्य आहे कीं, जनता साक्षर नि सुशिक्षित करणें. या जनतेस आपण जी तिची मातृभाषा म्हणजे प्रांतिक भाषा शिकविणार तिच्यासारखे रूप हिंदीचें आहे.हिंदुस्तानी ही फारसी निष्ठ आहे, लोकनिष्ट नाहीं. ती भाषा कृत्रिम असल्यानें कठीण आहे हें मागील प्रकरणांतून स्पष्ट केलेंच आहे.

हिंदी-मराठी आदि भाषांचे हृदय अेकच

हिन्दीमधील संतमहंत म्हणजे कबीर, तुलसी, सूर अित्यादींनीं जें सांगितलें तेंच तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर यांच्या संदेशांत आढळतें. आधुनिक काळांतहि प्रेमचन्द, प्रसाद किंवा मैथिली शरण यांच्या कथाकाव्यांतून आपल्या मातृभाषेंतीलच विचार आपण वाचत आहोंत असें वाटतें. आपल्याच संस्कृतीचें अुज्ज्वल दर्शन त्यांत घडतें ० बंगाली, कानडी, पंजाबी माणसांच्या हृदयाला जाअून भिडणाऱ्या भावना हिन्दींत त्यांस आढळतात. यामुळें प्रांतिक भाषांना आपलें हिन्दीशीं कौटुंबिक नातें आहे अर्थात बहिणी-बहिणींचें नातें आहे असें वाटतें. "महाराष्ट्राची संस्कृति हिन्दी भाषेंमध्यें आपलेंच रूप पाहील असा माझा विश्वास आहे."असें श्री. टंडनजी यांनीं पुणें अधिवेशनाच्या वेळीं (१९४०) अेका संदेशांत म्हटलें होतें तें सर्वच प्रांतिक भाषाबद्दल खरें आहे. ज्या भाषेमध्यें हें आत्मीयतेचें स्वरूप कायम राहील तीच आमची राष्ट्रभाषा होय. अुर्दू किंवा हिंदुस्तानीमध्यें या गोष्टी कधींही शक्य नाहींत.या दृष्टीनें अबोहर (१९४२) येथील वार्षिक अधिवेशनांत हिं. सा. सम्मेलनानें केलेला ठराव अत्यंत अुचित असून त्यांत राष्ट्रभाषेच्या स्वरूपाचा निर्णय निसंदिग्धपणें केलेला आहे. "राष्ट्रभाषा होनेके कारण, प्राचीन समयसे हिन्दी सब प्रांतीय भाषाओंकी बडी बहन है, अुसके और अुसकी छोटी बहनोंके स्वरूपमें माताका अमर सौन्दर्य छलकता है। बहनें अेक दूसरेके रूपमें अपना रूपभी देखती हैं। अुनका आपसका प्रेम स्वाभाविक है।"

---

० पं. ग. र. वैशंपायन राष्ट्रभाषा परिषद अध्यक्षीय भाषण—अबोहर पंजाब

सारांश

अुर्दू आणि हिन्दी यांच्या व्याकरणाचा सांचा मुळांत अेक असतां हिन्दीलाच राष्ट्रभाषा मानण्याचें कारण वरील विवेचनानें स्पष्ट केलें आहे. अुर्दू किंवा हिंदुस्तानीमध्यें विदेशी वातावरण, विदेशी शब्दावलि, विदेशी छन्द, विदेशी शैली (फारसी वळणाची), अरबी वळणाचे अुच्चार, हिन्दीच्या व्याकरणाचे नियम झुगारून फारसी-अरबी व्याकरण स्वीकारण्याची वृत्ति आणि फारसी लिपीच्या लेखनाचा प्रयोग या गोष्टी प्रामुख्यानें आढळतात.[१] अशा भाषेंत आपल्या प्रांतीयभाषियांना आपलें प्रतिबिंब आढळत नाहीं. हिन्दी भाषेंत त्यांना आत्मीयतेचा अनुभव येतो. हिंदीमधील भारतीय वातावरण, शब्दावलि, छन्द, शैली, उच्चार, लिपि आणि वर्णमाला यांत त्यांना आपलेंच प्रतिबिंब दिसते. ही हिन्दी म्हणजेच 'हिन्दी शैली' किंवा 'संस्कृतनिष्ठ' किंवा 'संस्कृतप्रधान'[२] हिन्दी होय. या स्वरूपासच राष्ट्रभाषेचें स्थान मिळालें आहे आणि मिळत राहील. स्वामी दयानंदांनीं हिंदीचें हें महत्त्व ओळखून आर्यसमाजाचे धर्मग्रंथ या भाषेंत लिहिले. ख्रिस्त्यांनीं बायबल याच भाषेंत अनुवादित केलें आहे. कारण हेंच रूप हिंदीचें स्वाभाविक रूप आहे.

हिंदी हेंच नांव योग्य

हिंदी शब्दानें राष्ट्रभाषेचें सर्वव्यापी नि भारतीयत्व दर्शविणारें रूप सहजच प्रकट होतें. कोठल्याही एका धर्माची ही भाषा नाहीं. ही भाषा बोलणाऱ्यांत बहुसंख्य हिंदु आहेत, कारण या देशांत तेंच बहुसंख्य आहेत. या दृष्टीनें 'भारती' म्हणजे भारताची भाषा असें नांव या भाषेस द्यावें असें क्वचित् सुचविलें जातें. पण परंपरागत, सार्थ,

---

१ प्रकरण ६ प्रारंभींचा भाग पहा. तसेच घटना समितीचें सभासद श्री. बाळकृष्णजी शर्मा:–(अध्यक्ष सं. प्रांतीय सम्मेलन १९४७):– " अुर्दू भाषा के विकास के अितिहास पर यादि हम विचार करें तो हमें पता लगेगा कि अुसका स्वरुप भारतीयता–विरोधी मुस्लिम भावनाकाही प्रतिफल है । "

२ कन्हैयालाल मुन्शी– सभापति भाषण, अुदयपूर १९४५

निसंदिग्ध नि आत्मीयतेचें दर्शक असें हिंदी हे नांवच योग्य आहे. "हिंदुस्तानी हें नांव स्वीकारल्यास सगळा तंटा मिटेल असें मानणें चूक आहे. मुख्य प्रश्न भाषेच्या नांवाचा नसून स्वरूपाचा आहे. जे लोक हिंदीला विरोध करीत आहेत,त्यांचें तोंड 'हिंदी' ला हिंदुस्तानी म्हणण्यानें बंद होणार नाहीं. जेव्हां आपण हिंदुस्तानी नांवाखालीं उर्दू भाषेचा स्वीकार करूं तेव्हांच त्यांना संतोष होईल. हें तर आम्ही कधींच मान्य करणार नाहीं."[१] हिंदी या नांवानें भाषेचें जें स्वरूप स्पष्ट होतें, तें कोणीं जाणूनबुजून सिद्ध केलेलें नाहीं. हें स्वरूप हिंदी भाषी वृत्तपत्रांतून मासिकांतून आणि पुस्तकांतून आजही व्यक्त होत आहे. अन्य प्रांतीय भाषेच्या सहकार्यानें त्यांत प्रांतिक भाषेचें कांहीं शब्द येतील, परंतु तिचा ओघ आज आहे हाच रहाणार, कारण तोंच स्वाभाविक नि प्रांतिक भाषेलाही पूरक असाच आहे. अशी हिंदी राष्ट्रभाषा व्हावी असा आमचा आग्रह आहे.

---

१. श्री. संपूर्णानंद, सा. भारत (प्रयाग) दि. १६ नोव्हेंबर १९४७

लिपि, ध्वनि आणि चिन्हें

लिपि म्हणजे अक्षर लिहिण्याची पद्धति किंवा ध्वनि लिहून दाखविण्याचें चिन्ह. अशा अनेक चिन्हांच्या सहाय्यानें भाषा लिहिली जाते. ध्वनि आणि वर्णचिन्हें यांच्या संबंधांचें नांव लिपि होय. अेकाच चिन्हानें अेकच ध्वनि समजला म्हणजे लिपीचा अुद्देश साध्य झाला. कांहीं लिप्यांमध्यें अेकाच ध्वनीला अनेक चिन्हें किंवा अेकाच चिन्हाचे अनेक अुच्चार असतात. पण हा त्या लिपीचा दोष आहे. शास्त्रशुद्ध लिपि तीच कीं जिच्या अेका चिन्हाचा अेकच अुच्चार आणि अेका अुच्चाराला अेकच चिन्ह आहे. अक्षराचें बाह्यरूप सारखें असून त्याचा अुच्चार भिन्न प्रांतांत भिन्न भिन्न प्रकारें झाला, तर चिन्ह अेक असूनही ती लिपि भिन्न मानली पाहिजे. सामान्यतः भाषा बोलणाऱ्या लोकांच्या अुच्चारांना लिखित करण्यास जुळेल अशी लिपि त्या भाषेला असते. कोणतीहि भाषा कोणत्याहि लिपींत लिहितां यावयास पाहिजे; परंतु त्या भाषेंतील सर्व ध्वनि दुसऱ्या भाषेच्या लिपींत असतातच असें नाहीं. लिपींतील दोषांमुळें पुष्कळ वेळां भाषेच्या अुच्चारांतहि तदनुकूल फरक पडत जातो. यामुळेंच भाषेचें आणि लिपीचें नांव पुष्कळ वेळां अेकच असतें. निदान सामान्य लोकांस तें तसेंच भासत असतें.

समन्वयानें हा वाद उत्पन्न केला

राष्ट्रभाषा कोणती असावी याबद्दल जसा वाद केला जातो तसाच या राष्ट्रभाषेस कोणती लिपि असावी, याबद्दलही करण्यांत येतो. वस्तुतः अेकदां राष्ट्रभाषा कोणती हें ठरविलें म्हणजे त्या भाषेची जी लिपि तीच राष्ट्रलिपि व्हावयास पाहिजे. हिन्दी ही आमची राष्ट्रभाषा आहे असें म्हटल्यानंतर तिची लिपि जी देवनागरी ती राष्ट्रलिपि ठरतेच; परंतु गेल्या १०।१२ वर्षांपूर्वीपासून हिन्दी-अुर्दूच्या समन्वयानें राष्ट्रभाषा ठरविण्याची विचित्र कल्पना ज्यांनीं काढली त्यांनींच ह्या राष्ट्रभाषेच्या माथीं अुर्दू भाषेची फारसी लिपीही मारली! दोन लिप्यांचा

जर समन्वय करतां आला असता तर तोसुद्धां या महापुरुषांनीं करून खिचडी भाषेला खिचडी लिपीची जोड दिली असती! तें साध्य न झाल्यामुळें त्यांनीं राष्ट्रभाषेला दोन लिप्या अनिवार्य केल्या आहेत. त्यांची मजल येथपर्यंत गेली होती कीं, 'स्वराज्य मिळविण्यासाठीं अुर्दू-लिपि शिकण्याचे श्रम घेणें अत्यावश्यक आहे.' असें ते म्हणत. पण असें न करतांही स्वराज्य मिळाले आहे ! भाषेचा किंवा लिपीचा शास्त्रीय दृष्टींनीं विचार करतांना वरील प्रकारची विचारसरणी त्याज्य होय. राष्ट्रलिपीचा अर्थ आणखी अेका तऱ्हेनें करतां येअील. राष्ट्रांमधील प्रचलित अशा अनेक भाषांना अुपयुक्त अशी जी सामान्य लिपि ती राष्ट्रलिपि होय. या दृष्टीनेंही राष्ट्रलिपीचा विचार येथें केला आहे.

राष्ट्रलिपीची आवश्यकता

समराष्ट्रीयत्त्वाचें चिन्ह जसें अेक राष्ट्रभाषा, तसेंच समलिपित्वही या राष्ट्रीयत्वाचें चिन्ह आहे. प्रांतिक भाषांची लिपि अेक असेल तर त्या भाषा अितर प्रांतीयांना शिकणें सुलभ जाअील. कारण नवीन लिपि शिकावी न लागतां नवीन भाषा फक्त शिकावी लागते. महाराष्ट्रीयांना आजहि हिन्दी भाषा शिकत असतांना नवीन लिपि शिकावी लागत नसल्यामुळें हिंदी भाषाज्ञानांत अेकदम प्रगति करतां येते, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. भिन्न भिन्न प्रांतिक भाषांमध्यें संस्कृत भाषेच्या आधारानेंच पुष्कळसे शब्द घेतलेले आहेत. या शब्दसाम्याबरोबरच जर लिपि साम्य असेल तर परप्रांतीय भाषा न शिकतांहि, ती अन्य प्रांतीयांस बऱ्हंशीं समजूं शकेल. बंगाली किंवा गुजराथी सावकाश बोलल्यास आपल्यास पुष्कळ कळतें हा नेहमींचा अनुभव आहे. जी भाषा बोलली असतां कळते, तीच जर आपणांस माहीत असलेल्या लिपींत लिहिली गेली तर त्या भाषेंतील ग्रन्थही आपणांस समजूं शकतील यांत शंका नाहीं. सुमारें ५० वर्षांपूर्वी न्यायमूर्ति शारदाचरणमित्र यांनीं अशा तऱ्हेनें देवनागरी लिपींत बंगाली, हिन्दी, गुजराथी, मराठी अशा चार भाषांमधील अेकच मजकूर छापण्याची योजना केली होती. त्या कल्पनेचा प्रचार अधिक झाला असता तर आज

राष्ट्रलिपीचा प्रश्न पुष्कळ अंशीं सुटला असता. कांहीं वर्षांपूर्वी खांडवा येथील 'हिन्दी-स्वराज्य' या वर्तमानपत्रांतही वरील पद्धतीप्रमाणेंच नागरी लिपींत अनेक भाषांतील मजकूर दिला जात असे. अलाहाबाद येथें निघणाऱ्या 'भूगोल' मासिकानें असा यत्न केलेला आहे.

मुद्रणांत क्रांति

सर्व प्रांतिक भाषांची लिपि अेक झाली तर मुद्रण-व्यवसायाच्या दृष्टीनें आपल्या देशाची फारच अुन्नति होणार आहे. मुद्रणाच्या दृष्टीनें लिपीमध्यें सुधारणा करणें, ती लिपि मोनोटाअीप, लायनो-टाअीप, टेलींप्रिंटर या यंत्रांत बसविणें; मागणी अधिक होणार असल्यानें त्या यंत्राची किंमत लोकांच्या आटोक्यांत आणणें अित्यादि गोष्टी सहज होअू शकतील. आज नागरी टाअीपरायटर किंवा मोनोटाअीप या यंत्रांची मागणी थोडी असल्यामुळें त्यांची किंमत भरमसाट असते आणि त्यांत सुधारणा करण्यासही व्यापारी कंपन्यांना अुत्साह वाटत नाहीं. देवनागरीची जर ही कथा तर कानडी किंवा मल्याळम् अशा अल्पसंख्यांक भाषीयांच्या लिपियंत्रांची काय स्थिति असेल? 'सर्व हिंदुस्थानभर सर्व लोकांची अेकच मातृभाषा करणें अव्य-वहार्य नि अजाणतेपणाचें होअील; पण हिंदुस्थानांत सर्वमान्य अशी अेकमेव लिपि म्हणून नागरीला मान्यता देणें हें त्यापेक्षां अधिक व्यवहार्य होअील*"

अेक लिपि पाहिजे

राष्ट्रभाषा अेक असणें हें जसें राष्ट्रीयत्वाचें गमक आहे तसेंच अेकलिपि असणेंही राष्ट्रीयत्वास पोषक आहे, हें प्रारंभी सांगितलेंच आहे. भाषा अनेक राहूनही अेक लिपि असणें शक्य आहे. ज्या राष्ट्रांत अेकच भाषा व्यवहृत होत असेल तेथें लिपिहि अेकच असणार. सुदैवानें अिंग्लंड किंवा जर्मनी या देशांत राष्ट्रभाषा किंवा राष्ट्रलिपीचा प्रश्नच अुद्भवत नाहीं. त्यांची मातृभाषा, राजभाषा आणि राष्ट्रभाषा ही जर्मन किंवा अिंग्रजी आहे. तिची लिपि जी रोमन तीच त्यांची राष्ट्रलिपि

*कलकत्ता अ. भा. हिंदुमहासभा-अध्यक्षीय भाषण-वीर सावरकर.

आहे. हिन्दुस्थानांत अनेक भाषा आणि त्यांच्या अनेक लिप्या अस्तित्वांत असल्यामुळें राष्ट्रभाषेच्या प्रश्नाप्रमाणेंच राष्ट्रलिपीचा म्हणजे सर्व प्रांतीय भाषांना अेकच लिपींत लिहिण्याचा प्रश्न अुद्‌भूत होतो. हिंदी ही जरी राष्ट्रभाषा असली तरी तिचा प्रचारहि ४० कोटी लोकांपर्यंत होणें असम्भवनीय आहे. परंतु जर अेकलिपीचा प्रचार करण्याची खटपट केली तर तर्कदृष्टचा तरी सर्व प्रांतीय भाषांपर्यंत म्हणजे ४० कोटी पैकीं जे साक्षर होतील त्या लोकांपर्यंत तिचें ज्ञान प्रत्यक्षांत येअील.

ही लिपि कोणती ?

हिन्दी हीच राष्ट्रभाषा मान्य केल्यानंतर त्या भाषेची जी देवनागरी लिपि ती राष्ट्रलिपि ठरते; परंतु या लिपीच्या जोडीला फारसी (अुर्दू) आणि रोमन (अिंग्रजी) या लिप्यांची बाजू घणारे लोक आपल्या देशांत आहेत. त्या दृष्टीनें राष्ट्रलिपीला कोणते गुण आवश्यक आहेत नि ते कोणत्या लिपींत आहेत याचा विचार करणें भाग आहे. कोणत्याहि लिपींत ती अुपयुक्त असण्याच्या दृष्टीनें दहा गुणांची तरी आवश्यकता आहे.

दहा गुण

१. **निश्चितपणा** :— अेकाच वर्णाचा (चिन्हाचा) ध्वनि अेकच असावा. म्हणजे जे लिहिलें असेल तसेंच तें वाचतां येतें आणि अक्षराच्या अुच्चाराबद्दल मनांत सन्देह अुत्पन्न होत नाहीं.

२. ज्या वर्णाचा जसा अुच्चार होतो तसाच तो लिहिला जावा. अुदाहरणार्थ :—'कमल'यामध्यें प्रत्येक वर्णाच्या अुच्चाराप्रमाणेंच वर्ण वाचल्यास सर्व शब्दाचा अुच्चार तसाच होतो.ही गोष्ट आणखी स्पष्ट करण्यासाठीं रोमन लिपीचें अुदाहरण देत आहें.

(१) RAM –आर् अे अेम् किंवा फार तर आर रेम्.

'आरेम'सारखा कांहींसा अुच्चार केवळ लिपीच्या अुच्चारणानें होअू शकेल; परंतु लिहिणाराचा अुद्देश वरीलप्रमाणें अुच्चार करावा असा नाहीं. त्याला या शब्दाचा अुच्चार 'राम', किंवा 'रॅम' असा कोणता तरी करावयाचा असला पाहिजे.

(२) अेम् अे टी MAT अेमेटी. अि.

या अुदाहरणांवरून रोमन लिपीचा अनिश्चितपणा कसा असतो तें दिसून येतें.

३. शब्द लिहिल्यानंतर त्यामधील कोठलेंही अक्षर अनुच्चारित राहूं नये. असें रोमन लिपींत कैक वेळीं दृष्टीस पडतें.

write या शब्दांत ' w ' चा अुच्चार होत नाहीं.
Psalm ,, "P" ,, ,, ,,

४. **अुपयुक्तता**:—भाषेमधील आवश्यक ध्वनींना लिपिचिन्हें असलीं पाहिजेत. अर्थात् वर्णमाला शास्त्रशुद्ध असावी. अुदा०— आजच्या हिन्दींत 'ळ' हें अक्षर नसल्यामुळें आपल्याकडील चितळे, काळे, मुळे, गोळे, सुळे अित्यादि विशेषनामें लिहितांना मोठी अडचण पडते. अुत्तरेकडील लोक वरील नांवें लिहितांना 'ळ' च्या जागीं 'ड' किंवा 'ल' हा वर्ण लिहितात; आणि वाचतांना सुद्धां 'ळ' अैवजीं 'ल' किंवा 'ड' वाचतात !

५. अेका ध्वनीला अेकापेक्षां अधिक लिपिचिन्हें असूं नयेत. कारण कोणत्या वेळीं कोणतें लिपिचिन्ह अुपयोगांत आणावें याचे नियम करावे लागून लिपि क्लिष्ट होते. अुदा०—फारसी मध्यें 'स' च्या अुच्चारासाठीं 'स्वाद, ' 'सीन', 'से' असे तीन वर्ण आहेत. तीच गोष्ट 'ज' या अुच्चाराची .

६. **लिपि वाचण्यास सोपी नि सरळ असावी**:—लिपिचिन्हांचा जो मूळ अुच्चार असेल त्याप्रमाणें लिपि वाचण्याची पद्धति नसल्यानें हें सौकर्य येत नाहीं. रोमन किंवा फारसी लिपीमध्यें लिहिलेल्या अपरिचित शब्दांचा अुच्चार नेमका कोणता आहे याबद्दल वाचक शंकित असतो. यामुळेंच या भाषेंतील शब्दांचें स्पेलिंग आणि त्या शब्दांचे अच्चार पाठ करावे लागतात.

७. **सौन्दर्य**:—हा प्रत्येकाच्या आवडी-निवडीचा प्रश्न आहे. याबद्दल फक्त अेवढेंच म्हणतां येअील कीं, तिच्यांत आकर्षणशक्ति असावी. निदान तिटकारा तरी निर्माण होअूं नये. अुदा०:—बालबोध लिपि आणि मोडी लिपि शेजारीं शेजारीं लिहून ठेवल्यास लहान मुलें झटकन बालबोध लिपीकडेच (देवनागरी लिपीकडे) आकृष्ट होतात.

८. **त्वरा लेखन**:––द्रुतगतीनें लिहितां आल्यास वक्त्याचें भाषण चालू असतां तें लिहून घेतां यतें किंवा स्वतःचें लेखन द्रुत होतें

९. **मुद्रणसुलभता**:––आजकालच्या काळांत प्रचार नि ज्ञानदान याकरितां वृत्तपत्रें नि पुस्तकें छापण्याची सोय आहे; परंतु हें काम द्रुतगतीनें आणि कमी खर्चाचें व्हावयास पाहिजे. अर्थात् अक्षरांची जुळणी करणाऱ्या माणसास हें काम लवकर करतां न आलें तर तो लिपीचा दोष होय.

१० याच गुणाचा दुसरा भाग म्हणजे अक्षर जुळविण्याचें काम यंत्रानें करता यावें. रोमन लिपींत मोनोटाओीप, लायनोटाओीप अगर टाओीपरायटर यांची सोय आहे. त्यामुळें रोमन लिपींतील काम शीघ्रतेनें होते, सुन्दर दिसतें आणि शुद्ध होऊं शकतें.

आणखी पांच गुण

अेवढें गुण असूनहि भारताची राष्ट्रलिपि होण्यास आणखी कांहीं गुणांची आवश्यकता आहे. या दहा गुणांपैकीं यद्यपि अेकादा गुण नसला तरी चालेल; परंतु पुढील पांच गुण भारताच्या राष्ट्रलिपीस अत्यावश्यक आहेत.

११. ही लिपि स्वदेशी पाहिजे. म्हणजे तिचा जन्म नि विकास हिंदुस्थानांतच झालेला असला पाहिजे. व्यक्तीच्या जीवनांत स्वदेशी-व्रताचें जें महत्त्व तेंच राष्ट्राच्या जीवनांत स्वदेशी लिपीचें अथवा अन्य स्वदेशी वस्तूचें होय. चार पैसे जास्त देऊनसुद्धां जसें आपण जाडें-भरडें स्वदेशी कापड वापरतों तसेंच या क्षेत्रांतहि वागलें पाहिजे.

१२. या लिपीचा प्रचार बहुसख्यांक लोकांत–निदान पंडितमंडळींत तरी–सर्व भारतांत झालेला असावा.अशी लिपि अेका अर्थानें राष्ट्रभर पसरलेली असते.

१३. राष्ट्रांतील प्राचीन वैभवशाली साहित्य याच लिपींत असणें युक्त होय. त्यामुळें तिच्या आधुनिक प्रसारास परंपरेचें बळ प्राप्त होतें.

१४. ज्या प्रांतिक भाषांना ही लिपि वापरावयाची त्यांच्या मूळच्या लिपींत आणि राष्ट्रलिपींत जितकें सादृश्य असेल तितकें चांगलें

लिपिचिन्हें भिन्न असलीं तरी वर्णमाला, स्वरांची संख्या अित्यादींचें राष्ट्रलिपीशीं साम्य असल्यास अिष्टच होय.

१५. बहुसंख्याकांची ही लिपि असल्यास अधिक चांगलें.

प्रश्नाचा विचका टाळा

वर सांगितलेले पंधरा गुण अथवा त्यांतल्या त्यांत अधिक गुण ज्या लिपीस मिळतील तीच राष्ट्रभाषेची नि प्रांतिक भाषांची लिपि होय. धर्म, संप्रदाय किंवा जातिविशिष्ट संकुचित दृष्टि भाषाक्षेत्रांत आणण्यानें या प्रश्नाचा विचका होतो.देशाचें राजकारण अेका जमातींतील कांहीं हट्टी लोकांच्या दुराग्रहामुळें जसें हेलकावे खात होतें व खात आहे तसेंच या राष्ट्रलिपीचें होअू देणें अहितकर आहे.

११ : : रोमन आणि फारसीची अपूर्णता

आज राष्ट्रलिपि म्हणून रोमन (अिंग्रजी), फारसी (अुर्दू), देवनागरी (हिन्दी) या तीन लिप्यांचीं नांवें सुचविलीं जातात. सेनाविभागांत ब्रिटिश सरकारनें 'रोमन' लिपीचा सक्तीनें प्रसार केला आहे, फारसी ही अुर्दू भाषेची लिपि असून मुसलमानांना खूष करण्यासाठीं कांहीं लोक तिलाहि नागरीबरोबर राष्ट्रलिपि मानावी असा घोष करीत आहेत आणि राष्ट्राची स्वाभाविक लिपि जी नागरी तिला पाठिंबा द्या असें सांगण्याची पाळी खऱ्या राष्ट्रवाद्यांवर आली आहे ! गेल्या प्रकरणांत दिलेल्या १५ मुद्द्यांच्या आधारानें या तिन्ही लिप्यांचें परीक्षण केलें असतां राष्ट्रलिपि कोणती याचा निर्णय करतां येईल.

रोमन लिपि

या लिपींत १, २, ३, ४, ५, ६, ११, १३, १४, आणि १५ हे गुण नाहींत. तिच्यांत केवळ पांचच गुण आहेत.

(१) निश्चितता नाहीं. अुदाहरणार्थ. c आणि ch चा अुच्चार क, च, श अि. होतो: Cat, chain, monarch, machine
D चा अुच्चार 'ड' किंवा 'द' अुदाहरणार्थ Daily, Mahamud
G चा अुच्चार God 'ग', Page 'ज'
A चा अच्चार, अ, आ, अे, अै, जसें America, table, man, about. इ. Hare हेअर, हरे. Thackore ठैकोर, ठैकोर, ठाकोर, ठकोरे, थैकौर, दैकौर अि. रीतीनें वाचतां येअील.

(२) R. A. M. आर. अेम. न होतां राम : म्हणजे वर्णाचा नि ध्वनीचा निश्चित संबंध ठरलेला नाहीं. हें वर दर्शिविलेच आहे.

(३) condemn न अनुच्चारित आहे.

(४) ङ., ञ, ण— , ळ. ड. ढ–– म्हणजे विदेशी ध्वनींना लिहिण्यांसाठीं या लिपींत संकेत नाहींत.

(५) f = म्हणजे f, ough, Ph. अि.

द = th, d.

क = c, k, q, ch, ck अि.

(६) रोमन लिपि वाचण्यास सोपी नि सरळ नाहीं. कारण स्पेलिंग-प्रमाणें शब्दाचा अुच्चार होतोच असें नाहीं. शिवाय या लिपीचीं चार वळणें आहेत–दोन छापण्यासाठीं नि दोन हातानें लिहिण्यासाठीं प्रयुक्त आहेत. कॅपिटल अक्षर काढण्याची रीतहि त्रासदायक आहे. २६+४=१०४ अितकीं वर्णचिन्हें शिकावीं लागतात. नागरींत ५६ अक्षरांनीं काम भागते.

(७) सौंदर्य – योजकाच्या अिच्छेवर हा गुण अवलंबून आहे.

(८) आहे.

या लिपीचें वैशिष्टय

९, १० हे गुण रोमन लिपींत पूर्णत्वानें आहेत. मुद्रणसुलभता आणि यंत्रें यांचें पाठबळ या लिपीस असून, या गुणांवर लुब्ध होअूनच ही लिपि राष्ट्रलिपि करावी असें कांहीं जणांकडून सांगितलें जातें.

(११) हा गुण रोमन लिपींत नाहीं.

(१२) भारतवर्षांतील सर्व प्रांतांतील पंडितमंडळींत प्रसार आहे, पण बहुसंख्याक लोकांस ती येत नाहीं.

(१३) भारतीय साहित्य या लिपींत नाहीं.

(१४) वर्णमाला किंवा लिपिचिन्ह यांत कोणत्याही प्रांतीय भाषांच्या लिपीशीं किंवा अुर्दूशींही साम्य नाहीं.

(१५) नाहीं.

रोमन लिपीचे गुण दिखाअू :
ते खरे गुण नव्हेत.

९, १० गुणाखेरीज रोमन लिपीच्या पुरस्कर्त्यांकडून असें सांगितलें जातें कीं, ही राष्ट्रलिपि झाल्यास सुधारलेल्या जगाचा फायदा आपणांस मिळेल, कारण युरोपखंडांत सर्वत्र ती प्रचलित आहे. पण ही विचारसरणी तितकीशी खरी नाहीं. कारण अेकाच वर्णाचा अुच्चार युरोपांतील भाषांत भिन्न केला जातो. अुदाहरणार्थ kind–अिंग्रजींत काअिन्ड; परंतु हाच शब्द असा लिहिला असता जर्मन

भाषेंत त्याचा अुच्चार 'कित' असा होतो. तसेंच knife नाअिफ् अिंग्रजींत; जर्मनमध्यें क्निफे, असें वाचतात. Paris चा अुच्चार अिंग्रजींत पॅरीस, पण फ्रेंच भाषेंत पेरी असा आहे.

लिपीचें अेकत्व केवळ अक्षराच्या बाह्य वळणावरून ठरवितां येणार नाहीं. अेकाच चिन्हाचा अुच्चार भिन्न भिन्न भाषांत वेगळा होत असेल तर ती लिपि भिन्नच आहे असें म्हटलें पाहिजे. रोमन लिपींत लिहिलेली हिन्दी ही, अिंग्लिश, फ्रेंच, जर्मन या भाषा बोलणाऱ्यांकडून निरनिराळ्या रीतीनें वाचली जाअील. असल्या अर्धवट लिपिसाम्याचा अुपयोग काय? फार तर या रोमन टाअिपाचीं यंत्रें सर्वत्र अेक राहूं शकतील. पण यंत्रें ही आपल्या सोयीसाठीं असतात, यंत्रांच्या सोयी-नुसार माणसांनीं वागण्याचें कारण नाहीं.या यांत्रिक सोयीसाठीं,आपली प्राचीन लिपि व प्राचीन नि अर्वाचीन हजारों ग्रंथ ज्यांत आज ग्रथित झाले आहेत ती वैज्ञानिक लिपि सोडून,रोमन लिपि स्वीकारण्यांत शहाणपणाही नाहीं नि मनुष्यत्त्वही नाहीं. आपली अकर्मण्यता आणि अुदासीनता मात्र व्यक्त होअील. चाळीस कोटी लोकांची जी राष्ट्र-भाषा तिला आपली लिपि यंत्रासिद्ध करतां येणार नाहीं काय? आजच या दिशेनें नागरी लिपीनें पुष्कळ प्रगति केली आहे.

रोमन लिपीचा आणखी अेक फायदा असा सांगितला जातो कीं, या लिपींत शब्दलेखन केल्यानें त्याला जागा कमी लागते. पण हेंही तितकेंसें खरें नाहीं. अलहाबादचे विज्ञानपंडित डॉ. सत्यप्रकाश यांनीं हिंदी प्रचार समाचार (मद्रास) मासिकांतील अेका लेखांत हें सिद्ध केलें आहे. सत्यप्रकाश = ८ खिळे नागरींत आणि satyprakash १३ खिळे रोमन लिपींत लागतात. अुलट अिंग्रजी वाक्य मात्र नागरींत लिहिलें तर जागा कमी लागते:

I shall not come tommrrow.

आय् शॅल् नॉट कम् टुमारो.

संस्कृत शब्दांस ही लिपि अयोग्य

हे संस्कृत शब्द रोमन लिपींत लिहिण्यानें त्याचें काय हाल होतात

हे श्री. सन्तराम या लेखकांनीं चांगलें दाखविलें आहे. त्यांतील कांहीं अुदाहरणें पुढें देतो.

रोमनलिपींत लिहिल्यानें झालेले अुच्चार*	शुद्ध अुच्चार	रोमनलिपींत लिहिल्यानें झालेले अुच्चार	शुद्ध अुच्चार
बरार	वऱ्हाड	हरप्पा	हडप्पा
सतारा	सातारा	आन्ध्रा	आन्ध्र
येरवदा	येरवडा	गोखेल	गोखले
वार्धा	वर्धा	हार्डवेअर	हरद्वार
आंबेडकार	आंबेडकर	लॉर्ड बुढ्ढा	बुद्ध
टेक्सील	तक्षशिला	दयानन्डा	दयानन्द
अुट्कल	अुत्कल	मुरेडाबाद	मुरादाबाद

दक्षिण भारतांतील नांवांची स्थिति फारच विचित्र आहे:

टिनिवेल्ली—खरें नांव तिरूनेलव़ेली (तिरू—सुंदर किंवा श्री; नेल—धान्य; वेली—घेरा. या नगराच्या सभोंवार धान्याचीं शेतें आहेत)

ट्रिचिनापल्ली—मूळ नांव त्रिशिरापल्ली (त्रि—तीन; त्रिशिरस नांवाचा राक्षस; पल्ली—स्थान. याचा वध येथें झाला)

अुटकमान्ड—म्हणजे अुटी—अुदकमन्डल

त्रिवेंद्रम्—अर्थात् तिरुअनन्तपुरम् (श्रीशेषशायी भगवानाचें—अनन्ताचें नगर)

हीं नांवें भारतीय आहेत.तीं प्रांतीय भाषांत किंवा हिन्दींत येणारच. पण हे शब्द लिहिण्यास रोमनलिपि असमर्थ आहे. सहाजिकच हिन्दी आणि प्रांतिय भाषांस ती अुपयुक्त नाहीं. असें संस्कृत किंव देशज शब्द लिहिण्यासाठीं जर रोमनलिपीला खालीवर खुणा करून 'फोनेटिक स्क्रिप्ट' बनवावयाची तर त्यापेक्षां स्वभावसिद्ध नागरी लिपीच हिन्दी भाषेस वापरणें हितावह नाहीं काय?

राजाश्रय असला म्हणून काय झालें?

सेना विभागांत रोमन लिपींत अुर्दू किंवा हिन्दी लिहिले जातें. कारण अिंग्रज अधिकाऱ्यांची सोय त्यांत आहे. याचें ज्ञान सैनिकांस

* 'भारतमें रोमन लिपिका लीला' —सरस्वति, जुलाअी १९४२.

अनिवार्य केल्यानें या युद्धकाळांत तिचा प्रसारही झाला आहे. पण केवळ राजाश्रय लाभला म्हणून अिंग्रजी राष्ट्रभाषा होअू शकली नाहीं. तर त्याचप्रमाणें रोमनलिपि तरी राष्ट्रलिपि कशी होणार? या सैनिकांतही मुळांत जे थोडे शिकलेले होते त्यांना त्यांची मातृभाषेची लिपि येतच होती. जे अशिक्षित रोमनलिपि शिकले त्यांना नागरी लिपि शिकण्यास, रोमन लिपि शिकतांना लागला असेल त्याच्या $\frac{१}{४}$ ही वेळ लागणार नाहीं!

* * *

फारसी (उर्दू) लिपि

अुर्दू भाषेखेरीज आपल्या देशांत प्रांतीय भाषांच्या ज्या लिप्या आहेत त्यांच्यांत पुष्कळ समानता आहेत. मराठी–हिंदी–गुजराथी–बंगाली यांची लिपिचिन्हें कांहीं अंशीं अेकच आहेत. कानडी-तेलगू आदि भाषांच्या लिप्या नि नागरीलिपीची वर्णमाला म्हणजे अ-आ ते ज्ञपर्यंतचीं अक्षरें नि बाराखड्यांची पद्धति–अेकच आहे. तामीलमध्यें अक्षरें कमी आहेत पण जी आहेत त्यांचे वर्ण नागरीलिपींतीलच आहेत. परंतु अर्दूभाषेची जी फारसी लिपि ती या सर्वांपासून अगदां भिन्न आहे. वर्णमालेंतहि साम्य नाहीं. लिहिण्याची पद्धतीहि अुजवीकडून डावीकडे ! शास्त्रीय गुणांच्या दृष्टीनेंहि लिपि अगदींच निकृष्ट. प्रारंभी दिलेल्या गुणापैकीं तिसरा, कांहीं अंशीं सातवा, बारावा नि तेरावा अेवढे चारच गुण या लिपींत आहेत. क्रमानें त्यांचें वर्णन करतो.

१. अुच्चाराचा निश्चितपणा नाहीं. जो अुच्चार मनांत धरून लेखकानें शब्द लिहिला असेल तसाच तो वाचकास वाचतां आला पाहिजे. फारसी लिपींत या गुणाचा अभाव आहे. कतब हा अरबी शब्द 'कुतब' 'कुतुब' किंवा 'कतब' अशा पुष्कळ तऱ्हांनीं वाचतां येतो.० या वाचण्यानें अर्थाचाहि घोंटाळा होतो. या लिपींत संस्कृत शब्द लिहिल्यानें ज्ञानवान् वाचकांचा कसा गोंधळ होतो याची माहिती पांचव्या प्रकरणांत दिली आहे. डॉ.रघुवीर यांनीं पुढील सुंदर उदाहरण दिलें आहे. अुर्दूंत गायत्रीमंत्र लिहून तो वाचल्यानें 'दही मही'

० हिन्दी-अर्दू–हिंदुस्तानी, पृ. ७३.

असा (र्धा महीच्या अैवजीं) वाचला जातो. (लॅंग्वेज् प्रॉब्लेम ऑफ् अिंडिया पृ.४)

(२) हा गुण फारसी लिपींत नाहीं. मीम्, लाम्, सीन्, हे वाचतांना अक्षरांच्या नांवांप्रमाणें वाचण्याची पद्धति नसून 'म' 'ल' आणि 'स' या अुच्चारांच्या वर्गाचे द्योतक असे हे वर्ण होत .

(३) हा गुण आहे.

(४) भारतीय भाषांतील आवश्यक ध्वनि लिहिण्याची पात्रता या लिपींत नाहीं. प्रत्यक्ष, अिंद्रिय, यासारखे जोडाक्षरांनीं युक्त शब्द या लिपींत लिहितां येत नाहींत, त्यामुळें कर्म, क्रम, करम यांची अेकरूपता आहे आणि लेखकानें 'जेर' 'जबर', 'पेश' हीं चिन्हें लाविलीं नाहींत तर (शेंकडा ९९ लेखक ही लावीत नाहींत) किम, कुमी या सर्वांचा बोध त्याच अक्षरांनीं होतो[१].

(५) या लिपींत अेकाच ध्वनीला अनेक लिपि-चिन्हें आहेत. स्वाद, सीन आणि से या वर्णांचा 'सा', ज्वाल आणि ज्वाद यांचा ज, हे आणि चष्मेवाला हे यांचा अुच्चारहि असा होतो.

(६) या लिपींतील 'शोशे' लिहितां-वाचतांना फार अवघड जातें. यामुळें सोपेपण हा गुण या लिपींत नाहीं.

(७) हा गुण विवाद्य आहे.

(८) अुर्दू लिहिण्यास कमी वेळ लागतो असें सांगितलें जातें; परंतु ही कल्पना चुकीची आहे असें कांहीं मुसलमान अुर्दू विद्वानांचेंच म्हणणें आहे. [२]

(९) मुद्रण क्षेत्रांत ही लिपी फारच मागासलेली आहे. अलीकडे हैद्राबाद संस्थानकडून कांहीं प्रगती केली जात आहे.

(१०) या लिपीचा टाअीपरायटरसुद्धां नाहीं. मग मोनोटाअीप, लायनोटाअीप, किंवा टेलिप्रिंटरची गोष्टच काढावयास नको!

---

१. डॉ. बाबूराम सक्सेना—साप्ताहिक 'सारथी' १३ जोलाअी १९४२.

२. महाराष्ट्राच्या हिं. सा. संम्मेलन विशेष अंकांत पृ. ३९ वर 'मुल्क की जबान और फाजिल मुसलमान' या पुस्तकांतील उतारे वाचा.

वरील ९, १० हे दोन गुण रोमन लिपीचे वैशिष्टयदर्शक आहेत. नागरी लिपींतहि शें. साठ टक्के हे गुण आतां आलेले आहेत. फारसी लिपींत हे गुण कधीं काळीं येऊं शकतील असें वाटत नाहीं. असें असतां अुर्दूला राष्ट्रलिपि करावी असा आग्रह चांगल्या चांगल्या पुढाऱ्यांकडून होतो याचें आश्चर्य वाटतें.

(११) राष्ट्रलिपि ही भारतीयच असली पाहिजे. अेकदां परकी लिपि आपण घ्यावयाचें ठरविलें कीं,परकीय भाषा राष्ट्रभाषा करण्याच्या रस्त्यास आपण लागलों असें होअील. जर ही अभारतीय फारसी लिपि—आपल्या देशांतील कांहीं थोडे लोक[1] त्या लिपींतून लिहितात म्हणून—जर राष्ट्र लिपि मानावयाची तर सर्व हिंदुस्थानभर जवळ जवळ त्याच प्रमाणांत किंबहुना जास्त प्रमाणांत रोमन लिपीचें ज्ञान[2] प्रचलित आहे; मग त्याच लिपीस राष्ट्रलिपि कां करूं नये ? फारसी लिपीमुळ आशिया खंडांतील मागासलेल्या मुस्लीम राष्ट्रांशीं[3]

---

१ डॉ. धीरेन्द्र वर्मा (नॅ. लँग्वेज फॉर अिंडिया—पृ. २६६) आणि हिं. सा. सम्मेलन (अबोहर अधिवेशन – प्रस्ताव :—"जो थोडेसे आदमियों मे सीमित है।",

२ हुमायून कबीर – नॅ. लँ. फॉर अिंडिया – पृ. २७९.

३ म्हणजे कोणतीं राष्ट्रें ? अिराण (आज ना अुद्यां तो ही लिपि सोडणारच), अरबस्तान, अिराक, सिरीया, पॅलेस्टाअिन, अिजिप्त ही राष्ट्रें. याच्यांत सामर्थ्य आहे कीं त्यांची लोकसंख्या अधिक आहे ? निर्जीव राष्ट्रांची मैत्री करण्यासाठीं निर्जीव लिपि शिकण्याचा आग्रह ! आपल्या देशांत असलेली फारसी लिपि टाकून केमालपाशानें रोमन लिपीचा पुरस्कार केला. याचें कारण फारसी लिपि ही स्वदेशांतील व्यवहारालाही अयोग्य असल्याचें त्यानें पाहिलें. नागरीसारखी लिपि त्याजवळ असती तर त्यानें असें खास केलें नसते ! केवळ परराष्ट्रीय व्यवहार सुलभ व्हावा म्हणून स्वदेशी लिपि टाकण्याअितका तो खुळा नव्हता! इराणांतून सुद्धां या फारसी लिपींत २४ दोष असल्यानें तिचें अुच्चाटन करून दुसरी कोठली तरी लिपि किंवा अवेस्ताची लिपि नव्या फारसी भाषेस घेण्याचा यत्न चालू आहे." यासंबंधी हिं. अु. हिंदुस्तानी

(टीप पुढील पानावर पहा)

मैत्री जडविणें सोपें जाईल असें म्हणून अुर्दूची बाजू घेणाऱ्या आचार्य-महामहोपाध्यायांना जगांतील बलाढ्य राष्ट्रांशीं मैत्री करविणारी रोमन लिपि (आशियांतील रशियासारख्या कोटद्यावधि लोक-संख्येच्या राष्ट्राशींही)हीच राष्ट्रलिपि म्हणून स्वीकार्य वाटली पाहिजे!

(१२) पंजाब, संयुक्तप्रांत,हैद्राबाद संस्थान या प्रांतांतील कांहीं विद्वान् मंडळीं या लिपीशीं पूर्वपरिचित आहेत, परंतु या प्रांताबाहेर या लिपीचा प्रचार नाहीं. रोमन लिपीचा प्रचार सर्व भारतभर विद्वानां-मध्यें तरी आहे.

(१३) कुराण-अे-शरीफ, या लिपींत लिहिलेलें आहे, यामुळें अिस्लामधर्मीयांना फारसी लिपीविषयीं आपलेपणा वाटणें स्वाभाविक आहे; परंतु केवळ अेवढ्याच गुणावर मुसलमानेतरांनीं अनिवार्य-रूपानें ती लिपि शिकावी असें म्हणणें असमर्थनीय आहे. प्रत्येक प्रांतांतील भाषा आणि तिची लिपि तत्प्रांतीय साक्षर मुसलमान जाणतो. त्यांस नागरी लिपि परकीय नाहीं, पण तेथील बहुसंख्य अशा मुसल-मानेतरांना फारसी लिपि मुळींच येत नसते.

(१४) वर्णमाला प्रांतीय भाषांच्या लिपीशीं जुळती नाहीं, त्यामुळें तिच्याबद्दलची आत्मीयता अितर भाषियांना वाटत नाहीं. राष्ट्र-लिपीच्या दृष्टीनें या आत्मियतेची तर अत्यंत आवश्यकता आहे.

(१५) हा गुण या लिपींत नाहीं.

फारसी लिपीच्या या दोषांची जाणीव अनेकमुसलमानांना आहे. त्यांत सुधारणा करण्याचा यत्न अंजमन-अे-तरक्की अुर्दू याकरवीं चालू आहे. पण मूळचे दोष या तात्पुरत्या सुधारणांनीं कसें जाणार ?

(टीप मागील पानावरून)

(१९३२) या पुस्तकांत प्रिन्स मिर्जा मलकनखां अजिमुद्दौला यांच्या 'कुल्लियाते-मलकम' या पुस्तकांतील आधार दिला असून इ. स. १९०७ पासून ही चळवळ सुरू आहे. कु. म. हें पुस्तक अि.स. १९०७ मध्यें प्रसिद्ध झालें. तसेंच अि.आर्यन अॅण्ड हिंदी प.२०७.सोव्हियट रशियांतील तुर्की भाषांनीं रोमन लिपीचाच स्वीकार केला आहे. अु. अुजबकिस्तान (हंस, ऑगस्ट १९४७)

मुल्क की जबान और फाजिल मुसलमानोंकी राय' या ग्रंथांत किती तरी विद्वान् मुसलमानांनीं देवनागरीचें श्रेष्ठत्व मान्य करून असें सांगितलें आहे कीं, 'मुसलमान शिक्षित व्हावयास पाहिजे असतील तर नागरी लिपीचा स्वीकार अिष्ट होय.' जे विद्वान् मुसलमानांनाहीं प्रसंगीं कळतें ते श्रेष्ठपदस्थ हिंदूंना कळत नाहीं हें राष्ट्राचें दुर्दैव होय.

असें असतां सांप्रदायिक हट्टानें मुस्लीमलीगसारख्या संस्थांनीं फारसी लिपीचें कोडकौतुक करावें आणि त्यांच्या सांत्वनार्थ ही लिपि शिकण्याचा आग्रह नि प्रचार, गांधीजी आणि त्यांची हिंदुस्तानी प्रचारसभा यांनीं चालवावा हें खेदकारक आहे ! राजकारणांत पाकिस्तान मिळूनही जसें या जात्यंधांचे समाधान झालें नाहीं तसेंच (नागरी लिपीला टाकून देअून) केवळ फारसी लिपीला राष्ट्रलिपीचें पद (आणि अुर्दूला राष्ट्रभाषापद) मिळाल्याशिवाय त्यांचें सांत्वन होणार नाहीं. गांधीजी–कालेलकर हे फारसी लिपीला राष्ट्रलिपि म्हणजे राष्ट्रभाषेची लिपि करा असें म्हणतांना नागरी लिपीलाहिं† तें स्थान देतात. हे या जात्यंधाना मुळींच मान्य नाहीं. परंतु गांधीजींहि "दोन्ही लिप्या शिका" असें म्हणतात. तेव्हां नागरीसारखा सर्व गुणी लिपीच्या योग्यतेस 'सर्वदोषी' फारसी लिपीला आणून ते बसवितात म्हणून आश्चर्य वाटतें. यामुळें अेकच राष्ट्रलिपि असावी या मुद्दयालाहि बाध येतो. दोन लिप्यांना जर राष्ट्रलिप्या म्हणून मान्यता द्यावयाची तर हिन्दी आणि अुर्दू या दोन भाषांना स्वतंत्रपणें राष्ट्रभाषा म्हणून माना असें अेखाद्यानें सुचविल्यास त्यांत काय वावगें आहे? * दोन्ही भाषांची खिचडी करून जर हिंदुस्तानी तयार करावयाची तर दोन्ही लिप्यांची खिचडी लिपि बनवून तिला राष्ट्र-लिपि कां मानूं नये? जर हें अशक्य आणि अव्यवहार्य असेल तर

† तथाकथित राष्ट्रीय मुसलमानांस ही गोष्ट सम्मत नाहीं. श्री. हुमायून कबीर (नॅ.लॅ. फा. अिंडिया पृ. २२५).

* सज्जद जहीर–नया साहित्य, भाग. तीन, पृ. ५२ वर हीच सूचना केली आहे : भारत की 'राष्ट्रभाषा' हिंदी और अुर्दु हो। जिसका जो जीं चाहे सो भाषा सीखे !

भाषेची खिचडी करण्याचा प्रयत्न हास्यास्पद नाहीं काय ? जर कां अेक़दां 'अेकभाषा आणि अेकलिपि' यांतील अेकाहि गोष्टीचा आग्रह आपण सोडला तर त्यांच्या संख्येला सीमा राहणार नाहीं. नागरी आणि फारसीच्या जोडीला रोमन लिपि कां घेत नाहीं असें आतांच कांहींजण म्हणूं लागले आहेत! [1]ही लिपि फारसीपेक्षां गुणांत आणि प्रचारांत (सर्व देशभर आणि सैन्यांत) अधिक आहे. या पायरीवर अुतरल्यानंतर ५॥–६ कोटी लोकांची समृद्ध भाषा बंगालीसहि राष्ट्रभाषा-राष्ट्रलिपीचें स्थान कां नको ? निदान लिपीच्या बाबतींत कोठल्याहि लिपींतून राष्ट्रभाषा लिहिली तरी चालेल असें म्हणण्याचा प्रसंग येईल ! [2] म्हणजे पुन: अनेक लिप्या आणि अनेक भाषा यांचा आजच्याप्रमाणें सुकाळ होअील आणि राष्ट्रभाषा आंदोलनाचें सर्वच मुसळ केरांत जाअील !

---

१ Times of India ३०-१-४७स्फुटIt should not matter whether that common language is written in one script or two or even three scripts.

२ गांधीजी तसें म्हणूंहि लागले आहेत. राष्ट्रभाषाकी समस्या और हिंदुस्तानी आंदोलन पृ. १०७. –ले. रविशंकर शुक्ल. गांधीजी म्हणतात : 'भलेहि हमेशा के लिये दो लिपियाँ रहें, या दोनोंको छोडकर हरअेक प्रांत अपनी-अपनी लिपिमें राष्ट्रभाषा लिखने लगे, तो भी कोअी हर्ज नहीं, मगर जबान तो एक हो जानी चाहिये'

बालबोध लिपि

देवनागरी अथवा नागरी लिपि म्हणजे आपली मराठी भाषा ज्या लिपींत लिहितो ती **बालबोध** लिपि होय. प्रत्यक्ष अर्थानें बालांनाही जिचा बोध लवकर होअू शकतो ती हीच लिपि होय. मराठीखेरीज संस्कृत, हिन्दी, पर्वतिया, या भाषा आज याच लिपींत लिहिल्या जातात.

भाषेच्या अुच्चारानुसारी लिपि

लिपि आणि भाषा यांचा संबंध शरीर आणि मांस यांच्या अितक अभिन्न नाहीं, परंतु सामान्यत: ती भाषा बोलणाऱ्या लोकांचे अुच्चार लिहिण्याची क्षमता त्या भाषेच्या प्रयुक्त लिपींत असते. लिपींतच कांहीं अुणीव असेल तर कालांतरानें जे नवे शब्द त्या भाषेंत येतील त्यांचा अुच्चारही लिपीच्या अनुरोधानें होअू लागतो. रोमन लिपि आणि फारसी लिपि यांतून भारतीय विशेष नामें लिहिण्यानें त्यांचे मूळ उच्चार कसें बदलले याची उदाहरणें मागील प्रकरणांत दिलीं आहेत. हे बदललेले अुच्चार पुढें रूढ होअून बसतात. या दृष्टीनें विचार करतां लिपि आणि भाषा यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे हें दिसून येअील. अिंग्रजी लिपींतून मराठी किंवा नागरी लिपींतून इंग्रजी लिहितां येअील-पण वाचतांना कानाला ते अुच्चार बरोबर वाटणार नाहींत. नागरी लिपि ही अुच्चारानुसारी लेखन असल्यानें तिच्यांत कोणतीही भाषा लिहिली तरी फारशी अुणीव आढळणार नाहीं, * तरीही प्रत्येक लिपीचें कांहीं वैशिष्ट्य असतेंच; कीं जे त्या लिपींत लिहिल्या जाणाऱ्या भाषेंतील अुच्चारांना युक्त असें असते.

---

१ 'नागरी हे सर्व गुणांचे आगर होय.' वरील शद्वसमुदाय पं. पराडकर, सभापति, हिं. सा. सम्मेलन यांनी सिमला अधिवेशनांत आपल्या भाषणांत वापरला आहे.

* नागरी लिपींतून अिंग्रजी प्रारंभी शिकवावें असा म्हणणारा अक वर्ग महाराष्ट्रांत आहे.

राष्ट्रभाषेची लिपि

वस्तुतः हिंदी ही राष्ट्रभाषा असल्यानें तिची लिपि हीच राष्ट्रलिपि होणें स्वाभाविक आहे. तिची योग्यताही तशी आहे. हिंदी भाषेच्या स्वरूपाविषयीं काथ्याकूट करणारांनीं फारसी लिपीस हें स्थान देण्याचा यत्न चालू केला आहे हें देशाचें दुर्दैव होय. नागरी लिपि ही सर्वांगपूर्ण आहे.

अनेक गुणांनीं युक्त

निश्चितपणा, उच्चाराप्रमाणें लेखन, अनुच्चारित अक्षरांचा अभाव, भारतीय ध्वनींना आवश्यक चिन्हें असणें, अेका ध्वनीला अनेक चिन्हें नसणें, वाचण्यास सुलभ, दिसण्यांत सुंदर; कांहीं अंशी त्वरा लेखन व मुद्रणसुलभता हे गुण या लिपींत आहेत. शेवटच्या तीन गुणांचें स्पष्टीकरण करावयास पाहिजे.

शिरोरेखा न लिहिल्या तर त्वरालेखनही या लिपींत करतां येतें. विशेष त्वरालेखन करणें झाल्यास सर्वच भाषांना लघुलिपीचा आश्रय घ्यावा लागतो.

जुळणी यंत्राचे शोध

नागरी लिपीचे जुळणीचें काम करण्यांत अलीकडे ' अखंड पद्धति ' निघाल्यानें सुकरता येअू लागली आहे, त्याचप्रमाणें ' संयुक्ताक्षरें ' लेखनाची नवी रीतही या दष्टीनें अुपयुक्त आहे. याच गुणाचा दुसरा भाग म्हणजे यांत्रिक रीतीनें जुळणी करतां येणें. या क्षेत्रांतही अलीकडे नागरीलिपीच्या अभिमान्यांनीं प्रगति केली आहे. दैनिक 'काळ'चे संपादक, मुद्रणकलानिधि श्री. शं. रा. दाते यांनीं १९३२ सालीं 'मोनो मशिनवर' नागरी लिपीचें काम करण्याची कला अिंग्लंडमध्यें जाअून शोधून काढली. 'नागरी जुळणी' करणारी अेकटंक यंत्रें (मोनो यंत्रें) आतां हिंदुस्थानांत बरीच आहेत. याच सुमारास बंगालमधील श्री. हरीजी गोविल यांनीं पंक्तिटंकावर (लायनो टाअिपवर) नागरी लिपि बसविली. तीही यंत्रें आपल्या देशांत कांहीं ठिकाणीं आहेत. यांत आणखी शोध चालू आहेतच. अगदीं अलीकडे दूरमुद्रक (टेलीप्रिंटरवर) किंवा तारछाप यंत्रावर नागरीची जुळणी करण्याचा

शोध अमेरिकेंत लागला आहे. हें कार्य सौ. श्री. सरलादेवी मिश्र (पाटणा) यांनीं केलें हें विशेष अुल्लेखनीय आहे. टंक लेखनयंत्रें (टाअिपरायटर) नागरींत आहेत, त्यांतही द्रुतगति करणारा शोध 'मोनो नागरीचे' संशोधक श्री. दाते यांनीं नुकताच लाविला असून तसें अेक यंत्र दै. 'काळ' कार्यालयांत त्यांनीं पाहण्यासाठीं ठेविलें होते.[१] या सर्वांवरून अेक निष्कर्ष निघतो कीं यत्न केल्यास हा गुण आपल्या लिपींत पूर्णत्वानेंही लवकरच येअील.

लिपीनुसार यंत्रें कां यंत्रानुसार लिपि

रोमनलिपिच्या अितकी सोपी जुळणी नागरीलिपींत करतां येत नाहीं म्हणून रोमन लिपीचा स्वीकार करा म्हणणाऱ्यांना अलाहाबाद विद्यापीठांतील प्रा. डॉ. धीरेंद्रवर्मा यांनी योग्य अुत्तर दिलें आहे. "अेकादा सूट विकत घेतल्यानंतर मालकाच्या अंगीं तो येत नाहीं म्हणून त्या मालकाच्या शरीरांतच कांहीं कमी-जास्त करा असें दुकानदारानें सुचविणें हें जितके विचित्र तितकेंच 'यांत्रिक सोयी नाहींत' म्हणून दुसरी लिपि स्वीकारा हें म्हणणें होय."[२]

रोमनलिपींतही पूर्वीं यंत्रें नव्हती, आणि ती नव्हती तेव्हांही किंवा आजही ती लिपि अपूर्ण नि अशास्त्रीय आहे म्हणून[३] या लिपीचा त्याग करण्याची सूचना कोणी पाश्चात्यांनीं केलेली नाहीं! नागरीची सुधारणा करण्याची खटपट न करतां तिला नांवें ठेवणें हें स्वाभिमानास मारक नव्हे काय?[२] वर दिलेल्या माहितीवरून जुळणींतही क्रांतिकारक शोध लागूं पहात आहेत, हीं आशादायक चिन्हें आहेत.

भारतीयत्व

आणखी पांच गुणाविषयीं फारशा विवेचनाची आवश्यकता नाहीं. स्वदेशीपणाचा गुण या लिपींत विशेष प्रकर्षानें आहे. अत्यन्त प्राचीन ब्राह्मी लिपीची सुसंस्कृत आवृत्ति म्हणजे नागरी लिपि. इतिहासाला ज्ञान असलेल्या कालापासून संस्कृत, अर्धमागधी पाली या मध्यदेशीय

---

१. दै. काळ. रविवार दि. २–२–४७.

२. नॅ. लॅं. फॉ. अिंडिया, पृ. २७५.

३. मागे वर्णिलेले दोष, चार प्रकारच्या लिप्या, कॅपिटलपद्धति अि.

भाषांची हीच लिपि आहे. प्राचीन, सांस्कृतिक आणि धार्मिक वाङ्मय याच नागरींत लिपिबद्ध आहे. संस्कृत भाषेची लिपि म्हणून कन्याकुमारीपासून ते थेट काश्मीरपर्यंत आणि विदेशांतही हिचा प्रचार आज आहे.* यामुळें पंडित मंडळींत सर्व देशभर हिंदीभाषी प्रांत आणि महाराष्ट्रांत ही लिपि ज्ञात आहे.

प्रांतीय भाषांची हीच वर्णमाला

चौदावा गुण या लिपीखेरीज अितर कोणाच्या वाट्यास आलेला नाहीं. मराठी, गुजराथी (कांहीं फरकानें) या प्रांतिक भाषांची हीच लिपि आहे. अुर्दूखेरीज सर्व भारतीय लिप्यांची वर्णमाला म्हणजे— अ, आ, इ, हे स्वर, क पासून ज्ञ पर्यंतची अक्षरें आणि बाराखडीची पद्धति—अेकच आहे. रोमन लिपींत जशी चार प्रकारांनीं अे, बी. सी. डी. (A a *A a*) ही अक्षरें लिहितात तद्वतच प्रांतिक लिप्याचें वर्ण अेकच पण अक्षरचिन्ह निराळें. यामुळें सर्व प्रांतिक भाषा नागरी लिपींत लिहितां येतात आणि हिंदी, संस्कृत, मराठी याही कानडी आदि लिपींत सहज लिहितां येतात. रोमन किंवा फारसी लिपींत या भाषा लिहिल्या तर शब्दांची जशी अुच्चारहानि होतें, तसें नागरींत होत नाहीं. कै. न्यायमूर्ती शारदाचरण मित्र यांनीं ' अेक लिपि विस्तार परिषद ' स्थापून तिच्या करवीं ' देवनागर ' नांवाचें वृत्तपत्र चालविलें होते. त्यांत बंगला, गुजराती, मराठी, नेपाळी, तेलगु, अुडिया, मलयालम् कानडी, तामिल, सिन्धी, पंजाबी, अुर्दू, हिन्दी या भाषांतील लेख नागरी लिपींत छापीत.† खांडवा येथील ' स्वराज्य ' या साप्ताहिकानें कांहीं वर्षे वरीलप्रमाणें प्रचार चालू ठेवला होता.

पंधरावा गुण या लिपींत आहे हें पुनर्घोषित करण्याचे कारण नाहीं.

आशिया संघटनास हीच वर्णमाला अुपयुक्त

या लिपीचा प्रचार हिंदुस्थानाबाहेरही आहे. ब्रह्मदेश, सयाम,

---

* क्वचित् संस्कृत ग्रंथ बंगाली अथवा रोमन लिपींत छापलेले आढळतात. कलकत्ता विद्यापीठांतील मॅट्रिक परीक्षेचा संस्कृत प्रश्नपत्र बंगालींत लिहिला तरी चालतो.

† हिं. अु. हिं. पृ. ७२.

तिबेट आणि सिंहलद्वीप किंवा लंका या देशांतील लिप्यांची वर्णमाला नागरीच आहे अर्थात् आशियांतील आंतरराष्ट्रीय संघटनेस पाली-भाषेची ही नागरी वर्णमालाही अुपयोगी पडेल. या कारणासाठीं अुर्दू लिपीचा स्वीकार करा म्हणणाऱ्यांनीं कांहीं परिच्छेदानंतर अुल्लेखिलेलें डॉ. चतर्जींचें अुत्तर वाचावें.

नागरी लिपि ही शास्त्रीय–म्हणजे स्वरांचा क्रम, अेक अक्षराचा अेकच ध्वनि, बाराखड्यांची पद्धतिनें युक्त अशी–असल्यानें जगांतील कोणत्याही लिपीपेक्षां गुणांत श्रेष्ठ आहे. जगभर प्रवास केलेले विद्वान बौद्ध भिक्षू श्री. आनन्दजी कौसल्यायन म्हणतात, "शास्त्रीयत्व आणि आजचें प्रचलनाचें विस्तृत क्षेत्र या दृष्टीनें पाहतां देवनागरी हीच अेक अशी वर्णमाला आहे कीं जी भारताची राष्ट्रीय वर्णमाला मानतां येईल."[१] "हें सर्वमान्य आहे कीं नागरी वर्णमालेप्रमाणें सर्वांगपूर्ण आणि शास्त्रीय अशा दुसऱ्या वर्णमालेचा शोध अद्याप लागलेला नाहीं."[२].

प्रांतिक भाषेची पुस्तकें नागरींत छापा

नागरीची ही योग्यता ओळखून भारतवर्षभर शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना 'नागरी लिपि' हा आवश्यक विषय म्हणून ठेवावा अशी वीर सावरकरांची सूचना[३] अत्यंत समुचित आहे. प्रांतिक भाषांच्या लिप्या नष्ट करण्याचा अुद्देश या आग्रहांत नाहीं, अुलट परभाषियांना आपली भाषा वाचावयास लावण्याची सोय यामुळें होते. प्रांतिक भाषांची कांहीं पुस्तकें नागरी लिपींत छापली जाणें अिष्ट आहे. गांधीजींनी त्यांचें गुजराथी भाषेंतील आत्मचरित्र देवनागरी लिपींत छापलेले आहे. याचें अनुकरण झाल्यास त्या त्या प्रांतिक भाषेंतील सर्वोत्कृष्ट साहित्य रचना मूळ भाषेंतच अितर प्रांतीयांना वाचावयास मिळतील.

---

१. हिं. सा. सं. पत्रिका भाग ३०, संख्या १–२.

२. बा. वि. पराडकर, सभापति–भाषण, हिं. सा. संम्मेलन २७ वें अधिवेशन.

३. वीर सावरकर, अध्यक्षीय भाषण, हिंदूमहासभा, कलकत्ता, अि. स. १९४०.

सगळ्या पुस्तकांचा अनुवाद होणें अशक्य, कारण तें खर्चाचें नि जिकीरीचे आहे.

आत्मीयत्वाचा बोध होअील

या पद्धतीनें आणखी अेक लाभ होअील. हें प्रांतीय भाषांतील पण नागरी लिपींतील ग्रंथ वाचून सर्व प्रांतिक भाषा (अुर्दूखेरीज) संस्कृतनिष्ठ म्हणजे संस्कृतच्या आधारें तत्सम किंवा तद्भव शब्द वापरणाऱ्या आहेत हें अनेक सुशिक्षितांना कळून येअील. हिन्दी भाषा ही 'संस्कृतनिष्ठ' असें म्हणतांच ते दचकणार नाहींत, उलट आपली मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि शेजारील प्रांतांची भाषा या सर्वांचें शब्दमय शरीर अेकच आहे हें पाहून हिंदीबद्दल त्यांचा आदर वाढेल. या सर्व भाषांत भारतीयत्वाची[१] ज्योत तळपत असून भारतीयांचें विचारमन (ते कोठल्याही प्रांतांतले असले तरी) अेकच आहे हें पाहून भारतवर्षाबद्दल अधिक प्रेम वाटूं लागेल. अशा रीतीनें भारताचें अखंडत्व या सर्व भाषामध्यें विद्यमान आहे याचा त्यांना बोध होअील.

अेक लिपीची शक्यता

या प्रश्नाबद्दल म. गांधींचें मत पुढीलप्रमाण आहे.—"संस्कृतोत्पन्न किंवा संस्कृतशीं संबंध असलेल्या परंतु भिन्न भिन्न लिपींत लिहिल्या जाणाऱ्या भाषांना अेक लिपि असली पाहिजे आणि ती निःसंदेह देवनागरीचहोय. युरोप अेकराष्ट्र नसतांही युरोपनें सामान्यलिपीचा पुरस्कार केला आहे. हिंदुस्थान तर अेक राष्ट्र आहे. मग त्याची लिपि अेक कां नसावी ? मला माहीत आहे कीं अेकच भाषेला देवनागरी आणि अुर्दू अशा दोन लिप्या ठेवा (या माझ्या विचाराशीं हें माझें) म्हणणें विसंगत आहे; ....परंतु सध्यांच्या स्थितींत हिंदु-मुसलमानांत संघर्ष आहे म्हणून अेकमेकांनीं दुसऱ्याबद्दल अधिक आदर आणि सहिष्णुता दाखविणें जरूर आहे. भाग्याची गोष्ट ही कीं प्रांताप्रांतांमध्यें संघर्ष नाहीं, म्हणून अशी सुधारणा झाल्यास अनेक दिशांनीं प्रांतांचा स्नेहसंबंध वाढेल. म्हणून अेक लिपीचा पाठपुरावा मी करतों.

---

१. प्रकरण चार, पृष्ठ २१ पहा.

आपल्या देशांत शकडा ९० लोक निरक्षर आहेत. भिन्नभिन्न लिप्यांचें ओझे त्यांजवर लादणें योग्य होणार नाहीं.

अशी सामान्य लिपि देवनागरी हीच होअू शकेल. तिच्याशीं प्रतिस्पर्धी म्हणन अुर्दूचें नांव घेतलें जातें, परंतु अुर्दू किंवा रोमन या लिप्यांमध्यें देवनागरी अितकी संपूर्णता आणि ध्वन्यात्मक शक्ति नाहीं.[1]

नागरी म्हणजे जागतिक लिपि

देवनागरीची प्रशंसा केवळ आपण भारतीयच करतों असें नाहीं तर परदेशी विद्वानसुद्धां करतात. अेक-लिपि-विस्तार-परिषदेचे अेक अिंग्रज अुपाध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले कीं, "देवनागरी लिपीचा प्रचार साऱ्या जगांत झाला पाहिजे. कारण या लिपीअितकी सर्वांगपूर्ण दुसरी लिपि नाहीं." त्याच परिषदेचे अेक मुसलमान अुपाध्यक्ष न्या. शरफुद्दीन (कलकत्ता हायकोर्ट) म्हणाले कीं 'हिंदुस्थानांत मुसलमानांचें कुराणशरीफसुद्धां देवनागरींत छापविलें पाहिजे[2]' 'तमदुनें हिन्द'चे लेखक शम्सुल अुलमा जनाब मौलवी सय्यदअली साहेब 'बिलग्रामी' यांनीं अुर्दूलिपीचे अनेक दोष दाखवून यामुळें मुसलमानांमध्यें शिक्षणाचा प्रसार होअू शकला नाहीं असें सांगितलें; आणि आर्य लिपीचे गुण गाअिले आहेत.[3]

फारसी लिपि वैकल्पिकही नको

राष्ट्रलिपीबद्दल डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांचें मत विशेष अुल्लेखनीय आहे : अुर्दू किंवा फारसी लिपीचा संबंध केवळ अुर्दू भाषेशीं आहे, भारतांतील अन्य कोणत्याही भाषेशीं या लिपीचा संबंध नाहीं. अुर्दू खेरीज अन्य भाषा बोलणाऱ्यांची संख्या शें. ८५ वर आहे. अुर्दू लिपीला राष्ट्रभाषा न करण्यास अवढें अेक कारणही अितर राष्ट्रांत अुचित समजलें गेलें असतें. अुर्दू लिपि मूलत:च दोषपूर्ण असल्यानें, तींत कितीही सुधारणा केली तरी वैकल्पिक रीतीनें सुद्धां राष्ट्रलिपीचें स्थान तिला देणें योग्य होणार नाहीं.

---

१. 'राष्ट्रभाषा का प्रश्न' ले. गांधीजी पृ. ६० ते ६४.
२. चतुर्थ हिं. सा. संमेलनाच्या सभापतींचें भाषण.
३. हिं. अु. हिंदुस्थानी पृ. ७३.

आंतरराष्ट्रीय संघटनेस फारसी निरुपयोगी

कांहीं लोकांना असें वाटतें कीं या फारसी लिपीमुळें अिराण, अफगाणिस्थान, अरबस्थान, अिराक, सीरिया, पॅलेस्टाअिन, औजिप्त, अुत्तरमध्य आफ्रिकेंतील कांहीं राज्यें यांच्याशीं आपला निकट संबंध जोडला जाअील. पण वस्तुस्थिति निराळी आहे! अेक तर हा गट अिस्लामधर्मीयांचा आहे, त्यामुळें अितर धर्मियांविषयीं त्यांना आपुलकी वाटणार नाहीं. दुसरें असें कीं वर ज्या देशांचीं नांवें दिली त्या देशांत आतां आपल्या भाषा लिहिण्यासाठीं फारसी लिपीच्या अैवजी रोमन लिपीचा अुपयोग करण्याची प्रवृत्ति वाढूं लागली आहे. कित्येक आफ्रिकन भाषांनीं फारसी लिपि पूर्णतया टाकून दिली आहे. अिराणही त्याच मार्गावर आहे. रोमन लिपि घ्यावी कां 'अवेस्ता' ची जुनी लिपि घ्यावी अेवढाच त्याच्यापुढें प्रश्न आहे. मलायांत रोमन लिपीचा वापर अधिकाधिक होअूं लागला आहे. यामुळें **आंतरराष्ट्रीय किंवा अिस्लामी संघटनेच्या** दृष्टीनेंसुद्धां अरबी लिपीचे महत्त्व नष्ट होत चालले आहे. [१] अशा स्थितींत आपण तिचा स्वीकार करण्याच्या पंथास लागावें ही परागति आहे, प्रगति निःसंशय नव्हे.

भारतीय-रोमन लिपि नको

डॉ. चतर्जींच्या मतें नागरी लिपि ही ध्वन्यात्मक आणि वर्णक्रमाच्या दृष्टीनें सर्व श्रेष्ठ आहे, आणि रोमन लिपि ही अक्षरचिन्हांच्या पद्धतींत श्रेष्ठ आहे. या दोहोंच्या समन्वयानें 'भारतीय-रोमन लिपि' (Indo Roman Script) तयार करावी नि ती राष्ट्रभाषेस वापरावी. पण हें होणें अशक्य असेल तर देवनागरीला राज्यव्यवस्थेनें राष्ट्रलिपि म्हणून पाठिंबा द्यावा. या पाठिंब्याच्या उपयोग भारतवर्षभर अेकलिपी करण्याची अत्यंत अिष्ट अशी सुधारणा करण्यास करून घ्यावा."

डॉ. चतर्जी जी रोमन लिपि म्हणतात ती सध्याची अिंग्रजी लिपि नव्हे. तिच्यांत ते नवीन पद्धतीचे लेखन सुचवितात. त्यामुळें आंतर-

---

१. अि. आर्यन अँ. हिंदी २११ ते २१५. या पुस्तकांतील पृ. १०८ वरील टीप पहा.

राष्ट्रीयसंबंधाचा जो फायदा या स्वीकारांत लोक सांगतात तो मिळणार नाहीं, फक्त जुळणीचें (कंपोजिंग) काम लवकर होईल. अ (a) आ (a:), अि (i) अी (i:) अु (u), अू (u:) ऋ, (r), ऌ (l), अे (e) अै (e:), ओ (o), औ (o:), अि. पण आतां नागरीलिपि यंत्रारूढ होअू लागल्यानें हा जुळणीचा फायदा आपोआप मिळणार आहे, त्यामुळ या नवीन रोमनलिपीच्या प्रचाराची खटपट करण्याची जरूरी नाहीं. रोमन लिपीचा परदेशीपणा, नागरीबद्दलची प्राचीन परंपरा आणि भावना यापुढे वरील योजना स्वीकृत होईल असें चतर्जी-नाही वाटत नाहीं. अस्तु.

कुबेरानें रत्न कां टाकावें?

नागरी लिपीचे दोन अवगुण 'मुद्रण असुलभता, आणि अक्षरांची अवघड जुळणी,' हें नाहींसे होअू लागले असून मुद्रणयुगांतही नागरी लिपीचें श्रेष्ठत्व राहील, अितका विश्वास, या नव्या शोधांनीं आपणांस आणून दिलेला आहे. हिची योग्यता अितकी आहे कीं जगांतील सर्व भाषांनीं ती स्वीकारावी. भारत परतंत्र राहिल्यानें त्या देशाच्या राष्ट्रलिपीचें महत्त्व अन्य देशीयांच्या डोळ्यांत भरत नव्हते. आतां आपण कणखरपणानें नागरीसच राष्ट्रलिपि केलें तर भावी काळांत नागरीची प्रगति या दिशेनेंही होअील. ज्या लोकांना ही लिपि माहीत नाहीं त्यांनीं फारसी अैवजीं रोमनचा स्वीकार केला हें ठीक म्हणतां येअील. 'रोमनलिपि राष्ट्रलिपि करा' म्हणणारांना वीर सावरकरांनीं दिलेलें उत्तर मननीय आहे. "केमाल पाशानें रोमन लिपि स्वीकारली याचें कारण तुर्कांना कसलाच जुना आधार घेण्यासारखा नव्हता. अुर्दूलिपीच्या अभिमानी मुसलमानांनीच यापासून बोध घेतला पाहिजे... अन्दमानी लोक कवडचा गोळा करून त्याचा हार करतात, पण म्हणून कुबेरानेंही तसेंच करावें काय ?"

---

१. ‘हिंदी’ भाषासमूह

हिन्दी भाषेच्या अन्तर्गत अनेक अुपभाषा व बोली आहेत; मथुरा भागांत व्रजभाषा, मेरट-दिल्लीस खडी बोली, अयोध्या प्रांतांत अवधी, राजपुतान्यांत राजस्तानी, काशीजवळ भोजपुरी, बुंदेलखडांतील बुंदेलखडी, महाकौशलप्रांतांतील छत्तीसगढी अित्यादि. अुर्दू ही सुद्धां हिंदीच्या अंतर्गत अेक बोली होती, आजही व्याकरणदृष्ट्या ती तशी आहे, परंतु लिपि, शब्दावली [१] अित्यादीमध्यें भिन्नत्व वाढल्यानें आज ती हिंदीपासून स्वतंत्रच भाषा झाली आहे.

या हिंदीभाषेच्या समूहापैकीं कांहीं अुपभाषा बोलीच्या स्वरूपांत आजही आहेत, कांहींमध्यें अेकेकाळीं चांगलें साहित्य निर्माण झालेले आहे. सूरदासांनीं व्रजभाषेंत विपुल पद्यरचना केली, आजही या भाषेंत काव्यरचना केली जाते. हिंदी संगीतांतील कित्येक पद्यें याच अुपभाषेंत आहेत. संत तुलसीदासांनीं अवधी अुपभाषेंत ‘रामचरित्मानस’ अथवा रामायणाची रचना केली आणि या भाषेस साहित्यिक स्वरूप मिळवून दिलें. अलीकडे या भाषेंत विशेष रचना केली जात नाहीं. तथापि नुकतेच ‘कृष्णायन’ नांवाचें महाकाव्य या अुपभाषेंत रचलेलें आहे, त्याचा अुल्लेख करणें जरूर आहे. पण या दोन्ही भाषा गद्यलेखनास तितक्या अनुकूल नाहींत. अिंग्रजी राज्याच्या प्रारंभीं जशी सर्व भारतीय भाषांत गद्यलेखनास विशेषरीतीनें सुरुवात झाली, तशीच हिंदींत झाली. या वेळीं ‘खडीबोलीं’त हें लेखन होअूं लागलें व तिला साहित्यिक स्वरूप आलें. अेक शतकभर गद्यलेखन या उपभाषेंत केल्यानंतर तिच्यांत काव्यरचना करण्याची चळवळ सुरू झाली, आणि आज या खडी बोलींत ‘प्रियप्रवास’ ‘साकेत’ यासारखीं महाकाव्यें निर्माण झालीं आहेत. हिं. सा. सम्मेलन याच अुपभाषेचा— ‘खडीबोली’चा—राष्ट्रभाषा हिंदी म्हणून प्रचार करते. प्राथमिक शाळे-

१. अबोहर हिं. सा. सम्मेलनाचा ठराव.

पासून महाविद्यालयापर्यंत हिंदी प्रांतांत हिंदी म्हणजे खडी बोली शिकविली जाते.

प्रारंभी अुल्लेखिलेल्या अुपभाषापैकीं भोजपुरी किंवा बुंदेलखंडी या अद्याप निव्वळ बोलीच राहील्या आहेत——म्हणजे त्यांत साहित्य निर्मित झालेलें नाहीं. साहित्यिक दर्जास पोहोंचलेल्या अवधि, व्रज-भाषा, खडीबोली या देवनागरी लिपींत लिहिल्या जातात. याच देव-नागरी लिपीला आणि हिंदी भाषेला अनुक्रमें राष्ट्रलिपि आणि राष्ट्र-भाषा-पद प्राप्त व्हावे असा यत्न आहे.

२. 'हिंदी' भाषेचीं नांवें

नांवांत काय आहे, असा प्रश्न विचारला जातो; परंतु वस्तु ओळ-खण्याचे साधन नांव हेंच आहे, हें विसरून चालणार नाहीं. अेखाद्या वस्तूला अनेक नांवें असूं शकतील परंतु जर त्या अनेक नांवांनीं ती अेकच वस्तु ओळखली जात असेल तर त्यांत कांहीं अडचण नाहीं. मानव, मनुष्य, मॅन, जन, या सर्वांचा अर्थ एकच आहे. परंतु प्रत्येक मनुष्याचें भिन्नत्व ओळखण्यासाठीं त्याला अेक विशेष नांव दिलेलें असतें. बालकाचा नामकरण करण्याचा संस्कार सर्व देशांत आणि सर्व जातींत रूढ असण्याचें कारण हेंच आहे. तसेंच 'भाषा' या शब्दानें जगांतील सर्व भाषांचा बोध होतो; प्रत्येक देशाची किंवा तेथील लोकांची भाषा ओळखण्यासाठीं त्या देशावरून किंवा त्या भाषेस योजिलेल्या लिपीवरून अथवा अन्य तऱ्हेनें हें नांव देण्याची प्रथा आहे.

मध्यदेशांतील (गंगाकांठच्या) लोकांनीं अपभ्रंशानंतरच्या आपल्या भाषेस प्राय: 'भाषा' असा शब्द योजिला आहे. आजही कित्येक हिंदी भाषी विद्वान् आपल्या भाषेस 'भाषा' हेंच नांव देतात. श्री. रामशंकर शुक्ल 'रसाल' कृत शब्दकोशाचें नांव 'भाषा-शब्द-कोष' असें आहे तसेंच प्रो. सीताराम चतुर्वेदी यांनीं हिंदीच्या शिक्षण पद्धतीवर

१. हिं. सा. सम्मेलनाचा प्रस्ताव (अबोहर)

लिहिलेल्या ग्रंथास 'भाषाकी शिक्षा' असें नांव दिलें आहे. मुसलमानांच्या आगमनानंतर त्यांनीं या भाषेस 'हिन्दी' अथवा 'हिंदवी' हें नांव दिलें. हिंदी म्हणजे हिन्द देशाची भाषा, हिंदवी म्हणजे हिंदूंची (या देशांत रहाणाऱ्या लोकांची[२]) भाषा. याच भाषेच्या पद्यभाषेस रेखता असें म्हणत असत. याच भाषेस पूर्वी अुर्दू असेंही नांव होतें. आजकालची अुर्दू ही भाषा त्यापासून अगदीं भिन्न आहे. सध्यांची अुर्दू ही 'अुर्दू-अे-मुअल्ला' होय. या अुर्दू-अे-मुअल्ला म्हणजे फारसीमय हिंदीला युरोपियनांनीं 'हिंदुस्तानी' म्हणून संबोधिलें. अि. स. १८०३ मध्यें कलकत्त्याला फोर्ट वुइल्यम कॉलेज स्थापन झाल्यानंतर या नांवाला सरकारी पाठबळ म्हणाले.

सध्याच्या 'हिंदी' ला खड़ीबोली हें नांवही आहे,कारण खड़ीबोलीचेच तें साहित्यिक रूप होय. या भाषेला स्वामी दयानंदांनीं 'आर्यभाषा' असें नांव अुपयोजिलें. या भाषेची लिपि 'देवनागरी' आहे म्हणून हिला 'नागरी' असेंही नांव आहे. जसें नागरी प्रचारिणी सभा. या संस्थेचा पहिलाच अुद्देश आहे कीं 'हिंदी भाषा आणि नागरी लिपि यांचा प्रचार करणें'. मेरठ आणि मुजफ्फर नगर जिल्ह्यांत आजसुद्धां 'खड़ी बोली' ला नागरी[१] असें म्हणतात. अलीकडे या भाषेस 'राष्ट्रभाषा' असें नांव दलें जाअू लागलें आहे, जसें राष्ट्रभाषा प्रचार समिति. ही संस्था हिंदी भाषा आणि नागरी लिपीचाच प्रचार करते. कांहीं ठिकाणीं हिंदी-अुर्दूच्या संमिश्रणाला किंवा गांधीजींच्या 'हिंदुस्तानी'ला राष्ट्रभाषा असा शब्द लावण्याचा अटाहास चालू आहे. हिंदी आणि हिंदुस्तानी यांचा घोटाळा होअू नये म्हणून 'राष्ट्रभाषा हिंदी' असा शब्दप्रयोग करणें अिष्ट होय. हाच विरोध दर्शविण्यासाठीं हिंदीच्या मागें कांहींजण संस्कृतनिष्ठ असा शब्द लावतात. हिं. सा. संमेलनाच्या नियमावलींत पुढील वाक्य आहे. "देशव्यापी व्यवहारों और

२. अमेरिका आदि देशांत गेलेल्या मुसलमानास याच अर्थानें हिंदु-मुसलमान असें संबोधिले जातें (हिं. अु. हिंदुस्तानी पृ. १८) येथें 'हिंदु'चा अर्थ जाति विशेष नसून हिंदुस्थानांत राहणारे लोक असा आहे.

१. भाषाकी शिक्षा पृ. १०

कार्योंको सुलभ करने के लिये राष्ट्रलिपि देवनागरी और राष्ट्रभाषा हिन्दी का प्रचार बढानेका प्रयत्न करना". हें वर्णन अगदीं यथार्थ आहे. हिंदीला राष्ट्रभाषा मानणाऱ्यांना म्हणजे तिचें सध्यां असलेलें लौकिक नि साहित्यिक स्वरूप मान्य करणाऱ्यांना हिंदी हेंच नांव पसंत आहे. याच हिंदीला भारती (भारताची भाषा) असें नांवहि अलीकडे सुचविलें गेलें आहे.

३. हिंदींत संस्कृत शब्दांचा भरणा मुद्दाम केला काय ?

हिंदी भाषेमध्यें आजकाल मुद्दाम अधिक संस्कृत शब्द घालण्यांत येतात असा आक्षेप घेतला जातो, पण हें कसें खरें नाहीं याचें मार्मिक विवेचन श्री. कन्हैयालाल मुन्शी यांनीं केलेलें आहे तें पुढें दिलें आहे. "...फारसीचे राजभाषापद गेल्यानें मोगल शासनकालाच्या अखेरीस हिन्दीची दोन रूपें सिद्ध झाली—संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या क्रमानें विकसित झालेलें मूलस्वरूप आणि (फारसी दरबारी भाषा असल्यानें) फारसीद्वारां प्रभावित अर्ध-राजकीय रूप. पहिल्या रूपाचा अुपयोग सर्वत्र होऊं लागला, आणि दुसऱ्या रूपास अर्ध-राजभाषा-पद प्राप्त झालें.

ब्रिटिश साम्राज्याचा सूत्रपात झाल्यानंतर अिंग्रजांनीं अुत्तरभारतांतील थोडा भूभाग सोडून सर्वत्र राजभाषा आणि न्यायालयांतील भाषा म्हणून अिंग्रजीचा अुपयोग सुरूं केला.फारसी-भाषी दरबाराशीं हिंदीचा जो रोजचा संसर्ग होता तो आतां बंद झाला, त्यामुळें जनभाषेंत जें फारसी शब्दांचें मिश्रण पूर्वी होत असें ती क्रियाही थांबली याच वेळीं अिंग्रजी विश्वविद्यालयें स्थापन झालीं, त्यामध्यें अिंग्रजी बरोबरच संस्कृतच्या पद्धतशीर अध्ययनास सुरुवात झाली. याचा परिणाम असा झाला कीं हिंदीला पुनः आपलें शुद्ध रूप आणि संस्कृतसान्निध्य प्राप्त झालें...फारसी भाषी न्यायालयें बंद होतांच फारसीद्वारा प्रभावित हिंदीची लोकप्रियता कमी झाली हें श्री. व्यं. ना. तिवारी यांनीं आंक-

ड्यांनीं सिद्ध केलें आहे. शें. ८४ लोकांच्या मातृभाषेचा न्याय्य हक्क बाजूस सारून 'फारसी-हिंदी 'ला जर संयुक्त प्रांताच्या न्यायालयांत स्थान नसतें तर अुर्दूचा प्रचार फारच कमी झाला असता.

सर्व भारतीय भाषा संस्कृत शब्द घेऊं लागल्या

या परिस्थितींत सर्व भारतीय भाषाच अधिक संस्कृत शब्द घेअूं लागल्या. हिंदी आणि अन्य भारतीय भाषांचें संस्कृतीकरण मुद्दाम केलेलें नाहीं. विदेशी शब्दांचा प्रवेश थांबला कीं लगच भाषा आपली नैसर्गिक रीतीनें शुद्धता प्राप्त करूं लागतात. या सिद्धांतानुसार तें झालेलें आहे. हिंदीचें संस्कृतशीं असलेलें साम्य स्वाभाविक व न्यायपूर्ण आहे. आधुनिक प्रभावशाली भारतीय भाषांच्या जन्मदात्री भाषेचे परिपूर्ण रूप म्हणजे संस्कृत होय. या भाषांच्या पूर्व रूपांनीं सुद्धां शतकानुशतकें संस्कृतपासून आपणास समृद्ध केले[१] आहे."

गुजरातीचा विकास संस्कृत मुळेंच झाला

"संस्कृतमय हिंदी कृत्रिम आहे, हिंदूंनीं तिला तशी बनवली, यांत जातीय दृष्टि आहे" असें म्हणणें म्हणजे सत्यापासून दूर जाणें होय. अि.स. १८२४ मध्यें गुजराथी गद्य अगदी खेडवळ होतें.त्याची प्रगति होअूं लागली आणि स्वाभाविकच तिच्यांत संस्कृत शब्दांची भर पडं लागली. सन १८५६ मध्यें हिंदू आणि पारशी अेकच गुजराथी लिहीत. दोघेही या भाषेचा विकास करूं लागलें. पारश्यांना संस्कृत सुगम नव्हती, त्यांनीं अिंग्रजीच्या सहाय्यानें गुजराथीचा विकास सुरू केला. हिंदूंनीं स्वाभाविकपणें संस्कृतचा आश्रय घेतला. यामुळें गुजराती ही समृद्ध, सुन्दर आणि शक्तिशालिनी भाषा झालीं. अिंग्रजीमिश्रित 'पारसीगुजराती' अेक बोली आहे !

बंगाली-मराठीची हीच स्थिति

"राममोहनरायनीं बंगाली गद्याचा आरंभ केला. त्याची अभिवृद्धि झाली. बंकीम आणि रवींद्रनें तिच्यांत अपूर्व लालित्य आणलें--संस्कृतच्या समृद्धीनें.

---

१. राष्ट्रभाषा परिषद जयपूर, १९४४ अध्यक्षीय भाषण.

"मराठी घ्या, कानडी घ्या, तेलगू घ्या, मलायालम् घ्या, आणि तामिळही घ्या; संस्कृतच्या शक्तीशिवाय यांना समृद्धि आणि सरसता येणारच नाहीं. पण हीं कांहीं नवी गोष्ट नाहीं. जर मी माझी अुन्नति प्राप्त करूं लागलो तर ती आपल्या शक्तींच्या जोरावरच करणार. भारतीय भाषांचा विकास व्हावयाचा तर तो संस्कृतच्या सहाय्यानेंच--दुसरा कोणताही मार्ग नाहीं.

संस्कृतखेरीज हिंदी समृद्ध होअूं शकणार नाहीं. संस्कृतच्या प्रेरणेविना ती रसपूर्ण होणार नाहीं. संस्कृत तिची जननी आहे, याबद्दल मला लाज वाटत नाहीं. मी या माझ्या मातेपासून प्रेरणा मिळवितो. यासाठीं मी कोणाची क्षमा मागत नाहीं आणि मागणारही नाहीं."[1]

४. हिंदीचें मराठीवर आक्रमण होतें काय ?

राष्ट्रभाषा हिन्दीच्या प्रचारामुळें मराठीवर आक्रमण होअून आपली मातृभाषा मागें पडेल असा अेक आक्षेप घेतला जातो. ही भीति निराधार आहे असें विचारवंतास दिसून येईल.

दोन्हीही संस्कृतोत्पन्न

मराठी नि हिंदी या दोन्ही भाषा संस्कृतोत्पन्न आहेत अर्थात् संस्कृत ही त्या दोहोंची जननी आहे, म्हणजे त्या भाषा सख्या बहिणी वहिणी आहेत. यामुळें दोहींत शब्दसाम्य फार आहे. विभक्ती-प्रत्यय गाळलेली हिंदी वाक्यें मराठी भाषियांना, आणि मराठी वाक्यें हिंदी भाषियांना सहज समजतात. याच पद्यांतून प्रतीत होणारीं संस्कृति आणि विचार यांतही साम्य आहे. हें विचारसाम्य सर्व भारतीय भाषांत आढळतें-हाच तर अखंड भारताचा आत्मा आहे, अर्थात् राष्ट्रभाषेचाही आहे. संस्कृतनिष्ठा, संस्कृति, विचार याच-प्रमाणें आणखी अेक समानतेच मुद्दा म्हणजे लिपीचा. मराठी-हिंदीची

---

१. हिं.सा.सम्मेलन, अुदयपूर १९४५-श्री. मुन्शींचें अध्यक्षीय भाषण.

लिपि अेकच० आहे. यामुळें आजही मराठीभाषी सुशिक्षित हिन्दी वाचतात नि हिन्दीभाषीही मराठी वाचतात. या भाषा बोलतां न आल्या तरीसुद्धां पारस्परिक साहित्यिक वाङ्मयाचा लाभ आज दोनही भाषाभाषी घेअू शकतात.

प्रांतांत प्रांतिक भाषा मुख्य

आपली मातृभाषा भ्रष्ट होण्याची कांहींसुद्धां शंका घेणें चुकीचें आहे. प्रांतिक भाषांच्या जागीं आज जसें अिंग्रजीचें दडपण आपल्यावर आहे तसें हिन्दीचें कधींही राहणार नाहीं. अिंग्रजीसारखी भाषा कीं जिची लिपि, संस्कृति, विचार हे परकीय असतांना, तिच्या पाठीमागें राजसत्ता अुभी असतांना, नि शाळा कॉलेजांत तीच भाषा माध्यम असतांही आपण मराठीची अभिवृद्धि करूं शकलोंच कीं नाहीं? अिंग्रजीचें असें दडपण नसतें तर मराठीची अुन्नति निश्चित अधिक झाली असती. मग राष्ट्रभाषा हिंदी आपल्या माय भाषेची प्रगति थांबवील या म्हणण्यांत काय अर्थ?

भावी स्वराज्यांत प्रांतांची सरकारी भाषा आणि विद्यापीठ-शाळा यांची भाषा मराठीच राहील. राष्ट्रभाषाप्रचारक संस्था किंवा व्यक्ति यांनीं या गोष्टीला विरोध केला नाहीं, किंबहुना पाठिंबाच दिला आहे. संयुक्त सरकारची आणि बनारससारख्या भारतीय विद्यापीठांची बोधभाषा (medium of instruction) हिंदी राहील. या विद्यापीठांतून आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्यास मिळावें म्हणून राष्ट्रैक्यबुद्धीनें आपल्या विद्यापीठांतून सर्व परीक्षांत ५० गुणांचा हिंदीचा अेकादा प्रश्नपत्र आवश्यक ठेवावा लागेल. हायस्कुलांतून आजही संस्कृत पाली अि. शिकवितात त्याप्रमाणें हिंदी विषय राहील. संस्कृत, पाली, अर्धमागधीनें मराठीची हानि झाली नाहीं, मग ती तसल्याच प्रकारच्या हिंदीनें कां होअील ?

---

*नागरी लिपि सुधारणेचे जे यत्न हिं. सा. सम्मेलन करीत आहे त्यांत श्री. शं. रा. दाते, डॉ. पी. अेल्. वैद्य या महाराष्ट्रीयांचें साहाय्य घेतलें गेलें आणि घेतले जाते.

हिन्दीचें साहित्यवाङ्मय आज तरी आपल्यापेक्षां जास्त दर्जाचे नाहीं. आणि तें हिंदीभाषा आणि आपण किंवा अन्य भारतीयांनींच समृद्ध करावयाचें आहे. असें झालें म्हणजे मराठी-हिंदीची देवाण घेवाण वाढेल. मराठी लेखक हिन्दींत लिहूं लागल्यानें मराठींत कमी साहित्य निपजेल अशी चिंता कांहींना वाटते. असें होणें संभवनीय नाहीं, आणि झालेंच तर या महाराष्ट्रीयांच्या हिंदी ग्रंथांचा अनुवाद मराठींत केला जाअील. शब्दांची भेसळ होअील ही भीति अनाठायी आहे, अुलट मराठीची शब्दसंपत्ति वाढेल. (मराठीच्या सहाय्यानें हिंदीचीही शब्दसंपत्ति वाढेल.[1]) हिंदींतील संस्कृतोत्भव नि तस्सम शब्द मराठींत अुपयोगी पडतात. शास्त्रीय विषयांत तर सर्वच प्रांतीय भाषांतील पारिभाषिक शब्दही अेकसारखे ठेवणें अिष्ट नि शक्य आहे. अनेक व्यावहारिक शब्द असें रूढ होत आहेत नि होतील:† मध्यवर्ती विधिमंडळ, प्रांतिक विधिमंडळ, निर्वाचन (निवडणूक), अविरोध (बिनविरोध), सभापति (अध्यक्ष), मंत्री (चिटणीस), समिति (कमेटी), संघराज्य (संयुक्तराज्य), सहपाठी (सहाध्यायी), जीवनधारा (जीवनप्रवाह), परिवर्तन (फरक), कठिनता (अडचण), संपत्तिशास्त्र (अर्थशास्त्र), अुपस्थित (हजर), स्थायीसमिति (नियामकमंडळ), नियमावली (घटनेंतील कलमांचा संग्रह), विधान (घटना), अनुपस्थिति (गैरहजिरी), अुत्तर पुस्तक (पेपर), प्रश्नपत्र (प्रश्न पेपर), आदानप्रदान (देवाण-घेवाण), पारिश्रमिक (मोबदला), मनोविज्ञान (मानसशास्त्र), वैज्ञानिक (शास्त्रीय); त्यागपत्र (राजीनामा), अभियोग (आरोप) अि.

---

१. राष्ट्र, राष्ट्रीय आणि राष्ट्रभाषा हे शब्द मी मराठींतूनच घेतले आणि हिन्दींत त्याचा उपयोग केला ...राष्ट्रभाषेवर मी प्रथम १९०७ मध्यें लिहिले."--पं. अंबिकाप्रसाद बाजपेयी, ' मेरा पत्रकार जीवन ' ले. ६ : विशाल भारत सितंबर १९४७.

† साहित्यिक पारिभाषिक शब्दावली (सं. प्रेमनारायण टंडन), हिं. सा. सम्मेलनाचा 'समाचार पत्रशब्दकोष', प्रा. दुवे–केलाकृत अर्थशास्त्र शब्दावली व राजनीति शब्दावली ' ही पुस्तकें पहा.

सहज ध्यानीं आले ते शब्द येथें दिले आहेत, हे जितके हिंदी तितकेच मराठीही आहेत. जुने शब्द ठेवूनही हे शब्द घेण्यास काय प्रत्यवाय आहे? अेकाच अर्थाचे २–४ शब्द भाषेंत असावयास पाहिजेतच. हिंदीच्या संगतीनें हा आपला फायदाच नाहीं कां होणार ? मराठी लेखक हिंदींत लिहूं लागले तर मराठींतील चांगले शब्द आणि तेजस्वी विचार हिंदी-भाषियांना देतील. हिंदी पुस्तकें मराठीभाषी वाचूं लागले तरी भाषेची हानि होणार नाहीं. तुळशीदास–कबीर अित्यादिकांच्या हिन्दी गीतांचा आणि म्हणींचा प्रचार महाराष्ट्रांत अनेक शतकें आहे, त्यामुळें मराठीला कांहींच धक्का पोंचलेला नाहीं.

हिंदीवाले मराठी शिकण्यास सिध्द

कांहीं महाराष्ट्रीय विद्वान् असें म्हणतात कीं आम्ही मात्र हिंदी शिकावें नि हिंदी भाषियांनीं मात्र दुसरी भाषा शिकूं नये ? यालाही, हिंदी साहित्य सम्मेलनानें यथाशक्ति अुत्तर दिलें आहे. या संस्थेनें आपल्या परीक्षांत हिंदीभाषियांनी दुसरी अेकतरी भाषा–मराठी, बंगाली, गुजराथी यांपैकीं घेतली पाहिजे असा नियम केला आहे. म्हणजे त्यांच्या मातृभाषेखेरीज अेक अन्य प्रांतीय भाषा हे विद्यार्थी शिकतात. हिंदीभाषी विद्यापीठांतून भावी कालांत हा नियम होअूं शकेल.

पण अेक सावधगिरीची सूचना देणें अिष्ट वाटतें. जर अुर्दू लिपि (विकल्पानेंही) राष्ट्रलिपि झाली तर मात्र आपल्या भाषेवर आघात होअील. त्या भाषेंतील पारिभाषिक शब्द, लिपिदोषामुळें अुच्चारांची होणारी हेळसांड, या गोष्टी अिंग्रजी प्रमाणेंच आपल्या भाषेच्या परंपरेविरुद्ध आहेत. ही परिस्थिति निर्माण होअूं नये म्हणून, मातृभाषेला पोषक जी हिन्दी तीच आमची राष्ट्रभाषा आणि ‘ बालबोध ’ म्हणून नागरी लिपि हीच आमची राष्ट्रलिपि आहे असा आग्रह धरला जातो.

५. भाषाशुद्धि

राष्ट्रभाषेचा प्रचार करणाऱ्या संस्थांच्या अुद्दिष्टांत जे बारकावे असतात ते सामान्य लोकांस सहाजिकच कळत नाहींत. 'हिंदी भाषेंत पारिभाषिक शब्द स्वभावतःच संस्कृत रहाणार या दृष्टीनें किंवा तिच्यामध्यें परंपरागत चालत आलेल्या संस्कृत शब्दांना काढून टाकणें अयोग्य आहे हें दर्शविण्यासाठीं 'संस्कृतनिष्ठ' असें विशेषण हिंदीला लावण्यांत येते. याच अर्थानें हिंदीशैली (हिंदी भाषेची अुर्दूपासून भिन्न असलेली शैली) किंवा संस्कृतमयी हिंदी अथवा संस्कृत-नुसारिणी हिंदी असा शब्दप्रयोग अुपयोजिला जातो. परंतु हा विषय कळला नाहीं म्हणून अथवा प्रतिपक्षाबद्दल जनतेंत गैरसमज पसर-विण्यासाठीं असें सांगितलें जातें कीं, संस्कृतनिष्ठ हिंदीचे पुरस्कर्ते, हिंदी भाषेंत प्रचलित असलेल्या सर्व अरबी फारसी शब्दांची हकालपट्टी करून तेथें मुद्दाम संस्कृत शब्द घुसडा असें म्हणतात. वस्तुस्थिति अशी नाहीं. (आक्षेपक मात्र हिंदींतील संस्कृत शब्द मुद्दाम काढून त्याअैवजीं अरबी-फारसी तेथें योजतात.) जशी आपली मराठी संस्कृतनिष्ठ आहे तशीच हिंदी आहे. हिंदुस्तानीपासून हिंदीचें भिन्नत्व दाखविण्यासाठीं हें विशेषण लावलेलें असतें हें मागेंच विशद केलें आहे.[१] कबीरदास, प्रेमचंद किंवा अमीर खुसरो यांची भाषा संस्कृतनिष्ठ हिंदीच आहे, परंतु मौलवी अब्दुलहक यांची भाषा किंवा रेडियोवरील हिंदुस्तानी ही हिंदी भाषा नव्हे.

मराठी भाषेमध्यें वीर सावरकर नि कै. डॉ. पटवर्धन यांनीं भाषा-शुद्धीची चळवळ चालविली ती सुद्धां आपल्या शब्दांना हाकून त्याजागीं बसलेले परकीय शब्द काढून टाकण्यासाठीं, किंवा नवीन वस्तंना आपल्या भाषेचे शब्द बनविण्यासाठीं. यांतील अिंग्रजी शब्दांचा बहिष्कार करण्याचा भाग आज सर्वसंमत आहे, मात्र अुर्दू शब्द काढूं लागले कीं कांहींना वाअीट वाटतें ! त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं अशी कट्टर भाषा-शुद्धीची चळवळ हिंदीभाषियांत नाहीं, आणि 'संस्कृतनिष्ठ' विशेषण

१. प्रकरण ९ पहा.

लावणाऱ्यांनाही ती अभिप्रेत नाहीं. या पुस्तकांत 'हिंदी हीच राष्ट्रभाषा आहे' असें जें साधार सांगितलें आहे, ती हिंदी म्हणजे आज हिंदी साहित्यग्रंथांतून, वृत्तपत्रांतून, व्याख्यानांतून प्रचलित असलेलीच भाषा होय. या भाषेचें बाजारू स्वरूप म्हणजेच टांगेवाल्याशीं किंवा स्टेशनावर बोलली जाणारी भाषा होय. भाषेचें खरें रूप ग्रांथिक होय, तेंच सम्पन्न नि समर्थ असणें आवश्यक होय. हें स्वभावतःच संस्कृताश्रित आहे. तथापि त्यांतही फारसी, अरबी, अिंग्रजी असे परकीय शब्द आहेतही, त्यांचा बहिष्कार करण्याचा प्रश्न अद्यापि कोणीच काढलेला नाहीं. मात्र नवीन विचार हिंदींत मांडतांना अिंग्रजी अथवा अरबी-फारसी पारिभाषिक शब्द न योजतां संस्कृतपासून हे शब्द निर्माण करून अुपयोगावे असे म्हणण्यांत 'भाषा शुद्धी' चा कांहींही संबंध नाहीं.

------

६. हिंदी भाषेंतील पारिभाषिक शब्द

नव्या वस्तू–नवे शब्द

बोलचालीची भाषा आणि ग्रांथिक भाषा यांच्या शब्दयोजनेंत थोडासा फरक राहतो. याचें कारण स्पष्ट आहे. एकाद्या विषयाचा बारकाअीनें विचार करावयाचा म्हणजे प्रत्येक विचाराचें दर्शक असे अनेक शब्द अुपयोगांत आणावे लागतात. तत्त्वज्ञानाच्या विचाराला लागणारे शब्द आज आपल्याजवळ आहेत; परंतु आधुनिक भौतिक शास्त्रांतील चर्चेस लागणारे शब्द आज आपल्या भाषांत नाहींत. असे शब्द अिंग्रजीच ठेवावे कीं नवे बनवावेत असा प्रश्न चर्चिला जात आहेच. अिंग्रजी टाकून भाषा-परंपरेस धरून संस्कृतच्या आधारानें हे शब्द बनविण्याची प्रवृत्ति बहुसंमत आहे. लाहोरचे डॉ. रघुवीर यांनीं या दिशेनें चांगलें काम केलें आहे. अशा प्रयत्नांनीं सर्व प्रांतीय भाषांची पारिभाषिक शब्दावली अेक होअू शकेल असें वाटू लागलें आहे.

देशज शब्द अपूर्ण

हिंदी-अुर्दूच्या मिश्रणानें 'हिंदुस्तानी' नांवाची राष्ट्रभाषा बनवावी असें म्हणणाऱ्यांना पारिभाषिक शब्दांचा प्रश्न नडतो. निरुपाय होअून

डॉ. राजेंद्रप्रसादांच्यासारखे लोक असें पारिभाषिक शब्द संस्कृतच्या आधारानेंच केले पाहिजेत [१] असें स्पष्ट म्हणतात. बिहारच्या जुन्या काँग्रेस सरकारनें नेमलेल्या 'हिंदुस्तानी बोर्डानें' बाजारू भाषेंतून पारिभाषिक शब्द शोधण्याचा जो अुद्योग केला तो किती हास्यास्पद आहे हें डॉ. सत्यप्रकाश यांनीं विशद केलें आहें : [२] ते विचारतात. "व्याकरणांतील अक्षर, शब्द, व्याकरण, वचन, लिंग, कारक, काल, अुपसर्ग, अव्यय, सर्वनाम, कर्ता, कर्म, करण, संप्रदान आदि शब्दांचे हिंदुस्तानी पर्याय कोणते ?" ते पुढें म्हणतात : "समजा, बोलचालीच्या भाषेंत कांहीं शब्द मिळाले तरी ते देशभर किंवा त्या भाषेच्या क्षेत्रांतही सर्वत्र रूढ नसतात. जशी १२ कोसावर भाषा बदलते तसे हे शद्बही भिन्न असतात. शें. ९० वेळां असें शद्बच मिळत नाहींत. हें साहाजिकच आहे. जे विषय सर्व साधारण लोकांचे नाहींत. त्यासाठीं त्यांच्या सामान्य भाषेंत शद्ब तरी कसे सांपडणार ? तेव्हां हे शद्ब संस्कृतपासून तयार करणे हाच योग्य मार्ग आहे."

अत्युच्च विचारासाठीं संस्कृत शब्दच योग्य

अुर्दूनें आपली परिभाषा अरबी-फारसी पासून बनविण्याचा अुद्योग अुस्मानिया विद्यापीठांत चालू केला आहे तो अुर्दू भाषियांनीं चालवावा. पण हिंदी अुर्दूची खिचडी करण्याच्या नादीं लागून आधीच अवघड असलेला पारिभाषिक शब्दांचा प्रश्न आणखी अवघड न करणें हें राष्ट्राच्या हिताचें आहे. 'बाजारू हिंदुस्तानी' हीच राष्ट्रभाषा, असें जे मानतात त्यांच्यापुढें पारिभाषिक शब्दांचा प्रश्न अुत्पन्न होत नाहीं. परंतु हिं. सा. सम्मेलन आणि राष्ट्रहितैषी यांचा हेतु असा आहे कीं राष्ट्रांतील अत्युच्च विचार राष्ट्रभाषेत मांडले गेले पाहिजेत.त्यासाठीं पारिभाषिक शब्द संस्कृतपासून घेणें हें स्वाभाविक न्याय्य आणि अुचित आहे. डॉ. चतर्जींनीं याच मतास पुष्टि दिली आहे. आज हिन्दीभाषी

---

१. पूर्वभारत राष्ट्रभाषा प्रचार सम्मेलनाचे सभापति म्हणून डॉ. राजेंद्रबाबूंचें भाषण.

२. अध्यक्षीय भाषण–विज्ञानपरिषद, २९ वें अधिवेशन पुणें.

आणि अन्य प्रांतिक भाषी असें करीतच आहे. याच संस्कृतनिष्ठेवर हिंदीचें स्वाभाविक राष्ट्रभाषापद टिकणार आहे.

७. बोलपट आणि हिंदी

बोलपट हें भाषेच्या प्रसाराचें महत्त्वाचें साधन आहे. हिंदी ही भारतव्यापी भाषा असल्यामुळें या भाषेंत, प्रांतीय भाषांपेक्षां जास्त बोलपट काढले जातात. मध्यंतरी कांहीं वर्षांत मराठी बोलपट निघाला नव्हता,याच काळांत महाराष्ट्रांतील चित्रपटकंपन्यांनीं हिंदी बोलपट काढले. आर्थिकदृष्टचा या बोलपटांत मराठीपेक्षां अधिक अुत्पन्न होतें, कारण ते सर्व देशभर चालतात.

हें चित्रपट पाहण्यास अनेक लोक प्रति दिन जातात. ती भाषा समजावी म्हणूनही कांहींजण हिंदी शिकण्यास प्रवृत्त होतात. रोजरोज बोलपटांतील भाषा अैकून व्यवहारापुरते हिंदी त्यांना येणें शक्य आहे. यामुळें बोलपटांतील हिंदी भाषेचें स्वरूप काय असावें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदी-हिंदुस्तानी वादाचा आणि राजकीय पुढाऱ्यांच्या या विषयांतील मतांचा परिणाम चित्रपट चालकांवर झाला असल्यानें पुष्कळ बोलपटांतील भाषा अुर्दू वळणाची झालेली आहे.अहिंदी भाषी बोलपट कंपन्यांतून काम करणाऱ्या हिंदीभाषी संवाद लेखकांच्या मर्जीवर भाषेचें हें रूप अवलंबून नसून कंपन्यांच्या चालकांच्या लहरी प्रमाणें तें बदलतें. पंजाब किंवा सीमाप्रांतांत आपले बोलपट पुष्कळ आठवडे चालावे म्हणून अुर्दू शब्दांचा भरणा करण्याकडे चित्रपट-चालकांची प्रवृत्ति असते.* प्राचीनकालीन संवादामध्येंसुद्धां कांहीं पात्रांच्या तोंडी अुर्दू भाषा घातलेली असते. आश्चर्य असें वाटतें कीं, मद्रास प्रांतांत किंवा बंगालमध्यें बोलपट अनेक आठवडे चालावा म्हणून त्याची भाषा नैसर्गिक हिंदी (संस्कृतनिष्ठ) ठेवावी हें मात्र

---

* पंजाबांतील लोकांची भाषा पंजाबी असून ती संस्कृतला जवळची आहे हें त्यांच्या ध्यानीं येत नाहीं. आतां हे प्रांत पाकिस्तानांत गेल्यानें चालकांची ही प्रवृत्ति बदलेल असें वाटते.

या चालकांच्या लक्षांत येत नाहीं ! हिंदी भाषेचा स्वाभाविक ओघ हिंदी बोलपटांत राहणें हें राष्ट्रभाषेच्या प्रसाराच्या दृष्टीनें आवश्यक आहे. हिंदी सा. सम्मेलनानें यासाठीं अेक समिति नेमलेली असून अनेक चित्रपटकर्ते त्यांना साहाय करतील अशी आशा वाटूं लागली आहे. त्यांना यश आलें म्हणजे आज राष्ट्रभाषेचें जे विडंबन अनेक बोलपटांत चालूं असते तें थांबेल.

---

८. राष्ट्रलिपीची सुधारणा

नागरी लिपीच्या गुणांचें वर्णन मागें केलें त्यांत मुद्रणाच्या दृष्टीनें या लिपींत सुधारणा करणें जरूर आहे असें सुचविलें होतेच. अशा रीतीचा प्रयत्न महाराष्ट्रांत गेली ५० वर्षें चालूं आहे. नागरीलिपींतील जुळणी करतांना अक्षरसंख्या सुमारे ४८५ आहे, आणि रोमन लिपींत १४७ च आहे. नागरी लिपींत संयुक्ताक्षरांचें स्वतंत्र खिळे लागतात, तसेंच मात्रा नि अुकार लावण्यासाठीं पाअूण अक्षरांचे टाअिप असतात. काना किंवा विसर्ग जसा अक्षरानंतर येतो त्या रीतीनें अिकार, अेकार, लावतां आलें असते तर टाअिपांची संख्या कमी होअून जुळणीचे काम सुलभ झालें असते. या प्रकारच्य अडचणी दूर करण्यासाठीं 'अ' 'आ' 'अि' 'अी' ची बारहखड़ी, जोडाक्षराची नवी पद्धति या योजना वीर सावरकरांनीं सुचविल्या. लाहोरचे कै. डॉ. लक्ष्मणस्वरूप, श्री. काका कालेलकर, हिं. सा. सम्मेलन, श्री. शं. रा. दाते, महापंडित श्री. राहूल यांनीं अशा अनक सुधारणा सुचविल्या असून अद्यापही हें कार्य चालूं आहे. राष्ट्रभाषा प्रचार समिति वर्धा आणि मुंबई सरकारचें हिंदुस्तानी बोर्ड यांनीं आपल्या पाठ्यपुस्तकांतून या सुधारलेल्या नागरी लिपीस स्थान दिलेलें आहे; सावरकारांची 'लिपि' आतां 'सरकारी' लिपि झाली आहे. हिंदीभाषियांतील सनातनी वर्ग या सुधारणांच्या विरुद्ध आहे, महाराष्ट्रांत मात्र पुष्कळ अंशी त्यांना मान्यता मिळू लागली आहे.

[हिंदी हीच राष्ट्रभाषा कशी आहे हें अनेक रीतीनें मागील प्रकरणांत विशद केलें आहे. तथापि कांहीं प्रश्न नेहमीं विचारले जातात, त्यांचीं अुत्तरें हिंदी प्रचारकांस अुपयोगी पडावी म्हणून येथें थोडक्यांत दिलीं आहेत.]

१. हिंदीचा बडेजाव करणार काय ?

प्रश्न १—'आज जे अिंग्रजी भाषेला स्थान आहे तें हिंदीला मिळाले पाहिजे' असें सांगितले जाते याचा अर्थ असाच कां, कीं पोस्ट, बँका, विमाकंपन्या, सरकारी कचेऱ्या, महाविद्यालय, रेल्वे अि. क्षेत्रांत अिंग्रजीचा जसा बडेजाव चालतो तसा राष्ट्रभाषा हिंदीचा चालणार ?

अुत्तर :—आज आपल्या देशांत अिंग्रजीला मिळालेलें स्थान अस्वाभाविक आहे. कोणत्याही परकीय भाषेला अितके जीवनव्यापी स्थान मिळणे अनिष्ट आहे. असलें स्थान हिंदीस मिळावें हा प्रचाराचा हेतु नाहीं. प्रत्येक प्रांतांत तेथील स्थानिक भाषेंत सरकारी काम चालेल, बँका, अिन्शुअरन्स कंपन्या यांचें व्यवहारही प्रांतिक भाषेंतून करण्यास अुत्तेजन दिलें जाअील. महाविद्यालयांतून (कॉलेजामधून) त्या त्या प्रांताची मातृभाषा हीच शिक्षणाचें माध्यम राहील. आंतर-प्रांतीय नि सार्वभारतीय व्यवहारांत जे स्थान अिंग्रजीला आहे ते हिंदीस प्राप्त होअील. पोस्ट, रेल्वेसारख्या सार्वभारतीय खात्यांची कामें अिंग्रजीअैवजीं राष्ट्रभाषेंत चालतील. अर्थात् प्रसंग विशेषीं याही विभागांत प्रांतीय भाषेचा अुपयोग करण्यास बंदी होणार नाहीं.

२. शाळा–कॉलेजांत हिंदी अनिवार्य पाहिजे

प्रश्न २:—हिंदी भाषेचें शिक्षण शाळा-कॉलेजांतून अनिवार्य करावें काय ?

उत्तर :—मराठी साहित्यिकांचा विचारप्रवाह असा आहे कीं हिंदी भाषेचे शिक्षण अैच्छिक विषय म्हणून ठेवावे. हिंदीचे मराठी भाषेवर आक्रमण होअील अशी भीति या मंडळींच्या पोटांत असावी !

ही भीति निराधार आहे हें मागील मुद्यांत सांगितलें आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा मानल्यानंतर तिचें शिक्षण हायस्कुलांतील वरच्या वर्गांतून (इं. ४ थी नंतर) सक्तीनें देणें आवश्यक नाहीं काय ? व्यापारापासून ते अुच्च वैज्ञानिक विचारापर्यंत सर्व भारतीय व्यवहार आणि वैचारिक देवाणघेवाण जशी आज अिंग्रजींतून चालते तशीच हिंदीतून चालावी अशी जर आपली अिच्छा आहे तर बी. अे.; बी.एस्‌सी. परीक्षांनासुद्धां हिंदीचा अेक प्रश्नपत्र दुसरी भाषा म्हणून अनिवार्य असावयास नको काय ? आजच्या अभ्यासक्रमांतील सर्व विषय अिंग्रजींतून शिकण्याचें आणि त्याच भाषेंतून लिहिण्याचे श्रम कमी झाल्यावर या दुसऱ्या भाषेचें ओझें विद्यार्थ्यांस जाणवणार नाहीं.बनारस विद्यापीठासारखी सार्वभारतीय विद्यापीठांचें माध्यम हिंदी राहणार; तेथें शिकण्यास जाणाऱ्या अितर प्रांतीय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा-कॉलेजांतून हिंदी अनिवार्य रूपानें शिकविले नाहीं तर त्यांचीं किती विचित्र स्थिति होअील ? या विद्यापीठांतून काम करणाऱ्या अन्य प्रांतीय प्राध्यापकांना हिंदींतूनच शिकवावे लागेल तेव्हां त्यांच्या विद्यार्थी दशेंतच या भाषेशीं त्यांचा परिचय करावयास नको काय ? सार्वभारतीय सरकारच्या खात्यांतून नोकरी मिळण्यास ही भाषा यावीच लागणार.

महाविद्यालयें किंवा विद्यापीठें यांतून माध्यम मातृभाषा राहील, तेथें दुसरी भाषा म्हणून हिंदी आणि कदाचित् अिंग्रजी शिकविलें तरी अडचण नाहीं. हैद्राबाद येथील अुस्मानिया विद्यापीठांत सर्व विषयांचें—गणित, विज्ञान, स्थापत्य, वैद्यकी यांचे माध्यम अुर्दू भाषा आहे [१] तथापि साम्राज्य सरकारची भाषा अिंग्रजी ही ' दुसरी अनिवाय भाषा, प्रत्येक विद्यार्थ्यांस शिकविली जाते. आपल्या प्रांतांत भावी विद्यापीठांत शिक्षणाचें माध्यम मराठी राहील आणि हिंदीही दुसरी अनिवार्य भाषा म्हणून राहील; तशी ती रहावी असा कांहींचा आग्रहही आहे. [२] अर्थात् ' हिंदुस्तानी ' राष्ट्रभाषा होणार असेल तर

१. आणि आम्ही मात्र मराठींतून विज्ञानादि विषय कसें शिकवितां येतील याची चर्चा करून रडगाणें गात बसलों आहोंत !

मात्र या सक्तीस विरोध करावा लागेल. सध्यां आपल्या हायस्कुलांतील ' हिंदुस्तानी ' पुस्तकें नि सरकारी धोरण पाहिलें म्हणजे खेद वाटतो.

---

३. मराठीवर आघात

प्रश्न ३:—अशी रीतीनें हिंदीस सार्वत्रिक स्थान मिळाल्यास मराठीवर आघात होअील काय ?

अुत्तर :—याचें अुत्तर पृ. १२६ वर दिलेलें आहे.

---

४. राष्ट्रनेते राष्ट्रभाषास्वरूप ठरवू शकणार नाहींत

प्रश्न ४:—राष्ट्रीय कार्य ज्यांना करावयाचें असतें अशा राष्ट्रीय नेत्याकडेच राष्ट्रभाषेच्या स्वरूपाचा प्रश्न सोंपविणें अुचित नव्हे काय ?

अुत्तर :—सकृद्दर्शनी हें म्हणण सयुक्तिक दिसतें, परंतु विचार केला असतां या प्रश्नांतील विचारसरणी चुकीची आहे हें लक्षांत येअील. भाषेच्या प्रश्नाचे स्वरूप ठरविण्याचें कार्य असें कोणाकडे देअून तें ठरत नसते. भाषा हें वाहतें पाणी आहे, जनगंगाच ती. तिचें रूप लोकच ठरविणार. तें रूप स्वीकारून तिचा प्रचार करणें हें नेत्यांना शक्य आहे.

केवळ राजकीय नेत्यांवर हा प्रश्न सोंपवून चालणार नाहीं, कारण त्यांत अनेक पक्षांचे आणि त्यांतील अुपपक्षांचे नेते येतात, या सर्वांचे अेकमत होणें कठीण. राष्ट्रभाषेच्या नांव नि स्वरूपाविषयीं म. गांधी, वीर सावरकर आणि बॅ. जिना यांच्यांत अेकमत होअील काय ? कॉंग्रेसमध्य सुद्धां गांधीजी आणि श्री. पुरुषोत्तमदास टंडन (सं. प्रां. विधिमंडळाचे कॉं. पक्षीय अध्यक्ष) आणि त्याच प्रांताचे शिक्षण मंत्री श्री. संपूर्णानंद यांच्या विचारसरणींत फार विरोध आहे. श्री. शंकरराव देव, मंत्री भारतीय कॉंग्रेस यांना गांधीजींच्या भाषेचें, हिंदुस्तानी हें नांव आणि स्वरूप, दोन लिप्या हें सर्व मान्य आहे, परंतु अुर्दू लिपि शिकण्याची सर्वांवर सक्ती करण्याची गोष्ट आज तरी श्री. देवांना

अमान्य आहे.[१] यामुळेंच बहुधा गांधीजींच्या हिंदुस्तानी प्रचार सभेचा जोर अद्याप महाराष्ट्रांत झालेला नाहीं.

या शिवाय भाषेचा प्रश्न हा सांस्कृतिक, व्यावहारिक सोईचा नि साहित्यिकही आहे. या दृष्टीनें शास्त्री-प्रवचनकार, व्यापारी, वैद्य,साहित्यिक,शिक्षक या सर्वांचा विचार या प्रश्नांत घेतला पाहिजे. परकीय राजकर्त्यांविरुद्ध संघटना करितांना राष्ट्रभाषेच्या चळवळीचा अुपयोग होत होता म्हणून पूर्वीं त्यांस राजकीय स्वरूप आले होते. स्वराज्य मिळाल्यावर कांहीं दिवस या प्रश्नांत राजकीय पुढाऱ्यांनीं लक्ष घातलें तरी कायमचें लक्ष त्यांत त्यांना घालणें शक्य नाहीं. हिंदु-मुसलमान हा प्रश्न जसा सर्वथैव राजकीय स्वरूपाचा प्रश्न आहे तसें राष्ट्रभाषेचें नाहीं.

---

५. स्वराज्यापेक्षां स्वभाषा श्रेष्ठ

प्रश्न ५:—धर्मकारण, राजकारण, समाजकारण, भाषा, लिपि अि. विषय प्रचलित राजकारणापुढें गौण आहेत म्हणून स्वराज्य मिळविण्यासाठीं खटपट करणाऱ्या कॉंग्रेसचें जे धोरण याबाबतींत राहील तेंच सर्वांनीं मान्य करावयास नको काय ?

अुत्तर:— स्वराज्य मिळाल्यानें हा प्रश्न आतां अुद्भूत होत नाहीं. तथापि पूर्वीही त्यास उत्तर देतां येत होते, ते विचारासाठीं पुढें दिले आहे. स्वराज्य तरी कशासाठीं मिळवावयाचे ? स्वभाषा, स्वधर्म, समाज, स्वजीवन यांच्या अुत्कर्षाकरतांच ना ? स्वराज्यांत या विषयांची स्थिति काय राहील स्याची ध्येयात्मक फोड कॉंग्रेसनें करावयास पाहिजे. स्वराज्यपेक्षांही स्वभाषेचें महत्त्व अधिक आहे असा विचार कांहीं नत्यांनीप्रकट केलेला आहे, कारण स्वभाषेंत स्वराज्य मिळविण्याचे सामर्थ्य असते.

आमची राष्ट्रभाषा ही आमच्या मातृभाषेप्रमाणेंच आम्हांस आप-

---

१ महाराष्ट्र आणि राष्ट्रभाषा संघटनः नवी योजना—श्री. देव-पोतदार यांचें सं. पत्रक.

लीशी वाटेल अशीच असली पाहिजे. राजकारणासाठीं या भाषेची विकृति करण्याचा अधिकार काँग्रेसलासुद्धां नाहीं. हिंदीच्या स्वरूपाबद्दल अधिकृत ठराव काँग्रेसनें केलेला नाहीं. कानपूरला 'हिंदुस्तानी' असें जें भाषेस नांव दिलें त्याच्या अर्थाबद्दल या संस्थेंतच मतभेद आहेत. समजा अुद्यां या संस्थेनें "हिंदुस्थानी = अुर्दू = राष्ट्रभाषा", असा ठराव केला तर काय होअील? या संस्थेच्या राजकीय प्रभावामुळें तिची भाषाविषयक विचारसरणी कांहीं काळ प्रभावी ठरेल! अिंग्रजांच्या राज्यांत आमची इच्छा नसतांही सर्व व्यवहारांत अिंग्रजीचें महत्त्व दिसतें. याचें कारण राजसत्ता नव्हे काय? आपल्या प्रांतांत प्राथमिक शाळांतील वरच्या वर्गांतून नि अिंग्रजी हायस्कूलांतील पहिल्या तीन अियत्तांतून 'हिंदुस्तानी' च्या नांवावर अुर्दू भाषेचा प्रचार सक्तीनें होतच आहे! याचें दुष्परिणाम कालांतरानें दिसूं लागतील. काँग्रेसमध्येंच या प्रश्नाबद्दल अेकमत नाहीं (हें मागील प्रश्नाच्या अुत्तरांत दाखविलें आहे) अशा स्थितींत हें हिंदुस्तानीचें खूळ काँ. सरकारनें सुरूं करावयाचे नव्हते! काँग्रेस ही संस्था असली तरी तो अेक पक्षच आहे. आतां स्वराज्य मिळालें आहे. यामुळें भाषेच्या प्रश्नावर काँग्रेसनें आग्रही अगर दुराग्रही धोरण ठेवणें अिष्ट नाहीं. आपल्या देशांत आज अशी परिस्थिति असल्यानें समर्थ अशा कोणत्याही राजकीय संस्थेनें आपलें बळ कोणत्याही पक्षाच्या बाजूनें खर्चणें अयोग्य आहे. बहुधा याच दृष्टीनें गांधीजींनी काँग्रेसद्वारा 'हिंदुस्तानी' चा प्रचार न करतां त्याकरितां 'हिंदुस्तानी प्रचार सभा' ही स्वतंत्र संस्था काढली असावी! पण हा त्यांचा विवेक त्यांच्या अनुयायांच्या लक्षांत आलेला दिसत नाहीं. महाराष्ट्रांतील अेका संस्थेला म. काँ. कमेटीनें पाठिंबा दिला यावरून असें म्हणावेसे वाटतें.

---

६. अनेक लिप्या नको

प्रश्न ६:—राष्ट्रभाषेला कांहींच्या मतें जर देवनागरी आणि अुर्दू अशा दोन लिप्या चालतात तर कानडी, गुजराथी, तेलगु आदि

लिप्यामधून ती भाषा लिहिली जाण्यास काय हरकत आहे ?

अुत्तर :—अेकदां अेक लिपीच्या सिद्धांतापासून आपण चळलों कीं असे प्रश्न अुद्भत होणारच. या दृष्टीनें हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा (हिंदुस्तानी नव्हे) आणि देवनागरी हीच राष्ट्र लिपि या सिद्धांतावरच राष्ट्रभाषेचें कार्य चाललें पाहिजे. अेक भाषेचा प्रचार हा सर्व भारतीय व्यवहारासाठीं आहे. केवळ बोलणें किंवा बोललेलें अैकणें अेवढ्यानें हा व्यवहार पुरा होत नाहीं. आंतरप्रांतीय प्रत्रव्यवहार, विज्ञापन, वृत्तपत्रें, ज्ञानप्रसार हा अेकलिपीवांचून सार्वत्रिक करतां येणार नाहीं. अेकाभाषेंत पण प्रत्येक प्रांताकरवी निरनिराळ्या लिपींत लिहून हा सर्व व्यवहार कसा करतां येअील ? प्रांतीय भाषांतील समाता पाहून त्या सर्वच देवनागरी लिपींतून लिहिल्या जाव्यात असा यत्न केला जावा असें लो. टिळकांनींही स. १९०६ मध्ये सांगितलें तें किती सार्थ होतें हें आज दृष्टोत्पत्तीस येत आहे. अेक लिपीचा प्रचार आज रूढ झाला असता तर राष्ट्रभाषेच्या स्वरूपाबद्दलचा आजचा वादही कदाचित अितका चिघळला नसता !

अेकापेक्षां अधिक लिप्यांचा राष्ट्रलिप्या म्हणून स्वीकार केला तर अेकापेक्षां अधिक भाषांचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करण्यास काय हरकत आहे अशी विचारसरणी निर्माण होअील, किंबहुना आजच ती निर्माण होअूं पहात आहे. रेडिओवरील हिंदुस्तानीच्या फारसीमय स्वरूपास वैतागून हिंदी आणि अुर्दू या भाषा स्वतंत्र समजून त्यांचे कार्यक्रम स्वतंत्रपणें व्हावेत अशी मागणी सरकारकडे होअूं लागली आहे. हें या वृत्तीचें द्योतक आहे ?

---

७. आशियाकरितां आशिया आणि अुर्दू लिपि

प्रश्न ७:—'आशियावासी लोकांकरितां आशिया' या राजकीय चळवळीस पोषक म्हणून अुर्दूस राष्ट्रलिपि केल्यानें सहाय्य मिळणार नाहीं काय ?

अुत्तर :—नाहीं. आशिया खंडांतील अफगाणिस्थान, अिराण

अरबस्थान, आदि देशांत अुर्दू '(फारसी) लिपीचा प्रचार असल्यामुळ या देशांशीं व्यवहार करणें सुलभ जाअील असें या प्रश्नकर्त्यास वाटत असावें. या देशांची अेक लिपि असली तरी भाषा निरनिराळ्या आहेत. त्यांतूनही तुर्कस्थान सारख्या देशांनीं रोमन लिपि स्वीकारली आहे, अिराणमध्यें फारसी लिपीविरुद्ध चळवळ चालू आहे. फारसी लिपीचे या देशांतूनच अुच्चाटन होण्याचा संभव असतां आपण तिला कां कवटाळावें ? अुलट आपला देश स्वतंत्र झाल्यानें त्याच्या वाढत्या वैभवापुढें अितर देशच नागरी लिपि स्वीकारण्यास (कारण ती वैज्ञानिक आहे) अुद्युक्त होतील असा अधिक संभव आहे. वरील प्राश्निकाच्या मतानें विचार केल्यास जपान आणि चीन या बौद्ध जगताशीं संबंध वाढविण्यासाठीं त्यांच्या चित्रलिपीचा राष्ट्रभाषेसाठीं आपणास स्वीकार करावा लागेल. ही चित्रलिपि जशी अवैज्ञानिक तशीच फारसीही ! चीनमधील मुसलमान या चित्रलिपींतच लिहितात-जसें बंगाली मुसलमान बंगाली लिपींत लिहितात तसें.कुराणांतील फारसी लिपीमुळे कांहीं चिनी मुसलमानांना ही लिपि येत असेल; पण त्यांच्या सोयीसाठीं आपण आपल्या राष्ट्रावर अनावश्यक लिपीचें ओझे टाकणें हें न्यायास धरून होणार नाहीं. राजनैतिक दृष्टचा अफगाणिस्थान, अिराण आदि दुर्बल राष्ट्रांचा आणि त्यांच्या दुर्बल लिपीचा स्वीकार करण्याचा विचार करणें सुद्धां गैरमुत्सद्देपणाचें होअील. आशियांतील रशियाशीं संधान वाढविणें हें अधिक शहाणपणाचें ठरेल, तसें करणें झाल्यास रूसी लिपीचा स्वीकार करावा लागेल !

---

८. हिंदी नांवांत संकुचितता नाहीं

प्रश्न ८. :—राष्ट्रभाषेस 'हिंदी' नांव दिलें तर घातक होअील कारण या शब्दामुळें अहिंदी प्रांतांत तरी 'हिंदुराष्ट्र' 'जातियता' 'संकुचितता' ही वृत्ति सूचित होते. 'हिंदुस्तानी' शब्दाच्या मागें हिंदीराष्ट्र, धर्मातीतवृत्ति, पुरोगामित्व ही वृत्ति सूचित होते. म्हणून 'हिंदुस्तानी' हें राष्ट्रभाषेचें नांव ठेवून राष्ट्रलिपि देवनागरी करावी'. मग 'हिंदी नांवाचा आग्रह कां ?

उत्तर :--अेखाद्यास 'मूर्ख' असें विशेषण आपण लावावयाचें नि मग तो मूर्ख कसा नाहीं हें सिद्ध करावयास त्यांस सांगावयाचें, असा हा प्रकार आहे.

'हिंदी' शब्दाच्या मागें 'हिंदुराष्ट्र' आदि कल्पना आहेत असें तुम्हांस कोणीं सांगितलें? हिंदुत्वनिष्ट हें हिंदीला राष्ट्रभाषा मानतात म्हणून कां असें तुम्ही मानता? अहिंदी प्रांताप्रमाणें हिंदी प्रांतांतील हिंदुत्वनिष्टही हिंदीलाच राष्ट्रभाषा मानतात, तुमच्या म्हणण्याप्रमाणें त्यामुळें हिंदुराष्ट्र अि. कल्पना अहिंदी प्रांतांतच मनांत येतात असें आपण कसें म्हणता? सं. प्रांतानें हिंदी भाषा राजभाषा केल्यानें स्वतःच्या समाधानासाठीं आपण ते प्रांत वगळतां वाटते? हिंदुत्वनिष्ट हें हिंदीच्या मागें 'संस्कृतनिष्ट' असें विशेषण लावतात, तेही हिंदुत्व-निष्टेसाठीं नसून आमची भाषा-अरबी फारसी-निष्ट हिंदी अथवा हिंदुस्तानी नाहीं हें दाखविण्यासाठीं होय. हिंदुत्वनिष्टांच्या मनांत नसणाऱ्या कल्पना हिंदी नांवास चिकटवून तुम्ही जर भाषेचीं नांवें बदलूं लागलांत तर प्रांतिक भाषांची नांवेंही बदलावी लागतील; कारण त्याही भाषा प्रांतांत राजभाषा व्हाव्या असे हिंदुत्वनिष्ट म्हणतात. अर्थात् त्यामागें हिंदुराष्ट्र अि. कल्पना येतात. 'हिंदी' हें नांव अितके प्राचीन आहे कीं, त्याचा अर्थ अलीकडील कांहीं आंदोलनानें बदलेल किंवा बदलला हें म्हणणेंसुद्धां चूक आहे.

या प्रश्नांत पक्षांचा अभिमान नको

आणखी अेक मुद्दा विचारणीय आहे. घटना परिषदेंतील कॉंग्रेस-पक्षाच्या बहुसंख्याक सभासदांनीं आपल्या समीतींत हिंदीला राष्ट्रभाषा नि नागरीला राष्ट्रलिपीचा मान दिला आहे. यामुळें अेक गोष्ट स्पष्ट झाली आहे कीं, हा प्रश्न कॉंग्रेस नि कॉंग्रेसेतर पक्षाच्या वादाचा नाहीं. अन्य पक्षांपैकीं हिंदुसभावादी किंवा कम्युनिस्ट हिंदीला राष्ट्रभाषा मानतात, म्हणून तिचा स्वीकार करूं नका असें कॉंग्रेसमधील हिंदुस्तानी गटानें म्हणणें म्हणजे राष्ट्रहितापेक्षां त्यांच्या मनांत पक्षद्वेष अधिक तीव्र आहे, असें म्हणावें लागते. भिन्न राजकीय पक्षांचें कोठल्याच पक्षांत अेकमत होअू नये असें कां या विरोधकांस म्हणावयाचें आहे? पुणें

विद्यापीठाला हिंदुसभावाद्यांचा पाठिंबा आहे, म्हणून तें विद्यापीठच नको, असें कां तुम्ही म्हणणार ? अशी विचारसरणी चुकीची आहे. आतां तुमच्या हिंदुस्तानी नांवासंबंधीं किती घोटाळे आहेत तें पहा.[1] तो शब्द अिंग्रजांनी रूढ केला तोही फूट पाडण्यासाठीं. मुसलमान तर त्यास अुर्दूचा पर्यायवाचीच मानतात. आणि गांधीजींच्या अलीकडील धोरणानें त्यांस किती तरी वेगवेगळे अर्थ अुत्पन्न झाले आहेत![2] यामुळें हिंदुस्तानी शब्द अुच्चारला कीं सर्व प्रांतांत त्याच्यामागें मुसलमानांचा अनुनय (जो अयशस्वी होअून पाकिस्तान स्थापन झालें), संस्कृत शब्दांचा बहिष्कार, परकीय शब्दांचा स्वीकार, नागरी-अुर्दू अशा दोन लिप्यांचा राष्ट्रलिप्या म्हणून स्वीकार अित्यादि अर्थ येअू लागले आहेत. या शब्दाच्या अर्थाचे आधुनिक प्रवर्तक गांधीजी आहेत नि त्यांनींच हें अर्थ अुत्पन्न केलें आहेत. तुमच्या म्हणण्याप्रमाणें हिंदुस्तानी नांव स्वीकारलें तर त्यांत पुरोगामित्वापेक्षां अितरच अर्थ (अनर्थ म्हणा हवे तर) अुत्पन्न होतात! तुम्ही तर 'हिंदुस्तानी' नांवाचा नि त्याबरोबर केवळ देवनागरीचा राष्ट्रलिपि म्हणून स्वीकार करून त्या शब्दाच्या अर्थांत आणखी गोंधळ अुत्पन्न करीत आहा.

नागरी लिपि 'हिंदुत्वनिष्ठ' नाहीं काय ?

तुम्ही देवनागरी लिपीस राष्ट्रलिपि मानता ना? अहो तिचाच आग्रह 'हिंदुत्वनिष्ट' ही धरतात, मग 'हिंदी भाषेच्या नांवाप्रमाणें या लिपीमागेंही 'हिंदुराष्ट्र' 'जातियता' आणि 'संकुचितता' येत नाहीं काय? तुमच्या सिद्धांताप्रमाणें या कल्पना येणारच. मग या लिपीचे नांव तुम्ही कां बदलत नाहीं ? या लिपींत लिहिल्यानें भाषेचें स्वरूप अुचित राहील असें तुम्हांस वाटतें ना ? पण भाषा नेहमीं लिहिली जात नाहीं, ती बोललीही जाते. नभोवाणीवरील तुमच्या हिंदुस्तानीचें काय रूप राहील ? तेथें लिहिण्याचा प्रश्न गौण आहे, म्हणून नागरी लिपि राष्ट्रलिपि मानून भाषेचें स्वरूप पूर्णपणें निश्चित होत नाहीं

१ पं. सातवळेकर भाषण—राष्ट्रभाषा परिषद अध्यक्ष १९४७.
२. प्रकरण ८ पहा.

हें ध्यानांत घ्या. गांधीजींची भूमिका चुकीची असली तरी त्यांची विचारसरणी निदान सुसंगत तरी आहे. 'राष्ट्रभाषा हिंदुस्तानी, राष्ट्र लिपि देवनागरी' ही घोषणा करून लोकांच्या गळी 'हिंदुस्तानी' तुम्हांस मारावयाची आहे. केवळ हिंदुसभाद्वेषाचा फायदा घेऊन तुम्हांस लोकांना फसवावयाचे आहे. या देशांत भाषेच्या प्रश्नावर दोनच पक्ष आहेत—अेक हिंदी व नागरीचा आणि दुसरा हिंदुस्तानी व दोन राष्ट्रलिप्यांचा. या दोनही पक्षांत जहाल-मवाळ आहेत, पण त्यांस महत्त्व नाहीं. गांधीजींच्या बाजूस लोकमत नाहीं असें वाटून तुम्ही भूमिका बदलत आहात.

९. हिंदी प्रांतिक भाषा असली तरी ती राष्ट्रभाषा होअू शकते

९. प्रश्न :—हिंदीभाषी प्रांतांत 'हिंदी' प्रांतिक भाषा रहावी, पण भारतीय भाषेपासून तिचें निराळेपण दाखविण्यासाठीं राष्ट्रभाषेचें नांव मात्र 'हिंदुस्तानी' ठेवावे.

अुत्तर :—हेंही चुकीचें आहे. अिग्लंडमधील अिंग्रजी भाषा येथें राजभाषा होती आणि अद्यापही तिचें नांव बदललें नाहीं, किंवा तुम्ही तसा आग्रह पूर्वी धरला नाहीं ! अमेरिकेंत हीच अिंग्रजी लोक-भाषा असतांही तिचें नांव अिंग्रजीच आहे. राष्ट्रभाषा ही कोठेंतरी प्रांतांत मातृभाषा असणारच, किंबहुना अनेक प्रांतांत तशी हिंदी आहे—बहुसंख्याकांची ती साहित्यिक भाषा आहे—म्हणून तर ती राष्ट्रभाषा आहे. प्रत्यक्ष तेथील लोकांच्या घरांतील बोली निराळ्या आहेतच.[1] पण त्या नसत्या तरी कांहीं बिघडत नव्हते. निराळे नांव कां घ्यावें तें तुम्ही सांगत नाहीं. अितर प्रांतीय भाषांचा परिणाम हिंदीवर झाला तरी तिचा मूळ सांचा तुम्ही बदलूं शकत नाहीं. अमेरिकेंत अिंग्रजीचें थोडें निराळेपण आहे, म्हणून त्या भाषेचें नांव कोणी बदलत नाहीं.

तुम्ही हिंदुस्तानी नांवाचा आग्रह धरता पण आतां देशास तरी हिंदु-स्थान हें नांव कोठें शिल्लक आहे? आपण हिंदुस्थानी हें भारतीय

१. प्रकरण १३–१. पहा.

नांव न देतां फारसी 'हिंदुस्तानी' असें कां म्हणता ? आतां संघराज्य आले आहे. 'भारत-संघ' असा Indian Union ला प्रतिशब्द होअील. त्या दृष्टीनें राष्ट्रभाषेला 'भारती' असें नांव दिल्यास चालेल, पण तिचें स्वरूप 'हिंदी'चे च राहील. "हमारी राष्ट्रभाषाका नाम हिंदी होना चाहिये और अुसकी **प्रवृत्तिभी हिंदी** यानी हिन्दकी होनी चाहिये।[1]" हिन्दी हा शब्द 'हिन्द की'–हिन्द या देशाची, या अर्थाचा आहे.

१०. हिंदी ही लोकनिष्ठ भाषा आहे

प्रश्न १०. :––राष्ट्रभाषा ही 'लोकनिष्ठ' पाहिजे, किंवा जनता-निष्ठ म्हणजे बहुजन समाजाची पाहिजे असें सांगितलें जातें. तशी हिंदी आहे काय ?

अुत्तर :––लोकनिष्ठ,जनतानिष्ठ,बहुजन समाजनिष्ठ म्हणजे सामान्य लोकांना, जनतेला, बहुजनांना समजणारी भाषा, म्हणजे सोपी भाषा. हिंदी ही भाषा अवघड नसतांना ती तशी आहे असें हिंदुस्तानीवाले भासवितात. तसेंच 'हिंदुस्तानी' अवघड भाषा असतांनी ती सोपी आहे म्हणून ती राष्ट्रभाषा करा असें हें लोक सांगतात. 'हिंदी'च्या मागील संस्कृतनिष्ठेला बागुलबोवा म्हणून हे लोक भितात. हिंदींत संस्कृत शब्द आले कीं ती अवघड झालीच हें म्हणणें चूक आहे. मराठींतही संस्कृत शब्द येतात नि येणारच. सामान्य व्यवहारांतही पंतप्रधान, प्रधानमंडळ, अन्नमंत्री, अुद्योगमंत्री असे शब्द येणारच. या अैवजीं अुर्दू शब्द वापरले तरच भाषा अवघड होणार, कारण ते मराठी किंवा अितर अन्य प्रांतीय भाषांना अपरिचित आहेत. असल्या अपरिचित शब्दांनीं भरलेली हिंदुस्तानी 'लोकनिष्ठ' किंवा सोपी कशी असणार ?

साध्या व्याकरणाच्या परिभाषेचे अुदाहरण घ्या. वाक्य, नाम, विशेषण, व्याकरण हें शब्द सोपे कां जुम्ला, अिस्म, सिफत, कवायाद् हे शब्द सोपे ? मुंबई सरकारच्या लोकनिष्ठ 'हिंदुस्तानीची' शालेय पुस्तकें म्हणजे अुर्दूचीच पुस्तकें आहेत ! हिंदी जर 'लोकनिष्ठ' नसती तर संयुक्त प्रांत सरकारनें ती राजभाषा कां ठरविली असती?

---

१. पराडकर–सभापति भाषण–शिमला सं. १९९५.

११. हिं. सा. सम्मेलन प्रांतीय नाहीं

प्रश्न ११. :--हिंदी साहित्य सम्मेलन म्हणजे प्रांतीय सम्मेलन, तें कसला राष्ट्रभाषेचा प्रचार करणार ?

अुत्तर :--हिं. सा. सम्मेलन ही केवळ प्रांतीय भाषिकांची संस्था नाहीं. हिंदी भाषा ही पंजाब, सं. प्रांत, बिहार, मध्यप्रांत अि. अनेक प्रांतांत व्यवहारभाषा असल्यानें सम्मेलनाचें मूळचें क्षेत्र व्यापक आहे. सम्मेलनाच्या स्थापनेपासून राष्ट्रभाषा हिंदीचा भारतभर प्रचार हा अुद्देश हिं. सम्मेलन नि नागरी प्रचारिणी सभेचाही आहे. या संस्थांच्या संघटनेमध्यें (स्थायीसमिति अि. मध्यें) अन्य भाषिकांना (हिंदी येत नसलें तरी), प्रथमपासूनच स्थान आहे. अि. स. १९४२ पर्यंत तर सम्मेलनावर हा आक्षेप कोणीच घेतला नव्हता ! या वेळीं गांधीजी त्यांतून निघाले तरी त्यांनींही 'सम्मेलन भारतीय नाहीं, तें प्रांतीयच आहे' असें कधींच म्हटलें नाहीं. लिपि नि भाषा यांच्या धोरणांत मतभेद झाल्यानें ते बाजूस सरले ! पण त्यामुळें सम्मेलनाचें कार्य नि स्वरूप हें कांहीं प्रांतीय होअू शकत नाहीं ! अनभिज्ञ लोकांपुढें हिं. सा. सम्मेलनाच्या कार्याची थोरवी कमी करण्यासाठीं हा खोटा आरोप घेतला जातो.

१२. अुर्दू न येणारा 'अर्ध राष्ट्रीय' नाहीं.

प्रश्न १२. :--हिंदी किंवा अुर्दू यापैकीं अेक भाषा येणारा तो अर्धराष्ट्रीय नि दोन्ही भाषा येणारा पूर्ण राष्ट्रीय असें कां म्हटले जाते ?

अुत्तर:—जे लोक हिंदी–अुर्दू—हिंदुस्तानी ही राष्ट्रभाषा करा असें म्हणतात, तें आपलें म्हणणें लोकांच्या गळी अुतरविण्यासाठीं असें सांगतात. पण त्यांचा हा सिद्धांतच कसा चुकीचा आहे हें माननीय टंडनजींनीं मुंबअीस भरलेल्या हिं.सा. सम्मेलनाच्या अधिवेशनांत स्पष्ट केले : "लो. टिळकांना अुर्दू किंवा हिंदी येत नव्हते, म्हणून ते काय अराष्ट्रीय होते ? म. गांधींना अुर्दू येत नाहीं, मग ते अर्धराष्ट्रीय आहेत काय ? मौ. आझादांना हिंदी येत नाहीं, म्हणून ते अर्धराष्ट्रीय आहेत काय ? भाषाज्ञानावर राष्ट्रीयत्व अवलंबून नसून तें मनोवृत्तीवर नि विचारावर आहे."

असला कोटीक्रम करून भोळ्या लोकांना फसविणें हें कार्य मात्र अराष्ट्रीय आहे.

---

१५ : : : अुपसंहार

हिंदी भाषा–प्रचार–क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचा व्यामोह आणि नागरिकांच्या मनांतील राष्ट्रभाषेसंबंधींच्या शंका यांचा निरास करण्याचा यत्न या ग्रन्थांत केला आहे. ' अुर्दू 'ला राष्ट्रभाषा मानणारे हे स्वतःला परकीय समजत होते, शेवटीं त्यांनीं आपलें स्वतंत्र राष्ट्र निर्माण केलें ! राष्ट्रभाषेचा वाद हा त्या पाकिस्तानवाद्यांत नव्हता आणि आज नाहीं. मात्र आमच्या राष्ट्रांत श्री. ग्रेलव्हीसारखे राष्ट्रीय मुसलमान अुर्दूचाच पाठपुरावा करीत आहेत. यामुळें राष्ट्रभाषेच्या नांवाचा, स्वरूपाचा नि लिपीचा वाद हा आम्हां भारतीयांत किंवा खरें म्हटलें तर मुसलमानेतरांमध्येंच चालू आहे. यासाठीं निसर्गसिद्ध देशाचे दोन तुकडे होण्यापूर्वीं आणि झाल्यावरही निसर्गसिद्ध राष्ट्रभाषा हिंदीचे रूप टाकून, तें मिश्रित करण्यासाठीं यत्न करण्याचें धोरण कसें अयोग्य आहे हें या पुस्तकांत साधार दाखविलें आहे.

अिंग्रजी ही विदेशी नि परकीय राज्याची वारस असल्यानें आमची राष्ट्रभाषा होअूंच शकत नाहीं. 'हिंदुस्तानी ' ही दोन संस्कृतींचा समन्वय करणारी भाषा नसून परकीय संस्कृतीच्या आहारी नेणारी भाषा आहे. अशी मिश्रित भाषा अस्तित्वांत नसून तिचें साहित्यिकरूप अुर्दूमय होतें हें अनुभवास आलेलें आहे. अपूर्ण फारसी लिपीचा नि परकीय शब्दावलीचा आश्रय तिला पाहिजे आहे, म्हणून ती आमची राष्ट्रभाषा नाहीं. अुर्दू भाषा, भिन्न संस्कृति वाढविणारी, अेक राष्ट्रीयत्वास मारणारी, परकीय शब्द नि कल्पना आग्रहानें योजणारी, विदेशी नि अपूर्ण लिपींत लिहिली जाणारी भाषा असल्यानें तिलाही राष्ट्रभाषेचें स्थान मिळणार नाहीं.

स्वीत्झरलंड–कॅनडाप्रमाणें २–३ राजभाषा या देशांत असणें कां शक्य नाहीं याचा विचार पूर्वीं केला आहे (पृ. १३). आमच्या देशाशीं विस्तारानें कांहींसा बरोबरी करणारा देश म्हणजे सोव्हिएट

रशिया होय. या संघराज्यांत ६६ भाषा आहेत, त्यांतील ५० भाषांचें रूसी भाषेशीं साम्य नाहीं, तरीसुद्धां सोव्हिएतसंघाची राष्ट्रभाषा रूसी ठरविण्यांत आली, कारण तीच बहुसंख्याकांची भाषा आहे. हिन्दी ही बहुसंख्याकांची भाषा आहे, प्रांतिक भाषेशी तिचें शब्दावलींत आणि वर्णमालेंत साम्य आहे; अुर्दूशी सुद्धां क्रियापदें आणि प्रत्यय यांच्याशीं तिची समानता आहे. यामुळें हिंदी भाषा हीच आमची राष्ट्रभाषा आहे; आणि तिची नागरी लिपि ही सर्व गुण 'आगरी' असल्यानें आमची राष्ट्रलिपि आहे.

भारत वर्षाची राष्ट्रभाषा हिंदी आणि राष्ट्रलिपि नागरी आहे, हें आमच्या साधूसंतांनीं वाद न करतां पूर्वींच ठरवून टाकलें आहे. या साधूपैकीं अेकानें अि. स. १८०९त सोवियत मधील बाकू नगरामध्यें अेका मंदिरावर हिंदीत लेख कोरविला आहे! *राष्ट्रभाषेचें स्वरूप हें भारतीयत्वास पोषक असेल तरच राष्ट्रीय अैक्य टिकेल. राष्ट्राचें सांस्कृतिक अैक्य वाढण्यास नि टिकविण्यास भाषा हें मुख्य साधन आहे. अभारतीयत्वाच्या विचारांची पेरणी करणाऱ्या भाषेस, राष्ट्रभाषेचें स्थान देणें देणें हें द्विराष्ट्रवादाला अुत्तेजक आहे. भाषेचें द्वैत अुत्पन्न झाले तर शेवटीं पृथक् राज्य स्थापण्याची पाळी येते, याचें अुदाहरण आपणापुढें आहे. या दृष्टीनें आमच्या देशाची राष्ट्रभाषा हिंदी आणि तिची लिपि नागरी हीच राष्ट्रलिपी आहे, हें स्वयंसिद्ध आहे.

प्रांतिक भाषासुद्धां नागरी लिपींत लिहिण्याचा प्रचार झाला तर प्रांतिय भेद कमी होअू लागतील. नागरी ही केवळ राष्ट्रभाषेची लिपि न राहतां राष्ट्रांतील सर्व भाषांची–अुर्दूचीसुद्धां–लिपि म्हणून अुपयोगांत आणणें आवश्यक नि श्रेयस्कर आहे. अेक लिपीच्या प्रचारावर भर दिला तर आपोआपच या भाषांत आधींच असलेले पारिभाषिक शब्दांचें साम्य वाढेल नि भिन्नभिन्न प्रांतीयांचे विचार अेकमेकांस कळतील. सयाम, लंका, आदि देशांत या शास्त्रशुद्ध लिपीचा प्रचार होअील आणि अशोककालीन सांस्कृतिक प्रचाराप्रमाणें भारताचें तेज पुनः अेकदा भारताबाहेर पसरेल!

*महा. पं. राहुल, भाषण: सभापति हिं. सा. सम्मेलन १९४७ डिसें. मुंबअी.

भाषेच्या प्रश्नाचा विचार करतांना, राष्ट्राच्या दीर्घ अितिहासांत क्षणिक महत्त्वाच्या असणाऱ्या राजकीय पक्षभिमानापासून दूर राहणें हें नेत्यांचें कर्तव्य आहे. देहांत जें आत्म्याचें स्थान तें देशांत भाषेचें स्थान होय. राजकीय पक्ष पूर्वीं होते ते आज नाहींत, आजचे पक्ष आहेत ते कांहीं वर्षांनीं बदलतील किंवा त्यांचीं कार्यें भिन्न होतील, पण भाषेचा विकास हा त्यांच्या राजनैतिक धोरणाप्रमाणें बदलणारा नव्हे. सर्वच पक्षांच्या—मग ते राजकीय असोत कीं शैक्षणिक असोत—मालकीचा जसा देश, तशीच त्याची भाषा. त्या संबंधांत राजकीय पक्षांनीं अभिमानास बळी पडूं नये, ती गोष्ट पक्षातीत ठेवावी यांत राष्ट्राचें खरें कल्याण आहे. ही वृत्ति आमचे सध्याचे केंद्रीय सरकार व्यक्त करील काय ? असें झालें तर 'आमची राष्ट्रभाषा हिंदी आणि आमची राष्ट्रलिपि देवनागरी' ही घोषणा घटनासमिति निःसंशय करील. ही घोषणा झाली कीं राजकीय क्षेत्राखेरीज अन्य क्षेत्रांतही या हिंदी नि नागरीचा प्रवेश द्रुतगतीनें होअील. हिंदी भाषा लोकसुलभ असल्यानें स्वभावतःच तिचें असलेले राष्ट्रभाषा नि राष्ट्रलिपिपद वैध रीतीनें तिला मिळेल. हा मंगल दिवस लवकर यावा अशी आपण अिच्छा करूंया.

परिशिष्टें १-७

१. हिंदीपासून अुर्दू भिन्न

(हिं. सा. सम्मेलन संवत् १९९८ (डिसेंबर १९४१) ३० वे अधि-वेशन-अबोहर येथें स्वीकृत प्रस्ताव)

'हिंदी और हिंदुस्तानी शब्दों के प्रयोग के बारे में हिदी साहित्य सम्मेलन और अुसकी समितियों की, विशेषकर अुसकी राष्ट्रभाषा प्रचार समिति की क्या नीति है अुस विषयमें कुछ भ्रम अुपस्थित हुआ है और कथनोपकथन प्रकाशित हुए हैं। अिसलिये अपनी नीति का स्पष्टीकरण करने के हेतु सम्मेलन निम्नलिखित घोषणा करता है—

(१) प्रारंभ से ही सम्मेलन ने अपनी भाषा और राष्ट्रभाषा को हिन्दी कहा हैं और अुस भाषा तथा नागरी लिपिकी अुन्नति और प्रचार ही अुसका अुद्देश्य रहा है। द्वितीय हिन्दी साहित्य सम्मेलन में जो पहिली नियमावली प्रयागमें स्वीकृत हुअी अुसमें, तथा अुसके पश्चात् अबतक जितने भी संशोधन अुसनियमावली में हुअे हैं, अुन सब से यह प्रकट हैं कि सम्मेलनकी भाषा का नाम हिन्दी है— यद्यपि साहित्यिक अथवा प्रचारक की दृष्टि और स्थनोंकी विभिन्नता के कारण अुसके रूप में शब्दावली का कुछ अन्तर होना स्वाभाविक है।

(२) वास्तवमें अुर्दू भी हिन्दी से अुत्पन्न अरबी फारसी मिश्रित अेक रूप है। हिन्दी शब्द के भीतर अैतिहासिक दृष्टि से अुर्दू का समावेश है, किन्तु अुर्दू की साहित्यिक शैली, जो थोडे से आदमियों में सीमित है, हिन्दी से अिस समय अितनी विभिन्न हो गअी है कि अुसकी पृथक् स्थिति सम्मेलन स्वीकार करता है और हिन्दी की शैली से अिसे भिन्न मानता है।

(३) 'हिन्दुस्थानी या हिन्दुस्तानी शब्दका प्रयोग मुख्यकर अिस लिअे हुआ करता है कि वह देशी शब्दव्यवहार से प्रभावित दिन्दी शैली

तथा अरबी फारसी शब्द व्यवहार से प्रभावित अुर्दू शैली दोनों का अेक शब्द से एक समय में निर्देश करे। कॉंग्रेस, हिदुस्तानी अॅकेडेमी और कुछ गव्हर्नमेंट विभागों में अिस अर्थ में प्रयोग हुआ है और होता है। कुछ लोग अिस शब्द का प्रयोग अुस प्रकार की भाषा के लिअे भी करते हैं जिसमे हिन्दी और अुर्दू शैलियों का मिश्रण हो।

अिस प्रकार निश्चित अर्थों में अुर्दू और हिंदुस्तानी शब्दों का प्रचलन है। अिस विषय में सम्मेलन का कोअी विरोध नहीं है, किन्तु सम्मेलन साहित्यिक और राष्ट्रीय, दोनों दृष्टियों से, अपने और अपनी समितियों के काम में हिन्दी शैली की और अुसके लिये हिन्दी शब्दकाही व्यवहार और प्रचार करता है।

(४) राष्ट्रीय सजगता के विस्तार और राष्ट्रीय भावना के उत्थान के साथ-साथ हिन्दी का राष्ट्रीय रूप, दिन-दिन विकसित हो रहा है। भिन्न-भिन्न प्रान्तों से आये हुअे तथा भिन्न-भिन्न प्रभावों से अुत्पादित नये शब्दों का भी अुसमें धीरे-धीरे स्वभावतः समावेश होगा। जीवित, क्रियाशील तथा हिन्दी की सार्वभौमिक प्रतिनिधिसंस्थाके कर्तव्यपालन में सम्मेलन, अिस विकास का आवाहन और स्वागत करता है।

(५) राष्ट्र-भाषा होने का कारण प्राचीन समय से हिन्दी सब प्रान्तीय भाषाओं की बड़ी बहन है, अुसके और अुसकी छोटी बहनों के स्वरूपों में माता का अमर सौंदर्य झलकता है। बहने एक दुसरे के रूप में अपना रूप भी देखती है। अुनका अपना घर सब बहनों के लिअे खुला है और अुसके घर में ही सब बहनों को आपस में मिलने और मिलकर राष्ट्रोपासना की सुविधा है।

सच्ची राष्ट्रीय भावनाओं से प्रेरित सब देशभक्तों से सम्मेलन अनुरोध करता है कि राष्ट्रीय उत्थान, संघटन और अेकीकरण में भाषा की शक्ति का अनुभव कर वे राष्ट्र-भाषा हिन्दी के प्रयोग और प्रचार में निष्ठा और दृढता से सलग्न हों।

———

२. राष्ट्रभाषा कोणती होअू शकते ?

१. राष्ट्रभाषा वही भाषा हो सकती है जिसका उद्गम अुसी देशमें हुआ हो। जो विदेशसे लायी गअी न हो।

२. राष्ट्रभाषा अुसे स्वीकार किया जा सकता है अिसके बोलने या समझनेवालोंकी संख्या अन्य भाषाभाषियोंसे कही अधिक हो।

३. राष्ट्रभाषा अुसे माना जा सकता है जिसका अुस राष्ट्र की संस्कृति तथा साहित्यसे विशेष संबंध हो।

४. अंग्रेजी विदेशी भाषा है। अुसके समझनेवालोंकी संख्या नगण्य है। वह राष्ट्रभाषा नहीं हो सकती। भारतकी सब भाषाओंका सम्बध संस्कृतसे हैं। बंगाली, गुजराती, मराठी, पंजाबी, मारवाडी ही नहीं, अपितु, कन्नडी, मल्यालम, तिलगू, तामिल आदिभी संस्कृतनिष्ठ हैं। अरबी फारसीसे अुनका रत्तीभर भी सम्बध नही है।

५ सन् १९४१ के आंकडो के अनुसार भारतमें भिन्नभिन्न भाषाअें बोलनेवालोंकी संख्या निम्न है:–

हिंदी	२३ करोड ९३ लाख
बंगला	४ करोड ९३ लाख
तेलगू	२ करोड ३६ लाख
मराठी	१ करोड ८८ लाख
तामिल	१ करोड ८८ लाख
कन्नडी	१ करोड ३ लाख
अुड़ियां	१ करोड १ लाख
गुजराथी	९६ लाख
अंग्रेजी	३ लाख

अिस प्रकार हिन्दी ही राष्ट्रभाषा होनेका दावा कर सकती है।

—[नेताओं की कलमसे, पुस्तकांतील मलपृष्टावरून.]

३. मराठी-हिंदीचें शब्दसाम्य

[मराठी आणि हिंदी वाक्यांत शब्दसाम्य कसें असते त्याचें सहज ध्यानांत आलेलें अुदाहरण पुढें दिलें आहे. क्रियापदांचीं रूपें करण्याची रीत आणि विभक्तिप्रत्यय हें मुख्य भेद, या दोन भाषांत आहेत. ज्या कवितांच्या ओळींत पुष्कळ वेळां अध्याहृत कियापदें आणि प्रत्यय घ्यावे लागतात किंवा मूळ क्रियापदें सारखी असतात त्या कविता दोन्ही भाषीयांना समजल्याच पाहिजेत. हिंदीचें आणि इतर प्रांतीय भाषांचें ह्या बाबतचें नातें असेंच जवळचें आहे.]

हिंदी

अेक भरोसो

गोधन, गजधन, बाजिधन और रतनधन–खान
जब आवत संतोष धन, सब धन धूरिसमान ॥ १ ॥
अेक भरोसो, अेकबल, अेक आस, विश्वास
स्वति–सलिल, रघुनाथ जस, चातक **तुलसीदास** ॥ २ ॥

* * *

मराठी

अेकतेचा मंत्र

अेक देव, अेक देश, अेक आशा
अेक जाति, अेक जीव अेक भाषा ॥
—वीर सावरकर

* * *

बंगाली

सरल हिंदुस्थानीर तुलना बांगला अपेक्षाकृत कठिन भाषा, बांगलीर व्याकरण सरल, किन्तु इहार वाक्यभंगी, इहार साधु ओ चलित दुइ रूप एवं इहार उच्चारणरीति बांगला भाषाके अ–बांगालीर पक्षें नितान्त दुरधिगम्य.

—सुनीतिकुमार चतर्जी–वंगीय सा. सम्मेलन, अध्यक्षपद आक्टो. १९३९.

४. भारतीय भाषांचें नागरींत लेखन

[नमुन्यासाठीं म्हणून आपल्या देशांतील भाषांमधील तोच मजकूर नागरी लिपींत लिहून पुढें दिला आहे. नागरीलेखनाची अिष्टता आणि प्रांतिक भाषांतील शब्दसाम्य कळण्यासही त्याचा अुपयोग होअील.

वर्धा, राष्ट्रभाषा प्रचार समिति आपल्या परीक्षांत मातृभाषांतून हिंदींत अनुवाद करण्यासाठीं जे अुतारे देते ते नागरी लिपींत छापलेले असतात. त्यापैकीं परिचय परीक्षेंतील ८–२–४२च्या प्रश्न पत्रांतून पुढील वाक्यें येथें अुधृत केली आहेत.]

असमिया

ऐअि टो सुखर कथा ये आजि आमि देशर सहस्र प्रानिर सुख दुखक निजर सुख दुख बुलि जानिबलै सक्षम हैछो। आजि आमि देशर सेवात तन, मन, धन लगाअि दिबलै आग बाढिछो।

* * *

मणिपुरी

हौजिक की मतमदा अैखोअिना देशगी मी लिशिं लिशिंगी अवाबा नुङ्गाअिबवु अिशागी अवाबा नुङ्गाअिबा ओअिना खनबा हौबा असि नुङ्गाअिबा वानि। हौजिक मतमदा अैखोअिना देशगी सेवात् हकचां, पुकनिं, लल हापननबगी दमक मांदा चत् खत् लकलि।

* * *

बंगला

आनदेर कथा जे आमरा देशेर लक्ष लक्ष प्राणीदेर सुख दुःखके निजेर सुखदुःख मने करि। आजके आमरा देशेर सेवाय तन, मन, धन दिते अग्रसर हअिते छि।

* * *

अुडिया

अेहा सुखर कथा जे, आजि आमे देशर हजार-हजार प्राणीक सुख

दुःखकु निजर सुखदुःख मने करिबाकु आरम्भ करिछु। आजि आमे देशर सेवारे शरीर, मन ओ धन लगाअि देबापाअिं अग्रसर हेअुअछुं

*　*　*

नेपाली

यो हर्ष को कुरा हो कि आजु हामि ले देश का सहस्र सहस्र प्राणी हरु का सुख-दुःख लाअि आफ्ना सुख-दुःख बुझ्नो थालै। आजु हामि देश का सेवा मा तन, मन, धन लगाअुन् लागि आगे बडिन्द छौ।

*　*　*

सिंधि

अिहा खुशीअ जी गाल्हि आहे जो अजु असां देश जे हजारें प्रेमियुनि जे दुख सुख के पंहजो दुखु सुखु समुझणु शुरू कयो आहे। अजु असीं देश जे वास्ते तनु मनु धनु लगाअिण लाअि अगूते वधी रह्या आह्यूं।

*　*　*

मराठी

ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे कीं आज आम्हांला देशांतील सहस्रावधि लोकांचें सुखदुःख आपलें सुखदुःख वाटूं लागलें आहे. आणि आज आम्ही देशाची सेवा तन-मन-धनानें करावयास कटिबद्ध झालों आहों.

*　*　*

गुजराती

आनंदनी वात छे के आजे आपणे देशना हजारो जीवोनां सुख दुःख पोतानां मानता थया छीये. आजे आपणे देशनी सेवामां तन, मन अने घनथी आगळ वधी रह्या छीये.

*　*　*

तेलगू

अदि चाला संतोषकरमैन विषयमु, नेडु मनमु देशमुयोक्क वंदलकोलादि प्राणुलयोक्क सुखदुःखमुलन् मनसुख-दुःखमुलगा तलंचुट प्रारं-

भिचितिमि. नेडु मनमु देशमुयोक्क सेवलो यावत्तु धनमुनु यावत्तु शरीरमु यावत्तु मनस्सु अेकमुगाचेसि मुंदंजिवेयु चुन्नामु.

*　*　*

तामीळ

देशत्तिन कोडी कणक्कान जनंगळीन सुख दुःखम नमदेन भाविप्पदु मीक्क संदोषकर मान विषयम । अिन्ड्रु देश सेवयिल मनम-पोरुळ कायम मून्ड्रु म अीडु पडुत्त मुन वहगिरोम ।

*　*　*

कन्नड

अिदु नावु सविरारु प्राणिगळ सुखदुखवन्नु नम्मदेंदु तिळियलु प्रारंभिसिद्देवे। अिदु आनंदद मातिदे । अिदु नावु देश सेवेगागि तन, मन, धनवन्नु कोडुवदक्कामि मुंदे बरतोड़गिद्देवे ।

*　*　*

मलयाळम्

अिन्नु नाम देशत्तिटे आयरिक्कणक्काय प्राणिकळूटे सुखदुःखत्ते नम्मुटे सुखदुःखमाणेन्नु करुत्तुवान तुटंगि यिरिक्कुन्नु येन्नु वळरे संतोषमुंडु । अिन्नु नाम देशसेवयिल देहवुं मनसुं धनवुं जिलवाक्कुवान वेंटि मुन्नोटु पोरुन्नू ।

---

५. राष्ट्रभाषा के नौ सूत्र

[जयपूर सम्मेलनाच्या राष्ट्रभाषा परिषदेचे अध्यक्ष श्री. कन्हैयालाल मुंशीजी (गुजरातीचे यशस्वी साहित्यिक आणि मुंबई सरकारचे भूतपूर्व कॉंग्रेसी गृहसचीव) यांच्या भाषणांतून पुढील उतारा दिला आहे.]

(१) अत्यन्त प्राचीन कालसे कृष्णाके अुत्तरवर्ती समस्त भारतमें अुसी भाषाके विभिन्नरूप प्रयुक्त किये जाते थे, जिसका पूर्ण विकसित स्वरूप मध्य देशकी बोलचाल की भाषामें पाया जाता था ।

(२) अितिहासके प्रारंभसेही मध्यदेश भारतीय, राजनैतिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनमें अत्यन्त ही महत्त्वपूर्ण रहा है।

(३) मध्यदेशकी सर्वप्रथम बोलीने संस्कृतकेरूपमें संस्कृतके पूर्ण विकास प्राप्त किया और अिसीलिये मध्यदेशकी बोलियोंमें संस्कृतके साथ सर्वाधिक समानता थी।

(४) अी. स. १३०० तक संस्कृत राजभाषा व समस्त भारत के लिये सांस्कृतिक व्यवहार की भाषा थी और दक्षिणमें तो और दो सौ वर्षतक यह शिष्टसमाजकी भाषा रही।

(५) आज वह पूर्णतया राष्ट्रभाषा हो सकती है यदि राष्ट्रभाषसे अुस भाषाका तात्पर्य हो जिसकी सांस्कृतिक प्रेरणा भारतके लोगोंको अेकताके बन्धनमें बाँध दे।

(६) १९३१ की मनुष्य–गणना के अनुसार भारत और ब्रह्म-देशमें ३४९८८८००० व्यक्ति भारतीय भाषाओंका प्रयोग करने वाले थे। अुनमेंसे २५३७१२००० संस्कृत परिवारकी भाषाअें बोलने वाले ४६७१८००० संस्कृतप्रधान द्रविड भाषाओंके बोलनेवाले, २१४१२००० संस्कृतमिश्रित द्रविड भाषाओं के बोलने वाले थे।

(७) संस्कृतके प्रभाव व मध्यदेशकी भाषासे अुसकी निकट समानताके कारण वह भाषा कृष्णानदीके अुत्तरवर्ती भारतके व्यवहारका नैसर्गिक माध्यम बन गयी है।

(८) आधुनिक हिंदी मध्यदेशकी प्राचीनतम भाषाकी उत्तरोत्तर वृद्धिगत अत्रुटित प्रणालिकामें विकसित हुअी है व अिसके शब्दकोशका प्रयोग उत्तर भारत की सब भाषाओंद्वारा किया जाता है, जिन्होंने युगप्रतियुगमें संस्कृत शब्दों द्वारा अपनेको समृद्ध बनाया है।

(९) अतः हिन्दीको "राष्ट्रभाषा" बनानेकी अवश्यकता नहीं है, वह तो पहलेहीसे है।

---

६. भाषाशुद्धीच्या मर्यादा

[हिंदी प्रचार संघ, पुणें या संस्थेच्या वार्षिक सम्मेलन प्रसंगीं इ. स. १९४२) अध्यक्ष म्हणून स्वा. वीर सावरकरांनी भाषण केलें त्यांतील उतारा]

...अरबी, फारसी, अंग्रेजी आदि बहुतसे शब्द हमारी भाषामें आगये हैं, अुन्हें हमने पचा लिया है। अब 'बूट' शब्द लीजिये! अुसकेलिये दूसरा शब्द ले लिया तो भी वह अर्थ नहीं निकल सकता। तो बूट हम रहने देंगे। जिलेबी, गुलाब आदि शब्द हमारी भाषामें वैसेहि रहेंगे। किन्तु माता, जननी, माअी, माँ आदि शब्दोंके प्रचलित होते हुअे भी यदि कोअी 'मदर' कहे तो भाषा शुद्धिके नाते हमें अुस शब्दको हटा देना होगा। हमारी संस्कृतनिष्ठ हिन्दी भाषा का घर चारों ओर से सुरक्षित चाहिये। अुसकी दिवारों में दरवाजा, खिडकी आदि की आवश्यकता है। क्योंकि बाहरी हवा भीतर आनी चाहिये; किन्तु अुलके द्वारपर वैशम्पायनजी जैसा संस्कृतनिष्ठ प्रहरी भी चाहिये। संस्कृतनिष्ठ हिन्दी का घर, घर ही रहना चाहिये। बाहरी शब्दोंके मुक्त स्वागत के लिये अुसकी चारों दिवारों को गिराकर हमें अुसे मैदान नहीं बना देना चाहिये।

नये शब्दोंके गठन के लिये विद्वानोंकी हरसमय आवश्यकता नहीं होती। नयी चीज देखकर जो विचार मनमें आते हैं, अुन्हीसे शब्द बनकर मुखसे झट ही बाहेर निकल आते हैं। अंग्रेजोंके आनेके बाद 'रेल्वेट्रेन' यहाँ आ गयी। लोगों ने सोचा कि अिस गाडी के लिये न बैल चाहिये न घोडा, तो यह चलती है, दौडती है कैसे? लोगों ने देखा कि अिसमें आग है। बस, झट से 'आगगाडी' शब्द बन गया। यह शब्द देहाती लोगों ने ही बना डाला है। कुछ लोग कहते हैं कि अन्य भाषाओं के शब्द लेने से अपनी भाषा 'रिच' बन जाती है और दूसरी भाषा के शब्दों के बहिष्कार से अपनी भाषा संकुचित हो जायगी। मैं अिन लोगों की बात मानता हूँ। लेकिन संतान राष्ट्र की सम्पत्ति है, यह जानते हुअे भी यदि कोअी अपने पुत्रको मारकर

दूसरे को 'दत्तक' लेकर अपनी सन्तानको बढाने लगे तो अुसे आप क्या कहेंगे? यही बात भाषा के बारे में भी है। अपने शब्दों को भुलाकर दूसरी भाषा के शब्दों को लेकर कोअी भाषा कभी 'रिच' नहीं हो सकती। –हिन्दी, काशी, सितंबर १९४२

---

७. संदर्भ ग्रंथ

हिंदी—१. राष्ट्रभाषाका प्रश्न–ले. म. गांधींजी. २. हिंदी-अुर्दू और हिंदुस्तानी–ले. स्व. पं. पद्मसिंहशर्मा, प्रकाशक–हिंदुस्तानी अकॅडमी, अलहाबाद. ३. राष्ट्रभाषाकी समस्या और हिंदुस्तानी आंदोलन–ले. पं. रविशंकर शुक्ल. ४. मुगलोकी हिंदी, ५. भाषाका प्रश्न, ६ अुर्दू की जबान, ७. हिंदुस्तानी की हिमायत क्यों–ले. पं. चंद्रबली पांडे एम्. ए. प्रकाशक, नागरी प्रचारिणी सभा काशी. ८. हिंदुस्तानी का अुद्गम–ले. स्व. पं रामचंद्र शुक्ल. ९. भाषाकी शिक्षा–ले. पं. सिताराम चतुर्वेदी, अेम्. अे. अि. और पं. शिवप्रसाद मिश्र. १०. मातृभाषा की महत्ता–ले. सैयद अमीर अली 'मीर'

हिंदुस्तानी—हिंदुस्तानी–मक्तबा जामिया देहली (ऑल इंडिया रेडियोकी इजाजतसे)

अुर्दू—१. मुल्ककी जबान और फाजिल मुसलमान–प्रकाशक नागरी प्रचारिणी सभा,

इंग्रजी:—1. **Indo Aryan & Hindi** by Dr. Sunitikumar Chatarji, Published by Gujarat Vernacular Society, Ahamedabad.

2. **Language problem of India**–Pamphlets by Dr. Raghuvir, Published by Saraswati Vihar, New Delhi.

3. **National Language for India**–edited by Z. A. Ahamad, published by Kitabistan, Allahabad.

4. Marxist Miscellany, Volume (iv) Peoples Publishing House, 190–B, Khetawadi, Main Road, Bombay.

5. Anti–Hindu Policy of All India Radio by Ravi Shankar Shukla, Publishcd by Ganga Pustakamala Karyalaya, Lucknow.

अन्य--'हिंदी' मासिकाचे अनेक अंक, हिं. सा. संम्मेलन नि परिषदांच्या अध्यक्षांचीं भाषणें, मराठी, हिंदी, इंग्रजी मासिकें नि वृत्तपत्रें.
